**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष )**

**स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आम्ही स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. आपण आमचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी विनंती आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. तारांकित प्रश्न हे महत्त्वाचे आयुध आहे. मात्र त्यापेक्षाही महत्त्वाचे आयुध हरकतीचा मुद्दा हे आहे. सभागृहाच्या पावित्र्याबाबत, उत्तरदायित्व या बाबत जेव्हा एखादा प्रश्न निर्माण होतो..... आम्ही महत्त्वाच्या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. हा विषय सभागृहाच्या अधिकाराचा आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या संरक्षणाचा आहे. या संदर्भात आम्हाला आमचे मत मांडावयाचे आहे.या करिता आम्ही आपली अनुमती मागत आहोत. आपण आपली भूमिका सांगावी. आम्हाला हा विषय कधी मांडू दिला जाणार आहे ?

**उपाध्यक्ष :** प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण विचार करु.

------

असुधारित प्रत

**पृ.शी /मु.शी : तोंडी उत्तरे**

**राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्याबाबत**

**(१) * ४२७३० श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, विमुक्त जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात ७२ वसतिगृहे सुरू करण्याची घोषणा शासनाने केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घोषणा करुनही अद्यापि एकही वसतिगृह बांधले गेले नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू वसतिगृहे सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेतून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून राज्यातील इतर मागासवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ वसतिगृहे सुरू करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक – इमाव – २०१६ / प्र.क्र.५८ / विजाभज-१, दि.३०.०१.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत वसतिगृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध झालेल्या नागपूर, अहमदनगर, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांचे प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून केंद्र शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. समाधान अवताडे : अध्यक्ष महोदय, ओबीसी विमुक्त जाती, विमुक्त जमातीकरिता विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता शिक्षणाकरिता वसतिगृह उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या राहण्याची व शिक्षणाची हेळसांड होत असल्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या संबंधी मी आपल्याला पार्श्वभूमी सांगू इच्छितो.

ता.प्र.क्र. ४२७३०....

श्री. समाधान अवताडे.....

अध्यक्ष महोदय, दि. १५ जानेवारी २०१९ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी ३६ वसतिगृहे सुरु करण्यास मान्यता दिली होती. या अंतर्गत त्या वेळच्या सरकारने दि. २२ ऑगस्ट २०१९ रोजी नागपूर, अहमदनगर, वाशिम, यवतमाळ या ४ जिल्ह्यांमध्ये वसतिगृह बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली होती. या नंतर महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर ३६ वसतिगृहांएवेजी ७२ वसतिगृहे म्हणजे प्रत्येक जिल्ह्याला २ याप्रममाणे बांधले जातील, अशी घोषणा केली. जागे अभावी वसतिगृह बांधण्यास अडचण येत होती. इमारतीमध्ये वसतिगृहे सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली होती. मात्र राज्यात एकही वसतिगृह बांधले गेले नाही.

अध्यक्ष महोदय, माझे स्पेसिफिक ४ प्रश्न आहेत. १) नागपूर अहमदनगर, वाशिम, यवतमाळ सोडून राज्यातील इतर जिल्ह्याचे प्रस्ताव शासनाने तयार केले आहेत काय ? २) सदर वसतिगृहासाठी आवश्यक शासकीय जागा उपलब्ध होत नसल्यास शासन जिल्ह्यातील एखादी खाजगी जागा योग्य तो मोबदला घेऊन ताब्यात घेण्याचा निर्णय घेणार आहे काय ? ३) सोलापूर जिल्ह्यामध्ये सदरचे वसतिगृह नेमके कोठे बांधले जाणार आहे, जागा निश्चित झाली नसल्यास सदरचे वसतिगृह श्रीक्षेत्र पंढरपूर या शहरामध्ये बांधले जाणार काय ? ४) प्रत्येक जिल्ह्यात २ वसतिगृहाचे निकष न लावता लोकसंख्येच्या प्रमाणात वसतिगृह बांधण्याचा शासन विचार करणार आहे काय ?

यानंतर श्रीमती गिरप...

ता.प्र.क्र. ४२७३० ...

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, दि. १५ जानेवारी , २०१९ रोजी ४ वसतिगृह बांधण्याचा ... त्यावेळी ३६ वसतिगृहांचा प्रस्ताव होता. बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेमध्ये हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवून केंद्र सरकारच्या मान्यतेनंतर हे वसतिगृह बांधण्यासाठी आम्ही त्यावेळेच्या निर्णयाप्रमाणे प्रस्ताव पाठवला. अद्यापही केंद्र सरकारकडून त्याला मान्यता मिळाली नाही. काही त्रुटी काढून आल्यानंतर त्रुटींची पुन्हा पूर्तता केली गेली. त्यानंतर मात्र राज्य सरकारने स्वत: ही ७२ वसतिगृहे राज्य शासनाच्या खर्चातून बांधण्याचा निर्णय किंवा घोषणा केली, हे खरे आहे.

अध्यक्ष महोदय, ही वसतिगृहे २ वर्षे किंवा १ वर्षात का झाली नाहीत, तर आपल्या सर्वांना माहिती आहे की, मागचे १ वर्ष तर कोरोनाची स्थिती होती. कोरोनामध्ये वसतिगृहांची उपलब्धता कारण सर्व शाळा, महाविद्यालये बंद होती. परंतु, आता हा विषय आम्ही कॅबिनेटपुढे ... मंत्री परिषदेपुढे नेलेला आहे. ७२ वसतिगृहे पुढच्या सत्रामध्ये बांधण्यासाठी कॅबिनेटच्या परवानगीची ... आता हा प्रस्ताव वित्त विभागाकडे आहे. वित्त विभागाने त्याला मान्यता दिल्यानंतर पुढच्या सत्रामध्ये ७२ वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय निश्चित घेतला जाईल व ती सुरु केली जातील.

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, नागपूर, अहमदनगर, वाशिम व यवतमाळ जिल्ह्यांचे प्रस्ताव सन २०१९ मध्ये राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठवले होते. त्यानंतर या प्रस्तावामध्ये केंद्र सरकारने त्रुट्या कधी काढल्या, राज्य सरकारने त्रुटींची पूर्तता कधी केली, केंद्र सरकारचे धोरण असतानासुध्दा राज्य सरकारने वेळेवर त्रुटीची पूर्तता केली नाही, म्हणून ही वसतिगृहे होऊ शकली नाहीत, हे खरे आहे काय, शासनाची याबद्दलची स्पष्ट भूमिका काय आहे, या ४ जिल्ह्यातील वसतिगृहे कधी पर्यंत करणार आहात?

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, यवतमाळ, अहमदनगर, वाशिम या ३ जिल्ह्यामध्ये आता आपल्याला जागा मिळाली आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४२७३० ...

श्री.विजय वडेट्टीवार ...

नागपूर येथे देखील आता दुग्धविकास विभागाची जागा मिळालेली आहे. नागपूर, यवतमाळ, वाशिम व अहमदनगर असे ४ जिल्हे आहेत. या चारही जिल्ह्यांचा प्रस्ताव राज्य सरकारने पाठवला. मागच्या ३-४ महिन्यांपूर्वी ... ती तारीख मी तुम्हाला लेखी स्वरुपात कळवतो. ४-५ महिन्यांपूर्वी त्या प्रस्तावावरील त्रुट्या प्राप्त झाल्या. त्यानंतर आम्ही त्रुटींची पुन्हा पूर्तता केली. परंतु, यामध्ये केवळ चारच जागा आम्हाला उपलब्ध झाल्या.

अध्यक्ष महोदय, आम्ही सर्व जिल्हाधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात कळविले की, आम्हाला जागा उपलब्ध करुन द्या. अद्याप कुठल्याही जिल्हाधिकाऱ्यांकडून ... तयार असलेल्या इमारतीबाबतही कळविले की, जर तुमच्याकडे इमारत तयार असेल, कन्स्ट्रक्शन झालेल्या इतर शासकीय इमारती तयार असतील तर तेथे सुध्दा ... माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यानंतर तो देखील निर्णय झाला. त्यांच्या निर्देशाप्रमाणे आम्ही पुन्हा सर्व जिल्हाधिकाऱ्यांना डिसेंबर महिन्यामध्ये पत्र पाठवले, जानेवारी महिन्यामध्ये पत्र पाठवले. मात्र दोनवेळा पत्र पाठवून कोणत्याही प्रकारचे उत्तर किंवा जागा उपलब्ध असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली नाही. चारही जिल्ह्यांच्या संदर्भात केंद्र सरकारने अद्याप ...(अडथळा)...

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझी मंत्री महोदयांच्या उत्तराला हरकत आहे. मंत्री महोदय हे शासनकर्ता आहेत की, अर्ज करणारे व्यक्ती आहेत? जिल्हाधिकाऱ्यांना डिसेंबर महिन्यामध्ये तसेच जानेवारी महिन्यामध्ये पत्र पाठवले, जागा दाखवतात, इमारती दाखवतात तरी देखील केवळ ४ जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध होते, मग आपण राज्यकर्ता आहात की, ते कलेक्टर राज्य करणारे आहेत, हे सरकार म्हणून काम करीत आहे की, सर्कस आहे?

ता.प्र.क्र. ४२७३० ...

श्री.योगेश सागर ...

अध्यक्ष महोदय, हा ओबीसींच्या, विमुक्त जाती समाजाच्या छात्रालयाचा प्रश्न आहे. आपण असे म्हणत आहात की, केंद्र सरकारच्या त्रुटींची पूर्तता केल्यानंतरही आले नाही. आपल्याकडे जागा उपलब्ध नाही ते कबूल करा ना, आपला प्रशासनावर वचक नाही ते सांगा ना. अशा पध्दतीने उत्तर देऊन या सभागृहामध्ये केवळ वेळ मारुन न्यायचा, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे. शासनाने याचे स्पष्ट उत्तर दिले पाहिजे की, किती दिवसांत जागा उपलब्ध होणार?

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना जरा घाई झालेली दिसते. ४ ठिकाणी जागा उपलब्ध झाल्या त्यानंतर केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवला. केंद्र शासनाने अद्याप त्याला मान्यता दिली नाही. मधल्या काळामध्ये त्रुटी काढण्यात आल्या होत्या. मी सांगितले की, त्या त्रुटींची पूर्तता करुन दिली त्यानंतरही, त्यांची मान्यता अद्याप अप्राप्त आहे.

अध्यक्ष महोदय, इतर जिल्ह्यांचा विषय राहिला. इतर जिल्ह्याचा विषय जागेसाठी नव्हता तर आमची माननीय उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. ज्या ठिकाणी... (अडथळा)... सन्माननीय सदस्य आपण माझे म्हणणे पूर्ण ऐकून घ्यावे. मी तुमच्या हरकतीचे उत्तर देत आहे. तुम्ही मध्येच बोललात तर मी उत्तर कसे देणार? जागेच्या संदर्भात देखील पत्र पाठवले आहे.

यानंतर श्री.शिंदे ....

ता.प्र.क्र.४२४७०...

श्री.विजय वडेट्टीवार...

शासकीय जागा उपलब्ध करुन द्या, असे पत्र पाठविल्यानंतर ४ जागा उपलब्ध झाल्या. त्यानंतर मी स्वत: प्रत्येक जिल्हाधिकारी यांचेशी व्हिडीओ कॉन्फरन्सींद्वारे बोललो होतो. आपल्याकडे इमारत तयार असेल तर तेथे वसतिगृह सुरु करता येईल, असे पत्र ही पाठविले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी जागा उपलब्ध नसल्याबाबतची माहिती कळविली आहे. शासनाला खालील स्तरावर जागा उपलब्धतेची माहिती जिल्हाधिकारी यांचेकडूनच घ्यावी लागते. त्यांनी जागा उपलब्ध नसल्याचे सांगितल्यानंतर संस्थांच्या माध्यमातून ७२ महाविद्यालयात वसतिगृह सुरु करावे किंवा विभागाने जागा बांधून सुरु करावेत, अशा प्रकारचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार आहे. त्यास मान्यता मिळाल्यानंतर ७२ वसतिगृहे पुढील वर्षापासून सुरु करण्याचा निर्णय घेण्याच्या या प्रस्तावास मान्यता मिळेल. त्याकरिता विद्यार्थ्यांच्या सोयी सवलतीसाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारने मान्यता दिली असती तर ४ वसतिगृहे सुरु झाली असती. राज्य शासनाचा प्रस्ताव ३५ वसतिगृहांचा होता त्यासाठी जागा उपलब्ध झाली नाही. इतर ठिकाणी जागेचा संबंध नाही. याकरिता राज्य सरकारने स्वत: इतर मागसवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात २ याप्रमाणे ७२ वसतिगृहे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून ते पुढील सत्रापासून सुरु करण्यात येतील.

------------

**मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागात महावितरण कंपनीने घरगुती वीज ग्राहकांचा थकबाकी अभावी वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत**

**(२) * ४१४३५ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागात महावितरण कंपनीने वीज बील न भरल्याने ६०० घरगुती मीटर काढून नेण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ग्राहक टप्प्याटप्प्याने वीज बील भरण्यासाठी तयार असूनही महावितरण कंपनीने घरगुती वीज मीटर काढून घेतल्यामुळे परिक्षा कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून नागरीकही त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वीज ग्राहकांना वीज बिल भरण्याकरिता शासनाकडून कोणत्या सवलती देण्यात येणार आहेत तसेच खंडीत वीज पुरवठा नियमित सुरु करण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्राजक्त तनपुरे (ऊर्जा राज्यमंत्री, माननीय ऊर्जा मंत्री यांचेकरिता) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी, २०२२ मध्ये महावितरण कंपनीच्या एकूण ११४ घरगुती विज ग्राहकांचा वीज पुरवठा थकबाकी न भरल्यामुळे कायम स्वरुपी खंडीत करण्यात आला.

(२) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०२२ दरम्यान थकबाकी वसुली मोहीम संपूर्ण मेहकर उपविभागात राबविण्यात आली. सदर मोहीमेअंतर्गत थकबाकी असलेल्या घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडे असलेल्या थकबाकीमुळे विजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात आली.

(३) महावितरणतर्फे वीज ग्राहकांना थकीत वीज बिल हप्ताने भरण्याची सुविधा मार्च, २०२२ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. थकबाकीदार वीज ग्राहकांनी वीज बिलाचा व पुनर्जोडणी आकार (Reconnection Charges) भरल्यानंतर वीज

ता.प्र.क्र.४१४३५...
श्री.प्राजक्त तनपुरे
पुरवठा पूर्ववत करण्यात येतो त्याचप्रमाणे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांनी वीज पुरवठा खंडित केल्याच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आत पुनर्जोडणी आकारासह संपूर्ण थकबाकी रकमेचा भरणा केल्यानंतर सदर ग्राहकांचा वीजपुरवठा पुर्ववत करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.संजय रायमुलकर : अध्यक्ष महोदय, मेहकर व लोणार तालुक्यातील १६० ग्राहकांचा वीज पुरवठा कायम स्वरुपी खंडित करण्यात आला आहे. सदरहू ग्राहकांनी त्यांचा वीज पुरवठा थकबाकी रक्कम भरुन नियमित करुन घेतला नाही. हा एक वेगळा विषय आहे. ४४० वीज ग्राहकांना वीज देयकाची थकीत रक्कम कोरोना कालावधीत भरता आली नाही. सदरहू सर्व ग्राहक मंडळे व ग्राहक उक्त थकीत रक्कम भरण्यासाठी वेळोवेळी हप्ते पाडून देण्याची मागणी करीत होते. परंतु त्यांना हप्ते पाडून देण्यात आले नाही. अशा पद्धतीचा हा मेहकर व लोणार तालुक्यातील ६०० वीज ग्राहकांचा विषय आहे. अनेक वीज ग्राहक वीज देयकाची रक्कम अदा करण्यासाठी तयारीत होते परंतु महावितरणच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. सदरहू संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? मेहकर विधानसभा मतदारसंघातील स्मार्ट मीटरच्या कामासाठी ४८.९९ कोटी रुपयांचा निधी तत्काळ मंजूर करण्यात येईल काय ? वीज पुरवठा पुर्ववत करण्यासाठी वीज कंपनी मीटर पुनर्जोडणी शुल्क किती रुपये आकारते, सदरहू रक्कम उक्त ६०० वीज ग्राहकांना माफ करण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, स्मार्ट मीटरचा उल्लेख सन्माननीय सदस्य यांनी केला आहे, त्याबाबत मी अगोदर सांगतो. नवीन आरडीएसएस योजना येऊ घातली आहे. सदरहू योजना केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातून राज्यातील १.६६ कोटी वीज ग्राहकांसाठी राबविण्यात येत आहे. या योजनेत स्मार्ट मीटरची

ता.प्र.क्र.४१४३५...
श्री.प्राजक्त तनपुरे
तरतूद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य यांनी उल्लेख केलेल्या ग्राहकांचा उक्त योजनेत समावेश आहे की नाही, हे तपासून घेण्यात येईल. त्यांचा समावेश नसेल व शक्य असेल तर त्यांचा समावेश करुन घेण्याबाबत सांगण्यात येईल. ६०० वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित केल्याबाबत सन्माननीय सदस्य यांनी सांगितले आहे. यामधील ११४ वीज ग्राहक यांचा कामय स्वरुपी वीज पुरवठा खंडित केला होता, याबाबत आपण सांगितले आहे. परंतु ते अनधिकृतपणे वीज वापर करीत होते. त्यामुळे त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित लोकांचा वीज पुरवठा खंडित करण्यापूर्वी महावितरण कंपनीकडून उर्वरित वसूलीबाबत सांगण्याचा प्रयत्न करण्यात येतो. वीज जोडणी खंडित करणे हा शेवटचा पर्याय असतो. आता आपण नवीन स्व.विलासराव देशमुख अभय योजना २०२२ च्या माध्यमातून ज्यांचा वीज पुरवठा कायम स्वरुपी खंडित केला आहे त्या ग्राहकांनी ३० टक्के रक्कम अगोदर भरणा केली तर उर्वरित रक्कम ६ महिन्यात भरण्यासाठी हप्ते पाडून देण्यात येतात व त्यांना आकारलेल्या व्याज किंवा दंडाची सर्व रक्कम माफ करण्यात आली आहे. सन २०२१ पूर्वी ज्या वीज ग्राहकांना थकीत वीज देयकापोटी जे काही व्याज किंवा दंड आकारण्यात आले असेल ते सर्व माफ करण्यात येत आहे.

यानंतर श्री.तेलंग....

ता.प्र.क्र.४१४३५.....

श्री.प्राजक्त तनपुरे.......

३० टक्के रक्कम भरल्यानंतर उर्वरित रक्कम भरण्यासाठी पुढील ६ महिन्यांसाठी हप्ते पाडून देण्यात येणार आहेत. अशा प्रकारची अत्यंत सुटसुटीत योजना शासनाने आणलेली आहे. या योजनेमध्ये सदर ग्राहक सहभागी होऊ शकतात.

डॉ.संजय रायमुलकर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या प्रश्नाला समर्पक असे उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, पाच-सहा वर्षापूर्वी सदर १६० व ११४ वीज कनेक्शन पी.डी. केले होते, असे आपण नमूद केलेले आहे. लोणार तालुक्यातील सदर कनेक्शन पी.डी. केल्यानंतर ३ वर्षे तत्कालीन उप अभियंता व कनिष्ठ अभियंता कार्यरत होते. परंतु उक्त प्रकरणी तत्कालीन उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यावर कारवाई न करता आपण विद्यमान उप अभियंता व कनिष्ठ अधियंता यांच्यावरच कारवाई केलेली आहे. सदर अधिकारी पुढील तीन ते चार महिन्यामध्ये सेवानिवृत्त होत आहेत. विद्यमान अधिकारी हे उक्त प्रकरणामध्ये बळीचा बकरा ठरलेले आहेत. त्यामुळे माझी विनंती अशी आहे की, उक्त प्रकरणाची चौकशी करुन विद्यमान अधिकाऱ्यांवरील कारवाई मागे घेऊन तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, पी.डी. झालेले कनेक्शन देखील अनधिकृत सुरु ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे ही बाब गंभीर आहे. पी.डी. करण्यात आलेले काही वीज कनेक्शन दीड वर्ष काही दोन वर्ष तर काही ५ वर्षांपासून अनधिकृतपणे सुरु होते. यावर नियत्रंण ठेवणे ही संबंधित उप कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे. संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. सन्माननीय सदस्यांच्या मते विद्यमान अधिकाऱ्यावर कारवाई न करता तत्कालीन अधिकाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक होते. उक्त प्रकरणामध्ये विद्यमान अधिकाऱ्यांचा काहीही दोष नाही, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे निश्चितपणे विभागीय चौकशी करताना हा मुद्दा विचारात घेतला जाईल.

ता.प्र.क्र.४१४३५.....

श्रीमती श्वेता महाले : अध्यक्ष महोदय, कोरोना काळामध्ये घरगुती वीज ग्राहकांना अवाजवी देयके देण्यात आलेली आहेत, ह◌े खर◌े आहे काय? जर अशा प्रकारची अवाजवी देयके दिली असतील तर त्यांची वीज देयके कमी करुन देण्याबाबत शासनाने नवीन धोरण आखले आहे काय?

अध्यक्ष महादेय, ज्या वीज ग्राहकांना अवाजवी वीज देयके देण्यात आले होते, अशाच ग्राहकांची वीज देयके थकित आहेत. त्यामुळे याबाबत शासन काय निर्णय घेणार आहे ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, वास्तविक पाहता सन्माननीय सदस्यांचा प्रश्न स्कोपच्या बाहेरील आहे. तरी देखील मी याबाबत सांगू इच्छितो की, कोरोनामुळे सर्वसामान्य माणसांच्या उत्पन्नावर झालेल्या परिणामुळे अनेकांना वीज देयके विहित कालावधीमध्ये भरता आली नाहीत. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुन शासनाने विलासराव देशमुख अभय योजना, २०२२ आणलेली आहे.

---------

**नाशिक शहरात व जिल्ह्यांतर्गत रुद्रा सिस्टीम एजन्सीकडून चुकीचे मीटर रिडींग घेऊन वीज ग्राहकांची केलेली फसवणूक**

**(३) * ३९५५८ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात व जिल्ह्यात रुद्रा सिस्टीम एजन्सी गेल्या वीस वर्षापासून वीज मीटर रिडींग घेऊन वीज देयकाच्या वाटपाचे काम करीत असून सदरहु एजन्सी वांरवार चुकीच्या रिडींगची नोंद घेणे, वेळेवर रिडींग न घेणे तसेच वीजबिल वेळेवर वाटप न केल्यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेळेवर महसूल जमा होत नसल्यामुळे राज्य महावितरण लि. आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालेलील असल्याने रुद्रा सिस्टीम एजन्सीने वेळेत वीज देयक वाटप न केल्याने एजन्सीला ७५ लाख ६९ हजार ८२२ रुपये इतका दंड केवळ चारच महिन्यात केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील रुद्रा सिस्टीम एजन्सीवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी ऊर्जा राज्यमंत्री यांना दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी व दिनांक १३ जानेवारी, २०२२ च्या स्मरण पत्र क्र.१ व्दारे मागणी करूनही तसेच सतत ३ महिने संबधित एजन्सीने काम निकृष्ट दर्जाचे असल्यास त्या एजन्सीचे काम तात्काळ बंद करण्यात येईल असे कार्यालय आदेशात नमूद असतानाही रुद्रा सिस्टीम एजन्सीवर कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे कास,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुद्रा सिस्टीम एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्राजक्त तनपुरे, डॉ. नितिन राऊत, यांच्याकरिता :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नाशिक शहरात व जिल्हा अंतर्गत रुद्रा सिस्टीम एजन्सी ई-निविदेव्दारे फोटो वीज मिटर रिडींगचे व वीज देयकाच्या वाटपाचे काम करीत आहे. सदर एजन्सीविरुध्द

ता.प्र.क्र. ३९५५८........

श्री.प्राजक्त तनपुरे........

माहे जानेवारी, २०२२ मध्ये तक्रार प्राप्त नसली तरी नाशिक शहर व जिल्ह्यांतर्गत एकूण १४ उपविभागाच्या कामाबद्दल सदर एजन्सीला निविदेच्या शर्ती व अटीनुसार ग्राहकांचे चुकीचे मीटर रिडींग आणणे, रिडींग न घेणे, ग्राहकांना बिल वाटप न करणे इत्यादी कारणांकरीता माहे जुलै, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत रु. २३,८४,२३९/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे.

(३) व (४) नाशिक ग्रामीण विभागांतर्गत पेठ उपविभाग महावितरण कंपनीने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे वेळोवेळी आदेश व सुचना देवून देखील एजन्सीच्या कार्यपध्दतीत सुधारणा न झाल्यामुळे कार्यकारी अभियंता, नाशिक ग्रामीण विभाग यांनी दि.१६.०२.२०२२ च्या पत्रान्वये सदर एजन्सीचे पेठ उप विभागाच्या कामाचा कार्यादेश रद्द करण्यात आलेला आहे.

तसेच चांदवड विभागीय कार्यालयाने असमाधानकारक मीटर वाचनाच्या कामाबाबत चांदवड, लासलगांव, निफाड व पिंपळगांव उपविभागाकरीता व मनमाड विभागीय कार्यालयाने नांदगांव व येवला ग्रामीण या उपविभागाकरीता सदर एजेन्सीवर नोटीस अदा केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.राहुल ढिकले : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील सार्वजनिक प्रश्नाबाबत छापील प्रश्नाचे उत्तर प्राप्त झाले आहे. त्यानुसार छापील उत्तर व प्रत्यक्षात असलेले वास्तव हे पूर्ण वेगळे आहे. रुद्रा सिस्टीम एजन्सीकडून चुकीचे मीटर रिडींग घेऊन चुकीचे देयके देण्यात आल्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे.

अध्यक्ष महोदय, रुद्रा सिस्टीम एजन्सीला ४ महिन्यासाठी २३ लाख ८४ हजार २३९ रुपयांचा दंड आकारल्याचे दाखविण्यात आले आहे. वास्तविक महाराष्ट्र राज्य महावितरणचे अधिकृत असलेले mobile app web console मधील मीटर रिडींग इन्व्हाईसमध्ये पाहिले असता उक्त एजन्सीस १ कोटी ३० लाख रुपयांचा दंड आकारल्याचे दिसून येत आहे. यावरुन संबंधित महावितरण विभागाचे अधिकारी/कर्मचारी या एजन्सीशी संगनमत करुन मंत्री महोदयांची दिशाभूल करीत

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३९५५८........
ॲड.राहुल ढिकले.......

आहेत. त्यामुळे सदर छापील रक्कम ग्राह्य धरावी की, ॲपमधील रक्कम ग्राह्य धरावी, याबाबत माहिती देण्यात यावी.

अध्यक्ष महादोय, गोरगरीब व शेतकऱ्यांचे ५ हजार रुपये थकित असले तरी त्यांचे वीज कनेक्शन कापले जाते. परंतु या एजन्सीचे जवळपास १ कोटी रुपयांचे देयके थकित असताना देखील ती रक्कम महावितरण वसूल न करता ती सोडून दिली जात आहे, याचे कारण काय आहे?

अध्यक्ष महोदय, मीटर रिडींग घेतल्यानंतर महावितरणच्या आयटी विभागामध्ये मीटर रिडींग घेतलेल्या लोकेशनची नोंद होते. परंतु रुद्रा सिस्टीम एजन्सी ही एका ठिकाणी बसून सर्व मीटरचे रिडींग घेत आहे. त्यानंतर ते सरासरी किंवा progresgive bill पाठवित आहेत. त्यामुळे गरिबांचे व शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे महावितरणच्या आयटी विभागाकडून याबाबतची सर्व माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहात काय?

यानंतर श्री.कुलकर्णी.......

ता.प्र.क्र. ३९५५८...

ॲड. राहूल ढिकले.....

अध्यक्ष महोदय, या एजन्सीचा समावेश काळ्या यादीत करण्यात येणार आहे काय ? ही एजन्सी माझ्या आणि मंत्री महोदयांच्याही मतदारसंघात काम करीत आहे. या एजन्सीला चुकीचे काम केल्याबद्दल अधिकचा दंड मंत्री महोदयांच्या मतदारसंघातून करण्यात आला आहे. त्यामुळे मंत्री महोदय याबाबतचे निदेश देणार आहेत काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी पुन्हा एकदा स्पेसिफिक प्रश्न विचारावेत. कारण त्यांनी अनेक प्रश्न विचारलेले आहेत. त्यामुळे स्पेसिफिक प्रश्न विचारले तर मला उत्तर देता येईल.

ॲड. राहूल ढिकले : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये माहिती देण्यात आली आहे की, रुद्रा सिस्टीम एजन्सीला चार महिन्यांमध्ये २३ लाख रुपयांचा दंड झाला आहे. परंतु महावितरणच्या ॲपमध्ये या एजन्सीला १ कोटी ३० लाख रुपयांपेक्षाही अधिक दंड असल्याचे दिसून येत आहे. ही बाब खरी आहे काय ? दुसरे असे की, या एजन्सीला काळ्या यादीत टाकले जाणार काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, महावितरण कंपनीने कळविलेल्या माहितीनुसार या एजन्सीला २३ लाख ८४ हजार २३९ रुपयांचा दंड करण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यात साधारणपणे २० उप विभाग आहेत. त्यातील १४ उप विभागांचे रिडिंग घेण्याचे काम या कंपनीला देण्यात आले आहे. मी सांगू इच्छितो की, यातील वस्तुस्थिती तपासून जे योग्य असेल त्यानुसार दंड करण्यात येईल. कोणालाही वाचविण्याचा प्रयत्न केला जाणार नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की घरबसल्या मीटर रिडींग घेतले जाते. महावितरण कंपनीचा कर्मचारी रिडींग घेण्यासाठी गेल्यावर त्याच्या अक्षांश, रेखांशाची नोंद होत असते. त्यामुळे कोणी घरबसल्या रिडींग घेतले असेल तर ते ऑटोमेटिक सिस्टीममध्ये ते दिसून येते. त्यावर मानवरविरहित दंडाची तरतूद केली जाते. त्यामुळे मीटर वाचकाद्वारे मीटरचे वाचन

ता.प्र.क्र. ३९५५८...

श्री. प्राजक्त तनपुरे....

होत नसल्यास, मीटरचे वाचन केल्यानंतर त्या वाचकाने १० मिनिटांमध्ये ते ऑनलाईन अपलोड केले पाहिजे. सिस्टीममध्ये चेक्स अँड बॅलेन्स देण्यात आलेले आहेत. रिडींग चांगल्या प्रकारे झाली पाहिजे. सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, महावितरण कंपनी कोणालाही पाठिशी घालणार नाही. सिस्टीममध्ये जो दंड असेल तो दंड या एजन्सीला भरावा लागेल. यापासून त्या एजन्सीची सुटका केली जाणार नाही. याबाबत मी तेथील एस.ई. यांना सूचना देतो. नाशिक जिल्ह्यातील सर्व एजन्सीची काटेकोरपणे तपासणी करावी. मी सांगू इच्छितो की, यात प्रोसिजरनुसार निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. चंद्रकांतदादा पाटील : अध्यक्ष महोदय, तारांकित प्रश्नाच्या यादीतील अनुक्रमांक २ – ता.प्र.क्र. ४१४३५, अनुक्रमांक ३ - ता.प्र.क्र. ३९५५८, अनुक्रमांक ५ - ता.प्र.क्र. ४२८४४ हे तीन प्रश्न ऊर्जा विभागाशी संबंधित आहेत. तसेच एक लक्षवेधी सूचनाही त्याच अनुषंगाने आहे. टाटा पॉवरला वीज निर्मितीसाठी जाणारे पाणी शेतीसाठी मिळाले पाहिजे, असा त्या लक्षवेधी सूचनेचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, आपण सर्वजण शेतकरी आहोत. हे अधिवेशन सुरु झाल्यापासून वीज विषयासंदर्भात प्रचंड आक्रोश आहे. असे असताना अतिशय थातुरमातूर उत्तरे दिली जात आहेत. आजच्या वर्तमानपत्रात बातमी छापून आली आहे की, उद्यापासून उन्हाचा तडाखा आणखी वाढणार आहे. याचा अर्थ शेतातील पिके जळून मरणार आहेत आणि पिके मेल्यानंतर शेतकऱ्यांनाही मरावे लागणार आहे. आजच्या दिवसामध्ये तीन प्रश्न या विभागाशी संबंधित आहेत. त्यामध्ये विविध प्रश्न आहेत. काही सन्माननीय सदस्य प्रायव्हेट कंपनीबाबत सांगत आहेत. काही सन्माननीय सदस्य ६०० मीटर कापून नेल्याबाबत सांगत आहे. त्यामुळे मी विनंती करतो की, आज या विभागावर एक ते दीड तास स्वतंत्र चर्चा सभागृहात घ्यावी. अन्यथा या सर्व विषयांवर कोणताही निर्णय होणार नाही.

ता.प्र.क्र.३९५५८.....

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत दादा पाटील यांनी आता उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. आपण देखील नाशिक जिल्हयाच्या ग्रामीण व बागायतदार भागातील प्रतिनिधी आहात. आज विजेचा प्रश्न अतिशय ऐरणीवर आहे व त्यामुळे नेमके काय करावे हेच शेतकऱ्यांना कळेनासे झाले आहे. सद्यस्थितीत गहू, हरभरा, मका, इत्यादी पिके पोटरीत आहेत. अशा स्थितीत विजेच्या अडचणीमुळे शेतकरी आपल्या डोळयादेखत पीक जळत असल्याचे पाहत आहेत. वीज बिल भरण्याबाबत कोणतीही गोष्ट स्पष्ट होत नाही. सर्व ट्रान्सफॉर्मर्स बंद झाले आहेत व त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या योजना देखील बंद झाल्या आहेत. त्यामुळे आपणास विनंती आहे की, या विषयावर सभागृहामध्ये दोन तासांची चर्चा उपस्थित करण्यास परवानगी द्यावी. तसेच केवळ चर्चा व्हावी असे नाही तर शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे निर्देश आपण सरकारला द्यावेत. माननीय मंत्री महोदय देखील या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यामुळे या विषयासंदर्भात आपण शासनाला सूचना करण्याची आवश्यकता आहे.

कु.प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, हा विषय अतिशय ऐरणीचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत दादा पाटील व सन्माननीय सदस्य श्री.गिरीष महाजन यांनी सांगितल्याप्रमाणे या विषयावर चर्चा घडवून आणणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे मलाही वाटते. ऊर्जा व वस्त्रोद्योग अशा दोन्ही विभागांचे मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित आहेत. तसेच इचलकरंजी, मालेगाव, सोलापूर, कोल्हापूर येथील सर्व सन्माननीय सदस्य देखील या ठिकाणी उपस्थित आहेत. मी या निमित्ताने स्कोपच्या बाहेरील परंतु स्पेसिफिक प्रश्न विचारत आहे. मागील दोन दिवसांत यंत्रमागधारकांची वीज कनेक्शन्स् कापण्यात आली आहेत. त्यामुळे सुमारे २०० ते ३०० कामगार रस्त्यावर आहेत... (अडथळा...)

(सन्माननीय सदस्य श्री.अबु आजमी व सन्माननीय सदस्य श्री.रईस शेख हे वेलमध्ये येऊन यंत्रमागधारकांच्या समस्यांच्या संदर्भातील फलक दर्शवितात.)

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९५५८.....

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.अबु आजमी व सन्माननीय सदस्य श्री.रईस शेख यांना विनंती आहे की, आपण आपापल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्या कु.प्रणिती शिंदे त्याच विषयावर बोलत आहेत.

कु.प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, वस्त्रोद्योग विभागाकडून ऊर्जा विभागाला आवश्यक ते अनुदान देण्यात न आल्यामुळे यंत्रमागधारकांच्या वीज जोडण्या कापण्यात आल्या आहेत... (अडथळा...) तसेच यंत्रमागधारकांना देण्यात आलेल्या बिलांमधून सबसिडी वजा करण्यात आलेली नाही. त्यांना दुप्पट बिले दिली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रभर कारखानदार व कामगारांच्या मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. माननीय ऊर्जा मंत्री व माननीय वस्त्रोद्योग मंत्री दोघेही सभागृहामध्ये उपस्थित आहेत. माझा त्यांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, वस्त्रोद्योग विभागाकडून ऊर्जा विभागाला अनुदान प्राप्त झाले आहे का ?

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की वीज बिलांची ऑनलाईन पध्दत बंद करुन ऑफलाईन पध्दतीने वीज बिले देण्यात यावीत. तसेच सबसिडी वजा करुन कारखानदारांना बिले देण्यात यावीत. रस्त्यावर उतरलेल्या कामगारांनी पुन्हा एकदा कारखान्यात यावे यासाठी ताबडतोब ही बिले माफ करावित.

**उपाध्यक्ष :** दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न शेतकरी व कारखानदार यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. माननीय मंत्री महोदय यावर उत्तर देतील.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी वस्त्रोद्योगांच्या संदर्भातील अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. अर्थमंत्री या नात्याने मी सांगू इच्छितो की, मी यासंदर्भात ताबडतोब माहिती घेतो. वित्त विभागाकडून वस्त्रोद्योग विभागाला निधी दिलेला नसेल तर तो या आठवडयाच्या आत देण्याची व्यवस्था केली जाईल. नंतर सदर निधी ऊर्जा विभागाकडे वर्ग होईल.

ता.प्र.क्र.३९५५८.....

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

कु.प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, आमची एवढीच मागणी आहे की, वीज कनेक्शन्स् कापण्याच्या मोहिमेला तोपर्यंत स्थगिती द्यावी व वीज बिले भरण्यासाठी एक महिन्याची मुदत द्यावी. तसेच सबसिडी वजा करुन नव्याने बिले द्यावीत.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

ता. प्र. क्र.३९५५८...

श्री. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, यासंबंधीची बैठक तात्काळ ऊर्जा व वस्त्रोद्योग मंत्री मिळून आम्ही दोघेही एकत्रितपणे घेऊ आणि यामधील तिढा सोडविण्याचा प्रयत्न करु.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, जी तत्परता या पॉवरलूमच्या बाबतीत शासनाने दाखविली आहे, ते आपलेच बांधव आहेत. त्याला आमचा विरोध नाही. परंतु या सभागृहात शेतकऱ्यांच्या वीजेच्या प्रश्नाबद्दल वारंवार मागणी होत असताना त्यांच्या बाबतीत शासनाची एवढी अनास्था का आहे. त्याबद्दल आपण चर्चा घेण्याचे मान्य करता. म्हणून आम्ही एवढीच विनंती केली आहे की, या वीजेच्या प्रश्नाबद्दल या सभागृहात चर्चा उपस्थित करावी. कारण या सभागृहात घोषणा एक होते आणि बाहेर कारवाई वेगळी होते.

अध्यक्ष महोदय, राज्यात सर्रासपणे वीजेचे कनेक्शन कापण्याचे काम सुरू आहे. मंत्री महोदय गोल गोल उत्तर देऊन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. म्हणून वीजेच्या बाबतीत ताबडतोब सभागृहात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय उपमुख्यमंत्री यांनी मागच्या वेळी आम्ही शेतकऱ्यांचे कोणतेही कनेक्शन कापणार नाही, असे म्हटले होते. अधिवेशन संपले आणि सरळ कनेक्शन कापण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे याबाबत शासनाचे धोरण काय आहे ते समजले पाहिजे आणि म्हणून किमान या विषयावर तातडीने चर्चा व्हायला हवी, अशी आम्ही विनंती केली आहे. पॉवरलूमच्या बाबतीत आपण तत्परता दाखविली तशी वीजेच्या प्रश्नाच्या बाबतीत शासनाने तत्परता दाखवावी.

ॲड अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने मागणी केली की, ऊर्जेच्या बाबतीत सर्वंकष चर्चा या सभागृहात व्हायला हवी. त्या अनुषंगाने मी आपल्याला सांगू इच्छितो की, वीजेच्या प्रश्नाबद्दल सत्तारुढ पक्षातर्फे

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

ॲड अनिल परब...

एक प्रस्ताव या सभागृहात आणला जाईल आणि त्या बाबतीत सविस्तर चर्चा होऊन त्याबाबत सरकारचे धोरण जाहीर करण्यात येईल.

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, ३ दिवसांपूर्वी वीजेच्या प्रश्नावर आपण सभागृहातील संपूर्ण कामकाज दिवसभरासाठी बंद केले होते. संपूर्ण दिवसभर त्यावर गोंधळ झाला होता. आता सरकार म्हणते की, त्यावर चर्चा करु. तोपर्यंत एक आठवडा जाईल. तिकडे शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. त्यामुळे आपण या विषयावर चर्चा काय करता ?

असुधारित प्रत

## राज्यात सहकारी साखर कारखान्यांच्या विक्रीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४) * ४१५५९ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी भांडवल व आपल्या जमीनी देवून उभे केलेल्या साखर कारखान्यांच्या विक्री व्यवहारात सुमारे २५ हजार कोटींचा गैरव्यवहार झाला असल्याने चौकशी करण्याची मागणी जेष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांनी केली असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील तोटयात असलेल्या ११६ साखर कारखान्यांपैकी ७४ कारखाने माहे जून, २००६ पर्यंत नकारात्मक निव्वळ मूल्यात नोंदवले गेले आणि सन १९८७ ते २००६ या कालावधीत ३१ साखर कारखाने अवसायानात काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) १९८७-२००६ या कालावधीत २४ कारखान्यांचे अंतरिम अवसायनाचे आदेश काढण्यात आले आहेत. त्यापैकी २२ कारखान्यांचे आदेश अंतिम करण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. छोट्या छोट्या शेतकऱ्यांनी आपापल्या जागा सहकारी साखर कारखान्याला सहकारी चळवळ म्हणून दिल्या आहेत. पण आज काय परिस्थिती आहे तर ज्या सहकारी क्षेत्रासाठी शेतकऱ्यांनी

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१५५९...

श्री. योगेश सागर...

जागा दिल्या आहेत त्या सहकाराचे आता कार्पोरेट लोकांच्या ताब्यात हे कारखाने आले आहेत. वेगवेगळे कायदे आणि नियम गरुन को-ऑपरेटचे कार्पोरेट असे साखर कारखान्यांचे प्रमाण झाले आहे. या सभागृहाला सन्माननीय सदस्य ॲङ आशिष शेलार नेहमी आठवण करुन देतात की, "ज्याचा राजा व्यापारी, त्याची प्रजा भिकारी." अशी परिस्थिती आज या शेतकऱ्यांची झाली आहे.

ॲङ आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माझी या प्रश्नाच्या लेखी उत्तराला हरकत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नातून पहिला प्रश्न असा विचारला आहे की, राज्यातील शेतकऱ्यांनी भांडवल व आपल्या जमीनी देवून उभे केलेल्या साखर कारखान्यांच्या विक्री व्यवहारात सुमारे २५ हजार कोटींचा गैरव्यवहार झाला असल्याने चौकशी करण्याची मागणी जेष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांनी केली असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ? परंतु या प्रश्नाला शासनाने "हे खरे नाही", असे उत्तर दिले आहे. याचा अर्थ सन्माननीय अण्णा हजारे यांनी मागणी केली हे खरे नाही. यामध्ये २५ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला हे २५ जानेवारीला शासनाच्या निदर्शनास आणून दिले, प्रेसशी बोलले, पत्र व्यवहार केला, हे खरे नाही काय ?

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१५५९....

ॲड. आशिष शेलार...

हे खरे नाही, असे उत्तर देणे चुकीचे आहे. त्यांनी शासनाला पत्र देऊन त्यांचे म्हणणे मांडले आहे. तसेच त्यांनी ते सर्व मिडियासमोर देखील आपले म्हणणे मांडलेले आहे. आपण एका वाक्यात "हे खरे नाही" असे उत्तर देत आहात. याचा अर्थ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केलेली मागणी ही खरी नाही. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी उपोषणाचा पर्याय समोर ठेवला. त्यांची मागणी आली हे खरे आहे पण २५ हजार कोटी रुपयांच्या बाबतीत आपले काय म्हणणे आहे ते खरे आहे असे जर आपण म्हणाला असता तर ती बाब वेगळी होती. परंतु सरसकट असे खोटे आपण बोलूच शकत नाही. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आज सत्य बोलले आहेत तसेच २५ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला हे ही खरे आहे. परंतु आपण ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना सुद्धा खोटे करीत आहात. त्यामुळे माननीय मंत्र्यांनी उत्तरामध्ये सुधारणा करावी की, त्यांनी जी मागणी केली आहे त्याबाबत होय, मागणी केली आणि त्यांच्या मागणीमध्ये काय म्हटले आहे ते सांगा आणि नंतर आपण आपले उत्तर मांडा. " हे खरे नाही" असे उत्तर योग्य नाही याबाबत आपण स्पष्टीकरण द्यावे.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, प्रश्नाचा आशय असा आहे की, "ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी ही मागणी केली असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय." त्या दरम्यानच्या काळात असे काही निदर्शनास आले नाही आणि आमच्याकडे कोणतेही पत्र आलेले नाही....(अडथळा)... अध्यक्ष महोदय, मला संरक्षण द्या....

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री आता जे बोलत आहेत त्या माझी उत्तरावर हरकत आहे. माननीय मंत्री हे वरिष्ठ आहेत. त्यामुळे आमची त्यांच्याकडून अपेक्षा आहे की, शासनाला जे उत्तर द्यायचे आहे त्यासाठी ते फ्री आहेत. परंतु त्यांच्या उत्तराचा अर्थ असा होतो की, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी अशा प्रकारची मागणीच केलेली नाही. दुसरे असे की, त्यांच्या मागणीमध्ये

ता.प्र.क्र. ४१५५९....

ॲड. आशिष शेलार....

२५ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असा आरोप त्यांनी केला नाही. माननीय मंत्री जर रेकॉर्डवर असे उत्तर देणार असतील तर दुर्दैवाने आम्हाला विशेषाधिकार भंगाची सूचना द्यावी लागेल. आम्हाला ही परिस्थिती आणायची नाही. त्यामुळे आपण असे म्हणा की, त्यांची मागणी २५ तारखेला न येता २६ ला आली आहे. परंतु आपण हे खरे नाही, असे सरसकट उत्तर देत आहात. त्यांनी स्पेसिफिक मागणी केली आहे काय, हा खरा प्रश्न आहे. त्यापुढे त्या मागणीमध्ये त्यांनी किती कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला, असे म्हटले आहे. हा दुसरा प्रश्न आहे आणि ते सर्व आपल्या कधी निदर्शनास आले आहे, हा तिसरा प्रश्न आहे. हे उत्तर चुकीचे असून माननीय मंत्र्यांनी त्यामध्ये दुरुस्ती करुन त्यापुढे चर्चा करावी.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मी आताच सभागृहात सांगितले की, प्रश्नामध्ये जी स्पेसिफिक तारीख दिलेली आहे त्यादरम्यान आमच्याकडे कोणतीही मागणी आलेली नाही. (अडथळा...)

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. दिनांक २५ जानेवारी, २०२२ किंवा त्या सुमारास, असे प्रश्नामध्येच दिलेले आहे म्हणून त्यामुळे प्रश्नामध्ये देखील कोणतीही स्पेसिफिक तारीख म्हटलेली नाही. त्यामुळे शासन झोपलेले होते काय ? कारण सर्व माध्यमांत आलेले आहे की, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी शासनाला पत्र पाठवले आहे आणि मलाही पत्र पाठवलेले आहे. त्यामुळे पहिले म्हणजे आपल्याला माहिती देणाऱ्यांवर कारवाई करा किंवा मग आम्हाला आपल्यावर विशेषाधिकार भंगाची सूचना आणवी लागेल. कारण अशा प्रकारचे चुकीचे उत्तर देता येत नाही. एवढया सर्व माध्यमांत चर्चा सुरु आहे आणि पहिल्या पानावरील बातमी आहे तरी देखील शासनाला माहीत नसेल तर शासन झोपलेले आहे. आपण अशा प्रकारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना खोटे ठरवू नका. यामुळे माननीय मंत्र्यांनी उत्तर सुधारित करावे, अशी आमची मागणी आहे.

ता.प्र.क्र. ४१५५९....

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा अपमान व्हावा किंवा आपण सांगत आहात तसे करण्याचा प्रयत्न होत आहे असे कृपा करुन समजू नका. सभागृहात प्रश्न पुकारल्या दरम्यानचा हा विषय आहे. प्रश्न पुकारल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी झालेली आहे. त्यामुळे उपप्रश्न विचारल्यानंतर आम्ही त्याला उत्तर देऊ.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सदरचा प्रश्न सभागृहाची प्रॉपर्टी झालेला असला तरी देखील अगदी योग्य स्टेजला सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी हरकत घेतली आहे. ती स्टेज ही असते की, सन्माननीय सदस्यांनी आपल्याला उत्तर सुधारित करायचे आहे काय यासाठी ऑब्जेक्शन घेतले होते. त्यावेळेस आपल्याला ही संधी असते. आता आपण उत्तर सुधारित करु शकता. त्यामुळे सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आपल्याला उत्तर सुधारित करायचे आहे काय असा प्रश्न विचारला आहे. त्यानुसार आपण ते उत्तर सुधारित केले पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

ता.प्र.क्र. ४१५५९.....

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, प्रश्नाप्रमाणे उत्तर द्यावे लागेल. तरी सुध्दा...

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपाध्यक्ष :** आपण उत्तर ऐकून घेतले पाहिजे.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मी उत्तरात थोडी सुधारणा करीत आहे. या पूर्वी माननीय अण्णा हजारे यांनी वारंवार हा विषय उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने हा प्रश्न येथे आलेला आहे.

श्री. योगेश सागर :अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांनी राज्यातील सहकारी चळवळीकरिता भांडवल दिले व आपली जमीनही दिली. ती आता कॉर्पोरेट लोकांनी ताब्यात घेतली आहे. ' ज्याचा राजा व्यापारी, त्याची प्रजा भिकारी '. आपला राजाच व्यापारी झालेला आहे. राजाने कॉर्पोरेट पक्ष चालवले आहेत. या राज्यातील राजाने कारखाने ताब्यात घेण्याचे पाप केलेले आहे. येथे उत्तरात असे सांगितले आहे की, सन १९८७ ते २००६ या कालावधीत २४ कारखान्यांचे अंतरिम अवसायनाचे आदेश काढण्यात आले आहेत. त्यापैकी २२ कारखान्यांचे आदेश अंतिम करण्यात आले आहेत. या मागे दोषी कोण आहे ? राज्याची शिखर बँक दोषी आहे. मी उदाहरण देतो. सातारा जिल्ह्यातील कारखान्याचा शिखर बँकेने लिलाव केला. या कारखान्याची वार्षिक थकबाकी ३ कोटी रुपये होती. धनलक्ष्मी ठेव योजनेत शिखर बँकेत साडे आठ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. तेथून ही रक्कम वसूल करता आली असती. मात्र ते केले गेले नाही. ४४ कोटी रुपये शासनाची थकहमी होती. तेथून ते रिलीज केले गेले नाही. म्हणजे एखाद्या कारखानदाऱ्याला किंवा शेतकऱ्याच्या कारखान्याला संपवण्याकरिता षडयंत्र रचले गेले. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. सन २००७ ते २०१० व सन १९८७ ते २००६ या कालावधीत व्यवहार झालेले

ता.प्र.क्र. ४१५५९.....

श्री. योगेश सागर ....

असतील. या संबंधी ज्या ज्या तक्रारी झाल्या असतील त्या बाबत उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीश यांच्या मार्फत चौकशी करणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यात सहकारी कारखानदारी मोठया प्रमाणात उभी राहिली. अनेक शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन कारखानदारी निर्माण केली. ती बरी वाईट चालली. ऊसाचे एक चक्र आहे. एखाद्या वर्षी अधिक ऊस येतो तर एखाद्या वर्षी कमी ऊस येतो. यामुळे काही कारखाने अडचणीत गेले. ज्या ठिकाणी बँकांनी कारखान्यांना कर्ज दिले होते त्यांनी ते ताब्यात घेतले व विक्रीची प्रक्रिया केली. सर्व प्रक्रिया कायदेशीर राबवून किंमत निश्चित करुन विक्री केलेली आहे. मी सांगू इच्छितो की, राज्य सहकारी बँकेने ३० कारखान्यांची SARFAESI या कायद्यांतर्गत विक्री केली. जिल्हा मध्यवर्ती बँकेने ६ कारखाने त्यांच्या ताब्यात असून त्याची विक्री केली आहे. तसेच राज्य शासनाच्या निर्णयानुसार, मान्यतेनुसार भागीदारी किंवा भाडे तत्वावर १२ कारखाने देण्यात आले. राज्य सहकारी बँकेने देखील भाडे तत्त्वावर दिलेले ८ कारखाने आहेत. या मागे उद्देश असा होता की, त्या भागातील ऊसाचे गाळप पूर्ण व्हावे. काही कारखान्यांची जी किंमत होती त्या नुसार कारखाने विकलेले आहेत.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री यांनी माननीय अण्णा हजारे यांची तक्रार जाणीवपूर्वक बाजुलाच करुन दिली आहे, त्यांनी ती पाहिलीच नाही. या तक्रारीत पहिला आरोप असा आहे की, चालू असलेले कारखाने बंद पाडले. या कारखान्याची थकबाकी मोठी नव्हती. त्याला रिशेडयुल करता आले असते. सरकारकडे थक हमी होती.या कारखान्यांची विक्री केली त्यावेळी सरकारचा पैसा गृहीतच धरला नाही. बँकांनी स्वत:चा पैसा गृहीत धरला. मात्र सरकारला जो पैसा द्यायचा आहे, तो गृहीत न धरल्यामुळे किंमतीपेक्षा कमी भावात विक्री झाली.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१५५९ ...

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, श्री.अण्णा हजारे यांनी दुसरे असे सांगितले की, त्या कारखान्याच्या जमिनीची जी किंमत आहे, त्याहीपेक्षा कमी भावात याची विक्री झालेली आहे. त्यांनी तक्रारीत तिसरे असे सांगितले आहे की, जेथे ३ बिड्स पाहिजेत. तेथे एकाच व्यक्तीने ३ बिड्स भरल्या आहेत किंवा २ बिड्स एकाच व्यक्तीच्या आहेत. एकाच खात्यातून पैसे गेलेले आहेत. असे अनेक आरोप या ठिकाणी लागलेले आहेत. त्यामुळे हा प्रश्न विचारण्यात आला आहे की, या संदर्भातील चौकशी आपण करणार आहात काय?

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, येथे किंमतीचा विषय आला. साधारणपणे यामध्ये एक अंबादेवी सहकारी कारखाना होता. त्याची off-set price २३ कोटी १४ लक्ष होती ... (अडथळा)... माझा सांगण्याचा उद्देश हा आहे की, जी off-set price ठरली त्याप्रमाणे ते कारखाने विकले आहेत... (अडथळा)...

**उपाध्यक्ष** : मंत्री महोदय आपण उत्तर द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, off-set price ठरविताना राज्य सरकारची देणी का विचारात घेतली नाहीत? हे सर्व कशाच्या भरवशावर उभे राहिले, हे सर्व राज्य सरकारने दिलेल्या पैशाच्या भरवशावर उभे राहिले आहेत. याला सर्व भागभांडवल राज्य सरकारचे आहे. NCDC ने पैसा दिला आहे. याचा कोणाचाच विचार आपण केला नाही.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय एक स्पेसिफिक अंबादेवी सहकारी कारखाना म्हणत आहेत. परंतु, अनेक कारखाने असे आहेत की, ज्या कारखान्यांच्या संदर्भात तुम्ही ज्या किंमतीत विक्री केली आहे, त्यापेक्षा आजही त्या जमिनीची व्हॅल्यू जास्त आहे. असेही कारखाने आहेत की, ज्यांची विक्री झाल्यानंतर म्हणजे १० रुपयाला विकत घेतला आणि त्याच ॲसेटवर १०० रुपयांचे कर्ज मिळाले. ते कसे मिळाले, याचा अर्थ त्या ॲसेटची व्हॅल्यू १०० रुपये होती.

ता.प्र.क्र. ४१५५९ ...

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, या ज्या काही गोष्टी पॉईंट आऊट झालेल्या आहेत, त्या गोष्टींच्या संदर्भात श्री. अण्णा हजारे यांनी चौकशी मागितलेली आहे. ती आपण करणार काय?

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मी वारंवार सांगतो की, त्या ठिकाणी किंमती ठरल्यानंतर पेपरला जाहीरात दिली. लोकांना सर्वांना सांगितले. त्या त्या वेळेला लोकांनी ... (अडथळा)...

**उपाध्यक्ष** : मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्या.

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, काही लोकप्रतिनिधींच्या ठिकाणी हरकती झाल्या त्या ठिकाणचे व्यवहार थांबले.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय गोल गोल फिरत त्याच ठिकाणी येत आहेत. प्रश्न तक्रारीचा एवढाच आहे की, off-set price चुकीच्या ठरविलेल्या आहेत. दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या बिड्स बोलावल्या त्या बिड्स बोलावत असताना एकाच व्यक्तीने ३-३ बिड्स भरलेल्या आहेत. एकाच खात्यातून पैसे गेलेले आहेत. सरकारची देणी गृहीत धरुनच off-set price ठरविली पाहिजे. कारण सरकारच्या भरवशावर कारखाना उभा केला आणि सर्व पैसा बँकानी नेला. असे कसे चालेल? त्यामुळे off-set price ठरविताना तुम्हाला ते गृहीत धरले पाहिजे. ते काही गृहीत धरले नाही, हाच श्री.अण्णा हजारे यांचा आक्षेप आहे. त्यामुळे हा आक्षेप गृहीत धरुन तुम्ही याची चौकशी करणार काय, अतिशय सोपा प्रश्न आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते तसेच अन्य सन्माननीय सदस्य व सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी हा तारांकित प्रश्न उपस्थित केलेला आहे. राज्यामध्ये अनेक वर्षे याबद्दल बरीच चर्चा चाललेली आहे. या प्रश्नाच्या उत्तराच्या निमित्ताने मला एक गोष्ट लक्षात आणून द्यायची आहे. यातून कारण नसताना वेगळ्या पध्दतीचा एक गैरसमज निर्माण करण्याचे काम होत आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१५५९ ...

श्री.अजित पवार ...

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस हे ज्यावेळेस ५ वर्षांकरिता या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळेस त्यांच्याकडे देखील अशाच प्रकारची तक्रार माननीय खासदार श्री.राजू शेट्टी यांनी केली होती. त्याच बरोबर श्री.अण्णा हजारे यांनी केली होती. राज्यपाल महोदयांकडे तक्रार दाखल केली होती. माझ्या माहिती प्रमाणे बहुतेक मुख्य न्यायमूर्ती यांच्याकडे केलेली होती. तुम्ही स्वत: त्यावर रिमार्क्स मारुन सीआयडीची चौकशी करायला सांगितली.

अध्यक्ष महोदय, माझ्या माहितीप्रमाणे त्यावेळेस सुरुवातीला माननीय श्री.चंद्रकांत पाटील हे त्या खात्याचे मंत्री होते. त्यानंतर श्री.सुभाष देशमुख हे त्या खात्याचे मंत्री झाले. तुम्ही राज्याचे प्रमुख असताना ही सीआयडीची चौकशी झाली. त्या चौकशीमध्ये तसे पाहिले तर जास्त काही निष्पन्न झाले नाही. त्यानंतर तुम्ही ती चौकशी अँटी करप्शन ब्युरोकडे दिली. अँटी करप्शन ब्युरोने देखील तुम्हीच मुख्यमंत्री असताना त्या संदर्भात क्लिन चिट दिली.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर सरकार बदलले. सरकार बदलल्यानंतर माननीय श्री.उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री झाले. त्यांनी EOW च्या मार्फत चौकशी करण्याच्या सूचना दिल्या. एकीकडे EOW ची चौकशी सुरु होती. त्याच बरोबर सहकार विभागाने ....

नंतर श्री.शिंदे ...

ता.प्र.क्र.४१५५९...

श्री.अजित पवार...

सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी सांगितल्यानुसार कोविड काळामध्ये माननीय माजी न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली एक वेगळी चौकशी समिती नेमण्यात आली होती. या प्रकरणी ८३ व ८८ अन्वये कारवाई करण्यात आली होती व आरोपींना जी संधी द्यावयास पाहिजे होती ती देण्यात आली नव्हती. श्री.जाधव हे चौकशी समितीमध्ये होते. त्यांनी केलेल्या चौकशीमध्ये काहीही निष्पन्न झाले नाही. अशा प्रकारे EOW, ACB, CID आणि माननीय माजी न्यायाधीश यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात आलेली आहे. यामधील दोन चौकशा माननीय श्री.उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात व दोन चौकशा माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात झालेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य साखर कारखाने चालवतात. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अनेक सहकारी कारखाने राज्य सहकारी बँकेला चालविण्यासाठी द्यावयचे आहेत. ते ज्यांना चालविण्यासाठी घ्यावयाचे असतील त्यांनी तेथे जाऊन ते घ्यावेत. लोक आरोप करतात परंतु कारखाना चालविण्यास घेण्याकरिता कोणी पुढे येत नाही. सदरहू साखर कारखाना चालविणाऱ्यास एका पोत्यामागे ७५ रुपये अदा करावे लागतात व ३ कोटी रुपये द्यावे लागतात. या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते, राज्यातील अनेक मान्यवर व देश पातळीवरील अनेक मान्यवरांचा गैरसमज झालेला आहे. हे मी अतिशय स्पष्टपणे नमूद करतो. एखादा साखर कारखाना कोणी चालविण्यासाठी घेतला व त्यावर्षी ५ लाख साखरेच्या पोत्यांची निर्मिती झाली तर ५ लाख X ३ हजार रुपये प्रति क्वींटल दर यानुसार १५० कोटी रुपये रक्कम मिळू शकते. बँकेकडे साखरेची जेवढी पोती गहाण ठेवण्यात येतील त्यावर बाजार भावाच्या ८५ ते ९० टक्के रक्कम उचल म्हणून देण्यात येते. ही वस्तुस्थिती आहे. परंतु कारखाना २० कोटी रुपयांना खरेदी केला व १५० ते ३०० कोटी रुपये रक्कम कशी मिळाली, अशी विचारणा करण्यात येते.

ता.प्र.क्र.४१५५९...

श्री.अजित पवार...

शेतकऱ्यांच्या ऊसापासून तयार करण्यात येणाऱ्या साखरेच्या पोत्यावर pledge दिलेले असते, त्याचे ते पैसे असतात. सदरहू पोते विक्री केल्यानंतर त्या रकमेतून व्याजाची व मुद्दलाची रक्कम बँकेला अदा करण्यात येते. बँकेने आगाऊ रक्कम दिल्यानंतर ती शेतकऱ्यांना १५ दिवसांच्या आत अदा करण्यात येते. अशी परिस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, मी भेदभाव करु इच्छित नाही. सन्माननीय सदस्य श्री.हरीभाऊ बागडे हे संभाजी राजेंच्या नावाने साखर कारखाना चालवितात. अनेकांना साखर कारखाना चालविण्याचा अनुभव आहे. सातारा जिल्ह्यातील किसन वीर सहकारी साखर कारखाना एकेकाळी उत्तमरित्या सुरु होता. आता तो अडचणीत आला असून त्यावर ६२५ कोटी रुपये इतकी कर्ज झाले आहे. हा कारखाना चांगला सुरु असताना त्यावर कर्ज झाले आहे. त्यांनी प्रताप गड व खंडाळा सहकारी साखर कारखाना चालविण्यासाठी घेतला होता, त्यामध्ये ते अडचणीत आले. त्यामुळे कर्जाची रक्कम ८०० कोटी रुपयांवर गेली. कारखान्याच्या किंमती पेक्षा कर्जाची रक्कम अधिक झाली. आम्ही सोमेश्वर सहकारी साखर कारखाना चालविण्यासाठी घेतला होता त्यावर्षी १० कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. हा कारखाना चालविण्यासाठी का घेतला, अशी आम्हाला शेतकऱ्यांनी विचारणा केली होती. साखर कारखान्याच्या भागातील भौगोलिक परिस्थिती, ऊसाचे क्षेत्र व वसुली यावर सर्व अवलंबून असते. आजही कोल्हापूर भागातील रिकव्हरीचे प्रमाण १४ टक्के आहे व नंदूरबार परिसरातील रिकव्हरीचे प्रमाण केवळ १० टक्के आहे. नंदूरबार येथील साखर कारखान्यात एक टन ऊसातून १०० किलो व कोल्हापूर येथील साखर कारखान्यात एक टन ऊसातून १४० किलो साखरेचे म्हणजे ४० किलो अधिक उत्पादन निघते. ४० X ३० प्रति किलो दराने १,२०० रुपये इतकी रक्कम होते. एवढा मोठा फरक आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना यातील माहिती नसते. यामुळे या प्रकरणी प्रचंड भ्रष्टाचार झाला, असा बाऊ करण्यात येतो.

ता.प्र.क्र.४१५५९...

श्री.अजित पवार...

अध्यक्ष महोदय, काही सहकारी साखर कारखाने माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले म्हणून विक्रीस काढण्यात आले आहेत. ही बाब माननीय विरोधी पक्ष नेता यांनाही माहिती आहे. सदरहू कारखाने पैसे देऊ शकत नाहीत, त्यांना एक वर्षाची मुदत देण्यात यावी अन्यथा Securitisation Act खाली विक्रीस काढण्यात यावेत, असे आदेश माननीय उच्च न्यायलयाने दिले होते.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अण्णा हजारे यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे व त्यांनी यासंदर्भात मागील वेळीही तक्रार केली होती. यासंदर्भात त्यांना सहकार मंत्री यांनी एकदा जाऊन भेटावे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४१५५९.....

श्री.अजित पवार.......

आणि सीआयडी चौकशीचा अहवाल काय आहे, एसीबी चौकशीचा अहवाल काय आहे, ईओडब्ल्यु चौकशीचा अहवाल काय आहे आणि माननीय न्यायाधीशामार्फत झालेल्या चौकशीचा अहवाल काय आहे, याबाबतची माहिती त्यांना देण्यात यावी. कारण एकदा "दूध का दूध, पानी का पानी" होऊ द्या. यामधील वस्तुस्थिती सर्वांसमोर आणण्यात यावी, एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, यामधील एका तक्रारीच्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. उक्त गुन्हाची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे अद्याप कोणतेही conclusion आलेले नाही. सदर चौकशीची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे चौकशी प्रगतीपथावर असल्याचे, माननीय सहकारी मंत्री हे माननीय श्री.अण्णा हजारे यांना सांगू शकतात. उक्त प्रकरणाची प्रामाणिक चौकशी केली पाहिजे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, सीआयडी चौकशी झाल्यानंतर उक्त चौकशीचा अहवाल माननीय उच्च न्यायालयामध्ये सादर करण्यात आला होता. उक्त अहवालाच्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. आता त्यासंदर्भातील चौकशी ईओडब्ल्युमार्फत केली जात आहे. त्यामुळे माननीय श्री.अण्णा हजारे यांनी दिलेल्या पत्राची दखल घेऊन सहकार मंत्री महोदयांनी त्यांना सांगितले पाहिजे की, सदर प्रकरणाची चौकशी प्रगतीपथावर आहे. तसेच सदर प्रकरणाची चौकशी प्रामाणिकपणे होणे गरजेचे आहे, असे मला म्हणावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांनी विषय काढला म्हणून मी सांगू इच्छितो की, किसनवीर सहकारी साखर कारखान्यासारखे कारखाने का अडचणीमध्ये येतात? सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना नियमबाह्य कर्ज दिले जाते परंतु एखादा कारखानदार भापजमध्ये गेल्यामुळे त्यांना अतिरिक्त कर्ज दिले जात

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४१५५९.....

श्री.देवेंद्र फडणवीस......

नाही. इतकेच नव्हेतर त्यांनी कर्ज परत केले तरी त्यांना दुसरे कर्ज दिले जात नाही. त्यामुळे किसनवीर सहकारी साखर कारखाना अडचणीमध्ये आलेला आहे. माननीय श्री.मदन दादा यांनी भापजमध्ये प्रवेश केल्यामुळे या सरकारने त्यांची आर्थिक कोंडी केली. त्यामुळे किसनवीर सहाकरी साखर कारखाना अडचणीमध्ये आला आहे. याबाबींचा देखील विचार केला पाहिजे, असे माझे मत आहे.

श्री.अजित पवार : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर सरकार म्हणून मी उत्तर देत आहे.

अध्यक्ष महोदय, प्रथम सीआयडी व एसीबीमार्फत चौकशी करण्यात आली, ही बाब बरोबर आहे. ईओडब्ल्युमार्फत चौकशी सुरु असल्यामुळे त्यांचा अंतिम अहवाल माननीय न्यायालयामध्ये सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे माननीय न्यायालयाने तो अहवाल स्वीकारलेला नाही. याबाबतची सर्व वस्तुस्थिती माननीय सहकारी मंत्री यांनी समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांना सांगावी.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात सांगू इच्छितो की, माननीय स्व.यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असल्यापासून ते माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असेपर्यंत सर्रास साखर कारखान्यांना हमी दिली जात होती. आता माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील, माननीय श्री.अशोक चव्हाण, माननीय श्री.हसन मुश्रीफ हे कारखान्याशी संबंधित असलेले नेते उपस्थित आहेत, त्यांना देखील या सर्व बाबींची माहिती आहे. माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्या दोन-चार मिहिन्यांमध्ये माननीय श्री.समाधान अवताडे यांच्या कारखान्यास, विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास, माननीय श्री.कल्याणराव काळे यांच्या कारखान्यास, माननीय श्री.धनंजय महाडिक यांच्या कारखान्यास, माननीय श्री.संग्राम थोपटे यांच्या कारखान्यास अशा ५ कारखान्यांना शासनाने हमी दिली होती.

ता.प्र.क्र.४१५५९.....

श्री.अजित पवार.......

त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आता यानंतर राज्यातील कोणत्याही सहकारी साखर कारखान्यास राज्य सरकार हमी देणार नाही. हे सरकार सत्तेत येऊन अडीच वर्षांचा कालावधी झालेला आहे. तेव्हापासून वरील पाच कारखान्यानंतर राज्य सरकारने कोणत्याही सहकारी साखर कारखान्यास हमी दिलेली नाही. सदर कारखानाधारक स्वत:च्या हमीवर बँकेतून कर्ज घेऊन सदर कारखाने चालवित आहेत.

अध्यक्ष महोदय, अनेक बँका कर्ज दिल्यामुळे अडचणीमध्ये आल्या आहेत, असे सांगण्यात आले आहे. परंतु राज्य सहकारी बँकेला मागील वर्षी ३८० कोटी रुपयांचा नफा झालेला आहे. त्यामुळे सदर बँक अतिशय सुस्थितीत सुरु आहे. सदर बँकेच्या बोर्डावर आपण चांगले प्रशासन नेमल्यामुळे सदर बँकचे काम अतिशय सुस्थितीत सुरु आहे. त्यामुळे यामध्ये आपले देखील मोठे योगदान आहे. ईओडब्ल्युमार्फत केलेल्या चौकशीचा अहवाल अद्याप माननीय न्यायालयामध्ये सादर झालेला नाही, ही बाब मला मान्य आहे. सदर अहवाल माननीय न्यायालयामध्ये सादर केल्यानंतर उक्त प्रकरणी अंतिम निर्णय येईल.

यानंतर श्री.कुलकर्णी......

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, चुकीची माहिती सभागृहाच्या पटलावर येऊ नये, म्हणून मी बोलत आहे. माननीय उप मुख्यमंत्री हमीबाबत बोलले आहेत. ते योग्य आहे. परंतु मागील वर्षी दिलेले कर्ज त्यांनी परत केले. त्यांना अतिरिक्त कर्ज दिले. परंतु ते किसनवीर सहकारी साखर कारखान्यास दिलेले नाही. या कारखान्याने कर्ज परत केले. तरीही त्यांना कर्ज दिले नाही. याचे कारण जिल्ह्यातील राजकारण हे आहे. त्या राजकारणामुळे त्या कारखान्याला कर्ज दिलेले नाही. मी स्वत: त्याचा पाठपुरावा केला आहे. कोणाला कर्ज दिले आणि कोणाला याच प्रकरणात कर्ज दिले नाही, याची यादी माझ्याकडे आहे.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहात चुकीची माहिती सादर केली जात आहे. राज्य शासनाने पाच कारखान्यांना थकहमीचे कर्ज दिले होते. त्यामध्ये किसनवीर सहकारी साखर कारखाना, खंडाळा सहकारी साखर कारखाना, प्रतापगड सहकारी साखर कारखाना आहे. दुर्दैवाने या कारखान्यांनी थकहमी घेतली. परंतु त्यावर्षी त्यांनी कारखाने सुरु केले नाहीत. त्यामुळे विभागाच्या वतीने त्याबाबत चौकशी सुरु आहे. दुसरे असे की, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितल्याप्रमाणे मी स्वत: समाजसेवक श्री. आण्णा हजारे यांना भेटून सीआयडी चौकशी आणि जाधव समितीच्या अहवालाची माहिती देईन.

**उपाध्यक्ष :** प्रश्नोत्तराचा तास संपला

----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री. जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१८-२०१९ या वर्षांच ा अनुक्रमे एकोणवीसावा, वीसावा व बावीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर मांडतो.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा बावीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर मांडतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर मांडण्यात आले आहेत. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**उपाध्यक्ष :** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी स्थगन प्रस्तावाची सूचना देलेली आहे. मी दिलेली सूचना ही स्थगन प्रस्तावामध्ये कशी येते, याबाबत मला माहिती दिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एका महत्त्वाच्या विषयावर म.वि.स. नियम ५७ अन्वये मी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. या सभागृहामध्ये कायदे, नियम तयार केले जातात. त्याची पवित्रता आपण पाळत असतो. हे सभागृह लोकशाहीचे मंदिर आहे. या मंदिरामध्ये नियमानुसार कार्यवाही व्हावी. सर्व सन्माननीय सदस्यांना समान अधिकार देत त्यांच्या हक्काचे रक्षण झाले पाहिजे. विधानसभेत मुक्तपणे चर्चा करण्यासाठी नियमांचे संरक्षण दिले आहे.

अध्यक्ष महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६४ (२) अन्वये मंत्रीमंडळ हे विधानसभेला सामुदायिकरित्या जबाबदार असते. संविधानातील गाभा असलेले हे महत्त्वाचे तत्त्व दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर निवडून आलेले लोकप्रतिनिधी कार्यकारी प्रशासनावर अंकुश ठेवत असतात. विधानसभेच्या १८० पानांच्या नियम पुस्तिकेमध्ये ३२० नियम केले आहेत. सन्माननीय सदस्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याचे दायित्व माननीय अध्यक्षांवर आहे. त्यामुळे आपण आमच्यापेक्षा उंच आसनावर बसलेला आहात. 'धर्मचक्र प्रवर्तनाय', 'सत्यमेव जयते', असेही याठिकाणी लिहिले आहे. महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तिकेतील नियम क्रमांक २७३ ते नियम क्र. २७७ हे सदस्यांच्या हक्काच्या रक्षणासाठी ब्रिज ऑफ प्रिव्हिलेज (हक्कभंग) यादृष्टीने याकडे पाहिले जाते. म.वि.स.नियम क्रमांक २८५, २८८, २८९ यानुसार छोट्या छोट्या गोष्टींसाठी सन्माननीय सदस्यांचे संरक्षण केले जाते. एखाद्या पोलिसाला जर कोणत्या सन्माननीय सदस्याला अटक करावयाची असेल तर त्या पोलिसांनी आपणास माहिती दिली पाहिजे. यामागे कायद्याचे मूळ तत्त्व असे आहे की, एखादे सन्माननीय सदस्य त्याच्या नियमाच्या हक्कासाठी,

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

जनतेच्या हितासाठी सभागृहाचा आणि सभागृहाच्या आयुधांचा उपयोग करीत एखादा विषय मांडत असेल तर त्या सदस्यांस संरक्षण दिले पाहिजे. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटत आहे. मी जगाची माहिती घेतली आहे. जगामध्ये ज्या ज्या देशात भ्रष्टाचार झाला असेल त्या त्या देशात भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा झाली आहे.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला, त्याची चौकशी झाली परंतु आपल्या राज्यामध्ये देशातील अशी पहिला घटना घडत आहे की माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस... माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांबद्दल, त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबद्दल या सभागृहाने अनेकदा त्यांचे कौतुक केलेले आहे. राज्याच्या जनतेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असा एक मुद्दा त्यांनी उपस्थित केला व राज्यातील पराकोटीचा भ्रष्टाचार उघडकीस आणला. त्यानंतर जगामध्ये पहिल्यांदा असे घडले की, पोलीस यंत्रणा भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या मागे न लागता उघड करणाऱ्यांच्या मागे लागली.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तिकेतील १८० पानांमध्ये नमूद करण्यात आलेले ३२० नियम ज्यांच्या पाठीशी उभे आहेत त्यांना सी.आर.पी.सी. मधील कलम १६० अन्वये नोटीस देण्यात आली. अशा प्रकारे कायद्याचे व नियमांचे वस्त्रहरण होत असताना माननीय गृह मंत्री हे कृपाचार्य व द्रोणाचार्यांच्या भूमिकेत आहेत, याचे मला आश्चर्य वाटते. माननीय गृहमंत्र्यांचे यासंदर्भातील व्हिडिओज मी पाहिले. माननीय गृह मंत्री हे या सभागृहाचे वरिष्ठ सदस्य आहेत. माझ्यापेक्षाही एक टर्म जास्तीचा अनुभव त्यांना आहे व त्यामुळे त्यांच्याबद्दल मला अतिशय आदर आहे. त्यामुळे त्यांच्याकडून अशी अपेक्षा नव्हती. माननीय विरोधी पक्षनेता व सभागृहाचा सदस्य या नात्याने महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तिकेने त्यांना जो अधिकार दिला आहे त्यांचे उल्लंघन करीत तपास यंत्रणा त्यांच्या घरी जाऊन चौकशी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय गृह मंत्री श्री.दिलीपराव वळसे-पाटील हे देखील पूर्वी विधानसभा अध्यक्ष होते. वेळेअभावी मी काल काही बाबी शोधू शकलो नाही परंतु मला आठवते की, ते विधानसभा अध्यक्ष असताना त्यांनी सभागृहाच्या सदस्यांच्या अधिकारांबाबत भाष्य केलेले आहे. त्यांच्या कार्यकाळामध्ये सदस्यांच्या संदर्भातील दोन विशेषाधिकार त्यांनी मान्य केले होते. पहिला म्हणजे सन्माननीय सदस्य सभागृहात सांगतात ती माहिती सत्य मानून त्याची चौकशी केली पाहिजे व

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

दुसरा अधिकार असा सांगितला होता की, एखादे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये ज्यावेळी भाषण करतात, मुद्दे मांडतात, विचार मांडतात, तथ्य मांडतात, तत्त्व मांडतात, तर्क मांडतात तेव्हा त्यांना पूर्णपणे मुक्त अधिकार दिला पाहिजे. अर्थात, मंत्री महोदय भाषणातून किंवा उत्तरातून सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्द्यांचे खंडन करु शकतात परंतु पोलिसांचे राजकीयीकरण हा कोणता प्रकार आहे ? उत्तरातून मुद्द्यांचे खंडन केले जात नाही, ज्यांच्यावर आरोप केले आहेत त्यांच्या चौकशीतून खंडन केले जात नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपणास उद्देशून सर्व पुरावे व माहिती या ठिकाणी सादर केली. असे करताना अशी अपेक्षा होती की, सदर पुरावे, माहितीचा तपशिल यांची सत्यता तपासली जाईल. एखाद्या पोलीस अधीक्षकांच्या बदलीमध्ये कोणी दोन कोटी, तीन कोटी, पाच कोटी रुपये घेतल्याचे खरे असेल तर भ्रष्टाचाराला मदत होईल, भ्रष्टाचारी लोकांमध्ये मस्ती व अहंकार येईल अशा पध्दतीने सरकारने वागता कामा नये.

अध्यक्ष महोदय, भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्यावर कोणत्या कायद्यांतर्गत कारवाई केली जाते ? मी काल पाहिले की, टेलिग्राफ ॲक्ट अंतर्गत कारवाई केली जात आहे. आपण १ लाख ४४ हजार कोटी रुपये खर्च करीत असल्याचे कधी-कधी आश्चर्य वाटते. पोलिसांवर केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये १६ हजार कोटी रुपयांवरुन २१ हजार कोटी रुपयांपर्यंत आपण वाढ करीत आहोत. नव्याने पदभरती देखील केली जाणार आहे. या सर्व बाबी सूड भावनेने वागण्यासाठी आहेत का ?

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याशी आमचे वैचारिक मतभेद असतील परंतु मी त्यांचे अभिनंदन करतो. कारण त्यांनी दोन्ही बाजुंच्या बाबतीत मनातील खरी भावना बोलून दाखविली की, हे जे सुरु आहे ते चांगले नाही... (अडथळा...) मी दोन्ही बाजुंचा उल्लेख केला आहे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा गंभीर व तुमच्या-माझ्या हक्काचा मुद्दा आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या निमित्ताने आपण आज अतिशय महत्त्वाच्या विषयावर चर्चा करीत आहोत. कारण या ७ हजार ७० फुटांच्या गोलाकार इमारतीच्या भूमीने आपल्याला काही अधिकार दिलेले आहेत. हे अधिकार केवळ आपल्यासाठी आहेत. आज हा विषय राजकारणाचा नाही. काल भारतीय जनता पक्षामध्ये असलेले सन्माननीय सदस्य आज दुसऱ्या पक्षामध्ये आहेत. त्यामुळे हा कोणा एका पक्षाचा विषय नाही... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, "सदर स्थगन प्रस्तावाची सूचना दालनात फेटाळली आहे, मंत्री महोदयांनी निवेदन करावे, नोंद घ्यावी" असा निर्णय या अतिशय गंभीर विषयामध्ये आपल्याकडून अपेक्षित नाही. माझी आपणास या निमित्ताने हात जोडून विनंती आहे की, अशी संधी कधी तरी एकदाच मिळते आणि इतिहासात रामशास्त्री प्रभुणे यांचे नाव अजरामर होते. तशीच संधी आपल्याला देखील या निमित्ताने मिळालेली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांना नोटीस देण्यात आली आहे. आपण यासंदर्भातील नियम वाचावेत किंवा आपल्यासमोर बसलेल्या विधीमंडळाच्या सचिवांना देखील ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे बऱ्यापैकी पगार आहे, त्यांचा या विषयात चांगला अभ्यास आहे, आपण त्यांना यासंदर्भात विचारावे. माझी विनंती आहे की, जे अधिकारी माननीय विरोधी पक्षनेत्यांची चौकशी करण्यासाठी गेले त्यांच्यावर हक्कभंग आणावा.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. सुधीर मुनगंटीवार...

आज संध्याकाळी ५ वाजता तो दरवाजा उघडायचा. त्यांना तेथे उभे करायचे. ३ दिवस तेथे उभे करायचे. मग हक्कभंग समितीकडे हक्कभंग प्रस्ताव द्यायचा आणि स्वर्गीय आर.आर. पाटील यांच्या वेळी जशी आपण ९० दिवसांची शिक्षा दिली होती तशी शिक्षा त्यांना द्यायची. दुसरे म्हणजे याबाबत आपल्याला पुन्हा आपल्या अधिकारांच्या बाबतीत ओव्हर ऑईलिंग करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी माझी दुसरी विनंती आहे की, यावर एकदा मुक्तपणे चर्चा होऊ द्यावी आणि एकदा मुक्तपणे चर्चा झाल्यानंतर आमच्या विशेष अधिकार असलेल्या ज्या नियमाचे वस्त्रहरण झाले ते समोर आणायचे. "भ्रष्टाचार करणाऱ्यांना शिक्षा की भ्रष्टाचार काढणाऱ्यांना त्रास", याची देखील चर्चा झाली पाहिजे. आज विधानसभेचे जे नियम आहेत त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, आज आम्ही आहोत, पण उद्या राहणार नाही तसेच आज आपण आहात पण उद्या राहणार नाहीत. परंतु या नियमांच्या पवित्रतेसाठी मला विश्वास आहे की, माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी कोणतीही चिंता न करता हा सर्व भ्रष्टाचार, विशेषकरुन पोलीस विभागाचा... भेसळ तर सर्व ठिकाणी होते. पण असे म्हणतात की, सर्वात वाईट भेसळ आईच्या दुधातली असते. आज तो प्रश्न निर्माण झाला आहे. जो पोलीस विभाग आहे त्यांने कायद्याचे रक्षण करायचे, कायद्याचे संरक्षण करायचे, कायद्याचे राज्य आणायचे. पण तेच बेकायदेशीर असेल तर चर्चा झाली पाहिजे. हे जर आपण केली नाही तर याबद्दल एक शेर आहे. तो मी वाचतो.

"कुछ बात है कि हस्ती मिटती नहीं हमारी,

सदियों रहा है दुश्मन, दौर-ए-जहां हमारा,

यूनान-ओ-मिस्र-ओ-रुमा हो,

सब मिट गए जहां से,

बाकी मगर है, लेकिन नामों निशान हमारा"

श्री. सुधीर मुनगंटीवार...

हा निशाण तुम्ही मिटवू शकणार नाही. आपण स्थगन प्रस्ताव मान्य करावा. राम शास्त्री प्रभूणे यांचे नाव आणि त्याच्या पदचिन्हावर चालावं... एवढीच या सूचनेनुसार माझी विनंती आहे.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मी ४-५ मिनिटांपेक्षा बोलणार नाही.

**उपाध्यक्ष :** आपण केवळ २ मिनिटात आपले म्हणणे मांडावे.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, हा स्थगनचा विषय कसा होतो, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आमची सर्व भूमिका मांडली आहे. खरा प्रश्न हा आहे की, या राज्यामध्ये लोकशाही मार्गाने कारभार चालणार आहे काय, हा पहिला मुद्दा. संविधानाने कारवाया होणार आहेत काय, हा दुसरा मुद्दा. कायद्याचा भंग होणार आहे काय, हा तिसरा मुद्दा. आज हा विषय माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या बाबतीत आहे. पण उद्या या सदनातील कोणत्याही सन्माननीय सदस्याच्या बाबतीत तो असू शकतो किंवा बाहेरील कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत असू शकतो. म्हणून हा स्थगन प्रस्तावाचा विषय महत्त्वाचा आहे. खरं तर आम्ही नियम ५७ अन्वये सभागृहासमोरील कामकाज बाजूला ठेऊन या विषयावर चर्चा करण्याची आम्ही मागणी केली. त्यावर आपण विनंती केली त्यानुसार आम्ही आमचे म्हणणे मांडत आहोत. त्यामुळे कृपया आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे. कारण मी जास्त बोलणार नाही.

अध्यक्ष महोदय, या प्रकरणातील घटनाक्रम मी आपल्याला सांगतो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक पत्रकार परिषद घेतली. त्या पत्रकार परिषदेत त्यांनी एक पत्र वाचून दाखविले. पेन ड्राईव्ह नाही. ऑफीशिअल सिक्रेट ॲक्ट अंतर्गत आपण गुन्हेगार होऊ शकता, आपल्याला गुन्हेगार करता येते, साक्षीदार म्हणून आपल्याला बोलावू आणि नंतर गुन्हेगार करु, हे जे सर्व प्रकार सुरू आहेत त्याच्या मूळाशी जाऊन विचार केला तर सन्माननीय मंत्री महोदय सुध्दा या गोष्टीशी सहमत होतील की, त्या पत्रकार परिषदेमध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी डी.जी. यांचे पत्र वाचले. त्याच

ॲड आशिष शेलार...

पत्रकार परिषदेमध्ये सांगितले की, ही जी पेन ड्राईव्ह आहे त्यामध्ये संवेदनशील माहिती आहे. म्हणून The Whistle Blowers Protection Act नुसार मी हे सक्षम प्राधिकारी यांच्याकडे देतो. दिल्लीला जाऊन सक्षम प्राधिकारी म्हणून त्यांनी केंद्रीय गृह सचिवांनी ती माहिती दिली. भ्रष्टाचार उघडकीस आणला, राज्याचा फायदा केला, करोडोच्या अपव्यवहारापासून आपल्याला वाचविले किंवा तो समोर आणला. त्यामुळे हे प्रकरण पहिले नाही. माझ्या हातामध्ये ३-३ जजमेंट आहेत. ती सर्व मी वाचत नाही.

अध्यक्ष महोदय, याच पध्दतीने मे २०१८ मध्ये National Herald च्या केसमध्ये सन्माननीय श्री. सुब्रमण्यम स्वामी यांनी सुप्रीम कोर्टाला सांगितले. मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी. आपल्या पोलिसांना खरं म्हणजे ही माहिती असायला हवी. कदाचित तशी ती असेलही. माझे तर असे म्हणणे आहे की, ती मुद्दम दडपली जाते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय श्री. सुब्रमण्यम स्वामी असे म्हणाले की, माझ्याकडे ही सिक्रेट माहिती कशी आली तर "सकाळी मी जेव्हा हे वर्तमान पत्र घ्यायला गेलो तेव्हा दरवाजावर वृत्तपत्राबरोबर ते डॉक्युमेंट मिळाले".

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार....

त्यावर न्यायालयाने न्याय देताना सांगितले की, आम्ही हे डॉक्युमेंट ग्राह्य धरु. ऑफिशिअल सिक्रेट ॲक्ट मध्ये काय म्हटले आहे तर केवळ मे, २०१८ नाही तर मार्च, २०१९ मध्ये श्री. एन. राम हिंदू वर्तमानपत्राचे मालक यांनी राफेलच्या प्रकरणात जे डॉक्युमेंट आणले ते डिफेन्स डॉक्युमेंट, प्रिव्हेलेज डॉक्युमेंट होते. त्यावेळेला ते गंभीर स्वरुपाचे सिक्रेट डॉक्युमेंट डिफेन्सशी संबंधीत होते. तेव्हा श्री. राम यांच्या वकिलांनी असे म्हटले की, "We did not steal the document from the Ministry of Defence. We got them from confidential sources. No force on earth can make me or us reveal the source of documents because we have given the word." सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले की, जगातील कोणतीही ताकद मला हे विचारु शकत नाही.

अध्यक्ष महोदय, एप्रिल, २०२० मध्ये राफेल प्रकरणात श्री. यशवंत सिन्हा आणि श्री. अरुण शौरी ही दोन सन्माननीय व्यक्ती परत रिव्हिवसाठी गेले. तीन जेजसचे बेंच होते त्यात चिफ जस्टीस देखील होते. त्यामध्ये असा दावा करण्यात आला की, हे डॉक्युमेंट इलिगली मिळाले असून लिक झालेले आहेत. त्यामुळे न्यायालयाने ते ग्राह्य धरु नये. जस्टीस गोगई, जस्टीस जोसेफ आणि जस्टीस कौल या तीन्ही जजेसने हे लिक असले तरी ते कोणत्या मार्गाने मिळाले हे महत्त्वाचे नसून आम्हाला या डॉक्युमेंटची सत्यता बघावी लागेल हे सांगितले आणि सर्वोच्च न्यायालयाने ते मान्य केले. अशा पद्धतीने भ्रष्टाचार उघडकीस आणणारे एक डॉक्युमेंट कॉम्पिटंट ॲथॉरिटीकडे दिले म्हणून आपण ऑफिशीअल सिक्रेट ॲक्ट खाली साक्षीदाराची नोटीस देणार आणि आपण हा ॲक्ट बंद करता काय असा प्रश्न विचारणार. हे सर्व करुन आपण आम्हाला गुन्हेगार करायला निघाले आहात काय ? अशा पद्धतीने जर आपण गुन्हेगार करीत असाल तर अशा प्रश्न निर्माण होतो की, लोकशाही, संविधान, सर्वोच्च न्यायालय आणि कायदा याचे राज्यातील नागरिकांना आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांना संरक्षण आहे की नाही? याबाबत सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी एक शेर सांगितला आहे. त्यामुळे मी एवढेच सांगतो की, माननीय

ॲड. आशिष शेलार....

विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांची कार्य पद्धती भ्रष्टाचाराला लपविणारी नसून भ्रष्टाचाराला उघड करण्याची आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रकरणामध्ये प्रश्न विचारण्यासाठी दोन तास चौकशी केली. माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ म्हणाले की, चौकशी केली तर काही हरकत नाही ना ? याबाबत आम्ही कधी नाही म्हणालो नाही. कारण आम्ही सर्वजण ती माहिती देऊ. पण आपण विटनेस म्हणून नोटीस द्याल आणि आरोपी करण्याचे प्रश्न विचाराल तर हे सर्वोच्च न्यायालयालाही मान्य नाही. त्यामुळे आपण असे करुच शकणार नाही.

"जहां से तेज हवाओं का आना-जाना है,

दीया हमें वहीं लगाना है,

इबादत की जगह तु ना हमें बता,

हमें पता है हमारा सर कहां झुकाना है."

अध्यक्ष महोदय, आम्ही अशा गिधड धमक्यांना घाबरत नाही. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना कायद्याचे संरक्षण देणे, हे आपल्या हातात आहे त्यामुळे आपण ते करावे, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत**

श्री मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है. मेरा एक छोटासा विषय है. भारत में कश्मीर की समस्या को लेकर "दी कश्मीर फाईल्स" नामक एक फिल्म आयी है. इस फिल्म को भारत के कई राज्यों ने टैक्स फ्री किया है. सदन में सम्माननीय वित्त मंत्री जी उपस्थित है. मैं उनसे निवेदन करना चाहता हूं कि "दी कश्मीर फाईल्स" फिल्म को महाराष्ट्र में भी तुरंत टैक्स फ्री घोषित किया जाए.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय शिरसाट)**

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत

श्री. राधाकृष्ण विखे –पाटील : अध्यक्ष महोदय,या ठिकाणी सदर विषयाबाबत गंभीर चर्चा झालेली आहे. प्रिव्हिलेजच्या मुद्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी मुद्दा मांडला. या बाबत आपण निर्णय द्यावा. सदस्यांच्या हक्कांचे हनन होत आहे. या संबंधी काही प्रकरणे माझ्याकडे देखील आहेत. मात्र प्रत्येक प्रकरण येथे मांडता येत नाही. सरकारमधून काम करताना काही जणांचा उन्मात दिसून येत आहे. येथे जर प्रत्येक प्रकरण मांडायला लागलो तर फार वेळ जाईल.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांच्या बाबत मुद्दा उपस्थित झालेला आहे. त्यांच्या हक्कांचे संरक्षण केले जाणार आहे की नाही ? सन्माननीय सदस्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जाबाबदारी आपली आहे. याचे गांभीर्य लक्षात घेऊन जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्या बाबत येथे तत्काळ चर्चा सुरु होणे गरजेचे आहे. या संबंधी आपण निर्णय करावा, ही विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट ) :** मला असे वाटते की,हा विषय शासनाने गांभीर्याने घेतला असून योग्य वेळी मंत्री महोदय उत्तर देतील.

श्री. दिलीप वळसे –पाटील : अध्यक्ष महोदय, या सदनात माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी कालच्या नोटीस संबंधी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. मी ३५ वर्षापेक्षा जास्त काळ या सदनाचा सदस्य म्हणून निवडून आलेलो आहे. जवळपास मला ३७ वर्षे झाली आहेत. विधान सभेचे अध्यक्ष म्हणूनही कामकाज करण्याची मला संधी मिळाली. सभागृहातील प्रथा, परंपरा, प्रोटोकॉल, प्रिव्हिलेज यांची मला माहिति आहे. तसेच आमचे मित्र माननीय विरोधी पक्ष नेते यांना देखील हे सर्व माहीत आहे. प्रिव्हिलेज काय आहे, हे त्यांना माहीत आहे. सदनातील सदस्यांच्या प्रिव्हिलेज संबंधी कोणतेही दुमत नाही. सभागृहात केसेस वाचून दाखवल्या, कोणतीही माहिति दिली तर सन्माननीय सदस्यांना कोणी काहीही विचारु शकत नाही.

श्री. दिलीप वळसे –पाटील.....

अध्यक्ष महोदय, एक घटना अशी घडली की, राज्याच्या पोलीस विभागातील एसआयटी मधून फोन टॅपिंग चुकीच्या पद्धतीने केले गेले. परवानगी न घेता केले गेले. फोन टॅपिंग केल्या नंतर या संबंधी माननीय विरोधी पक्ष नेते यांनी हा प्रश्न सभागृहात मांडला. या विषयी चौकशी करण्याबाबत राज्य शासनाने आधीच कमिटी नेमली होती. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी हा विषय मांडण्याच्या आधीच कमिटी तयार केलेली होती. त्या कमिटीने अहवाल दिल्यानंतर एक गुन्हा दाखल झाला तो गुन्हा अज्ञात व्यक्तीच्या विरुध्द करण्यात आला. या गुन्ह्याच्या संदर्भात चौकशीचे काम तपास अधिकारी यांच्याकडे असते. तपास अधिकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास करीत असताना २४ लोकांचे जबाब घेतले. सीआरपीसी मधील कलम १६० अंतर्गत तपास अधिकाऱ्यांना कोणतीही माहिती हवी असेल तर त्यांना बोलवण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराच्या अंतर्गत.... मी या बाबत वाद घालू इच्छित नाही किंवा काही वेगळे बोलू इच्छित नाही. आधी नोटीस दिलेली होती, प्रश्नावली पाठवली होती.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.दिलीप वळसे-पाटील …

माननीय विरोधी पक्ष नेत्यांना काही कारणामुळे त्याचे उत्तर देता आले नाही. त्यामुळे एक-दोन दिवसांपूर्वी त्यांना पोलिसांनी, तपास अधिकाऱ्यांनी सीआरपीसीच्या कलम १६० ची नोटीस पाठविली. कलम १६० च्या नोटिसच्या अर्थ एवढाच की, तुम्ही या संदर्भात तुमचा जबाब द्या. तो जबाब पोलीस स्टेशनमध्ये घ्यायचा की, घरी घ्यायचा याबाबत जी काही चर्चा झाली, त्यानंतर तो जबाब घरी घ्यायचे ठरले. त्याप्रमाणे काल जबाब घेतला.

अध्यक्ष महोदय, मी या सभागृहाला एवढेच सांगू इच्छितो की, ...(अडथळा)... प्रश्न काय विचारले, मी ते प्रश्नही पाहिले नाहीत व उत्तरे देखील पाहिली नाहीत. या संदर्भामध्ये ... (अडथळा)... सागर असतील ना, सागर असल्याशिवाय असे बोलू शकत नाहीत.

अध्यक्ष महोदय, आता चौकशी अशी सुरु आहे की, एसआयडी मधला हा डेटा बाहेर कुठे गेला? या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केंद्रीय सचिवांना पेन ड्राईव्ह दिला. तपास यंत्रणा तपास करीत असताना केंद्रीय सचिवांना देखील पोलीस विभागाने पत्र पाठवून तो पेन ड्राईव्ह तुम्ही आम्हाला उपलब्ध करुन द्या, अशी मागणी केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, एखाद्या गुन्ह्यामध्ये तपास पूर्ण करायचा असेल तर, त्यामध्ये जे सर्व संबंधित आहेत, त्या सर्वांचे सर्कल पूर्ण व्हायला लागते. ते सर्कल पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून माननीय विरोधी पक्ष नेते यांनी त्यामध्ये आपल्याकडे काय माहिती आहे .... आता शेवटी पोलिसांनी काही प्रश्न जरी विचारले तरी, त्याचे उत्तर काय द्यायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. त्यामुळे माझे असे मत आहे की, हा एक रुटिनचा भाग आहे. आज ते असतील, उद्या आणखीन कोणी असतील.

अध्यक्ष महोदय, मी थोडा कायदा शिकलो आहे. कदाचित माझ्या माहितीमध्ये फरक असेल. क्रिमिनल केसेसमध्ये कोणालाही इम्युनिटी नाही. विरोधी पक्ष नेत्यांना जी नोटिस पाठवली, ती आरोपी म्हणून पाठवलेली नाही. ती जबाब

श्री.दिलीप वळसे-पाटील …

देण्यासाठी... त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध झाली, ती कुठून झाली, काय झाली, ते त्यांनी सांगितले असेल की, वर्तमानपत्रातून मिळाली किंवा आणखीन इकडून, तिकडून मिळाली. त्यामुळे या विषयामध्ये जाणीवपूर्वक विरोधी पक्ष नेत्यांना अडचणीत आणण्याचा, त्यांना कुठल्या कटात फसविण्याचा वगैरे शासनाचा अजिबात संबंध नाही.

अध्यक्ष महोदय, त्यामध्ये जो तपास अधिकारी आहे, तो तपास अधिकारी त्या संदर्भामध्ये चौकशी करेल व त्यातून त्यामध्ये अंतिम निर्णय होईल. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हा विषय या ठिकाणी थांबवावा.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी हा विषय नीट मांडला आहे. यात मला फक्त २-३ गोष्टी सांगावयाच्या आहेत. पहिली गोष्ट अशी की, मला प्रश्नावली पाठविल्यानंतर मी लेखी उत्तर देऊन कळविले होते की, मी याचे उत्तर देणार आहे. मी आधीच सांगितले होते की, मला यात प्रिव्हिलेज वगैरे वापरायचाच नाही. कारण लपविण्यासारखे काहीच नाही.

अध्यक्ष महोदय, महत्वाचे म्हणजे प्रश्नावलीतील प्रश्न व काल विचारण्यात आलेले प्रश्न यात गुणात्मक फरक आहे. प्रश्नावलीत जे प्रश्न होते ते साक्षीदाराकरिता होते. काल मला जे प्रश्न विचारण्यात आले ते आरोपीकरिता होते. काय प्रश्न विचारला, तुम्ही ऑफिशिअल सिक्रेट्स ॲक्टचा भंग केला आहे, असे तुम्हाला वाटत नाही काय, असे साक्षीदाराला विचारतात? असे ४-५ प्रश्न आहेत. त्यातून हे लक्षात आले की, कोणीतरी जाणीवपूर्वक आधीची जी साक्षीदाराकरिताची प्रश्नावली होती ती प्रश्नावली बदलून या व्यक्तीला कोठे गुंतवता येते काय, आरोपी, सह आरोपी करता येते काय, अशा प्रकारचे ४ प्रश्न त्यामध्ये होते.

अध्यक्ष महोदय, काही फरक पडत नाही, काहीच फरक पडत नाही. कारण मी वकील आहे. मला समजते. ऑफिशिअल सिक्रेट्स ॲक्ट सोडून द्या, मी तर The Whistle Blower Protection Act प्रमाणे म्हणजे विरोधी पक्ष नेता म्हणून नाही

श्री.देवेंद्र फडणवीस ...

तर, साधा एक माणूस, एक नागरिक म्हणून देखील The Whistle Blower Protection Act प्रमाणे मी पूर्णपणे सॅनिटाईज्ड आहे, मी त्यातून पूर्णपणे प्रोटेक्टेड आहे आणि मी अतिशय जबाबदारीने वागलो आहे. त्या ट्रान्सस्क्रिब माझ्याकडे होत्या. त्या संध्याकाळी तुमच्या मंत्री महोदयांनीच प्रेसला दिल्या.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस...

त्या माझ्याकडे होत्या. त्यामुळे कोणाची बदनामी होऊ शकते म्हणून त्या ट्रान्सक्रीप्ट केंद्रीय गृह सचिव हे कॉम्पीटन्ट अर्थॉरिटी असल्याने त्यांना देत आहे, असे मी सांगितले होते. आयपीएस अधिकाऱ्यांची कॉम्पीटन्ट अर्थॉरिटी केंद्रीय गृह सचिव असल्याने मी ते त्यांचेकडे दिले होते. या संदर्भात मी कालचे प्रश्न पाहिल्यानंतर माझ्या लक्षात आले की, यात काही तरी राजकीय वळण देण्यात येत आहे. मला अडचण नाही, मी सामोरे जाण्यास तयार आहे. आपण मला इतक्या वर्षांपासून ओळखता. मी आपणास ओळखतो म्हणून आपणावर आरोप करीत नाही. प्रश्न कोठे बलदण्यात आले, ते कोणी बदलले हे मला माहिती असून त्यामुळे काही फरक पडत नाही. माझ्या वडिलांना स्व.इंदिरा गांधी यांनी २ वर्षे जेलमध्ये ठेवले होते, त्यांच्यावर कोणताही गुन्हा नव्हता. माझ्या काकूवर कोणताही गुन्हा नसताना तिला १८ महिने जेलमध्ये ठेवले होते. आम्ही जेलला घाबरणारे लोक नाहीत, जनतेसाठी लढणारे आहोत. ज्यांनी ही प्रश्नावली बदलली त्यांनी लक्षात घेतले पाहिजे की, अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या मुद्यांवर काहीही झाले तरी आम्ही लढत राहणार आहोत. यासंदर्भात सरकारची भूमिका, पोलिसांची भूमिका जी असेल त्यासंदर्भात कायदेशीर लढाई लढण्यात येईल.

------------

**पृ.शी.:** मुळशी धरणाचे पाणी वळविण्याबाबत दुसऱ्या सुर्वे समितीच्या प्रलंतिब अहवालावर कार्यवाही व उपाययोजना करणे.

**मु.शी.:** मुळशी धरणाचे पाणी वळविण्याबाबत दुसऱ्या सुर्वे समितीच्या प्रलंतिब अहवालावर कार्यवाही व उपाययोजना करणे या संबंधी ॲड. राहूल कुल, श्री.जयकुमार गोरे वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. राहूल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय जलसंपदामंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मावळ व मुळशी तालुक्यात (जि.पुणे) टाटा पॉवर कंपनीने एकूण सहा धरणे बांधली असणे, या धरणातील पाणीसाठा पश्चिमेकडे वळवून त्याव्दारे विद्युत निर्मिती करण्यात येत असणे, या धरणांच्या अनुषंगाने विद्युत निर्मितीसाठी काही पाणी वळविणेसंदर्भात स्वातंत्र्य पुर्व काळात करारनामे झालेले असणे, महाराष्ट्रातील कोयना जल विद्युत प्रकल्प व टाटा जल विद्युत प्रकल्प समुहातून विद्युत निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी (मुळशी धरणाचे पाणी) टप्प्या टप्प्याने कमी करण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये व माहे मे, २०१९ अशा दोन वेळा समित्या नियुक्त केल्या गेल्या असणे, पश्चिम महाराष्ट्रात पाण्याची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना १०० टी एम सी पेक्षा जास्त पाणी जल विद्युत वीज निर्मितीसाठी कृष्णा भीमा खोऱ्यातील वळविण्यात आले असणे, वास्तविक पाहता या पाण्यावर पहिला नैसर्गिक हक्क असणाऱ्या कृष्णा, भीमा खोऱ्यातील नागरिकांना आज देखील मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाईस सामोरे जावे

असुधारित प्रत

ॲड. राहूल कुल...

लागत असणे, त्यामुळे हे पाणी मूळ प्रवाहात आणणे गरजेचे असणे, समिती सदस्यांच्या बैठकांमध्ये समिती सदस्यांनी पाणी पूर्वेकडे वळविण्याची मागणी केलेली असणे, हे पाणी मिळाल्यास दौंड, पुरंदर आणि बारामती तालुक्यातील (जि. पुणे) कायमस्वरूपी दुष्काळी भागातील सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो. कोट्यवधी रुपये खर्च करून कार्यान्वित करण्यात आलेली पुरंदर उपसा सिंचन व जनाई - शिरसाई सिंचन योजना सक्षमपणे चालवता येणे शक्य असणे, दौंड तालुक्यातील (जि. पुणे) खोर, पडवी, देऊळगाव गाडा, कुसेगाव, वासुंदे, हिंगणीगाडा, रोटी, जिरेगाव व पांढरेवाडी या गावांचा समावेश जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजनेत करण्यात आला असून त्यामधील काही समाविष्ट परंतु भरता न येणारे तलाव, समाविष्ट व भरता येणारे तलाव व नव्याने समाविष्ट करण्याचे तलावाचे फेर सर्वेक्षण करण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये मा. मंत्री यांचेकडे केलेली असणे, मुळशी धरणाचे पाणी वळविण्याबाबत स्थापन केलेल्या दुसऱ्या सुर्वे समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित असल्याने हा पाणी वळविण्याचा प्रस्ताव देखील प्रलंबित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट) :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

ॲड. राहूल कुल : अध्यक्ष महोदय, पुणे व सोलापूर जिल्ह्यातील शेतीच्या पाण्यासंदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. टाटाने धरणामध्ये कशा पद्धतीने पाणी आडवले याची सविस्तर माहिती दिलेली आहे. ती मला मान्य आहे. त्याबाबत जोपर्यंत माननीय सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत संबंधित समितीचा अहवाल अंतिम करू नये, त्याचा तोपर्यंत अभ्यास करावा, हे उत्तर मला मान्य आहे. हा विषय मुळशी धरणाशी संबंधीत टाटा कंपनीच्या संदर्भातील आहे. मुळशी व सर्व परिसर इकोसेन्सिटिव्ह झोन जाहीर केलेला आहे. त्या ठिकाणी पर्यावरण पूरक सर्व व्यवस्था करण्याचा आपला प्रयत्न आहे. खूप मोठी बंधने त्या परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांवर घालण्यात आलेली आहेत. पर्यावरणाची एवढी बंधने घातलेली असताना पूर्वमुखी ४५ टीएमसी पाणी अनैसर्गिकरित्या पश्चिमेकडे वळविण्यात आले आहे. त्यावेळची गरज पाहता वीज निर्मितीसाठी ते आवश्यक होते, ही बाब नाकारता येत नाही. आता पाण्याचा प्राधान्यक्रम पाहता ते टप्प्याटप्प्याने वळविण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी पुढाकार घेतला होता व हा विषय मार्गस्थ करण्यासाठी मदत केली होती.

अध्यक्ष महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर याप्रकरणी तातडीने निसर्गाचा समतोल राखण्यासाठी निर्णय घेण्यात येईल काय ? पुणे महानगरपालिकेसाठी ११.५ टीएमसी पाणी वापर मंजूर आहे, असे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातील उत्तरात नमूद करण्यात आले आहे. प्रत्यक्षात २३ टीएमसी पाणी पुणे महानगरपालिका वापरत आहे. आम्ही पुणे येथे राहतो. यासंदर्भात आमचा विरोध नाही. परंतु सातत्याने नियमानुसार पाणी वापर करण्यात येईल, अशी उत्तरे वेगवेगळ्या समित्यांसमोर देण्यात आली आहेत. समितीसमोरील कामकाजास विधानसभेसमोरील कामकाजाप्रमाणे मानन्यात येते. परंतु अशी बाब असतानाही वर्षानुवर्षे पुणे महानगरपालिका पाणी वापर कमी करीत नाही. त्याचे महत्त्वाचे कारण

ॲड. राहूल कुल...

असे आहे की, सदरहू धरणे जलसंपदा विभागाची असून त्यावर महानगरपालिकेचे नियंत्रण आहे. जगात असे उदाहरण कदाचित नसेल. पुणे जिल्ह्याचे माननीय पालक मंत्री तथा उप मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी वेगवेगळ्या समित्यांच्या बैठकीत सदरहू नियंत्रण जलसंपदा विभागाकडे सुपूर्द करण्यात यावे, असे आदेश दिले आहेत त्याची पायमल्ली करण्यात येत आहे. यासंदर्भात एमडब्ल्यूआरआरएनने वारंवार निकाल दिले असून त्यास अद्याप स्थगिती देण्यात देण्यात आलेली नाही. पुणे महानगरपालिकेने ११.५ टीएमसी पेक्षा अधिक पाणी वापर करु नये. परंतु कायद्याने उक्त बाब बंधनकारक असताना पुणे महानगरपालिका दादागिरी करुन अधिक पाणी वापर करीत आहे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल......

अध्यक्ष महोदय, शासनाने ८१ टक्के तर शेतकऱ्यांनी १९ टक्के देयके भरावीत असा क्रांतीकारी निर्णय मागील सरकारने जानाई शिरसाई पुरंदर या योजनेंतर्गत घेतला होता. तरी देखील पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. मुळशी धरणातून पाणी पुरवठा केला तर तो पाणी पुरवठा व्यवस्थित होईल. सदर योजनेच्या नियोजनामध्ये काही चुका झालेल्या आहेत. उक्त योजनेमध्ये काही तलाव आहेत. परंतु मापदंडामुळे त्या तलावामध्ये पाणी भरता येत नाही. आता उक्त योजनेतून सदर तलावांना पाणी मिळाले नाही तर भविष्यामध्ये त्या तलावांना कोठूनही पाणी मिळणार नाही. त्यामुळे शासनाने सदर मापदंड शिथिल करुन पुन्हा सर्व्हे करणार काय, तसेच तेथील शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत सरकार निर्णय घेणार आहे काय?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मागील सरकारने दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी भावे समिती नियुक्त केली होती. माझ्या माहितीनुसार सन्माननीय सदस्य ॲड.राहुल कुल व सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत ठाकूर हे भावे समितीच्या बैठकीस उपस्थित होते. सदर समितीने याबाबतचा नकारात्मक अहवाल सादर केलेला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांचा सांगू इच्छितो की, आपण सन्माननीय सदस्य ॲड.राहुल कुल यांच्याजवळ जाऊन गोंधळ घालत असल्यामुळे मी देत असलेले उत्तर त्यांना ऐकू येत नाही. त्यामुळे मला पुन्हा उत्तर द्यावे लागेल. त्यामुळे आपण आपल्या मूळ आसनावर येऊन बसावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सन २०१९ मध्ये भावे समितीचा अहवाल नकारात्मक आला. त्यानंतर सुर्वे समिती नेमण्यात आली. भावे समितीने असे मत व्यक्त केले होते की, सन १९२० ते सन १९३० च्या दरम्यान पुणे जिल्ह्यातील सर्व धरणांचे पाणी कोकणाला देऊन वीजनिर्मिती सुरु करण्यात आली होती. त्यावेळी देशाला वीज हा प्रकार नवीन होता. त्यामुळे सदर पाच-सहा धरणातील ४२.६० टी.एम.सी. पाणी खाली सोडून वीजनिर्मिती केली जात होती. बिराल येथे ३०० मेगावॅट वीजनिर्मिती केली जात आहे. खोपोली येथे ७२ मेगावॅट वीजनिर्मिती केली जात आहे.

श्री.जयंत पाटील......

भिवापूर येथे विद्युतगृह आहे. तेथे ७३.५० मेगावॅट वीजनिर्मिती केली जात आहे. हे पाणी पुन्हा पूर्वकडे वळवू नये, असा भावे समितीने निष्कर्ष दिलेला आहे. उक्त अहवालामध्ये त्यांनी असे सुचविलेले आहे की, सदर धरणाच्या खाली जात असलेल्या पाण्याचा वापर सुनिश्चित झालेला आहे. जवळपास ३० टी.एम.सी. पाण्याचा वापर सिंचन आणि बिगर सिंचनासाठी करण्यात येत आहे. माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये पुन्हा सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीने सहा बैठका घेतलेल्या आहेत. याबाबतचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये करण्यात आलेला आहे. आपल्या समोर सर्वच मुद्दे पारदर्शीपणे मांडण्याचे काम केले आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये या समितीने एक निष्कर्ष काढला आहे. तो म्हणजे कृष्णेच्या पहिल्या लवादामध्ये पाणी मिळाल्यानंतर दुसरा लवाद जाहीर करण्यात आलेला आहे. परंतु अजून नोटिफाय झालेला नाही. सदर लवाद नोटिफाय होण्यापूर्वी याबाबत आपण कोणताही निर्णय घेतला तर त्याचा परिणाम लवादाच्या निर्णयावर होऊ शकतो. त्यामुळे दुसरा लवाद नोटिफाय होत नाही, तोपर्यंत कोणतेही काम करु नये, अशा प्रकारचे श्री.नारगोळकर, वरिष्ठ विधिज्ञ तथा समिती सदस्य यांनी सांगितले आहे. दुसरा लवाद लवकरच नोटिफाय केला जाईल, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना विनंती आहे, याबाबतचा आग्रह आज करण्यापेक्षा दुसरा लवाद नोटिफाय झाल्यानंतर त्यावर विचार करणे योग्य राहील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न हा पुणे शहरातील पाणी वापरसंदर्भात विचारलेला आहे. शासनाने पुणे शहराला ११.५० टी.एम.सी. पाणी देणे अभिप्रेत आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी......

श्री. जयंत पाटील....

अध्यक्ष महोदय, सध्या पुणे शहरात २२ ते २३ टीएमसी पाणी वापरले जात आहे. महाराष्ट्रातील प्रॉस्पेरिटी सेंटर म्हणून पुणे शहर ओळखले जाते. त्यामुळे त्याठिकाणी पाण्याचे रिस्ट्रीक्शन करणे योग्य नाही. त्याचप्रमाणे पाण्याचा पुनर्वापर केला पाहिजे. असा राज्य शासनाचा आग्रह आहे. एमडब्ल्युआरआरएनेही याबाबत दोनवेळेस पत्र पाठविलेले आहे. पुणे महानगरपालिकेला जायका कंपनीने निधी दिला आहे व प्रकल्प करण्यासाठी फायनान्स देण्याचा निर्णय केला होता. परंतु पुणे महानगरपालिकेमध्ये अंडरस्टँडींग कमी झाल्यामुळे स्टँडींग कमिटीने निर्णय घेण्यास असमर्थता दर्शविली असल्याचे दिसत आहे. त्यामुळे जायकाचा प्रकल्प निविदा प्रक्रिया करुनही लवकर निर्णय का झाला नाही ? शवेटी सर्व निविदा रद्द करण्यात आल्या आहेत. निविदेमध्ये मर्यादेपेक्षा अधिक किंमत होती, अशी माझी माहिती आहे. जायका कपंनीमध्ये निगोसिएशन नाही, असा एक क्लॉज असतो. त्यामुळे पुणे शहरात पाण्याचा पुनर्वापर करण्याचे जे एसटीपी होते त्यास विलंब झाला आहे. आता नवीन निविदा काढून कामे देण्यात आल्याची माहिती मला मिळाली आहे. त्यामुळे आता एसटीपी झाल्यानंतर आणखी ३००-४०० एमएलडी पाणी रिसायकल करण्याचे प्रकल्प हाती घेतले नाही. माझ्या माहितीप्रमाणे १,५०० एमएलडी पाणी रिसायकल केले पाहिजे. हे ज्यावेळेस होईल त्यावेळेस सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील तलाव भरणे आणि इतर ज्या मागण्या आहेत त्या पूर्ण होतील. तेथे पाण्याचे दुर्भिक्ष आहे. यात कोणतेही दुमत नाही. पुणे शहरास पाण्याचे रिसायकल करण्यासाठी मागील पाच वर्षात संधी उपलब्ध होती. परंतु ते काम पुणे महानगरपालिकेकडून झाल्याचे दिसून येत नाही. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुणे महानगरपालिका पुन्हा काम करण्यास सुरुवात करेल. त्यावेळेस हे सर्व प्रकल्प लवकर केले जातील. पुढील भागाकरिताही पाणी रिसायकल करुन ते उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

ॲड. राहूल कुल : अध्यक्ष महोदय, शिरसाई आणि पुरंदरबाबत माझा तिसरा प्रश्न होता. त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. तसेच आता सांगण्यात आले की,

ॲड. राहूल कुल .....

की पुणे शहरासाठी प्रॉस्पेरिटी रिस्ट्रीक्ट करणार नाही. असे असेल तर एमडब्ल्युआरआरएने जो निर्णय दिला आहे तो शासन मान्य करणार किंवा नाही ? हा निर्णय शासनावर बंधनकारक आहे किंवा नाही ? असेच रिलॅक्सेशन दिले जाणार असेल तर प्रॉस्पेरिटीच्या नावावर शेतीच्या पाण्याचे वाटप रद्द करण्याचे ठरविले आहे काय ?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रॉस्पेरिटेचे सेंटर पुणे आहे, असे माझे पहिले विधान होते. पुण्यातील पाण्याचे रिस्ट्रीक्शन करण्याऐवजी ते रिसायकल करण्यावर भर द्यावा, असे मी विधान केले होते. माझ्या उत्तरातून असे ध्वनीत होत होते की, हे पाणी रिसायकल केले तर पुण्याच्या पाण्याचा वापर जिथे पाणी कमी पडतो तेथे करता येईल. त्यामुळे एमएमडब्ल्युआरआरएने दिलेला निर्णय बंधनकारक आहे. ११.५ टीएमसी पाण्याचाच वापर केला पाहिजे. अतिरिक्त पाणी असेल तर ते पाणी रिसायकल करुन पुन्हा नदीपात्रात सोडले तर शहरी आणि ग्रामीण असा तणाव निर्माण होणार नाही. हा तणाव कमी करण्यासाठी पाण्याचे रिसायकल करणे हा एकमेव पर्याय आहे. उद्योगासाठी हे पाणी वापरले पाहिजे. उद्योगासाठी जे पाणी दिले जाते ते पुन्हा नदीमध्ये रिसायकल करुन सोडणे, असे पर्याय आहेत. परंतु पुढच्या पाण्याला कमी करता येणार नाही. पुणे महानगरपालिकेने मागील पाच वर्षामध्ये एसटीपीचे प्रकल्प पूर्ण करावयास हवे होते. हे प्रकल्प पूर्ण केले असते तर ग्रामीण भागावर अशी परिस्थिती आली नसती. असा माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे.

अध्यक्ष महोदय, जनई-शिरसाईमध्ये २० तलावांना तांत्रिक बाबीमुळे पाणी देता येत नाही, असे उत्तरामध्ये नमूद केले आहे. सर्व्हेक्षणाबाबत क्षेत्रीय आणि महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे. सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर या भागातील सर्व सन्माननीय सदस्यांची बैठक घेऊन त्यावर निर्णय घेऊ. कुठपर्यंत पाणी देता येते, हे तांत्रिकदृष्ट्या समजले पाहिजे. पाण्याची उपलब्धता किती आहे, हेदेखील समजले पाहिजे. पाणी देण्यात येणार नाही, असे मी म्हणत नाही.

श्री.जयंत पाटील.....

मी सांगू इच्छितो की, आपल्याला सर्व भागामध्ये पाणी द्यायचे आहे. सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, पुणे महानगरपालिकेमध्ये आपण थोडेसे वजन वापरावे. कारण आपल्याच पक्षाचे सरकार पुणे महापालिकेमध्ये सत्तेवर आहे. आपण प्रयत्न केल्यास सदर एस.टी.पी. प्लांटचे काम होईल.

श्री.सिध्दार्थ शिरोळे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये बऱ्याच बाबींची स्पष्टता दिली आहे. पुणे शहराला ११.५ अघफूट पाणी दिले जाते. तसेच खडकवासला धरणातून २३.५ अघफूट पाणी घेतले जाते. सन्माननीय सदस्य ॲड.राहूल कुल यांनी सांगितल्याप्रमाणे सिंचनास पाणी देण्यामध्ये अडचण निर्माण होते. पुणेकरांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे की, मुळशी धरणातून आम्हाला पाणी मिळावे. माझ्या माहितीप्रमाणे यामध्ये सुर्वे समितीच्या शिफारशींची अडचण आहे. खरे तर, अशी अडचण असण्याचे काहीही कारण नाही कारण सुर्वे समिती ही विद्युत प्रकल्प व पश्चिमेकडील पाण्याच्या संदर्भातील आहे. मंत्री महोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मुळशी धरणातील पाणी पुणे शहराला देण्याबाबत शासनाचे काय धोरण आहे ? तसेच पुणे महानगरपालिकेने मागणी केलेल्या ५ टी.एम.सी. पाण्याच्या संदर्भात शासनाने काही निर्णय घेतला आहे का ?

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, जायका व रिसायकलिंगच्या प्रकल्पांसाठी अगोदरच्या निविदा जास्त आल्या आहेत. त्यामुळे यातून मार्ग निघेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात मुळशी धरणातील पाणी पुणेकरांना देण्यात येईल का ?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी पुणे शहरात असताना देखील सांगितलेले आहे की, "कोणत्याही परिस्थितीत आम्ही पुणे शहराला पाणी कमी पडू देणार नाही. पुणे शहराचे पाण्याचे प्रश्न आम्ही सोडवू. त्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही." मी आज देखील पुन्हा या निमित्ताने तेच सांगत आहे.

श्री.राणाजगजितसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, पुणे शहर आणि जिल्हयाच्या दृष्टीने हा प्रश्न नक्कीच महत्त्वाचा आहे.

श्री.राणाजगजितसिंह पाटील.....

परंतु कृष्णा खोऱ्याचे अधिकचे पाणी पश्चिमेला देण्याऐवजी इकडे वळविण्याचा मुद्दा उस्मानाबाद आणि बीड या जिल्हयांसाठी देखील पुढील काळात महत्त्वाचा असणार आहे. मंत्री महोदयांनी समिती व लवादाचा या ठिकाणी उल्लेख केला. परंतु मी सांगू इच्छितो की, टाटा पॉवर कंपनीने काही जुने करार केलेले आहेत. त्या अनुषंगाने टाटा पॉवर कंपनीबरोबर शासन स्तरावरुन काही चर्चा झाली आहे का ? झाली असल्यास त्याबाबत मंत्री महोदय सभागृहाला माहिती देतील का ?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात टाटा पॉवर कंपनीसोबत माझी अधिकृत चर्चा झालेली नाही. परंतु कंपनीच्या प्रतिनिधींनी माझ्या कार्यालयामध्ये येऊन एकदा निवेदन दिलेले आहे की, "अशा प्रकारे पाण्याचे डायव्हर्जन करु नये." अर्थात, हे त्यांचे म्हणणे आहे व ते तसे राहीलच. त्यामुळे आपण आज त्यासंदर्भात जास्त बोलण्याची गरज नाही, असे मला वाटते. ज्यावेळी दुसऱ्या लवादाचा निर्णय येईल व प्रत्यक्ष निर्णय करण्याची वेळ येईल त्यावेळी कंपनीला विश्वासात घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.राणाजगजितसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना विनंती आहे की, या बाबींचा लिगल ॲस्पेक्ट आताच पाहिला तर बरे होईल. कारण ते अनेक जुन्या करारांचा संदर्भ देतात. त्यामुळे यासंदर्भात मंत्री महोदयांच्या स्तरावर बैठक आयोजित करावी, अशी विनंती आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन १९२२-२३ व १९२८ मधील एक धरण आहे. त्यासंदर्भात कंपनीने तत्कालीन सरकारसोबत करार केलेला आहे. तो करार कॅरी फॉरवर्ड झालेला आहे. या करारामध्ये खंड करता येतो किंवा कसे याबाबत आपल्याला वकिलांचा सल्ला घ्यावा लागेल. रितसर नोटीस देऊन करार खंडित करता येतो किंवा कसे हा पुढचा प्रश्न आहे. आज यावर चर्चा केली तर दुसऱ्या लवादाच्या निर्णयावर त्याचा परिणाम होईल. तसेच आपला हेतू कागदोपत्री कुठेही स्पष्ट करणे जरा अवघड आहे. त्यामुळे दुसऱ्या लवादाचा निर्णय आल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करता येऊ शकेल.

श्री.जयंत पाटील.....

तसेच सुर्वे समितीच्या बैठकीमध्ये टाटा पॉवर कंपनीच्या अधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलावून आपले इन्टेन्शन तोंडी सांगितलेले आहे.

श्री.धीरज देशमुख : अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचना पुणे जिल्हयातील पिण्याचे पाणी, कृष्णा नदीतील पाण्याचा वापर व टाटा कंपनीच्या धरणाच्या संदर्भातील आहे. परंतु घटनेच्या कलम २१ अन्वये पाणी हा सर्वांसाठीच जिविताचा हक्क आहे. सन २०१६ मधील भीषण पाणी टंचाईवेळी कृष्णा नदीचेच पाणी रेल्वेने लातूर येथे पुरविण्यात आले होते. मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना पुणे शहराच्या पाणी प्रश्नाच्या संदर्भात त्यांची भूमिका मांडली.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. धीरज देशमुख...

या सर्व पार्श्वभूमीवर मंत्री महोदयांनी आज पुण्याच्या संदर्भात ज्या पध्दतीने भूमिका मांडली की, पुण्याचे वैभव कमी होणार नाही. मला मंत्र्यांना विचारायचे आहे की, लातूरच्या लाईव्हलीहूडचे काय ? लातूरला मांजरासारखी धरणे जेव्हा कोरडी राहतात. दुष्काळामध्ये अनेक वेळा लातूरच्या पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत चर्चा झालेली आहे. पण लातूरचा पिण्याचा पाण्याचा टंचाईचा विषय अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. यासाठी कोणत्याही योजना नाहीत. आपल्या शासनाची भूमिका अशी आहे की, महाराष्ट्र राज्य आपण दुष्काळमुक्त करणार आहोत. जलजीवन मिशनचा मोठा गाजावाजा होतो. प्रत्येकाला आपल्याला ५५ लिटर प्रतिदिन पाणी द्यायचे असेल तर ते उपलब्ध झाले पाहिजे. पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी आपले सरकार कोणती योजना आखणार आहे ? मराठवाड्याचा हा अनुशेष आहे किंवा लातूरचा जो पाणी टंचाईचा प्रश्न आहे तो सोडविला गेला पाहिजे. आपण पाणी कुठूनही द्या, पण लातूरच्या पाण्याची व्यवस्था आपण कराल अशी आम्हाला अपेक्षा आहे. धन्यवाद.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, पहिला लवाद जेव्हा झाला तेव्हा कृष्णा नदीच्या लवादामध्ये या पाण्याचा अंतर्भाव नव्हता. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील किंवा पुणे शहराच्या विस्ताराची जसजशी चर्चा सुरु झाली तेव्हा पाणी वळविण्यासाठी विविध समित्या नेमल्या गेल्या. पश्चिम वाहिन्यांचे अंदाजे १०० टीएमसी पाणी जे कोकणातून समुद्रामध्ये वाहून जाते ते गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्यात यावे, असा मूळ प्रस्ताव होता. त्याबाबत चितळे आयोगासमोर जेव्हा साक्षी नोंदविण्यात आल्या होत्या तेव्हा हे पाणी उचलून कसे आणता येईल किंवा त्याला विद्युत खर्च किती प्रचंड असेल हे विषय समोर आले. कारण त्यावेळी टनेलिंग करण्याचे तंत्रज्ञान आपल्याकडे विकसित नव्हते. आता ते बोगद्यांद्वारे आणू शकतो अशी चर्चा झाली. त्यानंतर माजी सन्माननीय सदस्य कै. गणपतराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली "महाराष्ट्र पाणी परिषद समिती" नेमण्यात आली. त्या समितीने राज्य शासनाकडे अहवाल सादर

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

केला आहे. त्यानंतर गुजरातला पाणी जाईल काय, तसेच पिंजार किंवा नारपार अशा वेगवेगळ्या योजनेची चर्चा करीत मूळातच अंदाजे हे १०० टीएमसी पाणी कोकणातून वाहून जाणारे होते ते गोदावरी खोऱ्यामध्ये वळवून नाशिक, मराठवाडा आणि खान्देश दुष्काळमुक्त करावा, अशी भावना समोर आली. कारण सर्वात मोठे तुटीचे खोरे गोदावरी नदीचे आहे. त्यामुळे आपण गोदावरी खोऱ्यात पाणी कसे आणायचे, कारण दुसरे पाण्याचे साधन नाही. म्हणून आमची मंत्री महोदयांना विनंती आहे की, पश्चिम वाहिन्यांचे पाणी आणताना १०० टीएमसी पाण्याचा अग्रक्रम हा मूळ गोदावरी खोऱ्यात कसा वळविता येईल यावर विचार झाला. अप्पर वैतरणा, लोअर वैतरणा याबाबत पुष्कळ चर्चा झाली. पण त्यात पाणीच नाही. त्यामुळे नंतर कृष्णा खोऱ्याच्या पाण्यासाठी प्राधान्य देण्याचा विचार झाला. आमचा त्याला विरोध नाही. परंतु कृष्णा खोऱ्याचे पाणी महाराष्ट्राच्या वाट्याला यावे म्हणून जो प्रचंड खर्च झाला, मोठमोठ्या उपसा सिंचन योजना तयार करण्यात आल्या, दुष्काळी भागात आता पाणी जायला लागले. त्यामुळे त्या भागातील नागरिक आता समाधानी आहेत. परंतु वाढत्या नागरीकरणाचा परिणाम म्हणून शहरे वाढली आणि आता आपण दुष्काळी भागाचे पाणी तिकडे वळविण्यास निघाला आहात. म्हणून माझे २ प्रश्न आहेत. पहिला प्रश्न म्हणजे पश्चिम वाहिन्यांचे अंदाजे १०० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्याबद्दलच्या प्रस्तावाबाबत मंत्री महोदयांनी विशेष बैठक घेऊन काही कार्यवाही करणार आहात काय ?

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने मागच्या सरकारमध्ये शेवटच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हे पाणी वळविण्याकरिता साधारणपणे ५० हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता व त्याला मंत्रिमंडळाने तत्त्वता मान्यता दिली होती. त्यामुळे त्याबाबत आपण पुढे कार्यवाही करणार आहात काय?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी आणण्याचे सर्व प्रयत्न झाले असल्याचे मी यापूर्वी एक दोन प्रश्नाच्या वेळी सांगितले आहे. उदाहरणार्थ वैतरणा म्हणजे जे मुकणे धरण आहे त्या वैतरणा धरणामधील ११-१२

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील...

टीएमसी पाणी आहे त्याबाबत नाशिक जिल्ह्यातील सर्व प्रयत्न पूर्ण करुन आपण बऱ्याच मोठ्या प्रमाणात पाणी वळविण्याचे प्रयत्न सुरू केले आहे. सरकारचे त्याला प्राधान्य आहे. सर्व वळण बंधाऱ्यांची कामे सुरु आहेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील....

त्याचबरोबर वळण बंधाऱ्याच्या नंतर खालच्या तलांकावर जे तलाव आहेत त्यातून जे पाणी किंवा नद्या वाहून जातात ते अडवून पुन्हा ते पाणी लिफ्ट करण्याच्या योजनांचा सर्व्हे जवळपास पूर्ण झालेला आहे. विधान परिषदेच्या सभागृहात देखील मी पर्वा या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. खालच्या बाजुला वाहून जाणारे पाणी मोठया प्रमाणात अडवून ते गोदावरी खोऱ्यात आणण्याचे काम करीत आहोत. जेणेकरुन जायकवाडी धरणापर्यंत हे पाणी पोहोचेल आणि....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुळात कोकणामध्ये वाहून जाणाऱ्या १०० टीएमसी पाण्याच्या प्रस्तावासंदर्भात हे आपल्याला गोदावरी खोऱ्यामध्ये कसे वळवता येईल ? वळण बंधारे करण्यात येतील असे माननीय मंत्री सांगत आहेत. परंतु त्या प्रमाणात पाणी उपलब्ध नाही. प्रत्येक वेळी वरच्या धरणाचे पाणी खाली सोडायचे त्यामुळे वरच्या भागातील शेतकरी अडचणीमध्ये आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये बिगर सिंचनाच्या धरणावरील टक्केवारी ५२ ते ५५ टक्केवारी पुढे गेलेली आहे. त्यामुळे विनाकारण प्रादेशिक वाद निर्माण होत आहे. गोदावरी नदीचे खोरे हे सर्वात मोठे आहे. त्यातून वळण बंधारे बांधून काहीही होणार नाही. माननीय मंत्र्यांचा प्रयत्न चांगला आहे. परंतु या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मूळ प्रश्न असा आहे की, पश्चिम वाहिनी नद्यांचे १०० टीएमसी पाणी कोकणामध्ये वाहून जात होते ते मुळात गोदावरी खोऱ्यामध्ये आणता येईल काय ? पश्चिम महाराष्ट्र किंवा पुणे जिल्ह्यातील पाण्याची मागणी ही नंतर वाढली आहे. परंतु मूळ प्रश्नाच्या बाबतीत आपण काही विचार करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, तो विचार करुनच आपण डायव्हर्शनचे प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. माझ्याकडे आता तो तपशील नाही, कारण तो या प्रश्नाचा भाग नाही. पण या संदर्भात एक बैठक आयोजित करून या प्रकल्पाची प्रगती किती मोठया प्रमाणात केली आहे याची आम्ही आपल्याला माहिती देऊ. गोदावरी खोऱ्यात कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त पाणी आणायचे हे सरकारचे प्राधान्य आहे. तसेच कोणत्याही प्रकारे राज्यांतर्गत वळण योजनांचे तसेच दमणगंगा, पिंजाळ

श्री. जयंत पाटील....

धरण पूर्ण झाल्यावर वैतरणा नदीतून गोदावरी खोऱ्यामध्ये २५ टीएमसी पाणी येणार आहे. तसेच प्रवाह योजनेच्या माध्यमातून आपण बरेच पाणी वळवित आहोत. त्याचबरोबर उपसा करुन वळण योजनेद्वारे ५५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्याचा आमचा प्रयत्न आहे. कोकणातील एकूण ८९ टीएमसी पाणी वळविण्यासाठी आम्ही आखणी केलेली आहे. हा सर्व याचा तपशील आहे पण यासाठी एक बैठक घेऊन याबाबतीत आम्ही कोणते प्रकल्प हाती घेतले आहेत ते सांगण्यात येईल. हे सर्व काम व्यवस्थित सुरु आहे. त्यामुळे येणाऱ्या दोन ते तीन वर्षात गोदावरी खोऱ्यात मोठया प्रमाणात पाणी येण्याचे चित्र दिसेल असा मला विश्वास आहे.

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री हे बऱ्याचवेळापासून आणि व्यवस्थितपणे या प्रश्नाचे उत्तर देत आहेत आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्व कामे अगदी व्यवस्थित सुरु आहेत. माननीय मंत्र्यांना माझा स्पेसिफिक असा प्रश्न आहे की, टाटा कंपनी वीज निर्मिती करते तसेच कोयना धरणातून देखील वीज निर्मिती होते. माझे असे म्हणणे आहे की, मूळ कोयना धरण किती टीएमसीचे आहे त्या धरणातील पाणी साठ्याचा शेतीच्या पाण्यासाठी किती वापर होतो ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, त्या पाण्याचा विद्युत निर्मितीसाठी किती वापर होतो ? विद्युत निर्मिती होत असताना कोयना धरणाचे जे पाणी समुद्रामध्ये जाते त्याचा शेती पाण्यासाठी वापर होण्यासाठी शासन आता नेमके काय धोरण राबवित आहे ? हे वाया जाणारे पाणी शेतीला देण्याचा व्यवस्थित कार्यक्रम राबविण्याचे शासनाचे काय धोरण आहे ? या संदर्भात माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

अध्यक्ष महोदय, एमडब्ल्यूआरआरएचा निकाल लागला आहे. हा विषय पुणे जिल्ह्याच्या संदर्भातील आहे. ११.५ टीएमसी पाणी पुणे शहराने हा निकाल आपल्यावर बंधनकारक आहे काय? तसेच या निकालाची अंमलबजावणी आपण करणार आहात काय ? पुणे शहराची गरज आहे तर तेवढया पाण्याची आपण त्या शहरासाठी व्यवस्था करा. बेकायदेशीरपणे जे पाणी वापरले जाते त्या संदर्भात

श्री. जयकुमार गोरे....

शासनाची नेमकी काय भूमिका आहे ? पुणे शहराला पाणी देऊ नका असे नाही तर त्यासाठी आपण व्यवस्था करा. परंतु या निकालाची अंमलबजावणी होणार आहे किंवा नाही या संदर्भात माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, एमडब्ल्यूआरआरए यांचा निकाल सर्वांवर बंधनकारक आहे. हा निकाल पुणे शहरावर देखील बंधनकारक आहे. माझ्या माहितीप्रमाणे, एमडब्ल्यूआरआरए यांनी या पूर्वी दोन वेळा पुणे महापालिकेला कळवलेले आहे की, पाण्याचे रिसायकल करणे आवश्यक आहे. त्यासाठी तुम्ही प्रकल्प हाती घ्यावा. या संबंधी मी मघाशी उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, कृष्णा खोऱ्यातून विशेषत: कोयना धरणातून ६७ टीएमसी पाणी खाली कोकणात जाते. त्याचा वीज निर्मितीसाठी मोठा वापर होतो. प्रचंड निधी खर्च करुन लेक टॅपिंगची उपाययोजना करुन पाणी डायव्हर्ट करुन त्या पासून अधिकाधिक वीज निर्मिती करण्याचे अनेक प्रकल्प आपण हाती घेतले आहेत. जवळपास ६७ टीएमसी पाणी पश्चिमेकडे जाते. उर्वरित पाणी कृष्णा खोऱ्यात येते. विजेची किंमत हे देखील आपल्या समोर मोठे आव्हान आहे. हायड्रो पॉवर सर्वात स्वस्त वीज असते. आपण आता सौर ऊर्जा व पवन ऊर्जा तसेच हायड्रो पॉवर तयार करीत आहोत. कोळशापेक्षा कमी दरात हायड्रो पॉवर काम करते.

अध्यक्ष महोदय, टाटा यांनी ३ प्रकल्प केले आहेत. पुणे जिल्ह्यातून कोकणात खाली प्रकल्प आहेत. तसेच कोयनेचा देखील प्रकल्प आहे. या मधून हायड्रो पॉवर अधिकाधिक राज्याला उपलब्ध होते. आपल्याला कॅल्क्युलेशन व्यवस्थित करुन निर्णय करावा लागेल. हायड्रो पॉवर कमी करुन शेतीला पाणी द्यायचे... राज्यातील उद्योगांना पाणी देत असताना विजेची सरासरी दर किती हाईल याचा तौलनिक अभ्यास करुन निर्णय घ्यावा लागेल. आता निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. दुसऱ्या लवादाचा निर्णय होईपर्यंत, आपण कोणतेही फेर नियोजन केले किंवा पाण्याचे डायव्हर्जन केले...

अध्यक्ष महोदय, आता आंध्रमध्ये पोलावरम येथे ८० टीएमसी पाणी डायव्हर्ट केले. ते पाणी कृष्णा खोऱ्यात आले तर आपल्याला त्याचा वाटा मिळतो. पहिल्या लवादाच्या निर्णयानंतर आपल्याला १४ टीएमसी पाण्याचा वाटा मिळाला

श्री. जयंत पाटील .....

आहे. पाणी तिकडे डायव्हर्ट करणे त्या लवादाप्रमाणे अनुज्ञेय नाही. खोऱ्यात पाणी येऊ शकते मात्र खोत्यातून पाणी बाहेर जाऊ शकत नाही. चेन्नईपर्यंत पाणी जाते. मध्ये पाणी कमी पडल्यामुळे चेन्नईला प्रत्येक राज्याने आपल्यातील ५ टीएमसी पाणी काढून दिले. यामुळे डायव्हर्जन ऑफ वॉटर अवघड आहे. पश्चिमेकडे जाणारे पाणी पूर्वेकडे आणावे व ते शेतीसाठे वापरावे असे सांगण्यात आले. हायड्रो पॉवर जनरेशन करिता आपण प्रकल्प केले आहेत. त्यासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. राज्याच्या सरासरी विजेचा दर व सध्याचा विजेचा दर प्रचंड वाढला आहे. इतर राज्यांप्रमाणे आपल्या राज्यामध्ये हायड्रो पॉवरचे उत्पादन कमी आहे. आपण जास्त कोळशावर अवलंबून होतो. आता सोलार व पवन ऊर्जेचे प्रमाण वाढले आहे. याचा विचार करुन आपल्याला ठरवावे लागेल.

--------

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट ) :** आता लक्षवेधी सूचना क्र. ४ चर्चेला घेण्यात येईल. माननीय महसूल मंत्री यांनी मला विनंती केली आहे. त्यांना विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाकरिता जावयाचे असल्यामुळे, त्यांनी विनंती केलेली आहे. या नंतर लक्षवेधी सूचना क्र. २ व ३ चर्चेला घेतली जाईल.

**पृ.शी.:** महर्षी विद्या मंदिर बेला (ता.जि. भंडारा) या शाळेच्या गैरप्रकाराबाबत तपासणी व चौकशी अहवालानुसार शाळा प्रशासनाविरुद्ध तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना

**मु.शी.:** महर्षी विद्या मंदिर बेला (ता.जि. भंडारा) या शाळेच्या गैरप्रकाराबाबत तपासणी व चौकशी अहवालानुसार, शाळा प्रशासनाविरुद्ध तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजनेबाबत या संबंधी श्री. नरेंद्र भोंडेकर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री. नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महर्षी विद्या मंदिर बेला (ता.जि. भंडारा) या शाळेविरुद्ध शाळेच्या गैरव्यवस्थापन आणि लॉकडाऊन काळात विद्यार्थ्यांनी फी न भरल्याने त्यांना परीक्षेपासून वंचित ठेवणे, जबरदस्तीने फी वसुली करणे, पाल्यांना नाहक त्रास देणे, लोकप्रतिनिधींशी वाद घालणे व त्यांच्याविरुद्ध शाळा व्यवस्थापनामार्फत फौजदारी गुन्हा दाखल करणे, इत्यादी कारणास्तव लोकप्रतिनिधींव्दारे शाळेची मान्यता रद्द करण्यासंदर्भात मा.शिक्षण मंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी निवेदनाव्दारे मागणी करणे, त्यानुसार मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले असून चौकशी अहवालाची उपसंचालक स्तरावर तपासणी सुरू असणे, तसेच महर्षी शिक्षण

श्री. नरेंद्र भोंडेकर ....

संस्थाव्दारा संचालित महर्षी विद्या मंदिर, बेला (ता.जि. भंडारा) या शाळेविरुद्ध लोकप्रतिनिधींच्या तक्रारीवरून चौकशी सुरू असताना चौकशीदरम्यान शासन निर्णय क्र.: माशास्थ ३३२१/ प्र.क्र.४१८/एसएम-१ या निर्णयान्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक १ जुलै, २०२१ रोजी शाळेला महर्षी विद्या मंदिर, बेला (ता.जि.भंडारा) येथून मौजा अशोकनगर, फुलमोगरा, ता.जि. भंडारा येथे स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देऊन शासन निर्णय निर्गमित केलेला असणे, उक्त प्रकरणी शासन स्तरावर चौकशी व कार्यवाहीची प्रक्रिया सुरू असताना व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या गंभीर तक्रारी असूनही त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याऐवजी शाळेच्या स्थलांतरास बेकायदेशीरपणे मान्यता देण्यात आलेली असणे, या संपूर्ण प्रकरणी शाळा व्यवस्थापनाशी संगनमत करून गैरव्यवहार झालेला असणे, यामध्ये दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध अद्यापही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसणे, सदर शाळेच्या गैरप्रकाराबाबत सादर करण्यात आलेल्या अहवालाची तपासणी व चौकशी अहवाल शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांनी शासनास सादर केले असता शाळा प्रशासनाविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणे यासंदर्भात दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

प्रा. वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

श्री.नरेंद्र भोंडेकर : अध्यक्ष महोदय, महर्षी विद्या मंदिर, भंडाराबाबत मी दि.६.२.२०२१ रोजी मंत्री महोदयांकडे तक्रार दिली होती. त्यावर चौकशी झाली. त्यावर चौकशी झाल्यानंतर उप संचालक यांनी एक चौकशीचा आदेश काढला. तो चौकशीचा आदेश काढल्यानंतर एक समिती नेमण्यात आली. त्या समितीने एक अहवाल तयार केला. तो अहवाल उप संचालकांनी दि.१.३.२०२१ रोजी शासनाकडे पाठवला.

अध्यक्ष महोदय, त्या अहवालामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, मान्यता रद्द करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. ती शाळा अनधिकृतपणे स्थलांतरित करण्यात आलेली आहे. त्याबाबत अनेक मुद्दे आहेत. ती रद्द करण्यात यावी, अशी शिफारस करण्यात आली होती. ती नस्ती ३ महिने मंत्री महोदयांकडे आहे. मंत्रालयातून एक ....

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट)** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावेत

श्री.नरेंद्र भोंडेकर : अध्यक्ष महोदय, मी प्रश्नच विचारणार आहे. आपण थोडे समजून घ्या. मी एक वर्षापासून याबाबत भांडत आहे. माझी मुले त्या शाळेत शिकत नाहीत. त्या शाळेमध्ये गोरगरिबांची मुले शिकतात. कोरोना काळात मुलांच्या फी बाबत सक्ती करु नये अशी शासनाची गाईडलाईन होती. मुख्यमंत्री महोदय तसेच शिक्षण मंत्री महोदयांची देखील होती. परंतु, त्या शाळेमध्ये अतिरिक्त फी जबरदस्तीने घेतली जात होती. जी मुले फी भरु शकत नव्हते त्यांना परीक्षेपासून वंचित ठेवत होते. मला जेव्हा बोलावण्यात आले तेव्हा ५०-६० शिवसैनिक ....

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावेत.

श्री.नरेंद्र भोंडेकर : अध्यक्ष महोदय, मला दोन मिनिटे द्यावीत. जेव्हा सर्व शिवसैनिक गेले तेव्हा मला बोलावण्यात आले.

**तालिका सभाध्यक्ष** : आपल्या सर्व प्रश्नांची पार्श्वभूमी समजलेली आहे. आपण आता प्रश्न विचारावेत.

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र भोंडेकर : अध्यक्ष महोदय, आपण माझे म्हणणे थोडे समजून घ्यावे. ज्या वेळेस शासनाने ... उप संचालकांनी दि. १.३.२०२१ रोजी रद्द करण्याची शिफारस केली. दुसऱ्या वेळेस पुन्हा अशी शिफारस केली की, या शाळेच्या स्थलांतराला मान्यता देण्यात यावी. एक उप संचालक दि. १.३.२०२१ रोजी रद्द करण्याची शिफारस करतात. तेच उप संचालक दि.३.६.२०२१ रोजी मान्यता देण्याची शिफारस करतात. यामध्ये मंत्री महोदय आपण अधिकाऱ्यांना सस्पेंड करणार काय?

अध्यक्ष महोदय, दुसरे असे की, ज्या शाळेबद्दलची ही चौकशी आहे... अनेक चौकशी त्या शाळेच्या विरोधात आली आहे. त्यांच्यावर १ कोटी रुपयांचा दंड आकारण्याची शिफारस झालेली आहे. असे सर्व असताना त्या शाळेची मान्यता रद्द करणार काय आणि जी अवैध फी वसुली केली त्याकरिता त्या शाळेवर गुन्हा नोंदविणार काय?

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, महर्षी शिक्षण संस्थेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या विभागाचे डेप्युटी डायरेक्टर यांचा अहवाल मे महिन्यामध्ये प्राप्त झाला. त्यावर सुनावणी झाली. त्या सुनावणीला आपण आला होता. आपण स्थलांतराच्या प्रस्तावाला विरोध केला. मग आपण स्थगिती केली.

अध्यक्ष महोदय, एनओसीच्या बाबतीत मी सांगते की, आमच्याकडे तपासणी पूर्ण झालेली आहे. आमच्याकडे दिनांक ८ मार्च रोजी तो प्रस्ताव आलेला आहे. त्या समितीने तयार केलेला अहवाल डेप्युटी डायरेक्टर यांच्याकडून दिनांक ८ मार्च रोजी आमच्याकडे आलेला आहे. आम्ही येत्या २ दिवसांमध्ये त्या संदर्भातील निर्णय घेऊ.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या संदर्भात २ अहवाल देण्यात आले. मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, त्याबाबत अशी परिस्थिती आहे की, तेथे जवळपास २ हजार विद्यार्थी आहेत. कुठलीही शाळा बंद करीत असताना ... (अडथळा)... मला बोलू द्या. कुठलीही शाळा बंद करीत असताना त्या विद्यार्थ्यांना कुठे ॲडजस्ट करायचे, ते कशा तऱ्हेने केले पाहिजे, या संदर्भात निर्णय घेतला गेला पाहिजे. शाळेच्या स्थलांतराच्या संदर्भात तुम्ही सांगत आहात.

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड ...

त्या शाळेची इमारत अपुरी होती. तिच्या समोर एक मोठा रस्ता होता. तेथे एक अपघात झाला. दुर्दैवाने त्यात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. तशा घटना सातत्याने घडत होत्या.

अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकलेले आहे. मला पूर्णपणे जाणीव आहे. त्यांनी व मी तोच मुद्दा घेतला होता की, त्या काळात मुलांकडून फी घेतली जाऊ नये. आम्ही देखील सहानुभूतीपूर्वक त्याबाबतीत विचार करीत आहोत. आपला एनओसीच्या बाबतीतील निर्णय देखील आम्ही घेत आहोत. मी सांगितले की, तो प्रस्ताव आता दिनांक ८ मार्च रोजी आम्हाला प्राप्त झालेला आहे. २ दिवसांमध्ये त्या संदर्भातील निर्णय पूर्णपणे घेतला जाईल आणि त्या एनओसीच्या बाबतीत असेल... स्थलांतरांच्या बाबतीत आम्ही पूर्णपणे थांबवलेले आहे. आम्ही स्थलांतर अलाऊडच केलेले नाही. एनओसीच्या बाबतीत आपण जे म्हणत आहात त्या बाबतीत देखील निर्णय घेतला जाईल हे मी या ठिकाणी सांगू इच्छिते.

श्री.नरेंद्र भोंडेकर : अध्यक्ष महोदय, मी उप संचालकांना विचारले की, डबल अहवाल कसे गेले? मंत्री महोदयांच्या पी.एस. यांनी महर्षी विद्या मंदिरच्या मुख्याध्यापकांशी साठगाठ केली. त्यांनी दहावेळेस उप संचालकांना फोन केला व तो अहवाल मागवून घेतला. त्यामुळे सर्वच्या सर्व मंत्रालय दोषी आहे. माझी आपल्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. ही जी सर्व देवाणघेवाण झाली... गोरगरिबांना शासन न्याय देणार की नाही, जे गोरगरिब आहेत त्यांच्यावर संस्थाचालक किंवा ज्या संस्था आहेत ते अन्याय करीत आहेत. कोविड काळात अन्याय करीत आहेत. अनेक अधिकारी मला भेटले. अधिकारी देखील धजावत नाहीत. सी.ई.ओ. यांच्या दालनात बैठक घेण्यात आली. सी.ई.ओ. यांना सांगितले की, तुमच्याने जे होते ते करावे.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.नरेंद्र भोंडेकर...

आयएएस अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकारी यांचे ऐकत नाहीत. त्यांना पाठीशी का घालण्यात येत आहे. या प्रकरणी कारवाई झाली पाहिजे. मंत्री महोदय गोलगोल उत्तर देत आहेत. मी मंत्री महोदयांना विनंती केली होती. त्यांनी नेत्याचा दबाव आहे, सांगितले. कोणत्या नेत्याचा दबाव आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी जे पटलावर ठेवले त्याबाबत मी आक्षेप व्यक्त करते. त्यांना या विषयावर बोलण्याचा अधिकार आहे. उप संचालक यांनी त्यांची भूमिका मांडलेली आहे, त्यांना त्यांचा अहवाल सादर करण्याचे स्वातंत्र्य आहे. एखादी गोष्ट चांगली असेल तर त्यास चांगले म्हणण्यासाठी कोणी विरोध करणार नाही. मी स्वत:हून सांगितले आहे की, ज्या दिवशी याप्रकरणी सुनावणी झाली त्याच दिवशी स्थलांतर थांबविले आहे. एनओसी रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्याबाबत मी सांगितले आहे की, त्याबाबत सीबीएसईला सांगण्यात येईल. सदरहू शाळेतील २००० विद्यार्थ्यांच्या संदर्भात प्रश्न असून त्यांना कोणत्या ठिकाणी स्थलांतरीत करावयाचे याबाबत शासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे. सन्माननीय सदस्य यांनी सांगितले की, या प्रकरणी कोणत्या तरी नेत्याचा दबाव आहे. परंतु याबाबत नेत्याच्या दबावाचा प्रश्न उद्भवत नाही. जी प्रोसिजर असते ती फॉलो करावी लागते. उप संचालक यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर सुनावणी घ्यावी लागते. त्यामध्ये सर्व निर्णय घेण्यात आले आहेत. सदरहू विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेत स्थलांतरित करुन त्यांचे भविष्य सुरक्षित करणे, ही शासनाची जबाबदारी आहे.

श्री.नरेंद्र भोंडेकर : अध्यक्ष महोदय, अवैध फी वसूलीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला असूनही संबंधितांना मंत्री महोदया पाठीशी का घालत आहेत ?

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरणी कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न करण्यात आला नाही. स्थलांतर रद्द केले असून एनओसी देखील रद्द करण्यात आली आहे. सदरहू शाळेतील मुलांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या

प्रा.वर्षा गायकवाड...

दृष्टीकोनातून त्यांना इतर शाळेत स्थलांतरित करणे, ही शासनाची जबाबदारी आहे. या मुलांना सहाय्य करणे हे शासनाचे काम आहे.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य जे सांगतील ते सत्य आहे, असे समजून कारवाई केली पाहिजे. आज वृत्तपत्रामध्ये बातमी छापून आली आहे की, पुणे येथील एका शाळेत ज्या विद्यार्थ्यांची फी भरलेली नाही त्यांचे पालक शाळेत गेल्यानंतर बाऊंसर आणून त्यांना मारहाण करण्यात आली आहे. हा विषय या लक्षवेधी सूचनेचाही आहे. त्यास उत्तर देण्यात येत नाही. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी व त्यावर उद्या चर्चा घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. आपण निर्णय द्यावा.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट) :** सदरहू प्रकरणी योग्य ती चौकशी करण्यात येईल. मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे.

------------

यानंतर श्री.तेलंग....

**पृ.शी.:** चंद्रपूर थर्मल महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करुन १२८ उमेदवारांची अवैध भरती केल्याबाबत

**मु.शी.:** चंद्रपूर थर्मल महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करुन १२८ उमेदवारांची अवैध भरती केल्याबाबत श्री.सुभाष धोटे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सुभाष धोटे (राजुरा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर थर्मल महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये प्रकल्प सुरु होऊन ४० वर्षे झाल्यानंतरही सी.टी.पी.एस. च्या आस्थापना विभागात कार्यरत असलेले अधिकारी प्रकल्पग्रस्तांच्या नावावर गैरप्रकल्पग्रस्तांची प्रशिक्षणार्थी म्हणून भरती करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दरम्यान निदर्शनास येणे, यासाठी आर्थिक देवाणघेवाणही होत असून मूळ जमीन मालकाच्या नावावर वारसदार म्हणून खोटी कागदपत्रे बनवून गैरप्रकल्पग्रस्तांची प्रकल्पग्रस्त म्हणून निवड केल्या जात असून या प्रकरणात सी.टी.पी.एस. चे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री.अरविंद वानखेडे व अनेक अधिकारी / कर्मचारी सहभागी असल्याचे समजणे, नुकतेच १२८ उमेदवारांची प्रशिक्षणार्थी यादी सी.टी.पी.एस नोटीस बोर्ड वर लावून दिनांक २८ नोव्हेंबर, २०२१ पर्यत आक्षेप घेण्याची मुदत दिली असता या यादीवर अनेक प्रकल्पग्रस्तांनी आक्षेप घेणे, निवड केलेल्या उमेदवारांच्या नावासमोर प्रकल्पग्रस्त गावाचे नाव, उमेदवार कोणत्या प्रकल्पग्रस्तांच्या हक्कावर निवडला गेला याचा उल्लेख नसणे, तसेच दिनांक ७ ऑक्टोबर, २०२१ ला मा. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, चंद्रपूर यांनी बोगस प्रकरणात प्रपत्र कुणाला व किती लोकांना दिले तसेच यास सी.टी.पी.एस. ची

असुधारित प्रत

श्री.सुभाष धोटे.......

एन.ओ.सी. प्राप्त झाली किंवा कसे याबाबत माहितीच्या अधिकारातून विचारली असता माहिती न दिल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयीन पुनर्वसन विभागाचे अधिकारी यात सहभागी असणे असा संशय बळावणे, त्यामुळे पात्र प्रकल्पग्रस्त व स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन बनावट कागदपत्रे तयार करुन थर्मल पॉवर स्टेशन, चंद्रपूर येथे नोकरी मिळविल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्राजक्त तनपुरे (ऊर्जा राज्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री सुभाष धोटे : अध्यक्ष महोदय चंद्रपूर पॉवर स्टेशनमध्ये प्रकल्पग्रस्तांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झालेली आहे. उक्त ठिकाणी अवैध प्रकारची नोकर भरती करण्यात आलेली आहे, याकडे मी या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत. चंद्रपूर पॉवर स्टेशन मागील ४० वर्षांपासून तेथे कार्यरत आहे. उक्त थर्मल पॉवर स्टेशनमध्ये गेलेल्या जमिनीच्या मोबदल्यात मध्ये संबंधित पात्र लाभार्थ्यांना नोकरी मिळावी यासाठी अनेक लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केले. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबातील मुलांना नोकरी देण्याचा प्रश्न निर्माण झाला. यानंतर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये नोकर भरती करण्यात आलेली आहे. परंतु त्या नोकर भरतीमध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळा झालेला आहे. यासंबंधी मला शासनाकडून आवश्यक माहिती घेण्यासाठी मी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. या पॉवर स्टेशनमध्ये महाव्यवस्थापक पदावर श्री. अरविंद वानखेडे कार्यरत आहेत. त्यांनी उमेदवारांची निवड यादी प्रकर्शित केली होती. उक्त यादीमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर घोटाळा झालेला आहे. त्यामुळे इतर प्रकरणाची शासन चौकशी करणार आहे काय?

अध्यक्ष महोदय, चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये महानिर्मिती यांच्याकडून पाठवण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी केलेली आहे काय? दिनांक चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये दिनांक ८ नोव्हेंबर २०२१ रोजी १२८ उमेदवारांची निवड यादी प्रकाशित केली होती. त्या यादीवर अनेक लोकांनी आक्षेप घेतलेले आहेत. त्यानंतर उक्त प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती घटित करण्यात आली. या समितीने सदर १२८ उमेदवारांपैकी ११५ उमेदवार बोगस असल्याचे निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय? जर हे खरे असेल तर संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर सरकार काय कारवाई करणार आहे?

श्री. सुभाष धोटे.........

अध्यक्ष महोदय, मी अजून एक प्रकरण सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. भद्रावती येथील प्रकल्पग्रस्त श्री. गणेश श्यामराव केदारआप्पा यांच्या नावाने घर क्रमांक १८७, मौजे औंढा तालुका भद्रावती जिल्हा चंद्रपूर येथील २५ चौरस मीटर ही जागा चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र◌ा◌ंतर्गत संपादित केल्याचे दर्शविले आहे. परंतु सदर जागेचा मूळ मालक श्री. विश्वनाथ देवतळे हे आहेत. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची अनेक बोगस प्रकरणे आहेत. मी फक्त सदर एक प्रकरण या सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

अध्यक्ष महोदय माझा प्रश्न असा आहे की सदर १२८ उमेदवारांची करण्यात आलेली बोगस भरती रद्द करणार आहात काय? तसेच उक्त प्रकरणी संपादन अधिकारी किंवा महानिर्मितीच्या अधिकाऱ्यावर हे शासन कारवाई करणार आहे काय? सदर प्रकरणी अनेक संघटनांनी उपोषणे देखील केलेले आहे. त्यानंतर सदर प्रकरणी एफ. आय. आर. दाखल करण्यासाठी पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्याकडे विनंती देखील करण्यात आलेली आहे. परंतु चंद्रपूर येथील महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता यांनी आणि शासनाने कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. आज सभागृहामध्ये माननीय ऊर्जामंत्री व माननीय ऊर्जा राज्यमंत्री असे दोन्ही मंत्री उपस्थित आहेत. मला त्यांना सांगायचे आहे की सदर लक्षवेधी सूचना देण्यापूर्वी महाऔष्णिक विद्युत केंद्राने, शासनाने किंवा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उक्त प्रकरणी कोणतीही कारवाई केली नाही. परंतु लक्षवेधी सूचना दिल्यानंतर सदर प्रश्न सभागृहांमध्ये उपस्थित होणार या भीतीने दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले आहेत. मागील एक वर्षापासून सदर प्रकरण प्रलंबित आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करून संबंधितावर एफ. आय. आर. दाखल करणार आहात काय?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष धोटे यांचे मी आभार मानतो. कारण त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील अतिशय महत्त्वाचा विषय येथे मांडलेला आहे. चंद्रपूर येथील थर्मल पॉवर स्टेशनमध्ये एकूण ३ हजार ८७७

श्री. प्राजक्त तनपुरे........

प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी आजपर्यंत २ हजार ८८८ प्रकल्पग्रस्तांना सेवेत रुजू करून घेण्यात आलेले आहे. उर्वरित उमेदवारांना देखील प्रशिक्षणार्थी म्हणून म्हणून रुजू करून घेण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा येथे मांडलेला आहे.

अध्यक्ष महोदय, चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये १२८ उमेदवारांची प्रगत प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्याचा सी.टी.पी.एस. यांनी निर्णय घेतला होता. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यावर काही संस्थांनी आक्षेप नोंदविला.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे....

काही शंका उपस्थित केल्या आहेत. तेथील मुख्य अभियंता यांनी त्याची योग्य दखल घेऊन सविस्तर चौकशी केली. यात १२८ लोक होते. त्यावेळेस ज्या ज्या लोकांनी अर्ज केले होते, त्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावर कोणास हरकती, आक्षेप आहेत काय ? याची माहिती मागविण्यात आली होती. काही संस्थांनी या हरकतीसाठी वेळ वाढवून देण्याबाबत विनंती केली होती. ती विनंती विभागाने मान्य केली होती. या हरकती व सूचनांसाठी दिनांक १२ नोव्हेंबर पर्यंत मुदत दिली होती. ती वाढवून दिनांक १६ नोव्हेंबरपर्यंत करण्यात आली होती. यात कोणत्याही शंकेला वाव राहता कामा नये. कोणास काही आक्षेप नोंदवावयाचे असतील तर त्यांनी नोंदवावेत. यानंतर १२८ लोकांचे प्रमाणपत्र पडताळणी करण्यात आली होती. त्यामध्ये समोर आलेल्या माहितीनुसार १२८ लोकांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात आले होते. त्यामध्ये केवळ ५८ लोकांचे प्रमाणपत्र पडताळणी पार पडू शकले. काही लोक अनुपस्थित होते, तर काहींनी अनुपस्थितीबाबत विविध कारणे दिलेली होती. प्रकल्पग्रस्तांचे दाखले योग्य नाहीत, अशी शंका उपस्थित होत आहे. मी मुख्य अभियंता यांना याबाबत एक सूचना निर्गमित करणार आहे. मुख्य अभियंता यांनी चंद्रपूर पॉवर स्टेशनकरिता जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या दाखल्यांची यादी मागवून घ्यावी. १२८ लोकांच्या दाखल्यामध्ये काही दाखले बोगस आहेत, अशी शंका आहे. जिल्हा पुनर्वसन अधिकऱ्यांनी निर्गमित केलेल्या दाखल्या व्यतिरिक्त बनावट दाखले कोणी तयार केले आहेत काय ? याची माहिती घेतली जाईल. जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांकडून सर्व दाखले मागवून घेण्याबाबत सांगण्यात आलेले आहे. ज्यांनी बोगस दाखले दिलेले असतील ते त्यावेळेस समोर येतील. त्याची चौकशी होईल. याबाबतच्या सूचना मुख्य अभियंता, चंद्रपूर यांना निर्गमित केल्या आहेत. सरकार प्रकल्पग्रस्तांच्या पाठिशी आहे. त्यांची योग्यप्रकारे दखल घेतली जाईल.

श्री. सुभाष धोटे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, १२८ पैकी ५८ लोक पात्र आहेत. ७० लोक बोगस आहेत.

असुधारित प्रत

श्री. सुभाष धोटे .....

पुनर्वसन अधिकारी आणि थर्मल स्टेशन पॉवरचे अधिकारी यांच्या संगनमताने हे काम झाले आहे. याचे मी एक उदाहरण दिले आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत. यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्याकडून चौकशी केली जाणार काय ? यात महसूल विभागाच्या आणि ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. यांनी संगनमताने खोट्या लोकांना नोकरी देण्याचा प्रयत्न केला आहे. एकाच घरातील दोन-दोन लोकांना नोकरी दिलेली आहे. माझ्याकडे याबाबतची संपूर्ण कागदपत्रे आहेत. मी ते मंत्री महोदयांना देऊ इच्छितो. मी विनंती करतो की, सनदी अधिकाऱ्यांकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे काय ? दुसरे असे की, यातील दोषींवर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, या विषयाबाबत शासन गंभीर आहे. कोणत्याही प्रकल्पग्रस्तावर अन्याय होणार नाही. खऱ्या प्रकल्पग्रस्ताऐवजी बोगस प्रकल्पग्रस्त नोकरीला लागत असेल तर खऱ्या प्रकल्पग्रस्तावर अन्याय होत असतो. म्हणून मी सांगितले की, जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांकडून जितक्या प्रकल्पग्रस्तांना दाखले दिले आहेत ते सर्व मागवून घेतले जातील. त्यामध्ये बोगस प्रकल्पग्रस्त आढळून आले तर त्यांच्यावर कारवाई होईल. जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी यात गैरप्रकार केले असतील तर विभागीय आयुक्त स्तरावर याची चौकशी केली जाईल. पुनर्वसन अधिकाऱ्यांनी काही चुका केल्या का, याची तपासणी केली जाईल व संबंधितांना न्याय देण्याचा शासन निश्चितपणे प्रयत्न करेल.

श्रीमती प्रतिभा धानोरकर : अध्यक्ष महोदय, साधारणपणे ४० वर्षापूर्वी या थर्मल पॉवर स्टेशनची निर्मिती झाली होती. या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सीटीपीएसमध्ये आस्थापना विभागात खरे प्रकल्पग्रस्त असून त्यांना अद्यापपर्यंत प्रपत्र मिळालेले नाही.

यानंतर श्री. चौधरी...

श्रीमती प्रतिभा धानोरकर.....

श्री.अरविंद वानखेडे, मुख्य सहाय्यक व्यवस्थापक यांनी १२८ बोगस प्रकल्पग्रस्तांची यादी जाहीर केली आहे. त्यात एकही खरा प्रकल्पग्रस्त नाही. हवे तर मी त्या संदर्भातील सर्व रेकॉर्ड आपणास देते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष धोटे यांनी आता एका प्रकल्पग्रस्ताचा मुद्दा मांडला परंतु माझ्याकडे अशा अनेक प्रकल्पग्रस्तांची माहिती आहे की ज्यांच्या जमिनी जाऊन ४० वर्षे उलटली तरीही त्यांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. यामध्ये सी.टी.पी.एस. चे महाव्यवस्थापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या प्रपत्रांमध्ये मोठया प्रमाणात घोळ केला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष धोटे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे संबंधित अधिकारी श्री.वानखेडे यांच्यासह इतर संबंधित अधिकारी / कर्मचारी व पुनर्वसन विभागाचे अधिकारी यांचा यामध्ये सहभाग आहे. पुनर्वसन अधिकाऱ्यांचा यामध्ये ५० टक्के वाटा आहे. त्यामुळे एक उच्चस्तरीय समिती नेमून अशा अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल का ? ४० वर्षांपूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी या प्रकल्पामध्ये गेलेल्या आहेत. साधारणपणे ३ वर्षांचा कालावधी हा प्रशिक्षणार्थी म्हणून असतो. परंतु आठ-दहा वर्षे उलटूनही अनेक जण प्रशिक्षणार्थी म्हणूनच कार्यरत आहेत. स्वत:च्या जमिनी जाऊन देखील अद्याप त्यांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. अशा कुशल व अकुशल प्रशिक्षणार्थींना कधीपर्यंत नोकरीत सामावून घेण्यात येईल, याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे ही विनंती.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन स्पेसिफिक प्रश्न विचारले आहेत. त्यांच्या पहिल्या प्रश्नाबाबत मी मघाशीच उत्तर दिलेले आहे की, जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याबद्दलच्या आक्षेपांसंदर्भात विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा महाव्यवस्थापक यांच्या संदर्भातील आहे. वास्तविक पाहता प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्याचा विषय जिल्हा पुनर्वसन अधिकारी

श्री.प्राजक्त तनपुरे.....

यांच्या अखत्यारित येतो. दाखले देण्यासाठी महाव्यवस्थापकांकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' घेतले जाते. त्या माध्यमातून काही माहिती दिली जाते. परंतु त्यांच्या ना हरकत प्रमाणपत्राशिवाय देखील भू-संपादन अधिकाऱ्यांनी रेकॉर्ड तपासून प्रकल्पग्रस्ताचा दाखला देणे अपेक्षित आहे. केवळ चंद्रपूर पॉवर स्टेशनकडून दिलेल्या माहितीच्या आधारे जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी निर्णय घेणे हे प्रक्रियेला धरुन नाही. तरी देखील यासंदर्भात सी.ई. यांनी चौकशी लावलेली आहे. आम्ही या प्रकरणी अत्यंत संवेदनशील आहोत. यामध्ये जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, आपण अपक्ष सदस्याला या अधिवेशनामध्ये पहिल्यांदा बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले मन:पूर्वक आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यात येत आहे. पहिल्या लक्षवेधी सूचनेवर आपण एकूण ९ सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली होती. त्यामुळे माझी विनंती आहे की, या लक्षवेधी सूचनेवर चंद्रपूर जिल्हयातील सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये एकूण १२ लक्षवेधी सूचना दर्शविण्यात आलेल्या आहेत. आपापल्या भागातील प्रश्नांना न्याय मिळावा म्हणून सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना उपस्थित करीत असतात. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपले प्रश्न थोडक्यात मांडावेत. तसे केल्यास सर्व लक्षवेधी सूचना चर्चेस येतील. अन्यथा, यापैकी काही लक्षवेधी सूचना पुढे ढकलाव्या लागतील.

श्री.किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष धोटे यांनी उपस्थित केलेला मुद्दा १२८ लोकांच्या संदर्भातील आहे.

असुधारित प्रत

श्री.किशोर जोरगेवार.....

एकूण ३ हजार ८७७ पैकी आतापर्यंत २ हजार ८८८ प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. म्हणजे सुमारे ३५ ते ४० वर्षांनंतर देखील सुमारे ९९० प्रकल्पग्रस्तांना शासनाकडून नोकऱ्या देणे बाकी आहे. भ्रष्टाचाराचे मूळ येथूनच सुरु होते.

अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, सदर १२८ बोगस प्रकल्पग्रस्तांना स्थगिती देण्यात आली आहे का ? तसेच उर्वरित प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याबाबत शासनाचे काय धोरण आहे, त्यांना देखील लवकरात लवकर नोकऱ्या देण्यात येतील का ?

अध्यक्ष महोदय, जगातील सर्वाधिक भ्रष्ट प्रकल्पास पुरस्कार द्यायचा म्हटले तर तो पुरस्कार चंद्रपूर जिल्हयातील औष्णिक विद्युत केंद्राला मिळेल, एवढा भ्रष्टाचार या प्रकल्पामध्ये होतो.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. किशोर जोरगेवार...

एकूणच गरजेच्या ३० टक्के वीज निर्मिती करीत असताना आमच्या शेतकऱ्यांच्या मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. प्रदुषण आम्ही केवळ त्यामुळे सहन करतो तरीही आम्हाला न्याय मिळत नाही. म्हणून आज या ठिकाणी दोन्ही मंत्री महोदय उपस्थित आहेत. मंत्री महोदयांनी आमच्या बोलण्याकडे कृपया लक्ष द्यावे. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपला इतका मोठा वीज प्रकल्प आमच्या जिल्ह्यात आहे. आम्ही आपल्याला त्यामधून वीज निर्मितीच्या माध्यमातून पैसे कमविण्याची संधी देतो आणि आपण आमच्या प्रकल्पग्रस्तांच्या विषयाकडे लक्ष देत नाहीत, हे योग्य नाही. या ९९० लोकांच्या बाबतीत शासनाची भूमिका कोणती आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी २ स्पेसिफिक प्रश्न विचारले. पहिला म्हणजे २२८ लोकांच्या नियुक्तीला स्थगिती देणार आहात काय तर अजूनपर्यंत आपण कोणालाही नियुक्ती दिलेली नाही. आपण ही प्रक्रिया थांबविली आहे आणि जोपर्यंत आपले समाधान होत नाही किंवा जोपर्यंत खऱ्याखुऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत शंकेचे निरसन होत नाही तोपर्यंत आपण या नियुक्त्या देणार नाही. आपला हेतू एवढाच आहे की, या १२८ उमेदवारांमध्ये कोणताही बोगस प्रकल्पग्रस्ताचा दाखला असलेला व्यक्ती सेवेत लागू नये. त्यामुळे ही सर्व खातरजमा यथोचितरित्या केल्यानंतरच आपण त्यांना नियुक्ती देऊ.

ॲड आशिष जयस्वाल : अध्यक्ष महोदय, मी या प्रश्नाच्या मूळ विषयावर बोलू इच्छितो. विदर्भामध्ये जेवढे औष्णिक वीज प्रकल्प उभारले गेले आहेत त्या सर्व प्रकल्पांमधील बहूतांश प्रकल्पग्रस्त आजही वर्षानूवर्षे नोकरीसाठी तात्कळत बसले आहेत. हे प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्राला वीज पुरवठा करतात. शासनाने ५० टक्के प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या सेवेत रुजू करुन घेऊ असे धोरण राबविले आहे. शासनाच्या धोरणात जरी अशी तरतूद असली तरी त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केल्याशिवाय आणि आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केल्याशिवाय आपण त्यांना शासनाची नोकरी देऊ शकत नाही. विदर्भामध्ये विशेषकरुन मोठ्या प्रमाणात प्रकल्पग्रस्त नोकरीविना वंचित आहे. दुसरे कारण असे आहे की, जर एका व्यक्तीची १० एकर जमीन अशा

ॲड आशिष जयस्वाल...

प्रकल्पामध्ये गेली आणि त्याला २ मुले असतील आणि त्यांचे नातू जर ६ झाले असतील तर प्रकल्पग्रस्तांचा दाखला घेण्यासाठी इतर वारसदार एनओसी देत नाहीत. त्यामुळे संबंधित प्रकल्पग्रस्ताला दाखला मिळत नाही हे याचे मूळ कारण आहे. त्यामुळे आपल्याला या विषयावर निर्णय घ्यावा लागेल. महाराष्ट्रातील जे औष्णिक वीज प्रकल्प आहेत आणि त्यांचे जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना आयटीआय पूर्ण असण्याची अट अनिवार्य आहे त्यामध्ये आपण शिथिलता आणावी. त्यांना शासनाच्या कोणत्याही विभागात त्यांना नोकरी द्यावी. कारण शासनाच्या प्रत्येक विभागाला वीजेची गरज आहे. जोपर्यंत आपण मंत्रिमंडळासमोर नेऊन या विषयावर निर्णय घेणार नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. आज आपण महाराष्ट्राच्या कोणत्याही औष्णिक वीज प्रकल्पामध्ये पाहिले तर अशा लोकांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. त्यामुळे आपण हा धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. आपण आमच्या विदर्भाचे सुपूत्र आहात. विदर्भातील अनेक प्रकल्पग्रस्त नोकऱ्यांसाठी वर्षानूवर्षे तात्कळत बसले आहेत. म्हणून आपण त्यांच्यासाठी निर्णय करणार आहात काय, हे आपण या सभागृहाला सांगावे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न स्कोपच्या बाहेरचा आहे. कारण आजची लक्षवेधी ही प्रकल्पग्रस्तांच्या बोगस दाखल्यांसंबंधी आहे. हा विषय या लक्षवेधीच्या स्कोपमध्ये येत नसला तरी मी आपल्याला सांगू इच्छितो की, जे प्रकल्पग्रस्त दाखलेधारक आहेत त्यांना राज्यामध्ये कोणतीही शासकीय भरती होते तेव्हा त्यामध्ये ५ टक्के आरक्षण असते आणि त्यामध्ये ते सहभागी होऊ शकतात. उर्वरित आपल्या प्रश्नावर शासन निश्चितपणे व्यवस्थितपणे विचार करुन लवकरात लवकर न्याय देण्याचा प्रयत्न करु.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माझे स्पेसिफिक २ प्रश्न आहेत. या समितीला ज्या त्रुटी आढळल्या आहेत त्या त्रुटी कोणत्या आहेत ? कारण सन्माननीय सदस्य श्री. सुभाष धोटे यांनी अतिशय महत्त्वाच्या प्रश्नावर लक्षवेधी सूचना विचारली

श्री. सुधीर मुनगंटीवार...

आहे. या लक्षवेधीचा आशय इतकाच आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी गडबड किंवा भ्रष्टाचार केला असेल किंवा घोटाळा केला असेल किंवा त्यांचा हेतू भ्रष्टाचार करण्याचा असेल तर तो उघडकीस आला पाहिजे. त्यामुळे त्यामधील त्रुटी कोणत्या आहेत, हे समजले पाहिजे. दुसरे म्हणजे ज्यांनी ४० वर्षाच्या अगोदर जमिनी दिल्या त्यांच्यासाठी आपण एक विशेष कालबध्द कार्यक्रम आखून आणि आवश्यकता असेल तर अधिसंख्य पदे निर्माण करुन या सर्वांना येणाऱ्या ३ महिन्यात सामावून घेणार आहात काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी २ स्पेसिफिक प्रश्न विचारले आहेत. त्यातील पहिला प्रश्न या लक्षवेधी सूचनेच्या स्कोपमधील असल्यामुळे त्याची मी सन्माननीय सदस्यांना माहिती देऊ इच्छितो की त्या समितीची चौकशी अद्याप सुरू आहे. पण ती चौकशी होईपर्यंत आणि त्यातून सत्य बाहेर येईपर्यंत आपण ही भरती प्रक्रिया थांबविली आहे. मी हे मघाशी देखील सांगितले आहे की, जे खरेखुरे प्रकल्पग्रस्त असतील त्यांच्या बाबतीत आम्ही व्यवस्थित चाळणी करुन आम्ही त्यांची निवड करु आणि त्रुटींच्या बाबतीत जेव्हा चौकशी समिती आम्हाला सांगेल... त्यातून ज्या काही त्रुटी समोर येतील त्या निश्चितपणे मी आपल्यासमोर मांडेन. आजच्या लक्षवेधी सूचनेचा विषय फक्त प्रकल्पग्रस्तांच्या बोग दाखल्यांबाबत असल्यामुळे इतर प्रश्नांना न्याय द्यायचा असेल तर मी आपल्याशी नंतर व्यवस्थितपणे चर्चा करतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार :अध्यक्ष महोदय,माननीय मंत्र्यांनी म्हटले आहे की, त्रुटी आढळून आल्या आहेत. परंतु विधानसभेमध्ये कोणतीही माहिती गुप्त ठेवता येत नाही. त्रुटी काय आढळून आलेल्या आहेत त्या आपण पटलावर ठेवा. माझा दुसरा प्रश्न असा होता की, अधिसंख्य पदे करुन आपण यांची विशेष बाब म्हणून भरती करणार आहात काय, याचे होय किंवा नाही असे उत्तर द्यावे. आपण फक्त 'नाही' म्हणा.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, या विषयाच्या बाबतीत एक बैठक घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मेरा एक बहुत ही महत्वपूर्ण पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है.

अध्यक्ष महोदय, कोविड-१९ के बाद मुंबई में सैकड़ों बच्चों का शिक्षण एक प्रश्न हो गया है. जो बच्चे नॉनअॅडेड स्कूल में पढ़ते थे, कोविड के समय में उनके माँ-बाप स्कूल की फीस भर नहीं सके. उन बच्चों ने मुंबई महानगरपालिका की स्कूल में अॅडमिशन ले लिया, उनको अॅडमिशन मिल गया है. अब मुंबई महानगरपालिका की स्कूल उन बच्चों की लिविंग सर्टीफिकेट मांग रही है. जो बच्चे जिस स्कूल को छोड़कर आए थे, वह स्कूल उन बच्चों को लिविंग सर्टीफिकेट नहीं दे रही है. उन स्कूलों का कहना है कि पहले फीस भर दीजिए, उसके बाद लिविंग सर्टीफिकेट देंगे. यह बहुत ही महत्वपूर्ण विषय है. शासन ने इस पर तुरंत कार्रवाई करनी चाहिए. जिन बच्चों ने मुंबई महानगरपालिका की या अन्य किसी स्कूलों में अॅडमिशन ले लिया है, उनको पुराना स्कूल फीस न भरने के कारण लिविंग सर्टीफिकेट नहीं दे रहा है. उनको लिविंग सर्टीफिकेट मिलना चाहिए. इस बारे में शासन ने नोंद लेनी चाहिए.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट)** : शासनाने याची नोंद घ्यावी.

-------

**पृ.शी.:** हवेली तालुक्यातील स्वतंत्र नवीन तहसील कार्यालय स्थापन करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजनेना.

**मु.शी.:** हवेली तालुक्यातील स्वतंत्र नवीन तहसील कार्यालय स्थापन करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजनो या संबंधी ॲड. अशोक पवार आणि श्री. भिमराव तापकीर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. अशोक पवार (शिरुर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात १६० गावांचा समावेश असून तेथे जवळजवळ ४० लाख लोकसंख्येची वस्ती असणे, हवेली तालुक्याचे वाढते विस्तारीकरण, नागरीकरण, विकास पाहता या तालुक्यासाठी सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेली प्रशासकीय यंत्रणा अत्यंत तोकडी असून इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या तालुक्यासाठी शहरी व ग्रामीण भागाला मिळून एकच तहसिलदार, गटविकास अधिकारी व कृषि अधिकारी असल्यामुळे प्रशासनावर प्रचंड ताण पडत असणे, यामुळे खरेदी-विक्री व्यवहार, पुरवठाविषयक कामे, विविध परवानग्या, दाखले, नैसर्गिक आपत्ती, कायदा सुव्यवस्था, बैठका, नियोजन, न्यायालयीन कामकाज इत्यादी महत्वाच्या कामांमधील विलंबासह जनतेच्या विकास कामांवर परिणाम होणे, राज्यातील अन्य जिल्ह्यांच्या लोकसंख्येसाठी उपलब्ध असलेल्या तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषि अधिकारी व इतर खात्यांचे अधिकारी यांची तुलनात्मक संख्या पाहता हवेली तालुक्यावर या तोकड्या व अपुऱ्या प्रशासकीय यंत्रणेमुळे नागरिकांवर प्रचंड अन्याय होणे, उपरोक्त वस्तुस्थिती पाहता हवेली तहसिल

ॲड. अशोक पवार....

कार्यालयाचे विभाजन करुन हवेलीसाठी स्वतंत्र नविन तहसिल कार्यालय स्थापन करुन तेथे तहसिलदार, गटविकास अधिकारी व कृषि अधिकाऱ्यांची पदे वाढवून हवेली तालुक्याच्या विकास कामांची गती वाढविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

ॲड. अशोक पवार : अध्यक्ष महोदय, माझा हवेली तालुका हा एका जिल्ह्यापेक्षा मोठया लोकसंख्येचा तालुका आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार या तालुक्याची लोकसंख्या ४० लाख आहे. आजचा विचार केला तर ती लोकसंख्या ५० लाखाच्या पुढे गेलेली आहे. १० वर्षामध्ये या परिसरातील लोकसंख्या ६३ टक्क्याने वाढते. अशा वेळेला एकच तहसिलदार तिथे कसे काम करु शकतो, असे सातत्याने आमच्या भागातील जनतेला वाटते. आपण जर गडचिरोली जिल्ह्याची माहिती घेतली तर तिथे १२ पेक्षा जास्त तहसिलदार आहेत. जालना तसेच वर्धा जिल्ह्यात ८ पेक्षा जास्त तहसिलदार आहेत. नायब तहसिलदारांची संख्या ३६ आहे. परंतु हवेली तालुक्यात ३ च नायब तहसिलदार आहेत. महसूलचा विचार केला तर गडचिरोली जिल्ह्याचा ११ कोटी रुपये, जालना जिल्ह्यात १२ कोटी रुपये आणि हवेली तालुक्याचा ८० कोटी रुपये जमीन महसूल वसूल होतो. महसुलामध्ये या तालुक्याची मोठी मदत होते. परंतु तेथील सामान्य माणसांचे रोजचे प्रश्न सुटत नाहीत. तो तालुका पुणे शहरालगत असल्यामुळे तिथे अनेक विषय येतात. त्या परिसरामध्ये गौण खनिजाचा एक मोठा विषय आहे. तिथे सुमारे १२९ खाणी आहेत. त्या ठिकाणी मर्यादेपेक्षा जास्त उत्खनन होणे, बेकायदेशीर खाणी होणे तसेच या तालुक्यातील एका तहसिलदाराला एका वर्षाला ५ लाख दाखले द्यावे लागतात. यामुळे आपण अनेक बाबींमध्ये सामान्य माणसाला न्याय देऊ शकत नाही. माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी सन २००९ मध्ये मला या विषयासाठी सहकार्य केले होते. पिंपरी चिंचवडचा एक भाग त्यावेळेला अप्पर तहसिलदार म्हणून बाजूला केला. तसा आता आमच्या तालुक्यातील हा दुसरा भाग मोठा आहे. त्याला ही अप्पर तहसिलदार म्हणून एक वेगळे कार्यालय दिले तर सामान्य माणसांना निश्चितपणे याचा फायदा होईल, अशी माझी विनंती आहे. यासाठी मी आशावादी आहे की, कोणत्या तरी कालमर्यादेमध्ये माननीय मंत्री या विषयाला न्याय देतील.

यानंतर श्रीमती करंदीकर....

अप्रकाशित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, महाराष्ट्रात जास्त लोकसंख्या वाढणाऱ्या तालुक्यामध्ये हवेली या तालुक्याचा समावेश आहे. हे आपल्याला मान्य करावे लागेल. या पूर्वी देखील मी महसूल मंत्री होतो तेव्हा एका विभागामध्ये अप्पर तहसीलदार मंजूर केला होता. त्यावेळी पिंपरी –चिंचवड हा भाग तेथे वर्ग केला होता. सन्माननीय सदस्य ॲड. अशोक पवार सांगत आहे त्यानुसार, ही परिस्थिती खरी आहे. सन्माननीय सदस्य श्री. भिमराव तापकीर यांचाही हा प्रश्न आम्हाला पटलेला आहे. महसूल गोळा करणे, नियंत्रण करणे ही येथील जाबबादारी आहे. तसेच येथील ७/१२ अशा अनेक बाबी आहेत. लोणी -काळभोर या नावाने प्रस्ताव आला असून या बाबत त्वरीत निर्णय घेऊ. तेथे तहसील कार्यालय देण्यात येईल.

श्री. भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी अत्यंत सकारात्मक उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न आहे की, हवेली तालुक्यामध्ये एकूण १६० गावांचा समावेश केलेला आहे. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड भागातील ३० गावे आहेत. स्वतंत्र अप्पर तहसीलदार यांची नेमणूक केलेली आहे. १३० गावे हवेली तालुक्यात आहेत. तेथे ४६ तलाठी काम करतात. तेथे तलाठ्यांची रिक्त पदे किती दिवसात भरली जातील ? ३हजार१६५ तलाठी पदे शासनाने मंजूर केली आहेत काय, असल्यास या पदांना कधी मंजुरी दिली जाणार ? हवेली तालुक्यात आता जी पदे रिक्त आहेत ती कधी भरली जाणार ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मध्यंतरी तलाठी भरती झाली होती, त्यावेळी प्राधान्याने या विभागात तलाठी दिलेले आहेत. किती रिक्त पदे आहेत ते तपासून निर्णय घेऊ. आता नवीन एक हजार तलाठी पदे भरण्याची परवानगी मिळाली आहे. त्या नुसार भरती करु. ज्या रिक्त जागा असतील त्या पूर्ण करु.

ॲड. अशोक पवार : अध्यक्ष महोदय, तालुक्याच्या वतीने मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांना मी धन्यवाद देतो. माझी एक विनंती आहे की, या संबंधी त्यांनी सदनात कालमर्यादा जाहीर करावी. यामुळे मतदारसंघातील जनता खूष होईल.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, या विषयाच्या संबंधी आपण दोन समित्यांपुढे जातो. एक उप समिती आहे. अतिरिक्त मुख्य सचिव ( सेवा ) यांच्याकडे ही समिती असते. तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती असते. या दोन्ही समितीपुढे प्रस्ताव ठेवून तो मंजूर करुन घेण्यात येईल.

------

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट )** : मी आपणास सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांना विधानपरिषदेत जायचे असल्यामुळे, लक्षवेधी सूचना क्रमांक ५ नंतर घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

असुधारित प्रत

**पृ. शी.** : मौजे चेंबूर येथील न.भू.क्र ३६० क बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील भूखंड डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल फाऊंडेशन या संस्थेला दिलेला असून सदर इमारतीचे बांधकाम बंद असणे

**मु. शी. :** मौजे चेंबूर येथील न.भू.क्र ३६० क बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील भूखंड डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल फाऊंडेशन या संस्थेला दिलेला असून सदर इमारतीचे बांधकाम बंद असणे, या संबंधी श्री. प्रकाश फातर्पेकर वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. प्रकाश फातर्पेकर ( चेंबूर ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

मौजे चेंबूर येथील न.भू.क्र. ३६० क बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील भूखंड ३० वर्ष मुदतीकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल फाउंडेशन या संस्थेला सांस्कृतिक आणि कल्याणकारी उपक्रम इमारतीचे बांधकाम करण्याकरिता देण्यात येणे, सदरील भूखंडावरील इमारतीचे बांधकाम मागील ६-७ वर्षापासून पूर्णतः बंद असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२० पासून आजतागायत वारंवार सहा.आयुक्त, मालमत्ता, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय यांच्याकडे विचारणा केली असता या संदर्भात अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे ( नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. प्रकाश फातर्पेकर : अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे सांस्कृतिक व कल्याणकारी उपक्रम राबविण्याच्या हेतूने महानगरपालिकेने मौजे चेंबूर येथील नगर भू. क्र. ३६० हा भूखंड ३० वर्षाकरिता रु. ५१ प्रति वर्ष या सवलतीच्या दराने सन १९९५ मध्ये डॉ. आंबेडकर मेमोरियल फाऊंडेशन या ट्रस्टला देण्यात आला होता. सदर ट्रस्टला दि. २६.५.२०१४ रोजी महानगरपालिकेतर्फे पूर्ण

बांधकाम करण्यासाठी पूर्ण सीसी देण्यात येऊनही इमारतीचे बांधकाम मागील ६-७ वर्षे संपूर्णपणे बंद आहे. मी या बाबत पत्र व्यवहार केल्यानंतर दुसऱ्या टप्प्याची रक्कम व व्याजासकट भरणा करण्यासाठी महापालिकेतर्फे दि.११.२.२०२१ रोजी संस्थेस कळविण्यात आले.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.प्रकाश फातर्फेकर ...

परंतु, सदर संस्थेने अद्याप भरणा केलेला नाही. शासनाने ज्या उद्देशाने सदर भूखंड संस्थेला दिला, तो उद्देश सार्थ होत नसल्याने, सदर संस्थेस इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याकरिता कालमर्यादेची अट घालणार काय, कालमर्यादेत संस्थेने काम पूर्ण न केल्यास सदर भूखंड शासन पुन्हा ताब्यात घेऊन इच्छुक असणाऱ्या दुसऱ्या संस्थेस देणार काय?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश फातर्फेकर यांनी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. या बाबतीत मी हे सांगू इच्छितो की, दि.२०.१०.१९९२ पासूनचे हे प्रकरण आहे. यामध्ये अगदी नाममात्र दराने ... ३० वर्षांकरिता ही वास्तू सवलतीच्या दरात देण्याबाबत दि. १.११.१९९५ रोजी करार केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, दि.१४.११.१९९५ रोजी या भूखंडाचा ताबा महापालिकेमार्फत संबंधित संस्थेला म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल फाऊंडेशनला दिला. त्यानंतर त्यांच्या आर्किटेक्टने दि. १७.७.२००९ रोजी याचे आराखडे मंजुरीसाठी महापालिकेकडे सादर केले. दि. ११ सप्टेंबरला त्याची आयओडी... जोत्यापर्यंतची सी.सी. दि. २३.४.२०१० रोजी दिली.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर तळघर व १ व २ वाहनतळाकरिता, प्लस तळमजला, प्लस २ मजले व दुसरा पोटमाळा अशा स्वरुपाच्या सुधारित आराखड्याला देखील त्यांनी सन २०१३ मध्ये महापालिकेमार्फत मंजुरी दिलेली आहे. सदर आराखड्याला दि. २६.५.२०१४ रोजी महापालिकेमार्फत पूर्ण बांधकाम करण्याची फुल सी.सी. देखील दिली. त्यानंतर पुढचा कोणताही प्रस्ताव वास्तु विशारदाने मुंबई महापालिकेकडे पाठवलेला नाही.

अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन या सांस्कृतिक कल्याणकारी उपक्रमांतर्गतच्या इमारतीचे काम गेले ७ ते ८ वर्षे बंद आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी त्यामध्ये जे अधिमूल्य आहे ते १४ लाख ३० हजार रुपये भरले. ते २ टप्प्यांमध्ये

श्री.एकनाथ शिंदे …

भरावयाचे होते. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ७ लाख १५ हजार रुपये भरलेले आहेत. दुसऱ्या टप्प्यातील रक्कमेचा भरणा ३ वर्षांच्या आत करावयाचा होता. परंतु, तो ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या आत भरायचा होता, यापैकी जे प्रथम असेल ते… परंतु, ही रक्कम देखील सदर संस्थेने भरलेली नाही. त्यासाठी महापालिकेने त्यांना नोटिस देखील दिलेली आहे. ७ लाख १५ हजार प्लस त्यावरील १८ टक्के व्याज अशी नोटिस दिली आहे. ३ वर्षांमध्ये हे बांधकाम पूर्ण करावयाचे होते. ३० वर्षांची मुदत ही सन १९९५ पासून ते आतापर्यंतची असून, ती मुदत संपुष्टात येण्याच्या कालावधीपर्यंत आलेली आहे. त्यामुळे महापालिकेने त्यांना तशा प्रकारची नोटिस देखील दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, हा विषय थोडा संवेदनशील आहे. त्या संस्थेच्या देखील काही अडचणी आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश फातर्फेकर यांना त्याबाबत माहिती आहे. परंतु, आपला जो उद्देश होता की, अगदी नाममात्र दराने त्या संस्थेला ती वास्तू, ती जागा दिली. त्या वास्तूचा त्या भागातील लोकांना फायदा झाला पाहिजे. त्या भागातील लोकांना त्या वास्तूचा वापर करता आला पाहिजे, अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे. याचा विचार करुन हे डॉ. बाबासाहेब आंबडेकर भवनाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने संबंधित लोकप्रतिनिधी म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश फातर्फेकर व संबंधित संस्थेचे प्रतिनिधी महापालिकेचे अधिकारी यांची तातडीने बैठक घेण्यात येईल व ही इमारत तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील.

........

**पृ. शी. :** ठाणे महापालिका हद्दीत ग्लॅडी अल्वारीस रोड वरील मौजे चितळसर, मानपाडा येथील सेक्टर चार मधील खासगी गट क्र.५९ अ/३ अ, २ ई, २ फ या भूखंडावर तिरुपती डेव्हलपर्स प्रोप्रायटर्स कंपनी या विकासकातर्फे राबविण्यात येत असलेल्या बांधकाम प्रकल्पाबाबत

**मु. शी. :** ठाणे महापालिका हद्दीत ग्लॅडी अल्वारीस रोड वरील मौजे चितळसर, मानपाडा येथील सेक्टर चार मधील खासगी गट क्र.५९ अ/३ अ, २ ई, २ फ या भूखंडावर तिरुपती डेव्हलपर्स प्रोप्रायटर्स कंपनी या विकासकातर्फे राबविण्यात येत असलेल्या बांधकाम प्रकल्पाबाबतया संबंधी सर्वश्री राम सातपुते, अबू आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.राम सातपुते (माळशिरस) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे महापालिका हद्दीत ग्लॅडी अल्वारीस रोड वरील मौजे चितळसर, मानपाडा येथील सेक्टर चार मधील खासगी गट क्र.५९ अ/३ अ, २ ई, २ फ या भूखंडावर तिरुपती डेव्हलपर्स प्रोप्रायटर्स कंपनी या विकासकातर्फे राबविण्यात येत असलेल्या बांधकाम प्रकल्पात विकासकाने ठाणे महापालिका आणि म्हाडाच्या

असुधारित प्रत

श्री.राम सातपुते ...

माजी अधिकाऱ्यांसोबत आर्थिक संगनमत करुन सुमारे सव्वातीन लाख चौ.फूट चटई क्षेत्रफळ बेकायदा मंजूर करुन शासन तथा महापालिकेचे ७० कोटी रुपये आर्थिक महसुली उत्पन्न बुडवून आर्थिक घोटाळा केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, आरक्षित क्षेत्र संपादीत करुन त्याचा म्हाडा नियमानुसार विकास करणे आणि खाजगी जमीन मालकास अकोमोडेशन रिझर्वेशन नियमानुसार विकास अनुज्ञेय करण्याचा अधिकार म्हाडाला असणे, त्यानुसार निव्वळ भूखंड क्षेत्र, विचारात घेणे अपेक्षित असताना सदरहू प्रकल्पात म्हाडा व ठाणे महापालिकेने रस्त्याच्या क्षेत्रासह १२६५३ चौ.मी.निव्वळ भूखंडाऐवजी १७९४० चौ.मी. क्षेत्र विचारात घेऊन विकासकाला अतिरिक्त चटई क्षेत्र मोठया प्रमाणात वाढवून देऊन व यामध्ये कोटयावधी रुपये शासकीय महसुलाचे आर्थिक नुकसान केल्याचा प्रकार उघड होणे, अकोमोडेशन नियमानुसार भूखंडाचे ४० टक्के म्हाडाला व ६० टक्के जमीन मालकाला असे विभाजन होणे आवश्यक असतानाही तसे न करता ७० टक्के भूखंड जमीन मालकाला देऊन केवळ ३० टक्के भूखंड म्हाडाला देऊन म्हाडाचे आर्थिक नुकसान करणे, प्रकल्पात ६५७६ चौ.मी.क्षेत्र यूएलसी कायद्याअंतर्गत येत असून त्यानुसार आवश्यक नजराणा रक्कम भरुन शासनाची मान्यता घेणे बंधनकारक असतानाही ठाणे महापालिका व म्हाडा अधिकाऱ्यांनी याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करुन शासकीय महसुलाचे आर्थिक नुकसान करणे, म्हाडाच्या कोकण विकास मंडळाच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना डीसीआर नियमामध्ये फेरफार करण्याचे कोणतेही अधिकार नसताना त्यांनी बेकायदा पध्दतीने परवानगी देत विकासकास मोठया प्रमाणात आर्थिक फायदा मिळवून देणे, सदरहू गृह प्रकल्पात मोठया प्रमाणात शासकीय महसुल बुडविण्यात येऊन शासन व महापालिकेच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी आर्थिक संगनमत करुन कोटयावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचे उघडकीस येणे, यास्तव या प्रकरणाशी संबंधीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबीत करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी पाहता, अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने संबंधीत विकासकाचे बांधकाम

श्री.राम सातपुते ....

तात्काळ थांबवून सदर प्रकरणी चौकशी करुन दोषींवर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

डॉ.जितेंद्र आव्हाड( गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..............

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.राम सातपुते : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय यांनी या लक्षवेधी सूचनेच्या विषयाला अनुसरुन ट्वीट केले होते की, "या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. ठाणे महानगरपालिकेने व म्हाडाने काम थांबवावे." सदरहू प्रकरणाची चौकशी गृहनिर्माण मंत्री महोदयांनी केली आहे काय, असल्यास त्याचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय, अशा पद्धतीने परवानग्या दिल्यामुळे शासनाचा महसूल बुडणार होता काय ?

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी याप्रकरणी संशय व्यक्त केला होता. मी म्हाडा प्रशासनाकडून माहिती घेतली आहे. त्यानुसार याप्रकरणी म्हाडा प्रशासनास कोणताही तोटा झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, हमारी जानकारी के मुताबिक त्रिपति बिल्डर को इस प्रोजेक्ट के लिए १२,६५३ चौ.मी. भूखंड देना था. लेकिन उनको १७,९४० चौ.मी. भूखंड दिया गया. यानी ५,२८७ चौ.मी. जगह ज्यादा दी गई. क्या यह बात सही है ? थाना नगर निगम और म्हाडा के अधिकारियों की मिलीभगत के कारण तकरीबन सवा तीन लाख वर्ग फूट एरिया को गैरकानूनी तरीके से स्वीकृत किया गया. इसमें ७० करोड़ रुपये का घोटाला हुआ. क्या यह बात सही है ? यदि यह बात सही है तो इस बारे में कौनसी कार्रवाई की जाएगी ? इस बारे में कड़ी कार्रवाई होनी चाहिए. सरकारी खजाने की लूट मची हुई है. अधिकारियों की मिलीभगत से ये काम हो रहा है. क्या आप इस बारे में सक्त कदम उठाएंगे या नहीं ?

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरणी घोटाळा झाला नसून महानगरपालिकेच्या मदतीने म्हाडा प्रशासनाला काही अंशी जमीन मिळाली आहे. त्यावर म्हाडा प्रशासनाला इमारत बांधता येईल.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, म्हाडाची नियमावली म्हाडाच्या जागेसाठी आहे. खाजगी विकासकाला म्हाडा नियमावली लागू करण्यात आली आहे काय, एफएसआय देण्यात आला आहे काय ? मंत्री महोदयांनी सांगितले की, या प्रकरणी घोटाळा झाला नाही. परंतु betterment charges व इतर काही charges waive करुन वेळेत घेण्यात आले नाहीत. अशा पद्धतीने अप्रत्यक्षपणे फायदा देण्यात आला

असेल तर त्यावर मंत्री महोदयांनी त्यांचे मत व्यक्त करुन कोणती कारवाई करण्यात येईल, याबाबत माहिती द्यावी.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सदरहू व्यक्तीने आतापर्यंत २५ कोटी रुपये रक्कम महानगरपालिकेमध्ये भरणा केली आहे. युडीसीपीआर आल्यामुळे व त्यांनी उशीर केल्याने त्यांच्या सर्व परवानग्या व्यपगत झाल्या आहेत, त्या आता नाविन्याने भरण्यात येतील. त्यामुळे कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही.

------------

**पृ.शी.:** बेकायदेशीररित्या वृक्षतोड केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी मागणी केली असतानाही संबंधितांविरुध्द कारवाई न करणे

**मु.शी.:** बेकायदेशीररित्या वृक्षतोड केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी मागणी केली असतानाही संबंधितांविरुध्द कारवाई न करणे या संबंधी **श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स.** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"देवळाली मतदारसंघातील (जि.नाशिक) नाशिक रोडलगतच्या वडनेरगांव, वडनेरगेट परिसरातील वड, पिंपळ, आंबा व कडुनिंब इ .वृक्षांची बेकायदेशीरपणे तेथील नगरसेवक व उपायुक्त (उद्यान) महापालिका नाशिक, यांच्या आदेशानुसार संबंधित ठेकेदाराने दिनांक ७ व ८ जानेवारी, २०२२ रोजी वृक्षतोड केल्याचे तसेच जेलरोड-टाकळीरोड (नाशिक) येथे एका व्यावसायिकाने माजी नगरसेवकांच्या आदेशावरुन पिंपळ, औदूंबर इ .वृक्षांची वृक्षतोड केल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास येणे, सदर वृक्षतोडप्रकरणी वरील संबंधितांनी नाशिक महापालिका प्रशासनाची व

वृक्षप्राधिकरणाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास येणे, संबंधित नगरसेवक, उपायुक्त (उद्यान) व संबंधित ठेकेदार यांचेविरुध्द वृक्षतोड संवर्धन कायदा व वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिस कारवाई करण्यात यावी तसेच एक झाड एक लाख रुपये याप्रमाणे संबंधितांकडून वसुली करावी, अशी मागणी नाशिक कृती समितीचे पदाधिकारी, तसेच स्थानिक कर्तव्यशील सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व वृक्षप्रेमी जनतेने केली असल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर, सदर बेकायदेशीररित्या वृक्षतोड

श्रीमती सरोज अहिरे...

केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या सर्व प्रकरणी सर्व संबंधितांच्या विरोधात कारवाई करावी, अशी मागणी दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडे करणे, तथापि, त्याप्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

श्री.एकनाथ शिंदे (नगरविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट) :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्रीमती सरोज अहिरे : अध्यक्ष महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८ मे, २०१५ रोजी एका पीआयएलच्या आदेशात स्पष्ट नमूद केले आहे की, विकास (उदा. रस्ता रुंदीकरणाचे काम) कामे करताना त्याच्या आजूबाजूची झाडे रहदारीला अडथळा निर्माण करीत असतील तर त्याची छाटणी किंवा तोडणीस विशेष परवानगी घ्यावी लागते. माझ्या मतदारसंघातील वडनेर या गावातीन एक दोन नव्हे तर ५० वृक्षांची वृक्षतोड केली आहे. झाडांच्या फांद्यामुळे पथदिव्यांचा उजेड येत नसेल तर त्या वृक्षाची छाटणी किंवा तोडणी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची परवानगी घ्यावी लागते, त्यानंतर त्या वृक्षाच्या फांद्या छाटण्यात येतात. अशी पद्धत संपूर्ण राज्यात आहे. परंतु आवश्यकता नसताना फांद्या छाटण्याच्या नावाखाली भारतीय प्रजातीची वड, आंबा,चिंच अशी प्राणवायू देणाऱ्या वृक्षांची तोडणी करण्यात आली आहे.

यानंतर श्री.तेलंग....

श्रीमती सरोज अहिरे.......

सदर झाडे तोडण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नव्हती. तसेच सदर झाडे तोडण्यासाठी कोणताही कंत्राटदार न नेमता श्री.उत्तम सोन◌ावणे यांनी सोबत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने सदर झाडे बुडासह तोडली आहेत.

अध्यक्ष महोदय, कोरोनामध्ये आपणास मोठ्या प्रमाणावर प्राण वायूचा आवश्यकता भासली होती. असे असताना देखील अशा प्रकारची विनापरवानगी वृक्षतोड केल्यानंतर देखील महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल केलेला नाही. उक्त प्रकरणाचा अहवाल शासन◌ास सादर करण्याच्या सुचना दिल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याने सदर अहवाल शासनास सादर केलेला आहे. उक्त अहवालामध्ये एकूण ३६ झाडे तोडण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर झाडे तोडण्यात आलेली आहे. सदर अहवाल चुकीचा सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर, कंत्राटदारावर आणि ज्यांच्या आदेशाने सदर वृक्षतोड करण्यात आलेली आहे, अशा सर्वांवर शासन काय कारवाई करणार आहे?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज अहिरे यांनी नाशिक महानगरपालिका हद्दीतील वृक्षतोड केल्यामुळे त्यांनी या लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधले आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये दोन प्रकरणे आहेत. त्यातील पहिले प्रकरणे असे आहे की, वडनेर गेट ते पाळदे मळा येथील वृक्षतोड. या प्रकरणातील नाशिक महानगरपालिकेच्या नाशिक रोड विभागातील प्रभाग क्रमांक २२ मध्ये एकूण ३६ वृक्षांची अनधिकृतरीत्या छाटणी करुन ती वृक्ष तोडण्यात आलेली आहेत. उक्त प्रकरणी वृक्षप्रेमीनी दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपनगर येथे तक्रार केली. सदर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ९ जानेवारी, २०२२ रोजी सदर ठिकाणाची पाहणी करण्यात आली. त्यानुसार ठेकेदार श्री.उत्तमराव तुकाराम सोनवणे यांनी मजुरांमार्फत झाडांच्या फांद्यरा तोडून घेतल्याचे स्थानिक राहिवाशांनी सांगितले. सदर तोडलेली लाकडे त्यांनी एमएच ०४ सी.पी. ९१९६ या गाडीने

श्रीमती सरोज अहिरे.......

अमरधाम या स्मशानभूमीमध्ये जमा केल्याचे तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी सदर झाडांचा पंचनामा देखील करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम, १९७५ (सुधारित २०२१) वृक्ष प्राधिकरण विभागाने तयार केलेल्या नियमावलीनुसार अनधिकृत व विनापरवानगी वृक्षतोडीकरिता वृक्षांचे वय व प्रजातींच्या मूल्याकंनानुसार दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी श्री.उत्तमराव तुकाराम सोनवणे यांना २० लाख ३५ हजार रुपयांच्या दंडाची नोटीस पाठविण्यात आलेली आहे. संबंधितांकडून दंड वसुलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच वृक्ष कायदा १९७५ कलम २१ (१) अन्वये ठेकेदार श्री.उत्तमराव तुकाराम सोनवणे यांच्या विरुद्ध दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी उपनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. संबंधित ठेकेदाराने सदर दंडाची रक्कम भरणा केली नाही तर त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्याची कार्यवाही देखील करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी संबंधित दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तरी याबाबत सांगू इच्छितो की, उक्त प्रकरणी पोलीस तपास करीत आहेत. तपासातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती सरोज अहिरे : अध्यक्ष महोदय, श्री.उत्तमराव तुकाराम सोनवणे यांना २० लाख रुपये दंडाची नोटीस पाठविण्यात आली असल्याचे आताच मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु त्यांनी शासनाकडे सादर केलेल्या अहवालमध्ये अनेक चुका आहेत.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्रीमती सरोज अहिरे....

५० ते ५५ वृक्ष कापले आहेत. असे असताना येथे केवळ ३६ वृक्षांचा उल्लेख केला आहे. तसेच प्रत्येक वृक्षासाठी १ लाख रुपयांचा दंड आहे. यानुसार ५० ते ५५ लाख रुपयांचा दंड व्हावयास हवा होता. महानगरपालिकेने कंत्राटदाराची वृक्ष तोडण्यासाठी नियुक्ती केली नाही. असे असताना त्या कंत्राटदाराने कोणत्या अधिकारात वृक्षतोड केली आहे ? याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. तसेच वृक्षप्रेमी तेथील वृक्षांना अलिंगन घालत आहेत. त्यांनी याबाबत गुन्हा नोंदविला होता. असे असताना महानगरपालिका प्रशासनाने गुन्हा का नोंदविला नाही ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेने गुन्हा नोंदविलेला आहे. प्रती वृक्षांकरिता एक लाख रुपये दंड असल्याचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. हा दंड वाढला पाहिजे. प्रत्येक वृक्षाचे वयोमान आणि प्रजाती यानुसार दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या नियमानुसार दंडाची आकारणी केली जाते. अधिकाधिक दंड १ लाख रुपयांचा आहे. यात २० लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. या प्रकरणात पोलीस तपास सुरु आहे. या विषयाच्या अनुषंगाने ज्या ज्या बाबी निदर्शनास येतील त्यामध्ये कोणालाही पाठिशी घातले जाणार नाही. मी सांगू इच्छितो की, दोषींवर कारवाई केली जाईल.

**तालिका सभाध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्य डॉ. बालाजी किणीकर यांची लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, विधान परिषदेमध्ये माझ्या विभागाची सातव्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना चर्चेला येणार आहे. त्यामुळे आता जर लक्षवेधी सूचना क्रमांक १० चर्चेला घेतली तर मला ही लक्षवेधी सूचना संपवून वरच्या सभागृहात जाता आले असते.

**तालिका सभाध्यक्ष :** मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ. बालाजी किणीकर यांची लक्षवेधी सचूना संपल्यानंतर आपल्या विभागाची लक्षवेधी सूचना चर्चेला घेतली जाईल.

असुधारित प्रत

**पृ.शी. :** उल्हासनगर शहरातील धोकादायक इमारतींचा प्रलंबित असलेला प्रश्न

**मु.शी. :** उल्हासनगर शहरातील धोकादायक इमारतींचा प्रलंबित असलेला प्रश्न या संबंधी सन्माननीय सदस्य डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. बालाजी किणीकर : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी पाकिस्तानातील सिंध प्रांतातून निर्वासित केलेल्या रहिवाशांचे भारतात पुनर्वसन करण्याच्या उद्दीष्टाने उल्हासनगर शहरात त्यांचे पुनर्वसन करणे, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अनेक इमारती या ६० ते ७० वर्षापूर्वी बांधकाम केलेल्या असणे, परिणामी उल्हासनगर महानगरपालिकेने सर्व्हेक्षण केलेल्या ५०० हून अधिक इमारती या धोकादायक असल्याचे निदर्शनास येणे, सदर धोकादायक इमारतीमध्ये सुमारे १० हजार नागरिक रहिवास करीत असून त्यांच्यात भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, दरवर्षीप्रमाणे या इमारतीमधील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीस पाठविण्यात येणे, उल्हासनगरमध्ये दिनांक १५ व २८ मे, २०२१ रोजी मोहिनी पॅलेस आणि साई शक्ती अपार्टमेंट तसेच दिनांक २४ ऑक्टोबर, २०२१ रोजी पारस अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या अपघातात १३ नागरिकांचा मृत्यू आणि ११ नागरिक गंभीर जखमी होणे, या इमारतीमधील मृत्युमूखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना शासनाने ५ लाख रुपये मदत जाहीर करण्यात येऊनही अद्याप कोणतीही मदत देण्यात न येणे, मृत्युमूखी पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार करणे, मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनाकडे मानवतेच्या

असुधारित प्रत

डॉ. बालाजी किणीकर .....

दृष्टीने आर्थिक मदत करण्यासाठी मागणी करणे, परंतु शासनामार्फत धोकादायक इमारतीमधील नागरिकांसाठी अद्यापपर्यंत पर्यायी व्यवस्था न करण्यात येणे, उल्हासनगरमधील कोसळलेल्या धोकादायक इमारतींचे पुनर्निर्माण करण्यासाठी ४ एफ.एस.आय. देण्याची लोकप्रतिनिधींकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.नगर विकास मंत्री यांनी एक समिती स्थापन करून या समितीने १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असतानाही अद्यापही कोणतीही निर्णयात्मक कार्यवाही न होणे, धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी करण्याकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये शासनाविरुद्ध निर्माण झालेली असंतोषाची भावना, तसेच अनधिकृत बांधकामे नियमित करण्याकरीता शासनाकडून आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम कमी करुन लहान-मोठ्या भूखंडधारकांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

श्री. एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

डॉ. बालाजी किणीकर : अध्यक्ष महोदय, सन १९४७ ला भारत – पाकिस्तान फाळणीनंतर सिंध प्रांतातून सिंधी बांधव उल्हासनगर येथे आले होते. उल्हासनगर हे शहर १३ कि.मी. पर्यंत वसलेले आहे. हे शहर अतिशय दाट लोकवस्तीचे आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अनेक इमारती ६० ते ७० वर्षापूर्वी बांधलेल्या आहेत. उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत ८५५ इमारतींचा प्रश्न मोठा आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने ५०० ते ५५० इमारती धोकादायक घोषित केल्या आहेत. मागील वर्षी दिनांक १५ मे, २०२१ रोजी मोहिनी पॅलेस, साई शक्ती अपार्टमेंट आणि दिनांक २४ ऑक्टोबर रोजी पारस अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळून १३ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यामध्ये ११ लोक गंभीर जखमी झाले होते. मंत्री महोदयांनी त्याठिकाणी भेट देऊन लोकांना मदत केली आहे. धोकादायक इमारतीमधील नागरिकांचे पुनर्वसन, अनधिकृत ८५५ इमारतींचा नियमितीकरणाचा प्रश्न व मृत्युमूखी पडलेल्या नागरिकांना आर्थिक मदत मिळावी, याकरिता कल्याण लोकसभा सदस्य माननीय डॉ. श्रीकांत शिंदे व स्थानिक लोकप्रतिनिधीसोबत मी मंत्री महोदयांकडे पाठपुरावा करीत होतो. या विषयाच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी त्यांच्या दालनामध्ये बैठक घेतली होती. त्या बैठकीला स्थानिक व्यापारी, सोसायटी प्रतिनिधी, उल्हासनगर महानगरपालिका महापौर उपस्थित होते.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी तीन स्पेसिफिक प्रश्न विचारु इच्छितो. उल्हासनगर शहरातील धोकादायक इमारतीमधील रहिवाशी लोकांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. ज्या इमारती धोकादायक घोषित केल्यानंतर पाडण्यात आल्या आहेत त्या इमारतींची पुनर्बधांणी आणि उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा मुद्दा मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. याकरिता आकारण्यात येणार दंड मोठा आहे. कमीत कमी दंड आकारुन या इमारती किती दिवसांमध्ये नियमित केल्या जाणार आहेत ? इमारतींचा स्लॅब कोसळून तेथे जे लोक मृत्युमूखी पडले आहे त्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत कधीपर्यंत मिळणार ? जेठी कॉलनी, साईनाथ कॉलनी येथे गरीब रहिवाशी राहत

डॉ. बालाजी किणीकर .....

आहेत. तेथील लोकांची घरे नियमित करण्याची नोटीस महानगरपालिकेने दिली आहे. तेथे कमीतकमी दंड आकारुन ही घरे नियमित केली जाणार आहेत काय ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. बालाजी किणीकर यांनी उल्हासनगर येथील धोकादायक इमारतींसंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली आहे.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे.....

उल्हासनगर शहरामध्ये अनेक इमारती धोकादायक स्थितीमध्ये आहेत. पावसाळयामध्ये अशा प्रकारच्या अनेक इमारती कोसळल्या देखील आहेत. सन २०२१ मध्ये झालेल्या इमारत दुर्घटनांमध्ये १४ लोकांचा मृत्यू झाला तर १० लोक जखमी झाले. गेल्या अनेक वर्षांपासून अशा घटना घडत आहेत. शहरामध्ये सुमारे १४७ धोकादायक इमारती असून त्यापैकी १३९ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. धोकादायक इमारतींचा पुर्विकास होऊन तेथे राहणाऱ्या लोकांच्या डोक्यावरील टांगती तलवार कायमस्वरुपी दूर झाली पाहिजे असा विचार करुन शासनाने दिनांक १ जानेवारी, २००० पूर्वीची अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्यासंदर्भात सन २००६ मध्ये निर्णय घेतला. परंतु असे करताना आकारण्यात आलेले शुल्क जास्त असल्यामुळे काही लोक यामध्ये सहभागी झाले नाहीत. केवळ या कारणामुळे सदर निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. यासंदर्भात शासनाकडे तेथील लोकप्रतिनिधी, नागरिक, गृहनिर्माण संस्था यांनी वारंवार निवेदनांद्वारे मागणी केली की, सन २००६ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये सुधारणा करावी.

अध्यक्ष महोदय, या धोकादायक इमारतींमध्ये हजारो लोक राहत आहेत. जुन्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत अनेक बैठका झाल्या. या बैठकांना अनेक सन्माननीय सदस्य देखील उपस्थित होते. उल्हासनगर शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास कसा होऊ शकेल याची सविस्तर चर्चा केल्यानंतर दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी शासनाने अप्पर मुख्य सचिव, महसूल व वने यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. या समितीमध्ये प्रधान सचिव, नगरविकास (१), प्रधान सचिव, नगरविकास (२), सहकार आयुक्त, जिल्हाधिकारी, ठाणे, जमाबंदी आयुक्त, कोकण व ३ तज्ञ व्यक्तींचा समावेश आहे. या समितीच्या अनेक बैठका पार पडल्या. पुढील आठवडयाभरात या समितीचा अंतिम अहवाल प्राप्त होईल.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, एफ.एस.आय., ॲन्सिलरी, इन्सेन्टिव्ह, इत्यादी महत्त्वाच्या बाबींची बैठकांमध्ये चर्चा झाली. तसेच पुनर्विकासासाठी आवश्यक एफ.एस.आय. किती असावा, मालकी हक्क व सनदी यांचे दावे जलदगतीने निकाली काढले जावेत, क्लस्टरसंबंधी येणाऱ्या अडचणींचे युध्द पातळीवर निराकरण केले गेले पाहिजे, सोसायटीची नोंदणी व सभासदांचे न नोंदविलेले दस्त, प्रशमन शुल्क हे वाजवी व परवडणारे असले पाहिजे, इत्यादी अनेक मुद्दयांवर चर्चा झाली. प्रशमन शुल्क जास्त असल्याने पुनर्विकास थांबला होता.

अध्यक्ष महोदय, समितीचा अहवाल एका आठवडयात शासनास प्राप्त होईल.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे...

हा अहवाल एका आठवड्यामध्ये शासनाला प्राप्त होईल आणि त्यानंतर तातडीने पुनर्विकासाचा जो निर्णय प्रलंबित आहे तो निर्णय शासन तातडीने घेईल. त्यामुळे संपूर्ण उल्हासनगरवासियांच्या डोक्यावरील टांगती तलवार दूर होईल, असे मी सांगू इच्छितो. तसेच मघाशी सन्माननीय सदस्यांनी ज्या ठिकाणी स्लॅब कोसळून हानी झाल्याचे नमूद करुन त्यांना मदत करण्याची मागणी केली आहे. त्याबाबतचे प्रस्ताव तपासून आणि माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन त्यांना तात्काळ मदत दिली जाईल.

अध्यक्ष महोदय, साईनाथ कॉलनी आणि ज्योती कॉलनी या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. ती बाब तपासून घेऊन त्यावर सकारात्मक निर्णय दिला जाईल, जेणेकरुन त्यांना या निर्णयाचा फायदा होईल.

श्री. गणपत गायकवाड : अध्यक्ष महोदय, उल्हासनगरमध्ये सन १९९० पासून काही इमारती बांधल्या गेल्या आणि त्यानंतर १९९५-९६ मध्ये जास्त प्रमाणात अनधिकृत इमारती बांधल्या गेल्या आणि त्यावेळी वापरण्यात आलेल्या रेतीचा दर्जा चांगला नव्हता. ५-५, ७-७ माळयाच्या इमारती बांधल्या गेल्या. आपण आता क्लस्टर डेव्हलपमेंटची घोषणा केली. मागच्या १० वर्षापासून क्लस्टर डेव्हलपमेंटची योजना घोषणा केल्यानंतरही तेथे एकही इमारत क्लस्टरमध्ये उभारली गेली नाही. त्याचे कारण असे की, कमीत कमी ५ हजार चौरस मीटर जमीन असावी अशी अट त्या योजनेमध्ये ठेवली आहे. माझी याबाबत अशी मागणी आहे की, आपण ५ हजार चौरस मीटर ऐवजी २ हजार किंवा ३ हजार म्हणजे २० किंवा ३० गुंठे इतक्या जागा असतील तर त्यांना क्लस्टर योजनेमध्ये एफएसआय देऊन त्यांचा पुनर्विकास केला तर ते काम लवकर होऊ शकते. कारण ५ हजार मीटर म्हणजे ५ एकर जमीन होते आणि ५ एकर जमीन सलग एकत्रितपणे करणे शक्य नाही. अशा अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे आपण क्लस्टर डेव्हलपमेंटसंबंधी जो ५ हजार चौरस मीटरचा नियम बनविला आहे त्यामधील क्षेत्र आपण कमी करणार आहात काय ? दुसरे म्हणजे १९९०, १९९५, २००० आणि २००१जी अनधिकृत बांधकामे झाली आहेत त्यांना त्यावेळचा रेडी रेकनरचा दर न लावता अधिकाऱ्यांनी चालू वर्षाचा रेडी रेकनरचा दर

असुधारित प्रत

श्री. गणपत गायकवाड...

लावण्यात येईल. त्यामुळे त्यावर दंड आणि इतर आकारणी जास्त प्रमाणात येते. तसेच त्यावरील व्याजही जास्त येते. त्यामुळे ते व्याज शासन माफ करणार आहे काय, आणि जेव्हा बांधकाम झाले त्या वर्षाचे रेडी रेकनरचे दर आकारणार आहात काय ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मी मघाशीच या सर्व बाबींचा खुलासा केला होता. जे निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाले त्याबद्दल त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आणि त्यांना जी शिक्ष व्हायची होती ती झाली आहे. क्लस्टरचे क्षेत्र ५ हजार चौरस मीटर ऐवजी कमी करावे यासंबंधी एक समिती गठीत करण्यात आली होती आणि ती समिती येत्या आठवडाभरामध्ये शासनाला अहवाल देणार आहे. सन्माननीय सदस्यांनी रेडी रेकनरच्या दराचा उल्लेख केला. त्याबाबत पूर्वीचा दर लावण्यात आला होता. मात्र त्यानुसार कोणीही पुढे आले नाही. म्हणून आता याबाबत पूर्वीचा आणि आताचा दर यांच्या मधला मार्ग काढून लोकांना जे परवडेल तसा प्रयत्न होईल. शासनाची ही योजना कागदावर राहता कामा नये, याचा प्रामुख्याने विचार केलेला आहे. तेथील लोकांचा पुनर्विकास झाला पाहिजे हे जे आपल्या मनामध्ये आहे त्याचा शासनाने विचार केलेला आहे. त्याचबरोबर तज्ज्ञ कमिटीनेही या सर्व बाबी लक्षात घेतल्या आहेत. कारण गेल्या १० वर्षापासून, २० वर्षापासून कागदावरच राहिले आहे. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे ते क्षेत्र कमी करता येईल काय याबाबत त्या समितीचा विचार सुरू आहे. दंडाची रक्कमही कमी करता येईल काय याचाही विचार सुरू आहे. शासन याबाबत सकारात्मक आहे आणि म्हणून त्यावर निर्णय होईल.

**पृ. शी.** अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र नसताना बेकायदेशीर प्रवेश देणे.

**मु. शी.** अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र नसताना बेकायदेशीर प्रवेश देणे या विषयासंबंधी श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

असुधारित प्रत

श्रीमती मंजुळा गावित (साक्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त व महाराष्ट्र शासन (सिव्हील अपिल क्र. ५८५४ / १९९४ विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७६७ / १९९३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे नियमन) अधिनियम, २००० आणि शासनाकडील विविध आदेश अनुषंगाने जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र दिले जात असणे, श्री.दिलीप विठ्ठल बांबळे विरुद्ध महाराष्ट्र शासन या विशेष अनुज्ञा याचिका क्र.११२३४-४८-२०१७ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्णय देताना हमीपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्राशिवाय अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर शैक्षणिक संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेले प्रवेश रद्दबातल ठरविले असणे, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. एसटीसी २११९/प्र.क्र.१७९ का.१०, दिनांक १० डिसेंबर २०१९, शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश मिळवणाऱ्या व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रवेश देऊ नये असे शासनाने स्पष्ट आदेश दिलेले असताना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये श्रीमती सर्रासपणे शासन निर्णय धाब्यावर बसवून जात वैधता प्रमाणपत्रे सादर न करणाऱ्या

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. भास्कर जाधव)**

मंजुळा गावित...

विद्यार्थ्यांना संरक्षण दिले जात असणे, तसेच ज्या विद्यार्थ्यांकडे वैधता प्रमाणपत्र नाही परंतु त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांचेकडे वैधता प्रमाणपत्र आहे अशा विद्यार्थ्यांना अटी शर्तींच्या अधीन राहून वैधता प्रमाणपत्र मा.न्यायालयाकडून दिली जात असल्याने अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट उमेदवार प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे आदिवासी विकास विभागाने अशा विद्यार्थींचे व कुटूंबियांचे मूळ वैधता प्रमाणपत्र पुन:श्च तपासण्याबाबत अथवा पुनर्विलोकन करण्याची तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ॲड के. सी. पाडवी (आदिवासी विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्रीमती मंजुळा गावीत : अध्यक्ष महोदय, माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त व महाराष्ट्र शासन (सिव्हील अपिल क्र. ५८५४ / १९९४ विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७६७ / १९९३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे नियमन) अधिनियम, २००० आणि शासनाकडील विविध आदेश अनुषंगाने जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र दिले जात असणे, श्री.दिलीप विठ्ठल बांबळे विरुद्ध महाराष्ट्र शासन या विशेष अनुज्ञा याचिका क्र.११२३४-४८-२०१७ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्णय देताना हमीपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्राशिवाय अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर शैक्षणिक संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेले प्रवेश रद्दबातल ठरविले असणे,.....

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) :** सन्माननीय सदस्या आपल्याला लक्षेवधी सूचना वाचून दाखविण्याची आवश्यकता नाही.

श्रीमती मंजुळा गावीत : अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. एसटीसी २११९/प्र.क्र.१७९ का.१०, दिनांक १० डिसेंबर २०१९, शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश मिळवणाऱ्या व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रवेश देऊ नये असे शासनाने स्पष्ट आदेश दिलेले असताना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सर्रासपणे शासन निर्णय धाब्यावर बसवून जात वैधता प्रमाणपत्रे सादर न करणाऱ्या विद्यार्थ्यांना संरक्षण दिले जात असणे, तसेच ज्या विद्यार्थ्यांकडे वैधता प्रमाणपत्र नाही परंतु त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांचेकडे वैधता प्रमाणपत्र आहे अशा विद्यार्थ्यांना अटी शर्तीच्या अधीन राहून वैधता प्रमाणपत्र मा.न्यायालयाकडून दिली जात असल्याने अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट उमेदवार प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे आदिवासी विकास विभागाने अशा विद्यार्थीचे व कुटूंबियांचे मूळ वैधता प्रमाणपत्र पुन:श्च तपासण्याबाबत

श्रीमती मंजुळा गावीत....

अथवा पुनर्विलोकन करण्याची तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना...

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्या आपण जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे त्याबाबत माननीय मंत्र्यांनी दिलेले लेखी उत्तर हातामध्ये घेऊन त्याच्या अनुषंगाने आपल्याला आणखी काही प्रश्न विचारायचे असतील तर ते विचारा. आता आपण जी लक्षवेधी सूचना लिहून दिलेली आहे ती नका वाचू.

श्रीमती मंजुळा गावीत : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेचे लेखी उत्तर आतापर्यंत आमच्या हातात मिळालेले नाही.

श्री. दौलत दरोडा : अध्यक्ष महोदय, आता एका शिपायाने आमच्या हातात हे उत्तर आणून दिलेले आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण मागितल्यानंतर आपल्याला हे उत्तर मिळते यासाठी आपण पिजन होलमध्ये बघितले होते काय ?

श्री. दौलत दरोडा : अध्यक्ष महोदय, होय. आम्ही सर्व बॉक्स तपासले होते. सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपासून सदरच्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर आम्ही बघत होतो. परंतु आता ते उत्तर आलेले आहे. त्यामुळे माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सदरची लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**तालिका सभाध्यक्ष :** लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर जर आपण हरकतीचा मुद्दा मांडला असता तर तो ग्राह्य धरण्यात आला असता. परंतु आता तो विषय पुढे गेलेला आहे. सर्वच सन्माननीय सदस्य अनुभवी आहेत त्यामुळे मी त्यांना सांगू इच्छितो की, पर्वाच्या दिवशी याच विषयावर सभागृहात चर्चा झालेली आहे. त्यामुळे

असुधारित प्रत

सन्माननीय सदस्यांनी एक-एक प्रश्न विचारावा. परंतु लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. पण माननीय मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की,

**तालिका सभाध्यक्ष....**

त्यांच्या विभागाने याची दखल घेणे आवश्यक आहे. कारण आपल्याकडून खूप उशिरा उत्तर आलेले आहे.

ॲड. के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, याची नोंद घेण्यात येईल.

श्रीमती मंजुळा गावित : अध्यक्ष महोदय, शैक्षणिक, व्यावसायिक व नोकरीसाठी प्रवेश देताना किंवा निवड करताना जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करणार काय, असा माझा माननीय मंत्र्यांना प्रश्न आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी लक्षवेधी सूचनेवरील निवेदन वाचून दाखवले आहे. मला या मूळ प्रश्नाच्या खोलात जावे लागणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. भास्कर जाधव ) :** मंत्री महोदय, आपण या विषयाच्या खोलात जावे, त्यासाठी आपल्याला परवानगी आहे. मला आपण आज पहिल्यांदाच सभागृहात दिसत आहात.

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, राज्यघटना निर्माण झाल्यानंतर ४७ जमातींना राखीव जागा देण्यात आली आहे, हे आपल्याला मान्य करावे लागेल. सन १९५० मध्ये राज्यघटनेची यादी तयार झाली. काही यादी अपूर्ण राहिली म्हणून १९५६ मध्ये सुधारणा केली. काही राजकीय हेतुने केंद्रात १९७६ मध्ये सुधारणा केली. त्यामध्ये एक एरिया दिलेला होता. एवढया एरियामध्ये शेडयुल्ड एरिया ठरलेला होता. त्यामध्ये आदिवासींना राखीव जागा दिल्या पाहिजेत हे ठरलेले होते. असे असताना सन १९७६ एरिया रिस्ट्रीक्शन उठविण्याकरीता कायद्या झाला. आदिवासींच्या नाम साधर्म्याचा फायदा घेऊन अनेक जाती, जमातींमधील लोकांनी यामध्ये येण्याचा प्रयत्न सुरु केला. अशी संख्या आता वाढत चालली आहे. बोगस आदिवासींचे प्रमाणपत्र घेणे, नोकरी मिळवणे, राजकारणात येणे याचा सुळसुळात आता राज्यात सुरु झाला. म्हणून माधुरी पाटील विरुध्द अप्पर आयुक्त, महाराष्ट्र शासन ही सर्वोच्च न्यायालयात केस गेली. सर्वोच्च न्यायालयाने चांगला निर्णय दिला. ज्यांनी बोगस प्रमाणपत्र घेतले व ज्यांनी प्रमाणपत्र दिले या दोघांना शिक्षा झाली पाहिजे असे डायरेक्शन राज्य शासनाला दिले. राज्य शासनाने सन २००० मध्ये कायदा केला व त्याची अंमलबजावणी सन २००१ मध्ये सुरु झाली. या राज्यात हे जे बोगस आदिवासी आहेत ते कोठेही थांबायला तयार नाहीत. कायदा असला तरी देखील हे सर्व होत आहे. बोगस प्रमाणपत्र देणारे अधिकारी, आमच्या विभागात असतील, महसूल विभागातही असतील. या सर्वांनी फार मोठया प्रमाणात बोगस प्रमाणपत्रे दिलेली आहेत. व्हॅलिडिटी देखील बोगस आहेत. एखाद्या ठिकाणी

ॲड. के.सी. पाडवी.....

मेडीकल, इंजिनिअरला जाणारा विद्यार्थी क्लेम करतो की, आम्हाला कंडीशनल व्हॅलीडिटी दिली पाहिजे. उच्च न्यायालयातही तो सांगतो की, आम्हाला कंडीशनल व्हॅलीडिटी दिली पाहिजे. आता पर्यंत ७१९ केसेसमध्ये उच्च न्यायालयाने कंडीशनल व्हॅलीडिटी दिलेली आहे. अशा केसमध्ये डॉ. बांबळे नावाचा एक डॉक्टर सर्वोच्च न्यायालयात गेला व त्याने तेथे सांगितले की, आम्हाला कंडीशनल व्हॅलीडिटी चालणार नाही. आम्ही खरे आदिवासी आहोत. बोगस आदिवासींनी आधी ॲडमिशन घेतले आहे. डॉ. बांबळे यांची केस झाल्यानंतरही .... सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे वाचून दाखवले ते खरे आहे. पुन्हा पुन्हा या कायद्याचा भंग केला जात आहे. ( अडथळा ) मला पूर्ण उत्तर द्यावे लागेल.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी जरी वाचले असेल तरी आपण उत्तराचा शेवट करावा, उत्तरातील मुख्य गाभा काय आहे, ते आपण सांगावे.

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, त्यांनी शेवटचा प्रश्न विचारला आहे की, कंडीशनल व्हॅलीडिटी थांबवणार काय ? या बाबत मी सांगू इच्छितो की, या करिता एखादी कमिटी, आयोग नेमावा लागेल. जी प्रकरणे प्रलंबित आहेत ती निकाली काढण्यात येतील.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने जो शासन निर्णय निर्गमित केला होता तो रद्द केला. नॉन ट्रायबलला प्रोटेक्शन देणे रद्द झालेले आहे. या राज्यामध्ये किती बोगस आदिवासींची भरती झालेली आहे, त्यांच्यावर आपण काय कारवाई केली, त्या लोकांना काढून किती आदिवासींची भरती झालेली आहे, याचा खुलासा करावा.

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, दि. ६ जुलै, २०१७ रोजीच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर राज्य सरकारकडे साडेबारा हजार हा आकडा आहे. प्रत्यक्ष आकडेवारी किती आहे, हे आम्हाला समजायला मार्ग नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ६ जुलै, २०१७ रोजीच्या निकालानंतर सर्व विभाग अभ्यास करीत आहेत. ही आकडेवारी आमच्याकडे आल्यानंतर याचे उत्तर निश्चितपणे दिले जाईल.

प्रा.डॉ.अशोक उईके : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक १० वर अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. हे सर्व मुद्दे पॉलिसी डिसिजन संदर्भातील आहेत. महाराष्ट्रासाठी, अनुसूचित जमातीसाठी, आदिवासी बांधवांच्या हितसंबंधासाठी एक समिती नेमण्यात आलेली आहे. मंत्री महोदयांना मला हे सांगावयाचे आहे की, टि.ए.सी., जनजाती सल्लागार परिषद आपल्या विभागाच्या माध्यमातून आयोजित केली जाते, बोलावली जाते. मुख्यमंत्री महोदय हे त्याचे प्रमुख असतात. त्यामध्ये सर्व आमदार महोदय, खासदार महोदय असतात. त्यात आदिवासींच्या हिताच्या बाबत धोरणात्मक निर्णय ठरविला जातो. गत अडीच वर्षांपासून टि.ए.सी. झालेली नाही. ती टि.ए.सी. आपण किती दिवसांमध्ये, किती महिन्यांमध्ये आयोजित करणार, याबाबत सांगावे.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये उत्तर दिलेले आहे. जो कायदा अस्तित्वात आलेला आहे... अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जमाती, ओबीसींच्या अनुषंगाने जातीचे प्रमाणपत्र देणे. जातीच्या प्रमाणपत्राची वैधता सिध्द करण्याबाबतचा कायदा सन २००३ मध्ये अस्तित्वात आला.... क्रमांक २३ होता.

असुधारित प्रत

प्रा.डॉ.अशोक उईके ...

अध्यक्ष महोदय, त्या कायद्याच्या अनुषंगाने आजपर्यंत जातीचे प्रमाणपत्र देणे व वैधता सिध्द करण्याच्या अनुषंगाने देणारे व घेणारे म्हणजे जातीचे प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या व घेणाऱ्या किती कर्मचाऱ्यांवर आपल्या माध्यमातून, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून कारवाई झाली?

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव)** : सन्माननीय सदस्य दोन प्रश्न पुरेसे आहेत.

प्रा.डॉ.अशोक उईके : अध्यक्ष महोदय, अतिशय महत्वाचा असा हा विषय आहे. एखाद्या संस्थेमध्ये, वैद्यकीय महाविद्यालयामध्ये, इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये जर विद्यार्थ्यांचा अवैध प्रमाणपत्र देऊन अवैधरित्या प्रवेश झाला असेल, तर त्याचे प्रमाणपत्र अवैध झाल्यानंतर ते अवैध प्रमाणपत्र रद्द झाले असल्यामुळे त्या संस्थेने जर प्रवेश दिला असेल तर, त्या संस्थेची मान्यता रद्द करणार काय, त्या संस्थेचे अनुदान रद्द करणार काय? या माझ्या ३ प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी द्यावी, अशी विनंती आहे.

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, तिसऱ्या प्रश्नाचा या लक्षवेधी सूचनेच्या विषयाशी संबंध नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, हे खरे आहे की, गेल्या सव्वादोन वर्षात ट्रायबल ॲडव्हाजरी कौन्सिल झालेली नाही. मुख्यमंत्री महोदय त्याचे चेअरमन असतात. परंतु, कोविड काळ असल्याने ती बैठक होऊ शकली नाही. अधिवेशन संपल्यानंतर मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती करेन. मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला परवानगी दिली तर, माननीय दादांच्या अध्यक्षतेखाली किंवा मुख्यमंत्री महोदय थोडा वेळ आले व त्यांनी आम्हाला वेळ दिला तर, अधिवेशनानंतर लगेच ही कमिटी बसेल. हा एक भाग झाला.

अध्यक्ष महोदय, कायद्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. हा कायदा झाल्यानंतर आपण देखील मंत्री होता. आपण देखील कोणावर कारवाई केली नाही,

ॲड.के.सी.पाडवी ...

खरे तर सीव्हीसीने कारवाई केली पाहिजे. बोगस आढळून आल्यावर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. ते फक्त मंत्रालय किंवा विभागाने करण्याची गरज नाही. कोणीही करु शकते, असा माझा अभ्यास आहे.

श्री.सुनील भुसारा : अध्यक्ष महोदय, दि. ६ सप्टेंबर, २०१७ च्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये .... (अडथळा) ...

**तालिका सभाध्यक्ष** : आता केवळ अर्धा मिनिट शिल्लक आहे.

श्री.सुनील भुसारा : अध्यक्ष महोदय, कोर्टाने आदेश देऊनसुध्दा आदिवासी विकास विभागाने ऑर्डिनन्स का काढला, हा कोर्टाचा अवमान नाही काय? माननीय सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये प्रवेश रद्दबादल ठरवले. माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, बोगस आदिवासींना प्रवेश देता येणार नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊन देखील त्यानंतर सन २०१७ मध्ये आदिवासी विकास विभागाने ऑर्डिनन्स का काढला, हा कोर्टाचा अवमान नाही काय? अशा प्रकारच्या आपल्या ज्या समित्या आहेत त्यामध्ये औरंगाबादमध्ये नांदेड मधील किनवट येथे समिती आहे आणि नंदूरबार येथे समिती आहे. या समित्यांमध्ये बऱ्याच प्रमाणात हे दाखले दिले गेलेले आहेत. या समित्या अजून बळकट करण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे काय?

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, श्री.दिलीप विठ्ठल बांबळे यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये सन २०१७ याचिका दाखल केली होती. त्यावर दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी "सशर्त जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये", असा निकाल देण्यात आला आहे. विभागाने यासंदर्भात सन २०१८ मध्ये अध्यादेश काढला होता, तो चुकीचा होता. हे माझे स्पष्ट मत आहे. तो अवमान करणारा होता. तो अध्यादेश सन २०१७-१८ मधील होता व तो केवळ ६ महिने वैध राहू शकतो. या प्रकरणाची दखल विभागाने का घेतली नाही, असा मला प्रश्न पडला. या प्रकरणी कोणी चूक केली हे तपासून निश्चितपणे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. नंदूरबार, किनवट येथील समित्या सक्षम कराव्या लागतील, ही बाब खरी आहे. आतापर्यंत ७१९ सशर्त वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहेत. एका विद्यार्थ्याच्या कुटुंबामध्ये ७ ते १० जणांकडे वैधता प्रमाणपत्र असतात. त्यामुळे त्यांचे म्हणणे असते की, आम्हाला अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शिक्षण घेत असताना का अडवण्यात येते ? सदरहू सर्व प्रकरणे निकाली काढण्यासाठी एखादी समिती आयोगाप्रमाणे नियुक्त करावी लागेल. त्यानंतर सदरहू प्रकरणे एका वर्षात निकाली निघाल्यानंतर हा प्रश्न निकाली निघेल, असे मी स्पष्ट सांगतो.

डॉ.विजय कुमार गावीत : अध्यक्ष महोदय, विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सशर्त प्रवेश देण्यात आले आहेत. माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सदरहू निर्णय हा धोरणात्मक आहे. मागील काळात अनुभव आला आहे की, सरकारने सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागासवर्ग यांचेकरिता जात वैधता प्रमाणपत्राबाबत एकच धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. वैधता प्रमाणपत्र सुरुवातीस सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येत होते. त्यांना बंधनकारक केले होते त्यावेळी माननीय न्यायालयाने सांगितले की, एका विभागाकडून सशर्त वैधता प्रमाणपत्र देण्यात येते व दुसऱ्या विभागाकडून देण्यात येत नाही, यासंदर्भात सरकारचे एक धोरण असले पाहिजे. याकरिता सर्व विभागांनी सशर्त वैधता प्रमाणपत्र द्यावेत, असे आदेश माननीय न्यायालयाने दिले होते. त्यानुसार

डॉ.विजय कुमार गावीत...

कार्यवाही करण्यात येत होती. या प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. बोगस जात प्रमाणपत्र घेऊन काही लोक नोकरी मिळवतात, प्रशिक्षण मिळवतात. याकरिता सदरहू प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल काय ?

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना सशर्त वैधता प्रमाणपत्राच्या संदर्भातील आहे. हे सर्व थांबविण्याच्या दृष्टीकोनातून एक समिती गठीत करावी लागेल. उक्त समितीच्या माध्यमातून एखाद्या वर्षात सर्व प्रकरणे निकाली काढण्यात येतील. याप्रकरणी आपली काही मागणी असेल तर Tribal Advisory Council ची बैठक घेण्यात येईल. त्यावेळी आपण आपले प्रश्न उपस्थित करावेत. त्यासंबंधी धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल तर ते धोरण ठरविण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव) :** मंत्री महोदय बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याने तेथे सर्व प्रश्न निकाली निघू शकतात.

डॉ.किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, सन २००१ मधील कायदा क्रमांक २३ मध्ये आदिवासी विकास विभाग बदल करणार काय ? नामसादृश्य आणि बोगस आदिवासींच्या बाबतीतील श्वेतपत्रिका सरकार किती कालावधीत सन्माननीय सदस्य व जनतेसमोर ठेवणार आहे ?

यानंतर श्री.तेलंग.....

ॲड.के.सी.पाडवी : सन २००१ च्या कायद्यामध्ये आवश्यक बदल करणार आहात काय, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, उक्त प्रकरणी एक समिती घटित करण्यात आलेली आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ कौन्सिल यांच्यामार्फत उक्त विषयांचा सखोल अभ्यास करुन पुढील अधिवेशनामध्ये सुधारणा विधेयक मांडण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष :** उक्त प्रकरणी मंत्री महोदयांनी समिती घटित करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे यासंदर्भात काही प्रश्न असतील तर संबंधित सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांना लेखी सूचना द्याव्यात, अशी मती सूचना करतो.

श्री. जयकुमार (भाऊ) रावल : अध्यक्ष महोदय, हा अत्यंत जटील असा विषय आहे. रिझर्व्ह कॅटेगिरीतील लोकांच्या आयुष्याशी निगडीत असा प्रश्न आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या सरकारला माझा असा प्रश्न आहे की, अनुसूचित जातीचा दाखला जन्म दाखल्यासोबत देणार आहात काय तसेच त्यांना स्मार्टकार्ड देण्याची योजना सुरु करणार आहात काय?

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, अनुसूचित जमातील विद्यार्थी इयत्ता आठवीमध्ये गेल्यानंतर त्या विद्यार्थ्यांना अनुसूचित जमातीचे सर्टिफिकेट देण्यात येणार आहे. खरे पाहता इयत्ता पहिलीपासून अशा प्रकारचे सर्टिफिकेट देण्याचा शासन विचार करीत आहे. अनुसूचित जमातीमधील सर्वच विद्यार्थ्यांजवळ अनुसूचित जातीचे सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. त्यामुळे शासन त्या अनुषंगाने कार्यवाही करेल.

श्री.दौलराव दरोडा : अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षांपासून जनजाती सल्लागार समितीची बैठक घेण्यात आलेली नाही. त्यामुळे आता जनजाती सल्लागार समितीची बैठक केव्हा आयोजित करण्यात येणार आहे तसेच बोगस सर्टिफिकेट तयार करुन नोकरीमध्ये भरती झालेल्या साडेबारा हजार उमेदवारांवर ॲट्रॉसिटी ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करणार आहात काय?

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षांपासून कोरोनाचे संकट असल्यामुळे जनजाती सल्लागार समितीची बैठक होऊ शकली नाही. अर्थसंकल्पीय अधिवशेन संपल्यानंतर जनजाती सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात येईल. या समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री महोदय असतात. त्यामुळे याबाबत मी त्यांना एक पत्र देखील दिलेले आहे. निश्चितपणे हे अधिवेशन संपल्यानंतर जनजाती सल्लागार समितीची बैठक घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाला मी उत्तर देऊ इच्छितो की, दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मागील सरकारने मंत्रिमंडळाची उप समिती नेमली होती. आता महाविकास आघाडी सरकारने देखील उप समिती नेमलेली आहे. या उप समितीवर मी देखील आहे. मागील सरकारने नेमलेली समिती व आता महाविकास आघाडी सरकारने नेमलेली समिती ही माननीय न्यायालयाचा अवमान करणारी समिती आहे, हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. अधिसंख्याचा प्रश्न निर्माण होत आहे. खरे पाहता बोगस सर्टिफिकेटच्या आधारे नोकरी करीत असलेल्या साडेबारा हजार लोकांना घरी पाठवून त्या ठिकाणी मूळ आदिवासी उमेदवारांना नोकरी दिली पाहिजे. ज्यांनी बोगस सर्टिफिकेट काढून नोकरी मिळवलेली आहे, अशा सर्वांना बडतर्फकरुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. त्यामुळे या बाबींचा या सदनाने विचार करुन खऱ्या आदिवासींना न्याय दिला पाहिजे, अशी माझी स्वत:ची मागणी आहे.

श्री.राजेश पवार : अध्यक्ष महोदय, आदिवासी बांधवानी जातीच्या दाखल्यासाठी अर्ज केल्यानंतर त्यांना सन १९५० मधील महसुली पुरावा मागितला जातो किंवा शालेय व्यवस्थेतील एखादा पुरावा मागितला जातो. परंतु आदिवासी बांधवांकडे सन १९५० मधील पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अर्ज दाखल करुन देखील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. जातीचे दाखले नसल्यामुळे आदिवासी समाज शाळांचे प्रवेश, शासकीय योजनांपासून वंचित राहत आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री. राजेश पवार...

आदिवासी समाजाच्या लोकांनी जातीचा दाखला मिळण्याकरिता अर्ज केला तर तो दाखला वेळेत मिळण्यासाठी कालावधी निश्चित करण्यात येणार काय ? दुसरे असे की, आदिवासी व्यक्ती जात प्रमाणपत्र काढल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्राकरिता तो अर्ज करतो. तेव्हा जात वैधता प्रकरणे अनेक महिने प्रलंबित ठेवली जातात. अशी प्रमाणपत्रे विहित कालावधीत मिळण्यासाठी कालावधी ठरवून दिला जाणार काय ?

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, पहिल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, याकरिता स्टेट पॉलिसी आहे. त्या पॉलिसीमध्ये बदल करावयाचा असेल तर त्याबाबत राज्य सरकारला विचार करावा लागेल. राज्य सरकार याबाबत पॉलिसी ठरवेल. दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, यात निश्चित कालावधी ठेवता येणार नाही. मागील सरकारने आणि याही सरकारने निर्णय घेतला की, सीव्हीसी कमिट्यांची संख्या वाढवावी लागेल. त्या समितीमधील मनुष्यबळ वाढवून ही प्रकरणे निकाली काढली पाहिजेत.

श्री. दिलीप बोरसे : अध्यक्ष महोदय, जात पडताळणी समितीने बोगस आदिवासी दाखला घेऊन विविध प्रकारच्या योजनांचा फायदा घेतला असेल, अनुदान घेतले असेल तर माननीय सर्वोच्च न्यायालय आणि माननीय उच्च न्यायालयाने स्पष्ट सांगितले की, आदिवासी नाहीत म्हणून त्यांच्यावर आजपर्यंत कोणतीही पोलीस तक्रार दाखल केली नाही. येणाऱ्या काळात किती दिवसांमध्ये त्यांच्यावर पोलीस केसेस दाखल केल्या जाणार आहेत ?

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न यापूर्वीही अनेकदा उपस्थित केला आहे. आपण नवीन प्रश्न विचारावा.

श्री. दिलीप बोरसे : अध्यक्ष महोदय, ज्यांनी राजकारणाचे फायदे घेतले असतील, आदिवासी लोकांच्या जमिनी बळकावल्या असतील त्या जमिनी जमा करण्याचे आदेश मंत्री महोदय देणार आहेत काय ? ज्यांच्या विरुद्ध सन २०१४ पासून

असुधारित प्रत

श्री. दिलीप बोरसे ....

माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत की, त्या लोकांची जात पडताळणी करुन द्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या स्कोपमध्ये येत नाही.

श्री. दिलीप बोरसे : अध्यक्ष महोदय, परंतु आजपर्यंत जात पडताळणी समितीने तो आदेश दिलेला नाही. याबबातचे निदेश मंत्री महोदय जात पडताळणी समितीला देणार आहेत काय ?

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रश्नाचे उत्तर यापूर्वीच देण्यात आले आहे.

श्री. राजेश पवार : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात महादेव कोळी आणि मुनेवार कोळी समाज आहे. माननीय न्यायालयाने आदेश देऊनही औरंगाबाद येथील श्री. दिनकर पावरा नावाचे अधिकारी जात वैधता प्रमाणपत्र देत नाहीत. त्यामुळे मुनेवार कोळी समाज आणि महादेव कोळी समाजातील तरुणांचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे. याबाबतची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष समिती गठीत करण्यात येणार आहे काय ? तसेच श्री. दिनकर पावरा यांनी अर्वाच्च्य भाषेत बोलणे, वैधता प्रमाणपत्र न देणे याबाबत चौकशी करण्यात येणार काय ?

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नात केस नंबर सांगितलेला नाही. तसेच ही व्यक्तीगत केस आहे काय ? याबाबत उल्लेख केला नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** लक्षवेधी सूचना संपली आहे. आता माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव मांडण्यात येईल.

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष ....**

(...अडथळा...) मी सन्माननीय सदस्य श्री. हिरामण खोसकर यांना सांगू इच्छितो की, त्यांची लक्षवेधी सूचना लॅप्स झालेली नाही. (...अडथळा...) लक्षवेधी सूचना क्रमांक ८, लक्षवेधी सूचना क्रमांक ११ आणि लक्षवेधी सचूना क्रमांक १२ या तीनही लक्षवेधी सूचना उद्या विशेष बैठकीमध्ये घेण्याबाबत माननीय उपाध्यक्षांनी यापूर्वी घोषित केले आहे. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, त्यांची ही लक्षवेधी सूचना रद्द झालेली नाही.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

**पृ.शी.:** नियम स्थगित ठेवणे.

**मु.शी.:** नियम स्थगित ठेवण्याबाबत उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा प्रस्ताव.

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २४६ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**मु.शी.:** सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**तालिका सभाध्यक्ष :** आता सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात होईल. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी आजचा पहिला दिवस आहे. या चर्चेसाठी एकूण तीन तास वेळ देण्यात येईल, या तीन तासांपैकी सत्तारुढ पक्षास निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा करतो.

आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री.देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पाच्या सुरुवातीला माननीय अर्थ मंत्र्यांनी महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी करण्याबाबत सुतोवाच केले, याचा मला आनंद वाटतो. पाच वर्षांपूर्वी मी ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीची संकल्पना मांडली होती. महाराष्ट्र राज्याची इकॉनॉमी ही देशातील पहिली ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी होऊ शकते, असा विश्वास मी व्यक्त केला होता. यावरुन तत्कालीन विरोधक व आता सत्तारुढ पक्षामध्ये असलेल्या सन्माननीय नेते मंडळींनी माझा उपहास केला होता, खिल्ली उडविली होती व महाराष्ट्र ही ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी होऊ शकत नाही असे मत व्यक्त केले होते. परंतु आज माननीय अर्थमंत्र्यांनी तिच संकल्पना स्विकारली याचा मला आनंद आहे. खरे तर, आम्ही मांडलेल्या सर्वच गोष्टी आता स्विकारल्या जात आहेत. अर्थात, सुरुवातीला या सर्व गोष्टी नाकारल्या जात होत्या.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचे खरे सामर्थ्य ओळखून अर्थव्यवस्थेमध्ये योग्य प्रकारे गुंतवणूक केली तर इतर कुठल्याही राज्यापेक्षा आपले राज्य किमान दहा वर्षे पुढे जाऊ शकते ही ताकद व शक्ती आपल्या राज्याची आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाचे आकारमान ५ लाख ४८ हजार कोटी रुपये एवढे आहे. यामध्ये महसुली जमा ४ लाख ३ हजार कोटी रुपये, महसुली खर्च ४ लाख २७ हजार कोटी रुपये व महसुली तूट २४ हजार ३५२ कोटी रुपये दर्शविण्यात आली आहे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून मी पाहत आहे की, सुरुवातीच्या काळात महसुली तूट कमी दाखविली जाते परंतु पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात मागण्या आणल्याने ही तूट मोठया प्रमाणात वाढते. सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार १० हजार २२५ कोटी रुपये एवढी महसुली तूट दाखविण्यात आली होती. सुधारित अंदाजामध्ये ती ३० हजार ७२४ कोटी रुपये एवढी झाली आहे. म्हणजे महसुली तुटीमध्ये तीन पटींनी वाढ झाली आहे. अर्थात, ही आकडेवारी देखील अपेक्षित आहे. दिनांक ३१ मार्च रोजी अंतिम आकडेवारीत ही तूट ४० हजार कोटी रुपयांच्या घरात गेलेली आपल्याला पाहायला मिळेल.

अध्यक्ष महोदय, येत्या वर्षभरासाठी दर्शविण्यात आलेली महसुली तुटीची आकडेवारी देखील फसवी आहे. सरकारचे दायित्व लक्षात घेऊन राजकोषीय तूट मोजली जाते.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. देवेंद्र फडणवीस...

परंतु २०२१-२२ या वर्षाचा राजकोषीय तुटीचा अर्थसंकल्पीय अंदाज ६६६४१ कोटी इतका होता. पण प्रत्यक्षात सुधारित अंदाज किती आहे ८९ हजार कोटी रुपयांचा. म्हणजे २२४४० कोटींनी ही वाढ अंदाजापेक्षा जास्त झालेली आपल्याला पहायला मिळाली आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये पुरवणी मागण्यांचा जो कारभार चालू आहे तो अतिशय मनमानी अशा प्रकारचा आहे. सन २०२१-२२ मध्ये राज्याचा अर्थसंकल्प ४ लाख ८४ हजार कोटी रुपयांचा आहे आणि वर्षभरात पुरवणी मागण्या किती रकमेच्या आल्या तर त्या ६० हजार कोटी रुपयांच्या आहेत. त्यामुळे एकूण मागण्यांची रक्कम ५,४४,७८९ कोटी इतकी झाली. खर्चाचा सुधारित अंदाज ४ लाख ९६ हजार कोटी रुपये झाला. म्हणजे एकूण मागण्यांपेक्षा सुधारित अंदाज हा ४८ कोटींनी कमी आहे. याचा अर्थ असा आहे की, आपण बजेट बनवितो दाखविण्याकरिता आणि खर्च करतो मनमानीपणे. बजेटचा आणि खर्चाचा ताळमेळच लागत नाही. ज्यावेळी जो खर्च वाटला तो खर्च करतो आणि पुरवणी मागण्यांमध्ये तो घेतो. त्याला आपण मान्यता देतो. मूळ खर्च मात्र आपण करतच नाही. म्हणजे "खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे" अशा प्रकारची अवस्था या अर्थसंकल्पाची झालेली आपल्याला पहायला मिळते. त्यामुळे या २०२२-२३ वर्षाच्या अर्थसंकल्पातून ज्या घोषणा झाल्या आहेत त्यातील किती घोषणांवर विश्वास ठेवायचा, असा प्रश्न आपल्यासमोर उपस्थित होतो.

अध्यक्ष महोदय, आपल्या कर्जाचे प्रमाणही वाढत आहे. पण मी नेहमी सांगतो की, कर्जाचे प्रमाण वाढले तरी चिंता करण्याचे कारण नाही. वाढत्या अर्थव्यवस्थेमध्ये कर्ज हे वाढतच असते. कर्जाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी किती प्रमाण आहे याच्या आधारावर आपण त्याचे मुल्यमापन करतो. मात्र कर्ज वाढत असताना त्या कर्जातून विकासात्मक खर्च किती होतो याच्या आधारावर त्या कर्जाचे मुल्यमापन केले पाहिजे. म्हणून मी नेहमी सांगतो की, कर्ज घेणे चूक नाही. पण ते खर्च कुठे केले जाते ते आपण पाहिले पाहिजे. आता आपले कर्ज वाढले आहे. सन

श्री. देवेंद्र फडणवीस...

२०१९-२० या वर्षात राज्यावर ४ लाख ५१ हजार कोटींचे कर्ज होते ते आता ६ लाख ५० हजार म्हणजे जवळपास २ लाख कोटींने वाढले आहे. ते राज्य स्थूल उत्पन्नाच्या १६.५० टक्के इतके होते. नंतर ते १९ टक्के इतके झाले. आता आपण १८.१४ टक्के इतके असल्याचे म्हणत आहोत. म्हणजे जवळपास ते १९ टक्के झालेले आहे. ते कर्ज वाढले यापेक्षा मला चिंता या गोष्टीची आहे की, आपल्या भांडवली खर्चामध्ये जास्तीत जास्त विकास खर्चाचे प्रमाण ४९ टक्के होते. आता ते कमी होत होत २०२०-२१ मध्ये ३५ टक्के आले आहे. म्हणजे ४९ टक्क्यांवरुन ३५ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. आपण भांडवली खर्च करतो तो कर्ज काढून करतो. आपले भांडवली उत्पन्न म्हणजे कर्ज आहे. आपले राज्य महसूली तुटीचे आहे. त्यामुळे कर्ज घेऊनच आपण भांडवली खर्च करतो. कर्जातून आपण जो खर्च करतो त्यातील विकास खर्चाचे प्रमाण हे ३५ टक्क्यांपर्यंत खाली येत असेल ती अत्यंत चिंतेची बाब आहे. म्हणून याकडे लक्ष दिले गेले पाहिजे. एकूण खर्चामध्ये देखील विकास खर्चाचे प्रमाण ६३ टक्क्यावरून ५९ टक्क्यापर्यंत खाली आले आहे. उत्तरातून कोविडचे कारण सांगितले जाईल. पण त्याचे कारण कोविड नाही. ते मी माझ्या भाषणातून सांगणार आहे. कोविड हे फार छोटे कारण आहे. यामध्ये वित्तीय अव्यवस्था कशी आहे हे देखील आपल्याला त्यातून पहायला मिळेल.

अध्यक्ष महोदय, महसुली जमेच्या तुलनेत वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज या विकासेतर बाबींवर होणारा खर्च पहा. भांडवली खर्चाची माहिती तर मी आता दिली आहे. महसुली खर्चामध्ये सन २०१९-२० या वर्षात हे प्रमाण ६० टक्के होते.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. देवेंद्र फडणवीस....

सन २०२०-२१ मध्ये ते प्रमाण ६५.९७ म्हणजे ६६ टक्के पर्यंत पोहोचले आहे. याचाच अर्थ हे प्रमाण ६ टक्के वाढलेले आपल्याला पाहायला मिळते. याचा परिणाम असा आहे की, आपण बजेटमध्ये दाखवत आहात पण विभागांना खर्चासाठी निधीच उपलब्ध होत नाही. आर्थिक वर्ष संपले तरी अनेक विभागांनी अर्थसंकल्पाच्या तुलनेत ५० टक्के सुद्धा खर्च केलेला नाही. कारण मुळात त्या विभागांकडे खर्चासाठी निधीच उपलब्ध नाही. आता नवीन पद्धत अशी आहे की, कागदोपत्री कट लावायचा नाही, पण त्यांना पैसेच द्यायचे नाहीत. त्यामुळे फेब्रुवारी, २०२२ पर्यंत अर्थसंकल्पित तरतुदीच्या तुलनेत केवळ ५२ टक्के एवढाच निधी खर्च झालेला आहे. विभागांना जी रक्कम मिळाली त्यामध्ये ९३टक्के रक्कम दाखवली तरी आपल्या बिम्स प्रणालीमध्ये बघितले तर अर्थसंकल्पित तरतुदीच्या तुलनेत खर्चाचे प्रमाण केवळ ४९टक्के आहे. बिम्स प्रणालीमुळे हे सर्व आता आपल्याला ऑनलाईन मिळत आहे. त्यामुळे आपण जे मांडतो ते बजेट आणि जे दिसत आहे ते बजेट पूर्णपणे वेगळे आहे. या व्यतिरिक्त दिनांक ३१ मार्च रोजी होणाऱ्या खर्चाच्या बाबतीत बोलायचे झाले तर गेल्या काही वर्षामध्ये आपण असा प्रयत्न केला होता की, दिनांक ३१ मार्च रोजी जे सर्व बर्डन येते ते येऊ नये. परंतु ते आता पुन्हा येत आहे. आपण वर्षभरात निधी उपलब्ध करुन दिले नाहीत. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात एकूण झालेल्या खर्चापैकी २०.६४ टक्के खर्च हा मार्च महिन्यातील आणि त्यातील १९.३३ टक्के म्हणजे जवळपास २० टक्के खर्च हा एकाच दिवशी म्हणजे दिनांक ३१ मार्च रोजी केला आहे. याचा अर्थ एकूण बजेटच्या एक पंचमाश खर्च हा एकाच दिवसाचा आहे. ही आर्थिक शिस्त आहे काय, हा पैसा कुठे जातो ? दिनांक ३१ मार्च या दिवशी आपण राज्याचा २० टक्के पैसे खर्च करणार असू तर तो खर्च होत नाही. अनेक विभाग तो पैसा घेतात आणि आपल्याकडून तो रिलिज दिसतो त्यानंतर त्याचा कसा, कुठे वापर होता आणि देयके कशी काढली जातात याची काहीही शिस्त राहत नाही. त्यामुळे या संदर्भात कुठेतरी लक्ष घातले पाहिजे. सन २०२०-२१ मध्ये शेवटच्या दिवशी १९.३३ टक्केचा खर्च एका दिवसात दिसतो तो कोणत्याही आर्थिक शिस्तीमध्ये दिसत नाही. त्यामुळे मला असे वाटते की, विकासेत्तर खर्चाला कात्री

श्री. देवेंद्र फडणवीस....

लावून विकास खर्च वाढवता येईल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आपण सांगितले की, सन २०२०-२१ च्या तुलनेत सन २०२१-२२ मध्ये वास्तविक स्थूल उत्पन्नात १२.०१ टक्के वाढ आपण अंदाजित केली आहे. आपण १२.०१ टक्के म्हणत आहात ते ठीक आहे परंतु ते खरे नाही. याचे कारण असे आहे की, आपण जर बघितले तर सन२०१९-२० मध्ये राज्याचे वास्तविक स्थूल उत्पन्न हे २० लाख ४३ हजार कोटी रुपये होते. सन २०२०-२१ मध्ये ते उत्पन्न कमी असून १८.८९ लाख कोटी रुपये झाले म्हणजे -८.०३ टक्के ही आपली निगेटीव्ह ग्रोथ होती. सन २०२१-२२ मध्ये त्या निगेटीव्ह ग्रोथवर आपण २१ लाख १८ हजार कोटी रुपयांवर आलो आहोत. कोविडचे वर्ष सोडून सन २०१९-२० च्या आकडेवारीशी तुलना केली तर आपली वाढ केवळ ३.५ टक्के आहे, ती १२ टक्के नाही. फक्त ३.५ टक्क्यांची जीडीपीमध्ये वाढ दिसत आहे. हे सर्व ठीक आहे, यासाठी कोविडचा कालावधी होता असे आपण समजू. परंतु आपण जे १२ टक्के सांगितले आहे ते योग्य नाही. त्यामुळेच जर ही खरी वाढ असती तर साधारणपणे जीडीपी वाढल्यानंतर त्या प्रमाणात आपले महसुली उत्पन्न सुद्धा वाढले पाहिजे. असे होताना दिसत नाही. जीडीपी एवढया मोठया प्रमाणात वाढल्यानंतर आपण बघा की, सन २०२१-२२ मध्ये महसुली जमा अर्थसंकल्पिय अंदाज ३ लाख ६८ हजार कोटी रुपये, सुधारित अंदाज ३ लाख ६२ हजार कोटी रुपये म्हणजे ६ हजार कोटी रुपयांची घट आहे. जीडीपी जर एक्सपान झाला असता तर ही ६ हजार कोटी रुपयांची घट आली नसती. कारण आपला जीडीपीचा महसुलाशी असणारा रेशो किती skewed झाला तरी देखील निगेटीव्ह ग्रोथमध्ये जाऊ शकत नाही. हा निगेटीव्ह ग्रोथमध्ये गेला आहे याचाच अर्थ १२ टक्क्यांची ग्रोथ आपण सांगत आहात ती फक्त कागदोपत्री आहे. कारण आपले एक वर्ष निगेटीव्ह ग्रोथचे आहे. तर त्या निगेटीव्ह ग्रोथवरची ही पॉझिटीव्ह ग्रोथ आहे. आता जर आपण बघितला तर आपल्या लक्षात येईल की, जास्तीत जास्त योजना या केंद्र शासनाच्या सांगितल्या आहेत. ते चांगलेच आहे त्याचे आम्हाला काही वाईट वाटत नाही. पण रोज आपण केंद्र शासनाला नावे ठेवतो. आर्थिक पाहणी अहवाल किंवा माननीय अर्थमंत्र्यांचे भाषण असले तरी देखील सर्व जागी राज्य शासनाची

श्री. देवेंद्र फडणवीस....

कामगिरी दाखविताना केंद्रीय योजनांचाच आधार घेतला आहे. मी काही केंद्र आणि राज्य वेगळे आहे असे मानत नाही. शेवटी राज्याचा किंवा केंद्राचा पैसा नाही तर भारताचा पैसा आहे, याचा काही प्रश्न नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस ....

जाणीवपूर्वक जेव्हा केंद्र शासनावर टीका होते. त्यावेळी हे देखील सांगितले पाहिजे. की, आपण त्यांच्या योजनांचे क्रेडीट घेत आहोत. अशा वेळी जे चांगले आहे ते आपण का सांगत नाही ? पंतप्रधान कृषी सिंचन योजना, पंतप्रधान ग्रामीण आवास योजना, पंतप्रधान नागरी आवास योजना, पंतप्रधान ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, प्रधानमंत्री मातृ वंदना अभियान अशी योजनांची मोठी यादी आहे. या सर्व योजनांचा आज राज्य शासन श्रेय घेत आहे. या बाबत चांगली कामगिरी असे आपल्या बजेटच्या भाषणात सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री यांनी विकासाची पंचसुत्री आपल्याला दाखवली आहे. मला या बाबत आश्चर्य वाटते. विकासाच्या पंचसुत्रीमध्ये मनुष्यबळ विकास या अंतर्गत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा उल्लेखही नाही. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशिवाय आपण मनुष्यबळ विकास करु शकणार आहात काय ? मनुष्यबळाच्या विकासाचे साधन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे. मात्र त्याचा उल्लेख दिसून येत नाही. विकासाची पंचसुत्री म्हणजे नवीन योजनांचे केवळ रिपॅकेजींग आहे. माननीय वित्त मंत्री यांच्या भाषणात विकासाची पंचसुत्री, कृषी आरोग्य मनुष्यबळ विकास, दळणवळण, उद्योग, या क्षेत्रातील अनेक घोषणा जुन्याच आहे. या पूर्वी या घोषणा केलेल्या आहेत. दोन –दोन अर्थसंकल्पात केलेल्या घोषणा पुन्हा या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. मला आपली थीम आवडली. कधीही अर्थसंकल्प हा कोणत्या तरी थीमच्या आधारावर असला पाहिजे. आपली थीम चांगली आहे, क्षेत्रही चांगले निवडले आहे. मात्र त्याच वेळी घोषणाही नवीन असणे आवश्यक होते. अर्थसंकल्प हा एका वर्षाचा असला तरी देखील त्याचा परिणाम पुढील अनेक वर्षांवर होत असतो. यामुळे आपण राज्याला नवीन कोणती दिशा देत आहे, हे या माधून दिसले पाहिजे. कोव्हिड नंतरचा हा पहिला अर्थसंकल्प आहे. यामध्ये पुढील ३-४ वर्षाची दिशा ठरणार आहे. मात्र त्यासाठी कोणत्याच नवीन योजना शासनाने तयार केल्याचे दिसून येत नाही.

श्री. देवेंद्र फडणवीस ....

अध्यक्ष महोदय, नियमित पीक कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन, डॉ.पंजाबरराव देशमुख व्याज सवलत योजना, मुख्यमंत्री पंतप्रधान शाश्वत सिंचन योजना, कृषी उत्पन्न बाजार समितीचे बळकटीकरण, कृषी निर्यात धोरण, विविध सिंचन प्रकल्प, बळीराजा संजीवनी योजना, कृषी पंपांना वीज जोडणी, सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम,फळबाग योजना या सर्व चालू योजना आहेत. या मधील काही योजना आमच्या काळातील आहेत तर काही योजना या पूर्वीच्या आहेत. हे या ठिकाणी सांगितले पाहिजे, हे सांगण्यास आमची काही हरकत नाही.

अध्यक्ष महोदय, कृषी विभागाचे लक्ष्य काय आहे, आपण नवीन काय करणार आहोत ? चालू योजनांच्या व्यतिरिक्त नवीन काही आहे, असे या अर्थसंकल्पात दिसून येत नाही. चालू योजना म्हणजे... येथे शब्द थोडा चुकीचा आहे. या सरकारला मद्यामध्ये जास्त रस असल्यामुळे मी सांगू इच्छितो की , जुन्या बाटलीत नवीन दारु किंवा नवीन बाटलीत जुनी दारु, असे काही तरी या योजनांचे होत असल्याचे दिसत आहे. बाटलीचे केवळ लेबल बदलले आहे. असे म्हटले तर ते जास्त सोपे होईल. (अडथळा )

अध्यक्ष महोदय, आता सांगितले की, आम्ही योजना आणली. यामुळे कर्ज घेणाऱ्यांमध्ये वाढ झाली. ही केवळ एकूण संख्येची वाढ नाही. प्राथमिक क्षेत्रामध्ये शेतकरी व शेती पूरक कर्ज या दोन गोष्टींची आपण फोड करतो तेव्हा असे लक्षात येते की, बँका आपल्याला कसे मूर्ख बनवत आहेत. शेतकऱ्यांच्या नावावर उद्योगाला दिलेले कर्जही प्राथमिक क्षेत्रामध्ये दाखवले जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अतिशय यशस्वी अशा प्रकारची कर्ज माफीची योजना शासनाने जाहीर केली. सन २०२० च्या तुलनेत सन २०२१ मध्ये सावकाराकडून कर्ज घेणाऱ्यांच्या संख्येत २६.५ टक्क्यांची वाढ झाली. ही अवस्था का आली ? जर शेतकऱ्यांची कर्ज माफी झाली होती. तरी देखील सावकाराकडून घेतलेल्या कर्जाच्या रकमेत ४२ टक्के वाढ झाली आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.देवेंद्र फडणवीस ...

आपण ही कर्जाची सिस्टीम याकरिता उभी केली की, साधारणपणे कोणालाही सावकारी कर्ज घ्यायला लागू नये. परंतु, येथे उलट होत आहे. सावकारी कर्जामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे मी परवा देखील आपल्याला हे बोललो की, कर्जमाफीनंतर त्या खात्यांवर बँका कर्ज देत नाहीत. त्याकडे आपल्याला लक्ष घालावे लागेल. अन्यथा पुन्हा एकदा आपण सावकाराच्या तोंडी सर्वांना देऊ.

अध्यक्ष महोदय, आपण विचार केला तर कर्जाचा जो काही आराखडा तयार केला होता, त्या आराखड्याच्या तुलनेत आपण केवळ ६० टक्के वितरण करु शकलो आहोत. यामध्ये आपल्याला ४० टक्क्यांनी तूट पहायला मिळत आहे. आपण पहा खरे म्हणजे या सरकारमध्ये कसे आहे तर ज्याची ताकद आहे, त्याला मदत आहे. ज्याची ताकद नाही, तो राहिला आहे.

अध्यक्ष महोदय, तुम्ही पहा जिल्हा योजनेमध्ये सन २०२०-२०२१ च्या तुलनेत सन २०२२-२०२३ मध्ये कुठे वाढ झाली तर मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यांच्या योजनेत १३० टक्के वाढ आहे. माननीय श्री.आदित्य ठाकरे आहेत म्हणून असेल कदाचित. उस्मानाबाद जिल्ह्यांच्या योजनेत १५ टक्के वाढ आहे. गडचिरोलीमध्ये १७ टक्के आहे आणि मुंबई जिल्ह्यांच्या योजनेमध्ये १३० टक्क्यांची वाढ होताना दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचा अर्थसंकल्प ५ लाख, ४८ हजार, ७७७ कोटी रुपयांचा आहे. या ५ लाख, ४८ हजार, ७७७ कोटी रुपयांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खात्यांना ३ लाख, १४ हजार, ८२० कोटी रुपये मिळाले आहेत म्हणजे त्यांना ५७ टक्के मिळाले आहेत. काँग्रेसच्या खात्यांना १ लाख, ४४ हजार, १९३ कोटी रुपये म्हणजे २६ टक्के मिळाले आहेत. माननीय मंत्री ॲड.अनिल परब आपल्या शिवसेनेची काय परिस्थिती आहे ते पहा, ९० हजार १८१ कोटी रुपये म्हणजे १६ टक्के मिळाले आहेत.

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, जेथे वेतन जास्त द्यावे लागते अशी खाती राष्ट्रवादीकडे नाहीत. ती खाती काँग्रेसकडे आहेत, म्हणजे शिक्षण विभाग. ती खाती तुमच्याकडे आहेत, म्हणजे उच्च शिक्षण विभाग... (अडथळा)... तुम्हाला काळजीच नाही. ज्यांना आहे, त्यांच्यासाठी सांगत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांना मानलेच पाहिजेच. "डंके की चोट पे काम." मागच्या वेळेस हेच केले. याही वेळेच हेच. असे ठाम पाहिजे. एकदम ठाम पाहिजे. सर्व पैसा राष्ट्रवादी म्हणजे राष्ट्रवादी. ५७ टक्के. ... (अडथळा).. मग मिळेल ना. का नाही मिळणार, भाजपालाही द्यावेच लागेल... असे थोडीच आहे?

अध्यक्ष महोदय, सामाजिक योजनांची अतिशय दयनीय अंमलबजावणी होत आहे. खरे म्हणजे कोविड – १९ चे वर्ष हे सामाजिक योजनांच्या अंमलबजावणीचेच वर्ष असायला पाहिजे होते. कारण सर्वात जास्त आवश्यकता सामाजिक क्षेत्रातील योजनांची होती. परंतु, काय अवस्था आहे ते पहावे. उदाहरण द्यावयाचे झाले तर, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान व प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचा आपण विचार केला तर, सन २०१९-२०२० मध्ये प्रसुतीपूर्व सेवा मिळविलेल्या गर्भवती महिलांची संख्या ३ लाख होती. ती सन २०२०-२०२१ मध्ये फक्त ७२ हजार इतकी झाली. ज्यावेळेस त्यांना खरी मदत हवी होती, जेव्हा कोविडचे वर्ष होते तेव्हा, ३ लाखांवरुन ही संख्या ७२ हजारवर आली. या योजनेवर खर्च देखील निम्मा झाला, अर्धा खर्च झाला.

अध्यक्ष महोदय, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेंतर्गत सन २०१९-२०२० मध्ये लाभार्थी संख्या ७ लाख १९ हजार इतकी होती. सन २०२०-२०२१ मध्ये ही लाभार्थी संख्या ५ लाख ३० हजार इतकी झाली. जी संख्या वाढली पाहिजे होती, ती २ लाखांनी कमी झाली. कारण सामाजिक सुरक्षेच्या योजना देखील सरकार राबवू शकले नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, पाऊस चांगला झाला तरी कृषी उत्पादनात आपल्याला मोठ्या प्रमाणात घट पाहण्यास मिळत आहे. सन २०२१ मध्ये सरासरी पावसाच्या ११८.२ टक्के पाऊस पडला.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस...

तरी देखील तृण धान्य, कडधान्य, तेलबीया, कापूस, यांच्या उत्पादनामध्ये अनुक्रमे ११, २७, १३, ३० व ०.४ टक्के एवढी घट झाली आहे. सन २०२१-२२ च्या रब्बी हंगामामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्य व तेलबीयांच्या उत्पादनात २१ व ७ टक्के घट झाली आहे. यामागे एक कारण आहे. जलयुक्त शिवार योजना सरकारने बंद केली आहे. बोगस बियाणांचे प्रकार मोठ्या प्रमाणात पाहण्यास मिळाले आहेत. आम्ही प्रत्येक संकटाच्या काळात शिवारामध्ये जाऊन शेतकऱ्यांशी संवाद केला आहे. बोगस बियाणांच्या संदर्भात सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. Seed Control Act च्या माध्यमातून बोगस बियाणे आल्यानंतर आमच्या सत्ताकाळात आम्ही त्या कंपन्यांच्या सुनावण्या घेतल्या होत्या व त्यांना भरपाई देण्यास सांगितल होते. परंतु या सरकारने बोगस बियाणांमुळे अपेक्षित उत्पादन न आल्याने भरपाई देण्याबाबत कंपन्यांवर कारवाई केल्याचे दिसून येत नाही.

अध्यक्ष महोदय, बैलगाडा शर्यतीच्या संदर्भात या सरकारने श्रेय घेतले आहे. सन २०१४ मध्ये माननीय न्यायालयाने बैलगाडा शर्तीवर बंदी घातली होती. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ आम्ही केंद्र सरकारकडे घेऊन गेलो होतो. त्यानंतर माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांनी गॅझेट काढले व पुन्हा शर्यत सुरू झाली. त्यावर माननीय न्यायालयाने पुन्हा बंदी घातली. त्यानंतर सन २०१७ मध्ये कायदा केला आणि पुन्हा शर्यत सुरू केली. त्या कायद्याला माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्थगित केल्यानंतर running ability of bull म्हणजे बैल हा धावणारा प्राणी आहे, असा अहवाल आमच्या तत्कालीन सरकारने तयार केला.  आपण माननीय सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बघा. त्यांनी आमचा अहवाल स्वीकारला आणि त्याच्या आधारावर परवानगी दिली आहे. ही कार्यवाही तुमच्या झाली असली तरी आम्हाला थोडे श्रेय द्या, सगळे तुम्हीच घेऊन जाऊ नका. हा अहवाल आम्ही केला नसता व तो माननीय सर्वोच्च न्यायालयात सादर केला नसता तर बैलगाडा शर्यत कधीच सुरू झाली नसती.

श्री.देवेंद्र फडणवीस...

अध्यक्ष महोदय, या सरकारमध्ये कोण भाषणे लिहिते ते समजतच नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलता आले नाही, पण जे मनात आले ते आकडे सांगितले आहे. एका ठिकाणी सांगितले आहे की, माझ्या शासनाने आपत्तीत तत्परतेने प्रभावी प्रतिसाद दिला. यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून १५ हजार कोटी रुपये व राज्याच्या अर्थसंकल्पातून ५,५०० कोटी रुपये दिले. वस्तुस्थिती अशी आहे की, मदत व पुनर्वसन विभागाने दिलेल्या माहितीनुसार सन २०२० व सन २०२१ या दोन वर्षात ५,७९९ कोटी रुपये एसडीआरएफमधून व शासनाने २,१४८ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यानंतर मी विचार केला की, हा १५ हजार कोटी रुपये आकडा कोठून आला ? मग लक्षात आले की, सदरहू आकडेवारी सन २००३-२००४ पासून सन २०२०-२०२१ पर्यंतची एकूण आकडेवारी आहे. सरकारने चक्क सांगून दिले की, आमच्या सरकारने आपत्तीमध्ये पंधरा हजार कोटी रुपये दिले.

अध्यक्ष महोदय, शासनाने एकूण २,६३६ मेगा वॅट स्थापित क्षमतेचे ३४ जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित केले आणि १६० मेगावॅट क्षमतेचे लघु जल विद्युत प्रकल्प खासगीकरणातून कार्यान्वित झाले. वस्तुस्थिती अशी आहे की, जलसंपदा विभागाने आजपर्यंत २६ जल विद्युत प्रकल्प उभारून महावितरणला हस्तांतरित केले आहेत. ६ प्रकल्प जलसंपदा विभागातर्फे चालविण्यात येतात व दोन खाजगी प्रवर्तकांना चालविण्यास दिले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे २०२०-२०२१ मध्ये यातील एकही प्रकल्प कार्यान्वित केलेला नाही. हे सगळे प्रकल्प सन २०२१ पूर्वीचे आहेत. यातील एक प्रकल्प सन १९६२ मधील आहे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

आणि आपण दावा केलेला एक प्रकल्प सन १९५२ मध्ये उभारण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या अगोदरचा प्रकल्पही आमच्या सरकारने केला असे ठोकून देण्याचे व राज्यापाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये देण्याचे काम आपण केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मला तर आश्चर्य वाटत आहे की, हे सरकार कधी विधानमंडळाला गुंडाळते तर कधी आम्हाला गुंडाळते. परंतु आता जनतेला देखील गुंडाळत आहे. सन १९५२ पासून केलेली कामे आमच्या सरकारने केलेली आहेत, असे दाखविण्यात आलेले आहेत. "म्हणजे दुसऱ्यांना लेकरं झाली तर प्रोत्साहन आम्हीच दिले" असे म्हणण्यासारखे हे झाले आहे. मद्य संदर्भात शासन निर्णय तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांनाच अशा प्रकारची भाषणे लिहिण्यास देत आहात, असे मला तरी वाटत आहे.

अध्यक्ष महोदय, खाजगी जलविद्युत प्रकल्पासंदर्भात देखील असेच केलेले आहे. एकूण ४० खाजगी जलविद्युत प्रकल्पांपैकी सन २००१ मध्ये एका प्रकल्पाचे काम करण्यात होत होते. सन २०१५ ते सन २०१९ च्या काळामध्ये १८ प्रकल्पाचे काम करण्यात आले होते. सन २०२०-२०२१ मध्ये फक्त २ प्रकल्पाचे काम करण्यात आलेले आहे. असे असताना देखील या सरकारने एकूण ३९ जलविद्युत प्रकल्प केले, असे नमूद केले आहे. म्हणजे सन २००१ पासून ते सन २०२२ पर्यंत सर्व प्रकल्पांचे काम याच सरकारने केले आहे, असे यामध्ये नमूद केले आहे.

अध्यक्ष महोदय, हे सरकार मोठ-मोठ्या घोषणा करीत आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी आपण २५० कोटी रुपयांची घोषणा केली आहे. हा निर्णय अतिशय चांगला घेतला. त्यामुळे आम्ही आपले अभिनंदन करतो. धर्मवीर स्वराज्य रक्षक असे छत्रपती संभाजी महाराज आहेत. आपण त्यांचा जाज्वल्य इतिहास पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, खऱ्या अर्थाने स्वधर्माचे व स्वराज्याचे रक्षण छत्रपती संभाजी महाराजांनी केलेले आहे.

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

परंतु मागील अर्थसंकल्पामध्ये छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा यासाठी १२ कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु आपण अद्याप एकही रुपया दिलेला नाही.

(माननीय अर्थ मंत्री श्री. अजित पवार खाली बसून बोलतात.)

होय, सर्व निधीची तरतूद ३१ मार्चलाच करायची हा आपला नवीन फॉर्म्युला आहे. त्यानुसार सदर निधी मिळाला तरी आम्हाला आनंद आहे. अजून आपल्याकडे वेळ आहे. त्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत सदर निधी देण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, आता आपले सरकार छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारणार आहे. परंतु त्याचबरोबर औरंगाबादचे नाव संभाजीनगर करण्याबाबत प्रचंड आग्रही असणारे नेते आता का शांत आहेत? या प्रश्नाचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे. याबाबतचा दोन ओळीचा ठराव मंत्रिमंडळापुढे का येत नाही, याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, विकासाची पंचसूत्री सांगत असताना आपण कृषी विभागासंदर्भात काही माहिती दिली आहे. परंतु राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या मात्र मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. आत्महत्यांच्या आकडेवारीमध्ये मी जाणार नाही. हा महाराष्ट्र राज्याला लागलेला एक प्रकारे शाप आहे. या राज्यामध्ये चार-चार हजार आत्महत्या झाल्याचे आपणास दिसून येत आहेत. ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. परंतु यातील सर्वात मोठे दुर्दैव असे आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना हे शासन त्यावर कोणत्याही उपाययोजना करीत नाही. कारण अनेक वेळा आत्महत्या या आसमानी संकटामुळे होतात. परंतु आज मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सुलतानी संकटामुळे होत आहेत. स्व.सुरज जाधव सारखा एक शेतकरी व्हिडिओ तयार करुन सांगतो की, "माझे विजेचे कनेक्शन कापले गेले, त्यामुळे शेतकरी म्हणून या राज्यात राहण्यात काहीही अर्थ नाही. सरकार शेतकऱ्यांचे ऐकत नाही." आम्हाला असे वाटते की, सरकार ऐवढे तरी संवेदनशील असेल की एक सुरज जाधव गेल्यानंतर किमान त्याची लाज शरम वाटून राज्यातील

श्री.देवेंद्र फडणवीस.....

शेतकऱ्यांच्या विजेचे कनेक्शन कापणे बंद होईल. परंतु दुर्दैवाने आज देखील तसे झालेले नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, माननीय ऊर्जा मंत्री वांरवार सांगत आहेत की, वीज मंडळ मागील सरकारच्या कार्यकाळात तोट्यात गेले आहे. मी विचारु इच्छितो की, हे राज्य आपण कोणाकरिता चालवित आहोत ? शेतकऱ्यांकरिताच राज्यकारभार चालला पाहिजे. असे असताना जर शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता दोन पैसे अधिकचे द्यावे लागले तर त्याचा त्रास या सरकारला का होत आहे ? राज्यात अनेकांच्या वडिलांचे स्मारक उभारले आहेत. मी स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल बोलत नाही. ते अतिशय मोठे होते. तसेच ज्यांची ज्यांची स्मारके बांधलेली आहेत ते देखील महनीय व्यक्ती होते. परंतु त्यावेळेस राज्यात पैसे कमी असल्याची आठवण या सरकारला आली नाही. राज्य सरकारने अनेक कामाकरिता निधी उपलब्ध करुन दिला आहे. ज्या कामांचा संबंध अर्थसंकल्पामध्ये येत नाही, त्याकरिताही निधी उपलब्ध करुन दिला आहे. असे असताना शेतकऱ्यांकरिता या सरकारचे मन छोटे का आहे ? आमच्या सरकारच्या कार्यकाळात राज्य सरकारच्या वतीने १,२०० – १,२०० कोटी रुपये वीज मंडळाला दिले आहे. आम्ही वीज मंडळास सांगितले की, आपली अडचण असेल तर आम्ही निधी देऊ. परंतु शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापू नये.

अध्यक्ष महोदय, माननीय ऊर्जा मंत्री वारंवार सांगतात की, मागील सरकारच्या कार्यकाळात वीज मंडळ तोट्यात गेले. मी सांगू इच्छितो की, वीज मंडळामध्ये मोठी उलाढाल असते. तेथे मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले जाते. त्यामुळे यातील आकडेवारी मोठी दिसते. मी आमच्या सरकारच्या कार्यकाळातील वीज मंडळाची बॅलेन्स शीट सोबत आणली आहे. ही बॅलेन्स शीट राज्य सरकारने प्रसिद्ध केली आहे. एमएसईडीसीएल कंपनीचा सन २०१७-१८ मध्ये Profit after tax ४४२ कोटी रुपये आहे. सन २०१८-१९ मध्ये Profit after tax ८४६ कोटी रुपये आहे. सन २०१९-२० मध्ये Profit after tax २,००८ कोटी रुपये आहे. दुसरी कंपनी एमएसपीजीसीएल आहे. या कंपनीचा Profit after tax मी वाचून दाखवितो. सन २०१७-१८ मध्ये Profit after tax ७,०० कोटी रुपये आहे. सन २०१८-१९ मध्ये Profit after tax ३३४ कोटी रुपये, २०१९-२० मध्ये १२६ कोटी रुपये आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस.....

त्यानंतर ट्रान्सको कंपनीची before tax ची आकडेवारी माझ्याकडे आहे. सन २०१७-१८ मध्ये ८१५ कोटी रुपये, २०१८-१९ मध्ये ७४५ कोटी रुपये, सन २०१९-२० मध्ये ४९३ कोटी रुपये आहे. ही बॅलेन्स शीट ऑडिटरकडून तयार केली जाते. ती राज्य सरकार किंवा मंत्री महोदयांकडून तयार केली जात नाही. देशातील कोणतेही वीज पारेषण किंवा वीज वितरण कंपनी चांगल्या स्थितीत नाही. याचे कारण असे की, सर्वांना सामाजिक दायित्व आहे. परंतु मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, देशात आर्थिक स्थितीत चांगले असणारे वीज वितरण, पारेषण, महामंडळ हे महाराष्ट्र राज्यातील आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार हे निधी वाटप करीत असताना राष्ट्रवादी पक्षाकरिता राखीव ठेवतात. त्यांनी घोषणा केली की, शेतकऱ्यांनी मे महिन्यापर्यंत ५०० ते ७०० रुपये भरले तरी त्यांचे वीज कनेक्शन कापले जाणार नाही. त्या घोषणेचे काय झाले ?

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारच्या या पंचसुत्रीमध्ये पाणी दिसत आहे, पीक दिसत आहे. परंतु वीज दिसत नाही. असे असताना ही कसली पंचसुत्री आहे ? शेतकरी पंचतत्वात विलीन होत आहे. त्यांच्यावर पंचतत्त्वात विलीन होण्याची वेळ आली आहे. गावोगावी हा आक्रोश वाढत आहे. राज्यकर्त्यांनी संवेदनशील असले पाहिजे. माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या विभागासाठी १५ हजार कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्यातील एक हजार कोटी रुपये उशिरा दिले तरी चालतील. त्यांच्या विभागाचा निधी एका दिवसामध्ये खर्च होत नाही. त्या १५ हजार कोटी रुपयांपैकी १ हजार कोटी रुपये महावितरण कंपनीला द्यावे आणि सांगावे की, एकाही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापू नये.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.देवेंद्र फडणवीस.....

आज राज्यात मोठया प्रमाणात विजेचे कनेक्शन्स् कापण्याची कारवाई सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, या सरकारच्या घोषणांमध्ये आणि अंमलबजावणीमध्ये किती फरक आहे ते आपण पाहू. डिसेंबर, २०१९ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसाच्या अनुषंगाने ऑगस्ट, २०२० मध्ये मदत देण्यात आली. तसेच मार्च-एप्रिल, २०२० मध्ये पडलेल्या अवकाळी पावसाची मदत तब्बल ११ महिन्यांनी म्हणजे फेब्रुवारी, २०२१ मध्ये देण्यात आली. जून, २०२० मधील अवकाळी पावसात नुकसान झालेल्यांना पाच महिन्यांनी म्हणजे नोव्हेंबर, २०२० मध्ये करण्यात आली. मार्च-एप्रिल, २०२० मध्ये पडलेल्या अवकाळी पावसाची मदत ऑक्टोबर, २०२० मध्ये तर ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ ची मदत डिसेंबर, २०२१ मध्ये करण्यात आली. अवकाळी पावसाची मदत १२० ते ३३० दिवस उशिराने या सरकारमार्फत देण्यात आली आहे. तसेच मे, २०२० मध्ये आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीपोटी देण्यात आलेल्या मदतीचा शेवटचा हप्ता एप्रिल, २०२१ मध्ये म्हणजे ११ महिन्यांनी देण्यात आला.

अध्यक्ष महोदय, निसर्ग चक्रीवादळावेळी १५०० कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात ७२७ कोटी रुपये वितरित करण्यात आले तर ७७३ कोटी रुपये अखर्चित राहिले. सन २०२० मधील अतिवृष्टीवेळी ११ हजार कोटी रुपयांचे जाहीर करण्यात आले. त्यापैकी ४ हजार ६०० कोटी रुपये प्रत्यक्ष वितरित करण्यात आले व ६ हजार ३०० कोटी रुपये अखर्चित राहिले. सन २०२१ मधील अतिवृष्टीनंतर पुन्हा १० हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले. त्यापैकी प्रत्यक्षात ५ हजार ७०० कोटी रुपये वितरित करण्यात आले तर ४ हजार २३० कोटी रुपये शिल्लक राहिले. तौक्ते चक्रीवादळावेळी १ हजार कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली परंतु प्रत्यक्षात केवळ १७३ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, या सरकारने जलयुक्त शिवार योजना बंद केली. त्यांना आवडली नाही म्हणून बंद केली असे आपण समजू.

श्री.देवेंद्र फडणवीस.....

परंतु ही योजना बंद करताना अशी घोषणा करण्यात आली की, आता नव्याने मुख्यमंत्र्यांच्या नावाने 'मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना' सुरु करण्यात येत आहे. माझा या निमित्ताने माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना प्रश्न आहे की, आपला माननीय मुख्यमंत्र्यांवर एवढा का राग आहे ? आपण त्यांची अशी अवस्था का केली आहे ? दोन वर्षांपूर्वी सुरु केलेल्या मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेवर केवळ ६ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. किमान माननीय मुख्यमंत्र्यांच्या नावाने असलेल्या योजनेवर तरी खर्च करावा, इतर जाऊ द्या. कारण लोक उद्या प्रश्न विचारतील की, माननीय मुख्यमंत्र्यांची एवढीच किंमत आहे का ?

अध्यक्ष महोदय, सरकारने सांगितले होते की आम्ही शेतकऱ्यांना चिंतामुक्त करु, कर्जमुक्त करु, शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करु. परंतु आजही अशी अवस्था आहे की, १८ लाख ५२ हजार शेतकरी कर्जबाजारी आहेत. अर्थात, बांधावर केलेल्या घोषणेची तर या ठिकाणी आम्ही आठवणच करुन देत नाहीत. माननीय मंत्री श्री.दादाजी भुसे यांना सांगू इच्छितो की, बांधावर काय म्हटले होते ते आम्ही विसरुन गेलो आहोत... (अडथळा...) माननीय मंत्री श्री.दादाजी भुसे यांना आपले म्हणणे मनातून पटत आहे परंतु चेहऱ्यावर दाखविता येत नाही ही त्यांची अडचण आहे. तसेच त्यांच्या दाढीमुळे तसे लपविता येणे देखील सहज शक्य आहे.

अध्यक्ष महोदय, हे सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की गेल्या दोन वर्षांमध्ये सरकारने केलेल्या घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांचा काहीही संबंध नाही. हे सरकार घोषणांमध्ये नापास झाले आहे. शेतकऱ्यांचा प्रचंड पुळका व्यक्त करणाऱ्यांनी भू-संपादन कायद्यावर देशभर गहजब केला होता. त्यावेळी आमच्या सरकारने निर्णय केला होता की, आम्ही चार-पाच पट मोबदला देऊ. याच निर्णयामुळे समृध्दी महामार्ग होऊ शकला. ज्या गावामध्ये आपण सभा घेऊन सांगितले होते की, "जमिनी देऊ नका." त्याच गावातील लोकांनी सर्वात अगोदर जमिनी दिल्या.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. देवेंद्र फडणवीस...

कारण आम्ही त्याला मोबदला दिला. आता आपण काय केले, आता आपण हा ४ पटीचा मोबदला २ पटीवर आणला. त्यातही २० टक्क्यांची कपात केली. आमच्या काळात शेतकऱ्यांना भूसंपादनाचा जो मोबदला दिला जात होता त्यापेक्षा आपल्या या निर्णयामुळे ७० टक्के कमी मोबदला आता मिळणार आहे. म्हणजे कवडीमोल भावाने शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला आहे. आता कुठे गेले ते भूसंपादन कायद्यावर गजहब करणारे... ते विरले, झोपले.

अध्यक्ष महोदय, ही कोणाच्या डोक्यातील सुपिक कल्पना आहे ते मला माहिती नाही. पण मला या गोष्टीचा आनंद आणि समाधान आहे. कारण आमच्या काळामध्ये आम्ही जे भूसंपादन केले ते शेतकऱ्यांना उचित मोबदला देऊन केले आहे. त्यामुळे अर्ध्याहून अधिक ठिकाणी आम्हाला भूसंपादन करावे लागले नाही. मी मंत्री महोदय श्री. एकनाथ शिंदे यांना सांगू इच्छितो की, आम्ही समृध्दी महामार्गामध्ये फार कमी भूसंपादन आपण केले. लोकांनी स्वत: जमिनी दिल्या आणि त्यांच्या संमतीने खरेदी करुन त्या जमिनी संपादित केल्या. आता आपण ७० टक्के मोबदला कमी केल्यानंतर कोण आपल्याला संमती देणार आहे.

श्री. अजित पवार : (खाली बसून) श्री. गडकरी साहेबांनी सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस : श्री. गडकरी साहेबांनी आपल्याला अनेक गोष्टी सांगतात. पण आपण सर्व ऐकत नाही. त्यांनी काय काय सांगितले ते मला माहिती आहे. पण आपण ते ऐकत नाही. सोयीचे ऐकता. त्यांनी असे का म्हटले ते मी उपमुख्यमंत्र्यांच्या उत्तरानंतर सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, पीक विम्याच्या बाबतची परिस्थिती मी अनेक वेळा या सभागृहात मांडलेली आहे. कृषी मंत्री श्री. दादाजी भुसे त्याबाबत बैठक घेणार होते. पण माझ्यामुळेच त्या बैठकीला उशीर झाला आहे. पण मी विनंती केल्यानुसार आपल्याकडून सर्व माहिती माझ्याकडे आली आहे. त्यावर आपण चर्चा करु. पण खरोखर गेल्या २ वर्षामध्ये पीक विम्यापोटी आपल्याला पैसाच मिळाला नाही.

श्री. देवेंद्र फडणवीस...

सन १९९९ ते २०१४ या काळात पाहिले तर २५ लाख शेतकऱ्यांना ५७८ कोटी रुपये मिळाले. प्रधानमंत्री पिकविमा योजनेच्या आमच्या काळात १४४०० कोटी रुपये मिळाले. म्हणजे या काळात फार मोठी वाढ झाली आहे. या २ वर्षामध्ये केवळ ३९८१ कोटी रुपये मिळाले. त्यामुळे सरासरी कमी आली. मदतही कमी झाली आणि म्हणून त्या संदर्भात निश्चितपणे लक्ष देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आता जरी आम्ही वैधानिक विकास मंडळ बंद केले असले तरी विदर्भ आणि मराठवाड्याला आम्ही निधी देणार आहोत. पण असं होत नाही. हळूहळू आपण एक एक योजना बंद करीत आहात. आज आपण बघा विदर्भ आणि मराठवाड्यातील उद्योगांची वीज सवलत २०२४ पर्यंत होती. त्यामुळे उद्योगांना मोठ्या प्रमाणात सवलत मिळत होती. महाविकास आघाडीने ती सवलत बंद केली. आम्ही आवाज उठविला म्हणून सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीसाठी थकबाकी देण्याचा निर्णय घेतला. पण या ठिकाणी केवळ १२०० कोटी रुपयांचा निधी दाखविण्यात आला आहे आणि म्हणून ही सवलत मिळू शकत नाही. आज उद्योगांच्या संदर्भात अतिशय वैज्ञानिकदृष्ट्या पारेषणाचा तोटा जेथे कमी आहे तेथे डिफरेंसिअल टेरीफ असले पाहिजे. या आधारावर एमईआरसीकडून मान्यता घेऊन हे टेरीफ विदर्भ आणि मराठवाड्यातील उद्योगांना दिले होते. आज आपण पहा की, आमच्या जालना आणि औरंगाबादमध्ये जे लोक स्टीलचे काम करीत आहेत ते एका दिवसात इतक्या तोट्यात येऊ लागले आहेत की विचारु नका. कारण त्यांचे आपण नॉर्मल टेरिफ करुन टाकले. जे लोक नवीन गुंतवणूक करीत होते.. आपण पहा की, ज्यांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. त्यांची वीजेमधील विदर्भ आणि मराठवाड्याची सबसिडीच शासनाने काढून टाकली. माझी विनंती आहे की, आपण ही सबसिडी परत दिली पाहिजे. आपण पॉवरलूमची सबसिडी काढून टाकली, ती देखील दिली पाहिजे. हे चुकीचे होत आहे. पण मंत्र्यांचा आशिर्वाद आहे, अधिकारी करतात काय ते मला माहिती नाही.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. देवेंद्र फडणवीस.....

ज्या ठिकाणी पॉवरची सबसिडी आहे त्या ठिकाणी तेथील अधिकारी सबसिडी अडवतात आणि मग भेटायला बोलावतात. त्यानंतर जे भेटले त्यांचीच सबसिडी रिलिज होते आणि जे भेटले नाही त्यांची सबसिडी रिलिज होत नाही. टेक्सटाईल तसेच बऱ्याच ठिकाणी हे सुरु आहे. यासाठी आपण एक निर्णय करुन ते सर्व इलेक्ट्रॉनिक पद्धतीवर आणावे. माननीय मंत्री, अधिकारी किंवा इतर कोणालाही यामध्ये अधिकार असू नयेत. इकडे पुर्तता झाल्यानंतर तिकडे पैसे मिळायला पाहिजे. यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये सुरु असलेले उद्योग सरकारच्या या धोरणामुळे बंद होताना आपल्याला पाहायला मिळत आहेत.

अध्यक्ष महोदय, मी आता पुन्हा वैधानिक विकास मंडळाबद्दल बोलत नाही कारण बोलून काही फायदाच नाही. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी घोषणा केली होती की, नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीसाठी २०० कोटी रुपये देण्यात येतील. तसेच ६ मजली इमारत करण्यात येईल. यासाठी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी एक बैठक घेतली. या व्यतिरिक्त काहीही केलेले नाही किंवा एकही नविन पैसा सुद्धा दिलेला नाही. "दिव्य मराठी"या वर्तमानपत्रातील "सेकंड क्लास सरकार" अशी एक बातमी माझ्याकडे आहे. त्यांनी लिहिले आहे की, आघाडी सरकारने बजेटपैकी फक्त ५२ टक्के निधी खर्च करुन द्वितीय श्रेणीच मिळवली. ते सर्व वाचून आता मी वेळ वाया घालवत नाही.

अध्यक्ष महोदय, कोरोनाचा प्रकोप झाला तरी देखील आरोग्य विभाग आपल्या अजेंडावर नाही. कोरोना रुग्णांना तसेच नवजात माता आणि शिशुंना आहार देण्यासाठी आज आरोग्य विभागाकडे पैसे नाहीत. आरोग्य विभागाने याकरिता १३८ कोटी रुपयांचा निधी मागितला होता. त्यापैकी आपण ८५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आणि प्रत्यक्षात २१ कोटी रुपयांचा निधी दिला. आरोग्य विभागात विविध अत्यावश्यक सेवांसाठी त्यांची ८३५ कोटी रुपयांची मागणी होती. आपण ५०८ कोटी रुपये मंजूर केले आणि प्रत्यक्षात केवळ २६३ कोटी रुपये दिले. वीज बिल, पाणी आणि दूरध्वनी यामध्ये तर कपात करता येत नाही. यासाठी आरोग्य विभागाने ६३

श्री. देवेंद्र फडणवीस.....

कोटी रुपये मागितले त्यापैकी ३८ कोटी रुपये मंजूर निधी होता त्यातही प्रत्यक्षात ३१ कोटी रुपये दिले. आता काय त्यांनी या वर्षासाठी सोडून द्या, असे टेलिफोन विभागाकडे जाऊन सांगायचे काय ? एक वेळा टेलिफोन विभाग ऐकेल पण माननीय मंत्री डॉ. नितिन राऊत ऐकणार नाहीत. कारण माननीय मंत्री डॉ. नितिन राऊत म्हणतील आपण जर बिल भरले नाही तर हे कट करा. मग ते दवाखाना असेल किंवा काहीही असो कट करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, कंत्राटी सेवकांसाठी ४०३ कोटी रुपयांची मागणी होती. परंतु प्रत्यक्षात १८० कोटी रुपये दिले. आरोग्य विभागात वेगवेगळया आगीमध्ये ८१ लोक ठार झाले. यामुळे अग्निसुरक्षा बसविण्यासाठी २३० कोटी रुपयांचा निधी मागितला परंतु एकाही नवीन पैशाचा निधी मिळालेला नाही. चौकशी करण्यात येईल किंवा कठोर कारवाई करण्यात येईल असे सांगितले जाते. परंतु कोणती चौकशी किंवा कोणती कठोर कारवाई हे काहीच समजत नाही. आता आपण कदाचित यासाठी निधी कमी दिला असेल परंतु ही कहानी तर त्यापेक्षाही वेगळी आहे ती म्हणजे मिळालेल्या एकूण निधीपैकी आरोग्य विभागाने ४६ टक्केच पैसे खर्च केलेले आहेत.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात १७ हजार १८३ कोटी रुपये आणि सन २०२०-२१ मध्ये १२ हजार ५७ कोटी रुपये एवढा निधी वाढवून दिला होता. यापैकी औषधीसाठी १७३३ कोटी रुपये दिले होते. परंतु ११० कोटी रुपये म्हणजे फक्त ६ टक्के खर्च झालेला आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या कोणत्याही कॉलेजमध्ये किंवा रुग्णालयामध्येही औषधे नाहीत.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय ग्रामीण मिशन अंतर्गत आलेल्या निधीतून ४१ टक्के खर्च झालेला आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने ४९ टक्के खर्च केला आहे. आशा वर्कर करिता निधी वाढवून दिला आहे, या करिता मी आपले अभिनंदन करतो. आशा वर्करकरिता २९७ कोटी रुपये ठेवले होते. यापैकी केवळ २८ कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेवर सर्वात अधिक निधी सन २०२०-२१ व सन २०२१ -२२ मध्ये म्हणजे कोव्हिडच्या कालावधीत खर्च व्हावयास हवा होता. सन २०१९ मध्ये या योजनेचा खर्च ५५२ कोटी रुपये होता. २०२० मध्ये हा खर्च ३९९ कोटी रु. व सन २०२१ मध्ये त्याही पेक्षा कमी म्हणजे ३२५ कोटी रुपये खर्च झाला. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना जर कोव्हिडच्या काळात वापरली नाही तर ती कधी वापरली, हा पैसा कमी का झाला ? आम्ही या बाबत रोज सांगत होतो. या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये सत्यता प्रमाणपत्र जमा झाले. मंत्री महोदय रोज सांगायचे की, जन आरोग्य योजनेतून एवढी बिले दिलेली आहेत. हे सर्व राज्य सरकार करीत आहे. मात्र आपण कोणता खर्च केला आहे ? सन २०१९ मध्ये, म्हणजे जे नॉर्मल वर्ष होते त्या वर्षात ५५२ कोटी रुपये खर्च केलेला असताना कोव्हिडच्या काळात आपण ३२५ कोटी रुपयांपर्यंत खाली येत आहात. आपण जे सांगत आहात व जे करीत आहात यामध्ये प्रचंड मोठा फरक आहे.

अध्यक्ष महोदय, कोव्हिडच्या मृत्यू संदर्भात महाराष्ट्रामध्ये सांगितले की, १ लाख ४१ हजार मृत्यू झाले. दावे प्राप्त २ लाख २७ हजार. दि. २५ जानेवारी पर्यंत १ लाख ७ हजार दावे मंजूर केले. मात्र काही छोटया कारणाने हे दावे रद्द केले जात आहेत. या करिता फॉर्म इंग्रजीत तयार केलेला आहे. त्यामध्ये ' deceased' असे नमूद केले आहे. त्याचा अर्थ मृत झालेला. लोकांना वाटते की, याचा अर्थ आपल्याला कोणता रोग आहे. यामुळे या ठिकाणी सर्वांनी 'कोव्हिड १९' असे

श्री. देवेंद्र फडणवीस.....

लिहिले. त्यांनी ' कोव्हिड १९' असे लिहिले म्हणून हे फॉर्म रद्द केले गेले. असे एकूण ५० हजार अर्ज बाद केले आहेत. ज्यांना एसएमएस आले की, तुमच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. त्यांना ते पैसे मिळाले नाही. बोरिवलीतील चेतना मेहता यांचे पती पहिल्या लाटेत वारले. ते एकुलते एक कमावते होते. त्यांच्या पत्नीला संदेश आला पण खात्यात पैसे जमा झाले नाहीत. श्रीमती प्रियंका नागवेकर यांचा ४९ वर्षाचा पती गमावला. त्यांच्या नावासमोर पोर्टलमध्ये दाखवले की, पैसे जमा झाले मात्र त्यांच्याही खात्यात पैसा जमाच झालेले नाहीत. खरे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची आपण पूर्तता करीत आहोत. मुंबईमध्ये १६ हजार ५०० मृत्यू दाखवले गेले. प्रत्यक्ष दावे ३७ हजार प्राप्त झाले आहेत. अजून दावे प्राप्त होत आहेत. यातील ९ हजार ४००दावे वेगवेगळया जिल्ह्यांना पाठवले. तसेच ९ हजार दावे नाकारले. आता कोव्हिड झाला. आपण कशाला फसवाफसवी करीत आहात ? ज्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांना मदत केली पाहिजे. कोव्हिडमध्ये सर्वच राज्यांमध्ये जी मृत्यू संख्या दाखवली, त्यापेक्षा जास्त दावे आले आहेत. देशात सर्वाधिक दावे दुर्दैवाने महाराष्ट्रात आले आहेत, हे या ठिकाणी सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, लसीकरणाबाबत मी सांगू इच्छितो. केंद्र लस देत नाही, ही कॅसेट आता संपली आहे. आता सध्या राज्यात मोठया प्रमाणात लसीकरण केले गेले. आपण सांगितले की, आपण क्रमांक १ वर आहोत. मात्र दोन्ही डोस दिलेल्या राज्यांमध्ये व १५ प्लस लोकसंख्येचे लसीकरण करणाऱ्या राज्यांमध्ये आपण १९ व्या क्रमांकावर आहोत. जम्मू- काश्मिर, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तेलंगणा, दिल्ली, केरळ, राजस्थान, हरियाणा, ओरिसा, राजस्थान, गुजराथ, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, तमिळनाडू असे करता करता आपल्या राज्याचा क्रमांक १९ वा आहे. कोठे तरी या बाबत लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, मला आठवते की, हाफकीन संबंधी बरीच जोरदार चर्चा झाली. हाफकीन आता या ठिकाणी लस तयार करेल असे सांगण्यात आले. मग त्यासाठी प्रस्ताव गेला. केंद्र त्यासाठी परवानगी देत नाही असेही सांगितले. या नंतर केंद्र शासनाने परवानगी दिली. केंद्र शासनाने दोन दिवसात परवानगी देऊन राज्य शासनाने एकही रुपया न दिल्याने, गेल्या १0 महिन्यात हाफकिन मार्फत एकाही लसीची निर्मिती झालेली नाही.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, कोरोना काळात लढण्यासाठी १५ हजार व्हेंटिलेटर जनतेसाठी उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली. प्रत्यक्षात १ हजार व्हेंटिलेटर देखील राज्य सरकारच्या निधीतून खरेदी झाले नाहीत. केंद्र सरकारने मात्र आपल्याला ४५०० व्हेंटिलेटर दिले. त्यातील १ बॅच खराब निघाली. त्याचा आपण खूप गहजब केला. त्यावर आपण बोलला. मात्र जे ४३०० व्हेंटिलेटर चांगले निघाले त्याबद्दल आपण कधीच बोलला नाहीत.

अध्यक्ष महोदय, किमान समान कार्यक्रम ... तुम्ही विसरलाच असाल. आता वेगळाच किमान समान कार्यक्रम चालला आहे. परंतु, किमान समान कार्यक्रमामध्ये १ रुपया क्लिनीकची घोषणा होती. माननीय श्री.शिंदे साहेब १ रुपया क्लिनीकची घोषणा केली होती. मला असे वाटते की, तो रुपयाही संपला. त्यामुळे क्लिनीकच सुरु झाले नाही.

अध्यक्ष महोदय, आता मजेची गोष्ट अशी आहे की, किमान समान कार्यक्रम ... तुम्ही विसरला नाहीत. मी तुमचे अभिनंदन करेन. किमान समान कार्यक्रमाचा तुम्ही उल्लेख केला. तुम्ही त्याचा पहिल्या अर्थसंकल्पात, दुसऱ्या अर्थसंकल्पात व तिसऱ्या अर्थसंकल्पात देखील उल्लेख केला. आता चौथ्याही कराल, म्हणजे चौथा अर्थसंकल्प मांडण्यात येईल असे मी सांगत आहे. कारण उगीच परत मी सरकार पाडण्याचा प्रयत्न करतो, वगैरे बोलायला नको. खरे म्हणजे इतक्या गोष्टी आहेत की, त्याच येत आहेत. आता ..(अडथळा) ... ते आमचे मित्रच आहेत. ते आमच्याकरिता पर्मनंट पॉप्युलर आहेत.

अध्यक्ष महोदय, आपण खूप प्रयत्न करुन महाराष्ट्राला कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत होतो. आपण त्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी झालो होतो. केंद्र सरकारच्या रिपोर्टमध्ये देखील महाराष्ट्राच्या कामगिरीचे कौतुक सुरु होते. परंतु, आता पुन्हा एकदा महाराष्ट्राचा कुपोषणामध्ये पहिला क्रमांक झाला आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, दि. १४ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या आकडेवारीनुसार ६.१६ लाख कुपोषित बालके, ४.५८ लाख अतिकुपोषित तर, १.५७ लाख मध्यम कुपोषित बालके आहेत. दुसऱ्या क्रमांकावर बिहार आहे. आमचा समृध्द महाराष्ट्र कुपोषणामध्ये बिहारपेक्षाही पुढे गेला आहे. देशातील एकूण कुपोषित बालकांमध्ये महाराष्ट्राचा वाटा १९ टक्क्यांचा आहे. देशाच्या लोकसंख्येत आम्ही ९ टक्के आहोत. परंतु, कुपोषणामध्ये मात्र आम्ही १९ टक्के आहोत. याचे कारण काय तर, आपण पोषण आहाराच्या योजनांचा बट्ट्याबोळ केला.

अध्यक्ष महोदय, मागच्याच्या मागच्या अधिवेशनात सभागृहात नाही तर सभागृहाच्या बाहेर जे अधिवेशन घेतले होते, त्यात आदिवासींना कशा प्रकारचे मटेरिअल आपण सप्लाय करतो, त्याचे नमुने मी आणले होते. जनावर खाणार नाही, अशा गोष्टी आपण देतो. मग कुपोषण का वाढणार नाही? आपण कुठे कॉम्प्रमाईज केले ... कॉम्प्रमाईज तर कुठेच करु नये. परंतु, ज्याला करायचे आहे त्याने हा विचार केला पाहिजे की, ही छोटी छोटी बालके कुपोषित राहत आहेत.

अध्यक्ष महोदय, आमच्या देशातील सर्वात मोठा प्रॉब्लेम असा होता की, या देशामध्ये ४० टक्के स्टंटेड मुले जन्माला यायची. माननीय श्री.नरेंद्र मोदीजींनी सातत्याने प्रयत्न करुन गेल्या ७ वर्षांमध्ये ही संख्या ४० टक्क्यांवरुन २६ टक्क्यांपर्यंत खाली आणली. परंतु, २६ टक्क्यांवर नाही तर ती आपल्याला आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खाली आणावयाची आहे. आदिवासींमध्ये कुपोषणाची ही परिस्थिती राहिली तर, काय अवस्था असेल ते सांगता येत नाही.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळात वेगवेगळया प्रकारचे जे भ्रष्टाचार झाले, त्याची एक वेगळी चर्चा आम्ही करणारच आहोत. परंतु, विशेषत: पुण्यातील जे जंबो कोविड सेंटर आहे त्याचे कंत्राट ज्यांना मिळाले ते श्री.राजु साळुंखे नावाचे एक चहावाले आहेत. चहावाले काही कमी नसतात, चहावाले देशाचे पंतप्रधान होतात. परंतु, त्या श्री.साळुंखेना काही अनुभव नाही. परेल येथे केईएम हॉस्पिटल समोर त्यांचे 'सह्याद्री रिफ्रेशमेंट' नावाचे हॉटेल आहे. ते व श्री.सुजित पाटकर हे दोघे त्या

श्री.देवेंद्र फडणवीस ...

कंपनीत पार्टनर आहेत. या हॉटेलचे इन्कम टॅक्स रिटर्न १ लाख रुपये आहे. लाईफ लाईन हॉस्पिटल सर्व्हीसेस ही नवीन कंपनी आहे. ही रेग्युलर लाईफ लाईनची कंपनी नाही. ही नवीन कंपनी तयार करतानाही अनेक बोगस डॉक्युमेंट वापरुन रातोरात कंपन्या तयार केल्या. अशा कंपन्यांना तुम्ही ७-७ कोविड सेंटर दिली.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस...

या कोविड सेंटरमध्ये लोक मृत्यूमुखी पडले आहेत. या सेंटरमध्ये पत्रकार गेल्यानंतर त्यांना काढून टाकले. ७ ठिकाणी कोविड सेंटर देताना भ्रष्टाचार करण्यात येत आहे. यासंदर्भात माझ्याकडे खूप मटेरियल आहे. त्यावर योग्य वेळी निश्चितपणे मी बोलेन.

अध्यक्ष महोदय, माता सुरक्षा योजनेचे तीन तेरा वाजले आहेत. आज नंदुरबार जिल्ह्यामध्येही या योजनेचा बोजवारा वाजला आहे. सन २०१९ च्या शेवटच्या सात महिन्यांमध्ये १०४ मृत्यू झाले आहेत. अर्भक मृत्यू २९, बालमृत्यू ७१ व माता मृत्यू ४ झाले आहेत. चुकीच्या नोंदी घेतल्या आहेत. अत्यावश्यक औषध नाहीत. मुदतबाह्य औषधांचा महापूर आहे. माननीय मुख्यमंत्री यांनी मुंबईतून धडगावच्या रुग्णालयातील लसीकरणाचे ऑनलाईन उद्घाटन केले. आता तेथे उपचार करण्यात येतात का, औषधे आहेत का, पॅरासिटामोल, सेट्रीझीन अशी साधी औषधे तेथे उपलब्ध नसल्याने ती रुग्णांना बाहेरुन खरेदी करावी लागतात.

अध्यक्ष महोदय, आपण आपल्या या पंचसूत्रीमध्ये मनुष्यबळ विकास यामध्ये ओबीसीचा समावेश केला आहे. मी त्यावर जास्त बोलणार नाही, कारण नंतर बोलणार आहे. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यमातून दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी एक प्रसिद्धी पत्रक जारी केले आहे. त्यात त्यांनी काही गोष्टींचा खुलासा केला आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, राज्य मागासवर्ग आयोगाला सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी लागणारा निधी सहा महिने मिळाला नाही. राज्य सरकारने पुरवलेल्या माहितीच्या आधारे अंतरिम अहवाल तयार करण्यात आला, इम्पेरिकल डाटा तयार झाला नाही, याची माहिती राज्य सरकारला देण्यात आली होती. राज्य सरकारला अहवाल सादर करताना त्याच्या कव्हरिंग लेटरवर तारीख नमूद केली होती. राज्य सरकारने माननीय सर्वोच्च न्यायालयात पुरेशी खबरदारी घ्यावी, अशी सूचनाही देण्यात आली होती. मात्र हे काही राज्य सरकारने केले नाही. हे राज्य मागासवर्ग आयोगाने सांगितले आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस...

केवळ बैठका घेण्यात येतात व कागदी घोडे नाचवण्यात येत आहेत. अशी अवस्था आहे.

अध्यक्ष महोदय, महाज्योतीकरिता या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून निधीची तरतूद केली आहे. हिंदीमध्ये एक म्हण आहे परंतु ती दादांना लागू होत नाही. "भागते भूत की लंगोटी सही." जेवढे मिळाले त्यावर समाधान मानावे, असा याचा अर्थ आहे.

अध्यक्ष महोदय, रोजगार निर्मितीच्या संदर्भात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना होती. त्या योजनेचे तीनतेरा वाजले आहेत. या योजनेच्या कार्यक्रमात राज्यातील अनेक मंत्री महोदयांनी आपले फोटो काढून घेतले. लोकांनी पैसे भरले. याकरिता चीफ को-ऑर्डीनेटर नियुक्त केला होता, याची आपणास माहिती आहे. आपल्या सर्वांच्या मतदारसंघात हे घडले आहे. तो बोगस माणूस पैसे घेऊन गायब झाला तो जेलमध्ये आहे. एकाच व्यक्तीला मुख्यमंत्री रोजगार योजनेतून रोजगार मिळाला व त्याने सर्वांच्या मतदारसंघातील रोजगार गायब केला आहे. त्याच्या सोबत सर्व मंत्र्यांचे फोटो आहेत, सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांचाही त्याच्या सोबत फोटो आहे. गाड्या व जीप मिळणार असल्याने कार्यकर्त्यांची वर्णी लागली होती. ती न लागल्याने तेच कार्यकर्ते डोक्यावर बसले आहेत व विचारत आहेत की, कधी मिळणार ? अशी ही या योजनेची अवस्था आहे.

अध्यक्ष महोदय, रोजगार निर्मितीच्या संदर्भात काय करणार यावर दोन पानांमध्ये माहिती देण्यात आली आहे. दोन वर्षापूर्वी महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी योजना जाहीर करण्यात आली होती. त्यासाठी ५ वर्षात ६ हजार कोटी रुपये देण्यात येतील, असे सांगण्यात आले होते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत उक्त योजनेचे संकेत स्थळही तयार झाले नाही.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.देवेंद्र फडणवीस......

मागील दोन वर्षामध्ये प्रत्यक्षात १० हजार रोजगार देखील उपलब्ध करता आले नाहीत.

अध्यक्ष महोदय, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमांतर्गत या सरकारने १० शाळांची निवड केलेली आहे. ही अतिशय चांगली बाब आहे. परंतु सदर १० शाळांपैकी विदर्भ, मराठवाडा व खानदेशातील २५ जिल्ह्यांतील फक्त दोन शाळांची निवड केलेली आहे. विदर्भ, मराठवाडा व खानदेशामध्ये महापुरुषांची कमतरता नाही. अशा प्रकारच्या शाळांची निवड करताना आपण या बाबींचा विचार करणे आवश्यक होते. आपल्या अशा निर्णयामुळे आमच्या मनामध्ये अन्यायाची भावना का निर्माण होणार नाही? आम्ही अशा प्रकारचे निर्णय वाचतो, तेव्हाच आमच्या मनामध्ये अन्यायाची भावना निर्माण होते.

अध्यक्ष महोदय, आपले सरकार लोकशाहीर अणाभाऊ साठे यांच्या गावामध्ये शाळा उभारणार आहे, ही बाब अतिशय चांगली आहे. परंतु लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावे सामाजिक न्याय विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या योजनेसाठी मागील दोन वर्षांमध्ये किती निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे? लोकशाहीर अणाभाऊ साठे यांच्या गावामध्ये शाळा उभारण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देणार आहात. परंतु त्यांच्याच नावे सुरु असलेल्या योजनेसाठी मात्र एकही रुपया निधी उपलब्ध करुन देत नाही. कारण मागील दोन वर्षामध्ये सदर योजनेचे काम निरंक आहे. या सरकारने एक रुपया देखील उपलब्ध करुन दिलेला नाही.

अध्यक्ष महोदय,  काही योजनांमध्ये फक्त निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. संत रोहिदास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ आणि महात्मा फुले महामंडळास सन २०२१ आणि सन २०२१-२२ या वर्षात केवळ वेतनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. खरे पाहता भागभांडवल काहीही नाही. त्यामुळे फक्त तरतूद दाखविण्यात आली. एकाही पैशाचे वितरण करण्यात आलेले नाही आणि एकाही पैसा खर्च देखील करण्यात आलेला नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस......

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या गावातील शाळेसाठी १० कोटी रुपये उपलब्ध करुन द्यायचे व महामंडळाला मात्र नवा पैसा द्यावयाचा नाही, असे या शासनाचे धोरण आहे.

अध्यक्ष महोदय, मला एक अतिशय भयानक बाब माध्यमांच्या माध्यमातून पाहण्यास आली आहे. देहविक्री करणाऱ्या महिलांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये देखील भ्रष्टाचार झालेला आहे. माननीय श्री.संजय राऊत हे दलालासाठी जो शब्दप्रयोग करतात, तो शब्द मी येथे वापरु शकत नाही. कोविड-१९ मध्ये हातावर पोट असलेल्या व्यक्तींसाठी या सरकारने ५१ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते. त्यापैकी नांदेड जिल्ह्यासाठी २.८१ कोटी रुपये प्राप्त झाले होते. सदर २.८१ कोटी रुपयांचा निधी पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्यासाठी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, कासारखेडा या खाजगी संस्थेची निवड करण्यात आली होती. सदर संस्थेने देहविक्री करणाऱ्या महिलांना २.८१ कोटी रुपयांचा निधी वितरीत केल्याचे सांगितले. देहविक्री करणाऱ्या महिलांची कशी निवड केली, याबाबत विचारले असता त्यांच्याकडे उत्तर नाही. सदर लाभार्थ्यांची यादी मागितली तर सदर यादी गोपनीय असल्याचे सांगण्यात आले. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना विचारला असता त्यांच्याकडे देखील याबाबतची कोणतीही माहिती असल्याचे दिसून आले नाही. जेव्हा देहविक्री करणाऱ्या महिलांकडे सामाजिक संघटनांनी विचारणा केली तेव्हा त्यांना या योजनेची माहितीच नसल्याचे दिसून आले. सदर संस्था कोणाची आहे, हे शाधून काढण्यात येईल. एबीपी माझा या चॅनलने याचा शोध घेतला असता, असे लक्षात आले की, अशा प्रकारची योजना आहे, हे देखील आम्हाला माहिती नाही, असे तेथील देहविक्री करणाऱ्या महिलांनी सांगितलेले आहे. आता नांदेड येथील एक प्रकार उघकीस आलेला आहे. अन्य जिल्ह्यामध्ये काय झाले असेल, याबाबत वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. उक्त प्रकरणाची सर्व माहिती घेऊन संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस......

देहविक्री करणाऱ्या महिलांचा पैसा कोणी खात असेल तर आपण कुठे जात आहेत, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

अध्यक्ष महोदय, मनुष्यबळ विकास विभाग हा खंडणी आणि लाच हाच कौशल्याचा भाग बनलेला आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास महामंडळाचे सह संचालक, श्री.जाधव यांना ५ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे. खरे म्हणजे खूप मोठी स्टोरी आहे वेळ मात्र खूपच कमी आहे. त्यामुळे सर्व विषय मांडता येणार नाहीत. इतके भयानक प्रकरणे आपल्या निदर्शनास येत आहेत.

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये बोगस एमबीएच्या पदव्या देखील दिल्या जात आहेत. २९२ विद्यार्थ्यांना बोगस एमबीएच्या पदव्या देऊन ५८ लाख रुपयांचा गंडा घातलेला आहे. श्री.स्वप्नील ठाकरे हा छत्रपती ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचा अध्यक्ष आहे. त्यांच्यासह श्री. मयुर देशपांडे व श्री. माधव पाटील यांनी २९२ विद्यार्थ्यांना कानपूर विद्यापीठाची पदवी देण्यात येईल, असे सांगून त्यांना बनावट पदव्या देऊन त्यांची फसवणूक केलेली आहे. ि

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस ....

अध्यक्ष महोदय, पोलीस भरती, टीईटीमधील घोटाळे आहेत. याबाबत माझ्याकडे माहिती आहे. परंतु मी त्याबाबत अधिक काही बोलणार नाही. ते विषय यापूर्वी मांडलेले आहेत. मनुष्यबळ विकास कसा होत आहे, हे आपल्या चांगले लक्षात येत आहे. इन्फ्रास्ट्रक्चर अतिशय महत्त्वाचे आहे. मागील सरकारच्या काळात ज्या ज्या योजनांकरिता या सरकारने विरोध केला त्या योजनांच्या विस्तारासाठी या अर्थसंकल्पामध्ये निधी दिला आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. शेवटी सरकारचे काम नियमित सुरु असते. सरकार कधीही बंद होत नसते. तुमचे सरकार आले तर त्या योजना तुम्ही पुढे न्यावयाच्या असतात. आमचे सरकार आले तर आम्ही त्या योजना पुढे नेणार. सुरुवातीला या सरकारला मागील सरकारच्या योजना बंद करण्यात अधिक रस होता. नंतर या योजना हे सरकार पुढे नेत आहे, हे दिसून येते.

अध्यक्ष महोदय, कोस्टल रोड प्रकल्पाबाबत मी बोलू इच्छितो. कोरियन आणि स्पॅनिश जॉईंट व्हेंचरच्या माध्यमातून एक सब कॉंट्रॅक्ट देण्यात आले होते. ते कॉंट्रॅक्ट इनोव्हेव इंजिनिअरींग अँड ॲडव्हेटायझर्स यांना दिले आहे. श्री. सत्यजित देशमुख हे कोणाचे बंधू आहेत, हे मी सांगणार नाही. या कंपनीला ८३ कोटी रुपयांचे कन्सल्टींग शुल्क मिळाले आहे. महानगरपालिकेला याबाबत विचारले असता सांगण्यात आले की, अशा प्रकारचे काम महानगरपालिकेकडून देण्यात आलेले नाही. याबाबत कोणताही व्यवहार करण्यात आला नसल्याचे सांगण्यात आले. कोस्टल विभागाकडून सांगण्यात आले की, याबाबतची कागदपत्रे त्यांच्याकडे नाहीत. परंतु त्यांनी बयाणामध्ये ही बाब मान्य केली. ८३ कोटी रुपये हे कन्सल्टींगचे नसून ते किकबॅकचे आहेत.

अध्यक्ष महोदय, बुलेट ट्रेनची आवश्यकता का आहे, हे मी चार वर्षापासून सांगत होतो. ती कशी मोफत आहे, त्यातून कसा रोजगार मिळणार आहे, त्याचा किती फायदा आहे, हे मी सांगत होतो. परंतु मला आता आनंद होत आहे की, हे सरकार आता बुलेट ट्रेनची मागणी करीत आहे. मुंबई ते हैद्राबाद बुलेट ट्रेन सुरु करावी अशी

श्री. देवेंद्र फडणवीस ....

मागणी आता सरकारकडून केली जात आहे. मागील चार वर्षात जी बाब लक्षात आली नाही ती आता लक्षात येत आहे. बुलेट ट्रेनची आवश्कता आहे.

अध्यक्ष महोदय, बुलेट ट्रेनमुळे अर्थव्यवस्थेला कशी चालना मिळते, हे मी तेव्हा सर्वांना सांगत होतो. तरीही माझ्यावर काही सन्माननीय सदस्य ओरडत होते. माननीय मंत्री श्री. धनंजय मुंडे हे वरच्या सभागृहातून मला प्रश्न विचारत होते. परंतु मला आनंद वाटतो की, उशिरा का होईना ही संकल्पना या सरकारला पटली आहे. परंतु एका गोष्टीचे मला आश्चर्य वाटते. अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनला हे सरकार मदत करीत नाही. परंतु आता नवीन मुंबई – हैद्राबादकरिता बुलेट ट्रेन करीत आहे. नुकतेच माननीय मुख्यमंत्री श्री. के. चंद्रशेखर राव मुंबईत येऊन गेले आहेत. हैद्राबाद – मुंबई बुलेट ट्रेन सुरु झाली तर हे संबंध अधिक जलद होतील.

अध्यक्ष महोदय, आमच्या सरकारच्या कार्यकाळात आम्ही मुंबई – नागपूर बुलेट ट्रेनचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यासाठी समृद्धी महामार्गावर जागा आहे. यात फक्त ३३ टक्के जमीन अधिग्रहन करावे लागणार आहे. यातून ही बुलेट ट्रेन होऊ शकते. याचाही विचार करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मेट्रो – ४ मध्ये डब्बे पुरविणाऱ्या कंपनीने माघार घेतली आहे. माझ्याकडे आता अधिक वेळ नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सभागृहाला एक गोष्ट विचारु इच्छितो. माननीय गृह मंत्री नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर सायंकाळी ०५.०० वाजता उत्तर देणार आहेत. या चर्चेकरिता आज तीन तासांचा वेळ देण्यात आला आहे. दुपारी २ वाजून ४६ मिनिटे ३० सेंकदाला सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी भाषण सुरु केले आहे. दोन्ही पक्षाकरिता निम्मा-निम्मा वेळ देण्यात येत आहे. माननीय गृह मंत्री यांनी प्रस्तावावरील चर्चेला उत्तर दिल्यानंतर आजचा हा तीन तासांचा कालावधी पूर्ण करावयाचा किंवा कसे, याबाबत सभागृहाने सांगावे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय गृह मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर ही चर्चा पुढे सुरु करावी. याचे कारण असे की, सर्वच सन्माननीय सदस्यांना बऱ्याच दिवसानंतर अर्थसंकल्पावर चर्चा करण्यास संधी मिळणार आहे. त्यामुळे आपण त्यांना बोलू द्यावे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, मेट्रो-३ च्या संदर्भात मी बोलत आहे. सर्वोच्च न्यायालयाने या मेट्रो कारशेडला मान्यता दिली होती. मान्यता देताना सर्वोच्च न्यायालयाने अतिशय स्पष्टपणे सांगितले होते की, "जी झाडे आपण कापत आहोत ती झाडे त्यांच्या आयुष्यात जेवढे carbon sequestration करु शकते तेवढे मेट्रो ८० दिवसांच्या फेऱ्यात करु शकते." परंतु यामध्ये कोणाचा अहंकार आडवा आला त्यासंदर्भात मी आता बोलणार नाही. हा अहंकार किंवा इगो आडवा आल्यामुळे मेट्रो-३ च्या कारशेडचे काम होत नाही. जी मेट्रो या वर्षाच्या शेवटी किंवा पुढील वर्षी कार्यान्वित होऊ शकली असती ती मेट्रो पुढील पाच वर्षे कार्यान्वित होऊ शकणार नाही. ही इतर सर्व मेट्रो लाईन्सची मेन फिडर लाईन आहे. इतर सर्व लाईन्स् आडव्या आहेत तर ही लाईन उभी आहे. विलंबामुळे प्राईस एक्सलेशन व इतर अनेक बाबी समोर आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, यासंदर्भातील धोरण बदलून तात्काळ कार्यवाही सुरु करावी. ज्या ठिकाणी कारशेडचे २५ टक्के काम पूर्ण झालेले आहे तेथेच कन्टिन्यू करावे. हे काम ४०० कोटी रुपयांचे असून त्यापैकी १०० कोटी रुपयांचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ३०० कोटी रुपयांचे काम ९ महिन्यांमध्ये पूर्ण होऊन मेट्रो सुरु होऊ शकते. त्यासाठी पाच वर्षे का थांबत आहात ? त्यामुळे माझी विनंती आहे की, आडमुठेपणा सोडून त्याच ठिकाणी कारशेडचे काम केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आता मी परकीय गुंतवणुकी संदर्भात बोलतो. माननीय श्री.सुभाष देसाई हेच आमच्या सरकारच्या काळात देखील उद्योग मंत्री होते. आम्ही सोबत काम करीत होतो. मला आनंद आहे की, त्यावेळी परकीय गुंतवणुकीमध्ये जवळजवळ चार वर्षे आपण पहिल्या क्रमांकावर होतो. त्यातील एका वर्षी तर देशातील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी सुमारे ४७ टक्के गुंतवणूक आपल्या राज्यामध्ये आली होती. परंतु आताची परिस्थिती पाहिली तर आपण तिसऱ्या क्रमांकावर गेलो आहोत. पहिल्या क्रमांकावर गुजरात, दुसऱ्या क्रमांकावर कर्नाटक राज्य असून आपण तिसऱ्या क्रमांकावर आहोत.

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, याविषयी सरकारकडूनच घेतलेली माहिती मी सांगू इच्छितो. जानेवारी ते डिसेंबर, २०२० दरम्यान २२ हजार ६१७ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले परंतु प्रत्यक्षात केवळ १ हजार ९०० कोटी रुपयांचे काम सुरु झाले. जानेवारी ते डिसेंबर, २०२१ या वर्षात १४ हजार ४४० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यापैकी ३८० कोटी रुपयांचे काम प्रत्यक्षात सुरु झाले. या दोन वर्षांमध्ये २ हजार २०० कोटी रुपयांचे प्रकल्प अंडर कन्स्ट्रक्शन असल्याचा दावा होता परंतु त्या तुलनेत केवळ ६.१५ टक्केच काम सुरु झाले आहे. अर्थात, मला कल्पना आहे की या बाबी वर्षभरामध्ये होत नाहीत तर यासाठी वेळ लागतो. परंतु त्यातल्या त्यात चांगली प्रगती असली पाहिजे. आपण उद्योग क्षेत्रामध्ये देखील मागे चाललो आहोत.

अध्यक्ष महोदय, काहीही झाले तरी राज्य सरकारकडून एक गोष्ट हमखास सांगितली जाते की, केंद्र सरकारकडून जी.एस.टी. चे कॉम्पेन्सेशन दिले नाही. खरे तर, केंद्र सरकार यासाठी कायद्याने बांधील आहे. केंद्र सरकारला कायद्यानुसार पाच वर्षे कॉम्पेन्सेशन द्यावेच लागणार आहे. मागील वर्षी केंद्र सरकारकडे देखील अपेक्षित वस्तू व सेवा कर संकलित झाला नव्हता. तरीही केंद्र सरकारने १ लाख कोटी रुपयांचे कर्ज काढून राज्यांचे कॉम्पेन्सेशन दिले. तसेच मी हेही सांगू इच्छितो की, कॉम्पेन्सेशनचे वर्ष एप्रिल ते मार्च असे नसून ते जुलैपर्यंत आहे. त्यामुळे आम्हाला विश्वास आहे की, केंद्र सरकार आपला एकही पैसा शिल्लक ठेवणार नाही.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राला झालेला फायदा मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सन २०१७-१८ मध्ये आपल्या राज्याला ६.२८ टक्के कॉम्पेन्सेशन मिळाले होते. सन २०२०-२१ मध्ये त्यात वाढ होऊन १६.२६ टक्के एवढे झाले. म्हणजे १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. केंद्र सरकारने कोविडचे कारण सांगून कॉम्पेन्सेशन दिले नसते किंवा कोविडचे कारण सांगितले असते तर किती मोठे नुकसान झाले असते याचाही विचार करावा. परंतु केंद्र सरकारने तशी भूमिका घेतली नाही.

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

केंद्र सरकारने सांगितले की आमचेही जी.एस.टी. संकलन कमी आहे परंतु आम्ही कर्ज घेऊन सर्व कॉम्पेन्सेशन देऊ. त्यामुळे आपल्या राज्याला सन २०१९-२० मध्ये ११ टक्के तर २०२०-२१ मध्ये सुमारे १६ टक्के कॉम्पेन्सेशन मिळाले.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस...

पण त्याच वेळी महाराष्ट्रातील महसूल जमा होण्याचे प्रमाण खूप कमी झाले आहे. ही चिंतेची बाब आहे. देशातही कोविड होता. देशाच्या अन्य राज्यातही कोविड होता. पण त्या राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राचे महसूल जमा होण्याचे प्रमाण अतिशय खाली गेले आहे. स्टेट जीएसटी संकलनामध्ये जी निगेटीव्ह ग्रोथ झाली त्याची मी माहिती देतो. देशाची निगेटीव्ह ग्रोथ आहे ५.६७ टक्के आणि आपल्या राज्याची निगेटीव्ह ग्रोथ १०.३ टक्के म्हणजे दुप्पट. याचा अर्थ देशामध्ये या सर्व लॉकडाऊनच्या कालावधीत जो कारभार सुरू होता तो महाराष्ट्राने करु दिला नाही. सर्वात जास्त रुग्ण आपल्या राज्यात होते. पण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासंदर्भात ज्या बोल्डस्टेप घ्यायला हव्या होत्या त्या आपण घेतल्या नाहीत. त्यामुळे राजस्थान -३ टक्के, केरळ -४ टक्के, पंजाब -४ टक्के, पश्चिम बंगाल – ५ टक्के, आंध्रप्रदेश -५ टक्के, तामिळनाडू -८ टक्के, सर्वात जास्त महाराष्ट्र -१० टक्के होते. म्हणजे आपल्याला जी अधिकची नुकसान भरपाई घ्यावी लागते ती आपल्या अर्थव्यवस्थेवर दुपटीचा परिणाम घडविला, आपलं संकलन हे देशापेक्षा दुपटीने कमी झाले आणि म्हणून आपल्याला ही अधिकची नुकसान भरपाई घ्यावी लागते आणि केंद्र सरकार ते आपल्याला देते. त्यामुळे कधी कधी उपमुख्यमंत्री त्याबद्दल तारीफ करतात. इतरांनाही ते सांगा. कारण आपण अर्थमंत्री असल्यामुळे आपल्याला आकडे माहिती आहेत आणि म्हणून आपण तारीफ करता. इतरांनाही ते आकडे सांगा. केंद्र सरकार अन्याय करीत नाही. उलट केंद्र सरकार अडचणीच्या काळात राज्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक लोक न वाचता सांगतात की, केंद्र शासनाकडून या अर्थसंकल्पातून काहीच मिळाले नाही. मी मायल्यूडमध्ये जाणार नाही. पायाभूत सुविधांच्या बाबतीतही फार जाणार नाही. पण टॅक्स डिव्होल्यूशनमध्ये आपल्याला ५१ हजार कोटी रुपये दिले जे मागच्या वेळपेक्षा १० हजार कोटी जास्त आहेत. वित्त आयोगाच्या अनुदानामध्ये ११ हजार कोटी रुपये दिले. समग्र शिक्षामध्ये १२३४ कोटी रुपये मिळाले. वेगवेगळी क्षेत्रे आहेत. त्यामध्ये जलसंसाधन, नदी

श्री. देवेंद्र फडणवीस...

विकासासाठी १७३३ कोटी रुपये, जलशुध्दीकरणासाठी १९०० कोटी, हे सर्व सांगण्यासाठी आपल्याकडे वेळ कमी आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून राज्य शासनाला सातत्याने मदतच मिळाली आहे.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की,

"नमो ज्ञानेश्वरा, नमो ज्ञानेश्वरा, निवृत्ती उध्दारा सोपानदेवा,

नमो मुक्ताबाई त्रैलोक्य पावनी, आदि त्रये जननी, देवाचिया."

श्री. संत निळोबा यांचे हे वाक्य आहे. महाराष्ट्राची ओळख ही संत भूमी म्हणून आहे. महाराष्ट्राच्या घराघरात व्यापून असलेल्या भागवत धर्माचा पाया ज्यांनी रचला असे महाराष्ट्राचे वैभव असलेले माऊली संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, त्यांचे सदगुरु श्री. संत निवृत्ती महाराज, धाकटे बंधू श्री संत सोपानदेव महाराज, भगिनी आदिशक्ती श्री संत मुक्ताबाई या चारही संतांचे हे सप्त शतकोत्तर रौप्य महोत्सवी अर्थात ७२५ वे समाधी वर्ष आहे. या निमित्ताने मी सर्व प्रथम या संतांना आणि त्यांच्या कर्तृत्वाला शत् शत् नमन करतो आणि त्याचवेळी ही खंत देखील व्यक्त करतो की या संदर्भात आपण कुठलाही कार्यक्रम आखलेला नाही. या थोर संत परंपरेचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रामध्ये या महत्त्वाच्या सोहळयाच्या निमित्ताने आपण तरतूद केली पाहिजे. या सर्व संतांच्या समाधी स्थानावर म्हणजे आळंदी, त्र्यंबकेश्वर, सासवड, मुक्ताईनगर या ठिकाणी विशेष निधी देऊन तेथील विकास आपण केला पाहिजे. भाविकांसाठी सोयी सुविधा वाढविल्या पाहिजेत आणि या वर्षीच्या आषाढी वारीमध्ये या संतांच्या पालख्यांची विशेष सजावट ही सरकारच्या माध्यमातून केली पाहिजे अशी विनंती मी आपल्याला करतो.

अध्यक्ष महोदय, मी आता माझ्या शेवटच्या विषयाकडे वळतो आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नाविन्यता विकास या विभागाला ६१५ कोटी इतका नियतव्यय दिला.अल्पसंख्याक विकास विभागास ६७७ कोटी रुपये नियतव्यय दिला.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस....

कारण या विभागाचे माननीय मंत्री श्री. नवाब मलिक हे तुरुंगात आहेत. ठीक आहे,उद्या त्यांच्या बेलचा विषय आहे त्यांना बेल मिळेल किंवा नाही, हे जे काही असेल ते मला माहीत नाही. माझा मुद्दा असा आहे की, आताच्या सरकारला असे वाटते काय की, अल्पसंख्यांक विभागाशी संबंधीत लोकांचा कुठेतरी दाऊदशी संबंध आता तरच त्यांना आपण काम द्यायचे, असे कुठे मत आहे काय ? अध्यक्ष महोदय, माझ्याकडे असणारा पेनड्राईव्ह आता मी आपल्याकडे पाठवतो.

(माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय तालिका सभाध्यक्षांकडे पेनड्राईव्ह सुपुर्द केला.)

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) :** माननीय विरोधी पक्ष नेते मी आपल्याला सांगू इच्छितो की, आता आपल्याकडे आपल्या पक्षामार्फत बोलण्यासाठी फक्त एक मिनिट राहिला आहे. सभागृहाने आपली वेळ वाढवली तर माझी काही हरकत नाही. परंतु आता जी वेळ दिलेली आहे त्यानुसार मी सांगत आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, ठीक आहे, माझी काही हरकत नाही. कारण मी शेवटचाच मुद्दा मांडत आहे आणि तो तीन मिनिटांमध्येच मांडणार आहे.

अध्यक्ष महोदय, पोलिसांच्या बदल्यांचे रॅकेट तसेच महाकत्तलखाना ही आपण बघितला आहे. आता मी आपल्याला जो पेनड्राईव्ह दिलेला आहे त्यामध्ये मोहम्मद अर्शद खान आणि डॉ. मुद्दस्सिर लांबे असे दोन पात्र आहेत. डॉ. मुद्दस्सिर लांबे हे कोण आहेत तर आपल्या सरकारमधील माननीय अल्पसंख्यांक मंत्र्यांनी ज्यांना वक्फ बोर्डावर सदस्य म्हणून नेमले आहे. दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी डॉ. मुद्दस्सिर लांबे यांच्या विरोधात एका ३३ वर्षीय सामाजिक कार्यकर्तीने बलात्काराची तक्रार दाखल केली. त्या तक्रारीत त्या असे म्हणतात की, जेव्हा तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला तेव्हा डॉ. लांबे यांनी लग्न करण्याची तयारी दर्शवली मात्र त्यानंतर गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली. त्यानंतर या महिलेने तक्रार दिली. दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी ही घटना घडली आणि

श्री. देवेंद्र फडणवीस....

लग्नाच्या आश्वासनामुळे ऑक्टोबर, २०२० पर्यंत त्यांनी पोलीस तक्रार करण्याची वाट पाहिली असे त्यांनी म्हटले आहे. ही घटना कळल्यानंतर या महिलेच्या पतीने तीला घटस्फोट दिला असेही म्हटले आहे. या महिलेने आत्महत्या करण्याचा इशारा दिला आणि त्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. आता बलात्काराची तक्रार होऊनही डॉ. लांबे हे बाहेर आहेत आणि त्यांच्यावर कारवाई झाली नाही. परंतु डॉ. लांबे यांनी या महिलेच्या पतीविरुद्ध चोरीची तक्रार केली आणि तो आता अटकेत आहे. दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी ही तक्रार शिळ डाईघर, पोलीस स्टेशन,ठाणे येथे दाखल झाली. याच्या सर्व कॉपी माझ्याकडे आहेत. यापेक्षाही गंभीर बाब पुढे आहे. वक्फ बोर्डावर नियुक्त केलेले डॉ. लांबे हे आपला विस्तृत परिचय देत आहेत. मी त्याची ऑडिओ सिडी आपल्याला दिलेली आहे. मी आपल्याला जो पेनड्राईव्ह दिला आहे त्यामध्ये त्याचे सर्व ऑडिओ आहेत. डॉ. लांबे यांचा मोहम्मद अर्शद यांच्याशी झालेला संवाद आहे. परिचया व्यतिरिक्त वक्फ बोर्डामध्ये कशी कमाई करायची याचा ही उल्लेख आहे. तो संवाद मी आपल्याला सांगतो.

"संवाद : सलाम वालेकुम

डॉ. लाम्बे : मेरा प्रॉब्लम क्या है मालुम.. मेरे ससूर दाऊद के राईट हॅण्ड थे पहले और मेरा रिश्ता जो हसिना आपा ने कराई थी. मेरे तरफ से सोहेल भाई थे और वहां से हसिना आपा थी. हसिना आपा याने दाऊद की बहन. हसिना आपा और साथ में इक्बाल कासकर की वाईफ. याने दाऊद की भाभी. जरा भी कुछ हुआ तो बात वहां तक पहुंचती है, कराची तक."

हे कोण सांगतय? तर आपल्या वक्फ बोर्डाचे मेम्बर. श्री अर्षद खान. तो ही हुशार आहे. तो काय म्हणतो?

अर्शद खान : तुमने उनके साथ श्री अन्वर का नाम तो सुना होगा. वह मेरे चाचा है. वो भी उसके साथ ही रहते थे. मतलब स्टार्ट से रहते थे. अभी इंतकाल हो गया उनका.

श्री. देवेंद्र फडणवीस....

डॉ.लांबे : मेरा ससूर पूरा कोकण बेल्ट संभालते थे. ब्लॅक बेल्ट थे और वे ही पूरा संभालते थे.

अर्शद खान : अच्छा. बॉम्बे में मेरे चाचा थे और पूरा संभालते थे. जब मैं मदनपुरा में था, भेंडी बाजार में मेरी पैदाईश है.

डॉ.लांबे : मेरे घर में कोई मसला होता है तो वहां तक पहुंचता है. सिधी बात सोहेल भाई तक पहुंचती है. अभी चार-पांच दिन से मेरे घर में मसला चल रहा है. लगता है कि अपनी आप की जान देने जैसा है.

अर्शद खान : इसलिए मैंने पूछा सही सही में तेरी कहानी क्या, तो बोली कुछ नहीं मेरा अपना टेंशन है.

डॉ.लांबे : अर्शद मैं बोलता हूं कि तुम अभी वकफ का काम पकड़ों, अभी अपने पास पॉवर है. अभी तुम चाहे जितना पैसा कमा सकते हो, पूरे वकफ के काम शुरु करो. कमाने का सेटींग करो. तुम्हारा आधा और मेरा आधा.

अर्शद खान : अभी मैं बैठूंगा और तुमसे पर्सनली ये सब चीज में बैठूंगा. अपना एक बंदा ले के आऊंगा और काम पकडुंगा.

डॉ.लांबे : मेरे माहिम में कैसा होता मालुम है क्या ? मेरे साथ क्या हुआ तो पूरे लोग साथ में आते है.

अर्शद खान : अर्षद के नाम से बिल्डिंग ले. अर्शद मेरा भरोसे का आदमी है. कई पलटी नहीं मारेगा.

डॉ.लांबे : तुम्हारे ऊपर इन्क्वॉयरी बैठ सकती है, लेकिन मेरे ऊपर नहीं बैठ सकती. "

यानंतर श्रीमती करंदीकर.....

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अर्शद खान यांचा ८९७६५१९१९५ या क्रमांकावरुन संवाद झाला. मुदस्सिर लांबे यांचा ९९३०९३५९९९ हा क्रमांक होता. अर्शद खान हे आता जेलमध्ये आहेत. ते ठाणे पोलिसांच्या ताब्यात आहेत. सुदैवाने त्यांचा मोबाईलही पोलिसांच्या ताब्यात आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, येथे विषय मांडल्यानंतर लगेच डिलीट होऊ देऊ नका. लगेच या बाबत कळवा. मी या ठिकाणी पूर्ण संवाद दिलेला आहे. ते डिलीट झाले तरी काही अडचण नाही, मात्र आपण या बाबत कळवावे. त्यांचा मोबाईल आपण जप्त करावा.

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, दाऊदची माणसे आपण वक्फ बोर्डात नियुक्त केली आहेत. या अर्थसंकल्पावर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, सरकार ४ गोष्टी कमी करेल, किंवा ४ गोष्टी जास्त करेल, ते आपण पाहून घेऊ. एखाद्या वर्षी कमी विकास होईल, तर एखाद्या वर्षी जास्त विकास होईल, ते ही चालण्यासारखे आहे. मात्र या राज्यात ज्यांनी बाँबस्फोट घडवले, अशा दाऊदसोबत ज्यांचे नाते आहे अशा लोकांना जर सरकार पाठीशी घालत असेल तर या राज्याचे कोणीही भले करु शकत नाही. यामुळे आता तरी या शासनाने जागे व्हावे, अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य आपल्या जागेवरुन घोषणा देतात )

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. भास्कर जाधव ):** सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांचे ९६ मिनिटांचे भाषण झाले आहे. आता शिवसेनेच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर भाषण करतील.

श्री. रविंद्र वायकर ( जोगेश्वरी पूर्व ) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाच्या सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचा सन २०२२ -२३ मधील अर्थसंकल्प माननीय उप मुख्यमंत्री यांनी दि. ११ मार्च, २०२२ रोजी सदनात सादर केला. या अर्थसंकल्पावरील आज सर्वसाधारण चर्चेचा पहिला दिवस आहे. या अर्थसंकल्पावरील चर्चेत विरोधी पक्षाचा भाषण करण्याचा पहिला हक्क असतो. त्यानुसार माननीय विरोधी पक्ष नेते यांचे भाषण आताच संपले आहे. त्यांनी या ठिकाणी अनेक विषय मांडले असून त्याचा उहापोह केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी या अर्थसंकल्पातील काही आकडेवारी सांगू इच्छितो. सन २०२१ -२२ च्या अंदाजपत्रकामध्ये ३ लाख ६८ हजार ९८७ कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित होती.

सन्माननीय सदस्य श्री

असुधारित प्रत

**घोषणा**

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव) :** सर्व सन्माननीय सदस्यांना विदित आहेच की, दिनांक ५ व ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी "राज्याचा अर्थसंकल्प – माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात" या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आले होते.

या कार्यशाळेतील मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शन पुस्तिका स्वरुपात सर्व सन्माननीय सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात येत आहे. शुक्रवार, दि. ११ मार्च २०२२ रोजी सभागृहास सादर झालेल्या अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग घेण्यासाठी तसेच, पुढील काळातही एक संदर्भ साहित्य म्हणून ही पुस्तिका उपयुक्त ठरणारी आहे.

तरी, सर्व सन्माननीय सदस्यांनी ही पुस्तिका आपल्या टपालखणातून प्राप्त करुन घ्यावी, अशी सूचना आहे.

......

असुधारित प्रत

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा
**मु.शी.:** सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु ...

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, जी महसुली जमा अपेक्षित होती, महसुली जमेचे सुधारित अंदाज ३ लाख ६२ हजार, १३२ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहेत. सन २०२१-२०२२ च्या एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ४ लाख, ३७ हजार, ९६१ कोटी रुपये व सुधारित अंदाज ४ लाख, ५३ हजार, ५४७ कोटी रुपये असून आपत्तीच्या काळात राज्यातील भरीव मदतीच्या कारणाने वर्षाच्या खर्चाच्या सुधारित अंदाजामध्ये वाढ झाली होती. माननीय श्री.अजित पवार यांनी सन २०२२-२०२३ चा जो अर्थसंकल्प या सभागृहास सादर केला, त्यामध्ये महसुली जमा ही ४ लाख, ३ हजार, ४२७ कोटी रुपये व महसुली खर्च ४ लाख, २७ हजार, ७८० कोटी रुपये अंदाजित केलेला आहे. परिणामी २४ हजार, ३५३ कोटी रुपयांची महसुली तूट येत आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प मांडत असताना प्रामुख्याने .... आताच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, जेव्हा आपण अर्थसंकल्प मांडतो.... गेल्या २ वर्षामध्ये म्हणजे, सन २०२०-२०२१, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ मध्ये कोविडची सुरुवात झाली. त्या कोविडच्या अनुषंगाने त्यांनी सांगितले की, ५२ टक्के विकास कामे झाली नाहीत किंवा झाली... त्या कोविडच्या वेळेस आपण संपूर्ण लक्ष आरोग्याकडे दिले होते. जी स्थिती महाराष्ट्राची होती, ती देशाची होती. जी देशाची होती, ती जगाची होती व जगाची आहे. अशा पध्दतीने त्यांनी आपले भाषण केले.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री यांनी एक केले. त्यांनी विकासाची पंचसूत्री दिली. त्यामध्ये ५ सूत्रे सांगितली. त्यावरच त्यांनी आपले संपूर्ण भाषण केले. माननीय वित्त मंत्री आपण प्रथम कृषीला महत्व दिले. त्या कृषी विभागावर

श्री.रविंद्र वायकर ...

आपण भाषण केले. आपण पंचसूत्रीमध्ये दुसरे आरोग्याच्या बाबतीत सांगितले. आरोग्यावर काय झाले, कसे झाले, केंद्राने काय मदत केली, कशा पध्दतीने केली, राज्याने किती केली, राज्याने कशी केली नाही, हे त्यांनी सांगितले. पंचसूत्रीतील तिसऱ्या मनुष्यबळ विकासाच्या बाबतीत ते बोलले. चौथ्या रस्ते व विकासाच्या बाबतीत त्यांनी मेट्रोचा, बुलेट ट्रेनचा विषय घेतला. हे बोलत असताना त्यांनी केंद्र शासनाच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये जे रस्ते विकासाचे काम आहे ते कसे ठप्प झाले आहे, हा विषय काही मांडला नाही. राज्य शासन कुठे चुकत आहे, एवढ्याच गोष्टी दाखविण्याचे काम त्यांनी केले. पाचव्या उद्योगाच्या बाबतीत आम्ही किती अग्रेसर होतो, तुम्ही किती कमी आहात असे त्यांनी सांगितले. परंतु, २ वर्षांपूर्वी संपूर्ण जगच ठप्प झाले होते. त्या ठिकाणी आपण आपली शेखी मिरवायची की, २ वर्षांमध्ये उद्योगाला काही एवढी चालना मिळाली नाही. त्या दृष्टीने वित्त मंत्री महोदय आपण जो अर्थसंकल्प मांडलेला आहे. त्यावर मी माझे विचार मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, पंचसूत्रीतील प्रथम बाब असलेल्या कृषीबाबत आपण एक खरी गोष्ट सांगितली की, नियमित पीक कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना आपण त्यावेळेस प्रोत्साहन योजना जाहीर केली होती. ही प्रोत्साहनपर योजना ज्यावेळेस आपण जाहीर केली होती त्यावेळेस ज्या शेतकऱ्यांनी पीक कर्जफेड वेळेत केलेली असेल, त्यांना आपण ५० हजार रुपये अनुदान देण्याचे घोषित केले होते. परंतु, कोविडच्या काळात आम्ही ते देऊ शकलो नाही. कोवडच्या काळात ते देऊ न शकल्याने आम्ही ते आता देत आहोत, असे आपण सांगितले. खरे बोलायला देखील मनाचा मोठेपणा लागतो. माननीय श्री.अजित पवार आपण आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात हे बोलून दाखवले की, मी ते देऊ शकलो नाही. अर्थव्यवस्थेला ज्या पध्दतीने गती दिली पाहिजे होती, मी जे मुद्दे सांगितले होते ते मी २ वर्षामध्ये चांगल्या तऱ्हेने करु शकलो नव्हतो...

नंतर श्री.शिंदे ...

श्री.रवींद्र वायकर...

ते मी आता करण्यास तयार आहे, असे माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय भाषण पुढे नमूद आहे की, कोविडमुळे मंदावलेल्या राज्याचा आर्थिक विकास अधिक गतीमान करण्यासाठी महाविकासाची पंचसुत्री या विशेष कार्यक्रमाचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील ३ वर्षांच्या कालावधीत या कार्यक्रमासाठी सरकार सुमारे ४ लाख कोटी रुपये उपलब्ध करुन देईल. त्यातून राज्याच्या अर्थव्यवस्थेत भरीव गुंतवणूक होईल व महाराष्ट्र राज्य हे देशातील १ ट्रीलीयन डॉलर अर्थव्यवस्था असलेले राज्य ठरेल.

अध्यक्ष महोदय, जीएसटीचे परिपूर्ण पैसे देण्यात येत नव्हते त्यावेळी केंद्र शासनाने कर्ज घेतले होते. राज्य चालवावयाचे असेल तर नफा व तोटा पहावयाचा नसतो, असे म्हटले आहे. प्रबळ अर्थव्यवस्था उभी करण्यासाठी ४ लाख कोटी रुपये ३ वर्षासाठी घेण्यात येणार आहेत. या सरकारची २ वर्षे वायफळ गेली असतानाही ४ लाख कोटी रुपये कर्जरुपाने किंवा अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून उभे करण्यात येणार आहेत व विकासाला चालना देण्यात येणार आहे, असा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय भाषणात नमूद करण्यात आले आहे की, कोविड कालावधीत शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देऊ शकलो नाही परंतु यावेळी ते बळीराजाला देण्यात येतील. या मदतीच्या निर्णयाचा फायदा वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या राज्यातील २० लाख शेतकरी बांधवांना मिळणार आहे. त्यासाठी त्यांनी उल्लेख केला आहे की, आपण बोललात परंतु तसे केले नाही. याकरिता माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, मी त्यावेळी करु शकलो नाही म्हणून यावेळी करीन.

अध्यक्ष महोदय, प्रधान मंत्री पीक योजनेच्या संदर्भात आपणा सर्वांना माहिती आहे. पूर, वादळ, दुष्काळ येतो, पिकांवर कीड पडते यासाठी सन २०१६ च्या खरीप

श्री.रवींद्र वायकर...

हंगामापासून प्रधान मंत्री पीक विमा योजना राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सदरहू योजनाधारक शेतकऱ्यांना ज्यावेळी शेतकऱ्यांच्या पिकावर संकट आले त्यावेळी पीक विमा कंपनीने त्यांना नुकसान भरपाई द्यावयास पाहिजे होती. परंतु ती त्या पद्धतीने दिली नाही. पीक विमा योजनेंतर्गत असलेल्या जाचक अटी व विमा कंपन्यांचा वेळ काढूपणा व बनवेगिरी केली. केंद्र सरकारचा त्या कंपन्यांवर वरदहस्त होता. त्या कंपन्यांनी शेतकऱ्यांना नुकसानीच्या प्रमाणात विमा दिला नाही. त्यामुळे राज्यातील शेतकरी पीक विमा काढण्यास फारसे उत्सुक नसतात. देशामध्ये सन २०१६ मध्ये पीक विमा योजना सुरु करण्यात आली होती व सन २०१८ मध्ये देशातील २२ राज्यातील २.१६ कोटी शेतकरी विमा योजनेत सहभागी झाले होते. त्यानंतर सन २०१९ मध्ये २० राज्यांतील २ कोटी पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला होता. सन २०२० मध्ये १९ राज्यातील १.६७ कोटी शेतकरी पीक विमा योजनेत सहभागी झाले होते. माहे जून, २०२१ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांचे पीक विमा घेण्याची मानसिकता होत नाही. कारण पीक विमा कंपन्या नुकसानीच्या प्रमाणात विमा देत नाहीत. त्यामुळे राज्यातील ही संख्या ५१.४६ लाख इतकी झाली आहे. प्रधान मंत्री पीक विमा योजना ज्या पद्धतीने चालवावयास पाहिजे होती ती त्या पद्धतीने चालविण्यात आली नाही. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान लक्षात घेऊन या सरकारने माननीय प्रधान मंत्री यांची भेट घेऊन योजनेत बदल करण्याची विनंती केली होती.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर........

आपल्या भाषणामध्ये माननीय अर्थ मंत्री यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांची झालेली नुकसानभरपाई देण्यासाठी अन्य पर्याय व्यवस्था निर्माण करण्याबाबत सूचक विधान केलेले आहे. केंद्र सरकारच्या विमा कंपनीकडून राज्यातील शेतकऱ्यांना पैसे प्राप्त होत नसतील तर राज्य सरकारला वेगळा पर्याय निवडावा लागेल, अशा प्रकारचा एक सूचक इशाराच त्यांनी दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्रांमार्फत अनेक पिकांचे संशोधन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या संशोधन केंद्रामार्फत हळदीचे संशोधन करण्यास विशेष प्राधान्य दिलेले आहे, असे अर्थसंकल्पामध्ये नमूद केले आहे. हिंगोली येथे माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी व त्यावर चांगल्या प्रकारे संशोधन करण्यासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अशा प्रकारच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करणे अत्यंत गरजचे आहे. या अर्थसंकल्पामध्ये कोकण कृषी विद्यापीठ व परभणी येथील कृषी विद्यापीठाला प्रत्येकी ५० कोटी रुपये देण्याची तरतूद केलेली आहे. कृषी विद्यापीठांनी एखाद्या पिकांचे संशोधन केले नाही तर त्यातून काहीही साध्य होणार नाही.

अध्यक्ष महोदय, हळदीवर संशोधन करण्याबाबत माननीय श्री. हेमंत पाटील यांनी मोठ्या प्रमाणावर पाठपुरावा केलेला आहे व याबाबत अनेक बैठका देखील घेतलेल्या आहेत. माननीय श्री.हेमंत पाटील यांनी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये स्थापन करण्यात आलेल्या हळद संशोधन प्रक्रिया केंद्र अभ्यास समितीच्या अनेक बैठका घेऊन त्यास राज्य सरकारची मंजुरी घेतलेली आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाने उक्त संशोधन केंद्रास १०० कोटी रुपयांचा निधी देखील उपलब्ध करुन दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासन अशा प्रकारच्या संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देत आहे. परंतु उक्त निधीच्या माध्यमातून पिकांवर

श्री.रविंद्र वायकर........

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.कुणाल पाटील)**

चांगल्या प्रकारे संशोधन करणे आवश्यक आहे. तसेच संशोधन केंद्रामार्फत पिकांचे संशोधन केले जात आहे की नाही, हे पाहणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, आंब्यामध्ये कधी-कधी लासा पडतो तर कधी-कधी महोर गळून पडतो. यावर काय संशोधन केले पाहिजे हे आमच्या संशोधकांना अजूनपर्यंत कळालेले नाही. प्रामुख्याने कोकणामध्ये हापूस आंब्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्यामुळे मी पालकमंत्री असताना दापोली कृषी विद्यापीठामध्ये एक बैठक घेऊन याबाबत सविस्तर चर्चा केली होती. त्यावेळी असे सांगितले की, कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर आंब्याचे उत्पादन घेतले जाते. कोकणातील आंबा लवकर का नासतो, महोर का गळते, यावर आपण का संशोधन करीत नाही? यावर संशोधन करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यावेळी मी सांगितले की, आपण शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जाऊन त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. आंब्यावर पडणाऱ्या रोगांचा विचार करुन आपण संशोधन करणे आवश्यक आहे. असे अनेक सूचना मी केल्या होत्या. या शासनाने दोन्ही विद्यापीठांना प्रत्येकी ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी या सरकारचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, हिंगोली येथे २५ कोटी रुपये खर्च करुन ॲग्री बायोटेकची प्रयोगशाळा उभारली जात आहे. हिंगोली येथे सदर संशोधन केद्रांमुळे हळद उत्पादनाच्या आघाडीवर असलेल्या हिगोंली जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नावलौकिकाला येईल, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यातील ५५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे एकूण पिकाखालील २२५ लाख हेक्टर क्षेत्रापैकी ८० टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. त्यामुळे राज्यातील सिंचनाचे प्रमाण वाढविण्यासाठी या सरकारला जे जे करणे शक्य आहे, ते ते करणे अत्यंत गरजेचे आहे. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. परंतु ते पाणी नदीच्या माध्यमातून समुद्रामध्ये जात आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर....

जसे कोयना धरणावर वीज निर्माण केले जाते. त्या धरणातील पाणी वशिष्ठी नदीच्या माध्यामतून पुढे समुद्राला मिळते. ते पाणी थांबवून ग्रॅव्हिटेश्नल फोर्सच्या माध्यमातून संपूर्ण विभागाला देण्याचा प्रयत्न केला तर कोरडवाहू जमिनीचा पाण्याचा प्रश्न सुटेल.

अध्यक्ष महोदय, कोरडवाहू जमिनीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे की, ८० टक्के क्षेत्र कोरडवाहू असून सदर शेतातील पिकाच्या उत्पादनात पावसाच्या अनियमिततेमुळे सातत्याने चढ ऊतार होत असतो. त्यामुळे शेततळयांचा निर्णय घेतला आहे. शेततळयांच्या अनुदानात ५० टक्के वाढ करुन यात आता ७५ हजार रुपयांचे अनुदान करण्यात येत आहे. या निर्णयाबाबत मी राज्य सरकारने अभिनंदन करतो. आता ७५ हजार रुपयांमध्ये शेतकऱ्यांची शेततळे होतील. या निर्णयाचे मी अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, महिला शेतकरी व शेतमजुरांच्या कुटुंबांचा शेतीमध्ये हातभार लागतो. राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या दूर करण्याची आवश्यकता ओळखून यात आवश्यकतो बदल करण्यात आला आहे. शेतकरी महिला, महिला मजूरांसाठी महिला सन्मानवर्ष जाहीर केले आहे, त्याबाबत मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो. शेतकरी महिला, महिला उद्योजक यांच्या मालावर प्रक्रिया व्हावी, त्यास गती मिळावी, त्यांना स्टॉल निर्माण करुन देणे, यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे. महिला बचत गटांना राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी सातबारा उताऱ्यावर त्यांचे नाव असले पाहिजे. त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी या सरकारने विचार केला आहे. याबाबत मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, भारतातील अन्न प्रक्रिया उद्योग पाचव्या क्रमांकावर आहे. राज्यातील जवळपास ६५ टक्के लोकसंख्या कृषि व कृषि संलग्न क्षेत्राशी जोडलेली आहे. शेतीच्या माध्यमातून पिकविण्यात आलेल्या पिकांचे मुल्यवर्धन करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापित करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच अन्न प्रक्रियेद्वारे उत्पादित मालास ग्राहकांची पसंती, बाजारपेठ

श्री. रविंद्र वायकर....

निर्माण करणे व  निर्यातीस प्रोत्साहन देण्यात येत आहे. लघू व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य देण्यसाठी गती दिली तर अधिक चांगले होईल. याबाबतचा निर्णय माननीय वित्त मंत्री यांनी घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बळकटीकरणासाठी स्तुत्य उपक्रम राज्य सरकार राबवित आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये ज्यावेळेस लोक शेतमाल घेऊन जातात त्यावेळेस त्यांना सोयी सुविधा, जागा पाहिजे असते. परंतु शेतकरी या सुविधा स्वत: घेऊ शकत नाहीत. जवळपास ३०७ कृषि उत्पन्न बाजार समितीला बळकटी मिळणार आहे. अर्थसंकल्पामध्ये शासनाने दोन हजार कोटी रुपयांच्या या निधीची घोषणा केली आहे. बाजार समितीला पायाभूत सुविधांसाठी कर्जावरील व्याजाची १०० टक्के परतफेड शासनाकडून मिळणार आहे. याकरिता १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. याबाबत मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो. यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती अधिक बळकट होतील. या माध्यमातून शेतकऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत.

अध्यक्ष महोदय, शासनाने कृषि निर्यात धोरण जाहीर केले आहे. कोरोना काळात कृषि क्षेत्रातील उलाढाल वाढली होती. याकरिता राज्य शासनाने चांगला प्रयत्न केला होता.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर.....

माननीय मुख्यमंत्री व माननीय अर्थमंत्र्यांनी यादरम्यान 'विकेल ते पिकेल' ही संकल्पना मांडली. ज्या गोष्टी बाजारात विकल्या जातील त्याच गोष्टी पिकविल्या पाहिजेत व त्यांना उत्तम दर मिळाला पाहिजे अशी त्यामागील भूमिका होती. देशाच्या एकूण कृषी निर्यातीपैकी ७० टक्क्यांहून अधिक निर्यात आपल्या राज्यातून होते व त्याला या संकल्पनेच्या माध्यमातून आपण अधिक गती दिली. कोविड काळात इतर क्षेत्रांना काही मर्यादा होत्या परंतु कृषी क्षेत्राच्या बाबतीत मात्र तशी परिस्थिती नव्हती. त्यामुळे कृषी उत्पन्नामध्ये सुमारे १४ टक्क्यांची वाढ नोंदविली गेली. राज्यातील २६ उत्पादनांना भौगोलिक मानांकन देखील मिळाले ही गोष्ट देखील राज्यासाठी भुषणावह आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील सन्माननीय सदस्यांना माहिती असेल की मुंबईतील परळ येथे बैल-घोडा पशुवैद्यकीय महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाची स्थापना ऑगस्ट, १८८६ मध्ये झालेली आहे. या महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सुमारे ६० ते १२० वर्षे जुन्या १३ इमारती आहेत. तो वारसा जपणे अत्यंत गरजेचे होते. त्या अनुषंगाने सरकारने सुरुवातीचा निधी म्हणून १० कोटी रुपयांची घोषणा केली आहे. इतिहासकालीन इमारतींचे वैभव कायम ठेवण्यासाठी शासनाने हा जो निर्णय घेतला आहे तो अतिशय चांगला आहे.

अध्यक्ष महोदय, कोकण, महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचा मुद्दा म्हणजे बैलगाडी शर्यत. बैलगाडा शर्यत हा महाराष्ट्र राज्याचा पारंपारिक खेळ आहे. या खेळामध्ये संस्कृतीचे दर्शन होते. आपल्या संस्कृतीमध्ये पशुधनाला दैवताचे स्थान दिलेले आहे. बैलपोळा सणाच्या दिवशी शेतकरी बैल, गायी यांची पुजा करतात. पोटच्या मुलाप्रमाणे शेतकरी या जनावरांची काळजी घेत असतो. परंतु बैलगाडा शर्यतींवर अनेक दिवसांपासून बंदी घालण्यात आली होती. सदर बंदी उठविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा देण्यात आला.

अध्यक्ष महोदय, वीस-पंचवीस वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील प्रत्येक शेतकऱ्याच्या दारात खिल्लारी गाई असायच्या.

श्री.रविंद्र वायकर.....

खिल्लार गायींच्या दुधांपासून अतिशय चांगली ऊर्जा मिळते. महाराष्ट्रातील शेतकरी व बैल आणि बैलगाडा शर्यत यांचे नाते पूर्वापार चालत आलेले आहे. ट्रॅक्टर नसताना संपूर्ण शेती बैलांच्या मार्फतच केली जात होती. आपले शेतकरी बैलांना दैवत मानून त्यांची पूजा करतात. याच सर्वांचा परिपाक म्हणजे बैलगाडा शर्यत सुरु करण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा दिला गेला. सर्वोच्च न्यायालयाने बैलगाडा शर्यतीसाठी परवानगी दिल्यामुळे शेतकरी वर्ग अतिशय खुश झाला आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी शासनाचे आभार मानले आहेत. बैलगाडा शर्यत पुन्हा सुरु व्हावी यासाठी ज्यांनी-ज्यांनी लढा दिला आहे त्या सर्वांचे देखील मी या निमित्ताने अभिनंदन करतो. ही शर्यत पुन्हा सुरु झाल्यामुळे आपल्या परंपरेचे आणि पशुधनाचे वैभव पुन्हा पाहता येणे शक्य होणार आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या पंचसुत्रीमध्ये आरोग्याचा समावेश आहे. त्यामध्ये हाफकिन इन्स्टिटयुटचा उल्लेख करण्यात आला आहे. सन २०२० मध्ये कोविडची साथ आली त्यावेळी विधीमंडळाचे अधिवेशन सुरु होते. दिनांक २० मार्च रोजी अधिवेशन संस्थगित होणार होते परंतु आपण त्यापूर्वीच म्हणजे १५ मार्च रोजीच अधिवेशन संस्थगित केले होते. त्यावेळी आपल्याला सांगितले गेले होते की, २१ दिवसांमध्ये कोविडची साथ आटोक्यात येईल. केंद्र व राज्य शासनाने वेगवेगळे नियम घालून दिले. कोविडची लस व उपचारांबाबत त्यावेळी कोणालाही काहीही माहिती नव्हती.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. रविंद्र वायकर...

माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी ज्या पध्दतीने धैर्याने महाराष्ट्र पुढे नेण्याचा प्रयत्न केला, त्याचे देखील कौतुक होणे गरजेचे आहे. ज्यावेळी ही परिस्थिती निर्माण झाली, त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी टी.व्ही.च्या माध्यमातून ते लोकांच्या समोर आले. दर १५ ते २० दिवसातून लोकांच्या समोर येऊन राज्याची स्थिती काय आहे याची माहिती लोकांना दिली. कशा पध्दतीने आपण काम करतो आणि कशा पध्दतीने नियमांचे पालन केले पाहिजे या सर्व गोष्टींचे मार्गदर्शन केले.

अध्यक्ष महोदय, मला आणखी एक बाब सांगावीसी वाटते की, परवा जो अर्थसंकल्प आपण सभागृहामध्ये मांडला, त्याचे प्रक्षेपण मिडीयाच्या इतर सर्व वाहिन्यांनी दाखविले. परंतु मला हे कळत नाही की, गेल्या वर्षी आणि याही वर्षी दूरदर्शनने त्या अर्थसंकल्पाचे प्रक्षेपण केले नाही. दूरदर्शन हे केंद्र शासनाच्या अखत्यारित असल्यामुळे राज्य शासनाचा बजेट त्यांनी दूरदर्शनवरुन दाखवायला पाहिजे होता. इतर सर्व चॅनेल्स तो दाखवित असताना दूरदर्शनने का दाखविला नाही, याची देखील आपण उत्तराच्या भाषणतून सभागृहाला माहिती दिली तर बरे होईल अशी मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळात मुंबई महानगरपालिकेने केलेले कार्य देखील कौतुकास्पद आहे. मुंबईच्या ४३७ कि.मी.च्या परीघ क्षेत्रफळामध्ये लोकसंख्येची घनता जवळपास १ कोटी २५ लाख इतकी आहे. मुंबई शहरात कोविड कशा पध्दतीने पसरले याची जाणीव नव्हती. त्याला कसे रोखायचे हे देखील माहिती नव्हते. पण त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी लोकांचे जे प्रबोधन केले ते खरोखरच वाखाणण्याजोगे आहे आणि म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आपल्या सर्वांच्या वतीने अभिनंदन करु इच्छितो. ज्या दिवशी त्यांनी आपल्या सर्वांवर बंधन घातले तो दिवस आणि आजचा दिवस. म्हणजे आज आपण या सभागृहामध्ये मास्क काढून भाषण करतो. हे आपल्याला आठवावे लागते. कोविडच्या काळात आपल्यापैकी अनेक आमदार बाधित झाले होते. मी देखील बाधित झालो होतो. पण ज्या पध्दतीने माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची आणि मुंबई महानगरपालिकेची यंत्रणा

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर...

राबविली त्याला खरोखरच माझा सलाम आहे.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळात सर्वच रुग्णालयांची चांगले काम केले. पण "सेवन हिल" नावाच्या रुग्णालयाने जे स्तुत्य काम केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. मुंबई महानगरपालिकेने केलेले कर्तव्य सुध्दा कौतुकास्पद आहे. इतर रुग्णालयांनी केलेल्या कार्यबद्दल दुमत नाही. परंतु "सेवन हिल"च्या बाबतीत राज्यात कुठूनही फोन आला तरी ते सांगायचे की आम्हाला इतर ठिकाणी नको. पण "सेवन हिल" रुग्णालयात दाखल करा. त्यामुळे तेथील डीन आणि ओएसडी यांनी जे कर्तव्य बजावले, त्याबद्दल त्यांना पारितोषिक देणे अत्यंत गरजेचे आहे. अशा पध्दतीने ज्या डॉक्टर्स आणि डीन्स यांनी चांगली कामे केली आहेत त्यांना राज्य शासनाच्या माध्यमातून किंवा मुंबई महापालिकेच्या माध्यमातून पारितोषिक दिले पाहिजे. ज्या पध्दतीने के.ई.एम. रुग्णालयाचे डेप्युटी डीन यांनी ते रुग्णालय चालविले त्या पध्दतीने सेवन हिल रुग्णालयातील ओएसडी श्री. कुंभार यांनी कर्तव्य बजाविले आहे. म्हणून त्यांचे अभिनंदन केल्याशिवाय रहावेसे वाटत नाही. त्यामुळे मी त्या सेवन हिल रुग्णालयात जाऊन त्या सर्व डॉक्टरांचे आभार मानले आणि त्यांचे अभिनंदन केले. कारण त्यांनी केलेले काम हे खरोखरच गौरव करण्यासारखे होते. कोविडमुळे मी ११ दिवस त्या रुग्णालयात ॲडमिट होतो. आमदार म्हणून त्यावेळी त्यांनी मलाच नव्हे तर कोविडच्या प्रत्येक सर्वसामान्य रुग्णांची ज्या पध्दतीने सेवा केली किंवा त्यांची ज्या पध्दतीने काळजी घेतली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी ते पात्र आहेत.

अध्यक्ष महोदय, कोविडमध्ये कोव्हॅक्सीन आणि कोविशिल्ड अशा २ लसी आल्या आहेत. कोविशिल्ड लस आपण सर्वांना देण्यासाठी सुरूवात केली आणि त्यानंतर कोव्हॅक्सीन आले. आम्ही पाहिले की, माननीय पंतप्रधान यांनी कोणती लस घेतली तर कोव्हॅक्सीन आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणती लस घेतली तर कोव्हॅक्सीन. त्यामुळे आपणही कोव्हॅक्सीन घेऊ.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री.रविंद्र वायकर....

विमान सुरु झाल्यानंतर ज्या कोविड पेशंटनी लस घेतली त्यांना प्रवास अलाऊ केला. परंतु ज्यांनी कोव्हॅक्सिन ही लस घेतली त्यांना प्रवास अलाऊ केला नाही. का केला नाही ? डब्ल्यूएचओच्या माध्यमातून कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिन देण्याचे मान्य केल्यानंतर कोविशिल्ड घेतलेल्या लोकांना परदेशात जाण्यासाठी मान्यता दिली जाते परंतु कोव्हॅक्सिन घेतलेली नसेल त्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी जायचे होते त्यांनी काय करायचे हे मोठे प्रश्नचिन्ह होते. डब्ल्यूएचओ सांगत आहे, केंद्र शासन व राज्य शासन त्यासाठी मान्यता देते, टास्कफोर्सची समिती त्याला मान्यता देते तरी देखील कोव्हॅक्सिन ही लस घेतलेली आहे त्यांना परदेशात जाता येत नव्हते. परंतु आता यासाठी परवानगी दिली आहे, ती कशी आणि का दिली हे मला माहीत नाही. त्यावरही प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे ही लस भारतात तयार व्हावी याच्या अनुषंगाने हाफकिन इन्स्टिटयुटमध्ये देखील अनेक लसींची उत्पत्ती होते. त्या पद्धतीने मुंबई महानगरपालिका त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करते. परंतु परेल येथील हाफकिन इन्स्टिटयुटला निधी दिलेला नाही.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील) :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सायंकाळी ५.०० वाजता माननीय गृह मंत्र्यांचे नियम २९३ च्या प्रस्तावावरील उत्तर होणार आहे. त्यामुळे आपण दोन ते तीन मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, मी या विषयावर ऑनलेग राहिल कारण माझे दोनच विषय झालेले आहे. आता जर आपण चार मिनिटे दिली तर तेवढया वेळात बोलून बाकीच्या विषयावर बोलण्यासाठी मी ऑनलेग राहिल.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या सहाय्याने मेसर्स भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड, हैद्राबाद या कंपनीकडून कोविड-१९च्या साथरोगाचे लसींचे उत्पादन, तंत्रज्ञान घेऊन महामंडळाच्या परेल, मुंबई जागेत जवळ जवळ १५४ कोटी भांडवली खर्चाच्या कोव्हॅक्सिन लस उभारण्याचा प्रकल्प सुरु करीत आहोत. यासाठी जे साहित्य किंवा

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर....

इतर ज्या बाबी लागतात यासाठी अर्थसंकल्पामध्ये ताबडतोब देण्याची प्रोव्हिजन केलेली आहे. आपण म्हणता ती प्रोव्हिजन दिलेली नाही. परंतु ती प्रोव्हिजन दिली जाणार आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून एकदा डायरेक्शन गेल्यानंतर त्या पद्धतीने हाफकीनने देखील यावर प्रतिबंधात्मक लस सुरु करण्यासाठी सुरुवात केलेली आहे. सदरहू प्रकल्पाकरिता ९४ कोटी रुपये अर्थसहाय्य राज्य शासनाच्या आकस्मिक निधीतून मंजूर करण्यात आले असून केंद्र शासनाच्या माध्यमातून ६५ कोटी रुपये इतके अर्थसहाय्य मंजूर केले आहेत. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार मी आपल्याला सांगू इच्छितो की, यासाठी केंद्र शासन देखील अर्थसहाय्य देत आहे. कारण मघाशी आपण सांगितले केंद्र शासनाचा कधी उल्लेख केला जात नाही. परंतु असा दुजाभाव महाराष्ट्रामध्ये कधी झालेला नाही आणि आम्ही तसे करीतही नाही. त्यामुळे हाफकिन इन्स्टिटयुटमध्ये कोव्हॅक्सिन लसची निर्मिती करण्यासाठी जो निधी लागेल तो राज्य आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणार आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी हाफकिन इन्स्टिटयुटने ज्या पद्धतीने लसींचा शोध लावला आहे त्यासाठी मुंबई किंवा महाराष्ट्रामध्येच नव्हेतर पूर्ण जगामध्ये त्या लसींना मागणी असते. कोविड-१९ ची साथ ज्यावेळी सुरु झाली त्यामुळे आम्ही ७ किंवा १४ दिवस किंवा २१ घरामध्ये बसलो होतो, टाळया वाजवल्या, आम्ही मेणबत्या पेटवल्या, दिवे लावले, घंटा वाजविल्या हे सर्व काही केले. तर हे सर्व मॅनमेड होते असे म्हणतात जैविक नव्हते. हा जिवाणू नव्हेतर विषाणू आहे. यावर कोणतेही औषध नव्हते त्यामुळे हे सर्व भक्तिभावाने केले होते, ही वेगळी बाब आहे. आपण आणि माननीय पंतप्रधानांनी सांगितल्यामुळे आम्ही ते मान्य केले. ....(अडथळा).. अध्यक्ष महोदय, मी ऑनलेग राहतो.

**तालिका सभाध्यक्ष** : आता माननीय गृह मंत्री नियम २९३ च्या प्रस्तावाला उत्तर देतील.

यानंतर श्रीमती करंदीकर..

**पृ.शी:** राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, मराठा व ओबीसी समाजाला आरक्षण मिळणे, परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा संप व स्पर्धा परीक्षांमध्ये झालेले घोटाळे

**मु.शी:** राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, मराठा व ओबीसी समाजाला आरक्षण मिळणे, परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा संप व स्पर्धा परीक्षांमध्ये झालेले घोटाळे या विषयावर सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीश महाजन, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री रणधीर सावरकर, जयकुमार रावल, संभाजी निलंगेकर-पाटील, नितेश राणे, अतुल भातखळकर, डॉ.संजय कुटे, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, योगेश सागर, सुभाष देशमुख, राम कदम, डॉ.सुरेश खाडे, सर्वश्री अमित साटम, सुनिल राणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, देवयानी फरांदे, मनिषा चौधरी, सर्वश्री हरिभाऊ बागडे, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.राहुल आहेर, सर्वश्री समिर कुणावार, मोहन मते, डॉ.देवराव होळी, श्री समीर मेघे, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्रीमती नमिता मुंदडा, सीमा हिरे, मोनिका राजळे, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, राम सातपुते, श्रीमती विद्या ठाकूर, ॲड पराग अळवणी, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, महेश लांडगे, लक्ष्मण जगताप, सुनिल कांबळे, अभिमन्यू पवार, सचिन कल्याण-शेट्टी, जयकुमार गोरे, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, ॲड आकाश फुंडकर, सर्वश्री हरिष पिंपळे, दादाराव केचे, टेकचंद सावरकर, प्रा. डॉ. अशोक उइके, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, मदन येरावार, नारायण कुचे, प्रशांत बंब, कॅ. आर तमिल सेल्वन, ॲड.राहुल कुल, सर्वश्री भिमराव तापकीर, कालीदास

असुधारित प्रत

कोळंबकर, डॉ.विजयकुमार गावित, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, राजेंद्र पाटणी, ॲड राहुल नार्वेकर, सर्वश्री विजयकुमार देशमुख, कृष्णा गजबे, तानाजी मुटकुळे, राजेश पवार, संतोष दानवे, रविंद्र चव्हाण, बबनराव लोणीकर, अतुल सावे, पराग शाह, समाधान आवताडे, संजय सावकारे, मंगेश चव्हाण, मिहिर कोटेचा, गणपत गायकवाड, वि.स.स. यांचा नियम २९३ अन्वये प्रस्ताव

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला )

असुधारित प्रत

श्री. दिलीप वळसे –पाटील ( गृह मंत्री ) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ अन्वये या ठिकाणी प्रस्ताव मांडण्यात आला असून त्यावर उत्तर देण्याकरिता मी उभा आहे. माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव सदनामध्ये मांडला. सभागृहात या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्ष नेते सन्माननीय सदस्य श्री, नाना पटोले, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत दादा पाटील, राजेंद्र राऊत, प्रतिभा धानोरकर, सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे, सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांनी भाग घेतला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

अध्यक्ष महोदय, नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावाचा विषय खूप मोठा आहे. भ्रष्टाचाराला संरक्षण दिल्यामुळे कोटयवधी जनतेचा उडालेला विश्वास, कायदा व सुव्यवस्था, गुंडांकडून मिळत असलेल्या धमक्या, आरक्षण, एसटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न इ. प्रश्न या प्रस्तावामध्ये मांडले आहेत. चर्चेत भाग घेत असताना राज्याच्या समोर ज्या समस्या आहेत त्या सोडवण्यासाठी मार्गदर्शन मिळेल असे मला वाटले होते. मात्र माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जास्तीत जास्त वेळ दोन प्रकरणांकरिता खर्च केला. मी केवळ आपल्याच प्रश्नांचे उत्तर जर या ठिकाणी दिले व राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी आकडेवारी दिली नाही तर कदाचित मी तसेच उत्तर दिले, असा त्याचा अर्थ होईल.

श्री. दिलीप वळसे –पाटील....

अध्यक्ष महोदय, राज्यात आपण जी कामगिरी केली आहे, त्या बाबत मी आपल्याला सांगू इच्छितो. क्राईम २०२० च्या अहवालानुसार, ३ लाख ९४ हजार १७ गुन्हे दाखल झाले आहेत. १ लाख लोकसंख्येमागे ३१८ गुन्हे, अशी ही संख्या आहे. देशाची संपूर्ण परिस्थिती पाहिली तर महाराष्ट्र ११ व्या क्रमांकावर येतो. आपल्या राज्यात परिस्थिती खालावलेली आहे, कायदा व सुव्यवस्था शिल्लक राहिली नाही, असे म्हणणे योग्य नाही. या सर्व गोष्टींचा विचार करीत असताना मी सांगू इच्छितो की, गृह खात्यावरील चर्चेच्या वेळी मी त्या बाबत बोलेन.आता या ठिकाणी मी सदनाचा वेळ घालवू इच्छित नाही. गेल्या वर्ष –दोन वर्षाच्या कालावधीत राज्य शासनाने काही चांगले निर्णय घेतले आहेत. महिलांच्या संरक्षणाकरिता, हिताकरिता या सदनात शक्ती विधेयक मांडले असून ते सदनाने व संयुक्त चिकित्सा समितीने मंजूर केले.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.दिलीप वळसे-पाटील …

आता ते विधेयक माननीय राष्ट्रपती यांच्याकडे सहीकरिता गेलेले आहे. राज्यपाल महोदयांनी त्यावर सही केली, राष्ट्रपती महोदयांची सही झाली तर, एक चांगला असा कायदा आपल्या राज्यामध्ये मिळेल.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी आपण पाहिले तर, पोलीस स्टेशनच्या इमारती एकदम जुन्या झालेल्या आहेत. वर्षानुवर्षे जुन्या म्हणजे काही इमारती तर ब्रिटिशकाळापासूनच्या आहेत. त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता होती. त्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून गृह विभागाने निर्णय घेतला आणि मागच्या वर्षामध्ये ८७ पोलीस स्टेशनची बांधकामे हातात घेतली.

अध्यक्ष महोदय, नवीन पोलीस स्टेशन निर्माण करणे वेगळे. परंतु, जी पोलीस स्टेशन्स आहेत त्यापैकी ज्यांना इमारत नाही, त्यांना इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याच बरोबर या वर्षामध्ये आम्ही पोलीस स्टेशनच्या बरोबरीनेच निवासाच्या व्यवस्थेसाठीसुध्दा मोठ्या प्रमाणामध्ये तरतूद केलेली आहे. त्यातून मार्ग काढण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, राज्य राखीव दलातील जे पोलीस अंमलदार आहेत त्यांना एसआरपीएफ मधून पोलिस दलामध्ये जायची एक संधी असते. पूर्वी ती अट १५ वर्षांची होती. आता आपण ती अट १२ वर्षांची केली आहे. जेणेकरुन एसआरपीएफ मधून त्यांना लवकरात लवकर पोलीस दलामध्ये जाता येईल.

अध्यक्ष महोदय, कोविडमध्ये आपल्या सर्व पोलिसांनी मोठी कामगिरी केली. मला असे वाटले की, सभागृहामध्ये पोलिसांचे थोडेफार कौतुक होईल. ठीक आहे. ३९४ पोलीस अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर केलेले आहे. राज्यात बलात्कार... पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत जी प्रलंबित प्रकरणे आहेत, ती निकाली काढण्यासाठी १३८ विशेष जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी

असुधारित प्रत

श्री.दिलीप वळसे-पाटील …

१०८ विशेष जलदगती व  पॉक्सो अंतर्गत ३० न्यायालये सुरु करण्याच्या संदर्भातील निर्णय झाला आहे. त्यामध्ये २५ न्यायालये कार्यान्वित झालेली आहेत.

अध्यक्ष महोदय, होमगार्ड ही आपली मोठी ताकद आहे. परंतु, बऱ्याच वेळेस होमगार्डना पूर्ण दिवस काम मिळत नाही. या सर्व होमगार्डना काम देण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही अर्थ विभागाकडे प्रस्ताव नेला. मी वित्त मंत्री महोदयांचे मनापासून आभार मानतो. या होमगार्डना वर्षभरातून किमान १२० ते १५० दिवस काम देण्याच्या संदर्भातील निर्णय आपण घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, पोलीस भरतीच्या संदर्भात सतत चर्चा सुरु आहे. सतत फोन येतात. सतत सोशल मीडियावरुन विचारले जाते की, पोलीस भरती कधी करणार? मी या निमित्ताने आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, सन २०१९ मध्ये रिक्त असलेल्या पोलीस शिपायांच्या ५२९७ पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. अजून नेमणुका देणे बाकी आहे. काही ठिकाणी मुलाखती देखील बाकी आहेत. परंतु, मी आज या सभागृहामध्ये सांगतो की, ते उद्याच्या काही दिवसांमध्ये संपवून दुसऱ्या टप्प्यामध्ये आणखी ७२३१ पोलिसांची भरती करण्यात येईल. याला मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, ही भरती करीत असताना त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार होणार नाही, याची देखील आम्ही काळजी घेऊ. त्याचा फायदा निश्चित महाराष्ट्रात होईल. त्यानंतर पुन्हा आणखी पुढच्या २ वर्षातील जी नवीन भरती करावयाची आहे, त्या संदर्भामध्ये आम्ही मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव घेऊन जाणार आहोत. त्याला मंजुरी मिळाली तर, पोलीस भरतीची आणखी संधी मिळेल.

अध्यक्ष महोदय, आणखी एक महत्वाचा निर्णय आम्ही घेतला. पोलीस सेवेमध्ये जॉईन झालेल्या शिपायाला निवृत्त होताना कधी पोलीस उप निरीक्षक होण्याची संधी मिळायची, कधी मिळायची नाही. ३० वर्षे काम केल्यानंतर देखील

श्री.दिलीप वळसे-पाटील …

एखादा पोलीस शिपाई म्हणून भरती झाला तर तो कॉन्स्टेबल म्हणून सेवानिवृत्त व्हायचा.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील...

याकरिता कालबद्ध पदोन्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. आता प्रत्येक पोलीस शिपयास ३० वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त होण्यापूर्वी किमान सब इन्स्पेक्टर पदावर काम करण्याची संधी मिळणार आहे. पोलीस विभागामध्ये वरिष्ठ अधिकारी खूप आहेत. परंतु गुन्ह्याचा तपास करण्यासाठी सब इन्स्पेक्टर स्तरावरील अधिकारी कमी आहेत, याकरिता कालबद्ध पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, लोकप्रतिनिधी यांना येणाऱ्या धमक्यांच्या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये सांगितले होते की, या प्रकरणी एक एसआयटी स्थापन करण्यात येईल. आता श्री.मिलींद भारंबे, सह पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांनी उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून अहवाल सादर केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. धमक्या येण्याच्या घटना घडतात त्याप्रकरणी आपणा सर्वांना काळजी घेणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात आरक्षण किंवा इतर अनेक विषयांच्या संदर्भात आंदोलने होतात. कोविड कालावधीत शासनाने घातलेल्या नियमभंग प्रकरणी कलम १८८ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामधील राजकीय आंदोलनाच्या संदर्भातील खटले पाठीमागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. सदरहू प्रकरणी आयुक्त यांच्या कार्यक्षेत्रातील प्रस्ताव आयुक्त यांचे माध्यमातून तर जिल्हाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे माध्यमातून सादर करणे आवश्यक आहे. सदरहू प्रस्ताव जसजसे प्राप्त होती त्याबाबत सरकारने निर्णय घेतला तरी त्याची अंतिम निर्गती न्यायालयामध्येच होते. त्यादृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचाही फायदा होईल. सदरहू चर्चेमध्ये इतर सन्माननीय सदस्य यांनी सहभाग घेतला त्याचा परामर्श मी शेवटी घेईन.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये पेपर फुटीच्या संदर्भात बरीच चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळण्याचा कोणालाही अधिकार नसल्याने राज्य सरकारने व पोलीस विभागाने पेपर फुटीच्या संदर्भात अतिशय कठोर भूमिका घेतली आहे. या

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील...

प्रकरणी एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोग्य विभागातील गट ड मधील भरती पेपर फुटी प्रकरणी गुन्हा दाखल केला असून २० आरोपींना अटक करण्यात आली आहे व १० आरोपींना अटक करावयाची आहे. तसेच ज्या परीक्षार्थी पेपर मिळून आले आहेत त्यांची अद्याप चौकशी पूर्ण झाली नाही. आरोग्य विभागातील क वर्गातील भरती पेपर फुटी प्रकरणी गुन्हा दाखल केला असून ११ आरोपींना अटक करण्यात आली असून ९ आरोपींना अटक करावयाची आहे. म्हाडा पद भरती परीक्षा झाली नाही. परंतु त्या परीक्षेच्या पेपर फुटीच्या संदर्भात ज्या बाबी समोर आल्या त्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून ६ आरोपींना अटक करण्यात आली असून १६ आरोपींना अटक करावयाची आहे. टीईटी संदर्भातही चौकशी करण्यात आली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे व १४ आरोपींना अटक केली आहे. सदरहू पेपर फुटी प्रकरणातील जी ए सॉफ्टवेअर कंपनीचा संचालक श्री.प्रतेश देशमुख व त्याचे साथीदार यांचेकडे तपास सुरु असताना सन २०१९ मधील शिक्षक पात्रता प्रमाणपत्र वाटप करताना ७,८८० अपात्र प्रशिक्षणार्थींना पात्र केल्याची बाब समोर आली आहे. तसेच सदरहू परिक्षार्थींकडून सुमारे ४.२० कोटी रुपये जमा केले आहेत. त्यांनी तपासामध्ये सांगितले की, सन २०१७-२०१८ पासून अशा पद्धतीचे काम करीत आहे. यामध्ये कोणाचा दोष आहे, मला माहिती नाही.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील......

परंतु अशा प्रकारच्या कंपन्या नियुक्त करताना अधिक पारदर्शक पद्धत कशी राबविता येईल, यासाठी प्रयत्न केला जाईल व यासाठी सर्व संबंधित विभागाशी समन्वय साधून तशा आवश्यक सूचना देखील केल्या जातील.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता यांचे भाषण मी ऐकले आहे. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये सन १९९३ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटासह सन २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाचा उल्लेख केलेला आहे. तसेच मुंबई व नवी मुंबईमध्ये सायबर हल्ल्यात वाढ झाल्याचेही सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता यांनी त्यांच्या भाषणाच्या सुरुवातीलाच सांगितले आहे की, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. आपली संस्कृती देखील पुरोगामी आहे. मी देखील मुख्यमंत्री व गृह मंत्री म्हणून ५ वर्षे काम केलेले आहे. खऱ्या अर्थाने मला महाराष्ट्र पोलिसांचा अभिमान आहे. महाराष्ट्राचे पोलीस दल हे देशामध्ये कायद्याने व नियमांने काम करणारे आहे. ज्या वेळी आपण अशी भावना मांडली त्यावेळी मला दुसऱ्या बाजूला एका बाबीचे दु:ख झाले. ज्या पोलीस दलाचा आपणास अभिमान आहे, त्याच पोलीस दलावर कोणत्याही प्रकारचा विश्वास न ठेवता प्रत्येक प्रकरण सीबीआय किंवा केंद्रीय तपास यंत्रणेकडे पाठविण्याबाबतचा आग्रह धरणे बरोबर नाही. सरकार षडयंत्र करीत असेल किंवा सरकार तपास यंत्रणेचा गैरवापर करीत असेल तर त्याबाबत आपण जरुर बोलू शकता. माननीय श्री.गिरीष महाजन यांच्याबाबत कटकारस्थान करुन बनावट केसेस तयार करीत असल्याचे आपण सांगितले आहे. परंतु मी या विषयाच्या जास्त खोलात जाणार नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिरीष महाजन यांच्या विरुद्ध बनावट केस तयार करण्याच्या प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी व्हावी व माननीय श्री.नवाब मलिक यांचा राजीनाम घेण्यात यावा, अशी आपण मागणी केलेली आहे. या निमित्ताने मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, मुंबईमध्ये सन १९९३ मध्ये बॉम्बस्फोट झाला होता. सन २००५, सन २००६ व सन २००८ मध्ये मुंबईवर मोठ्या

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील......

प्रमाणावर सातत्याने हल्ले देखील झालेले आहेत. आपण आपल्या भाषणामध्ये असे म्हटले आहे की, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी यासंदर्भात एक एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. सन १९९३ मधील बॉम्बस्फोट प्रकरणी अनेकांना शिक्षा देखील झालेली आहे. असे असताना देखील उक्त प्रकरणी एनआयएमार्फत गुन्हा दाखल केला जातो. असे आपणच भाषणामध्ये म्हटलेले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. दिलीपराव वळसे-पाटील......

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेता यांनी भाषण करताना सांगितले की, स्टिंग ऑपरेशन केले गेले. १२५ तासांचे फुटेज आहे. त्यातून अनेक गोष्टी समोर येतील. यातील पेनड्राईव्ह माननीय अध्यक्षांकडे दिला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सर्व पेनड्राईव्ह दिलेले नाहीत. काही पेनड्राईव्ह राखून ठेवले आहेत. जसजशी वेळ येईल तसतसे ते पेनड्राईव्ह समोर आणतील किंवा नाही, हे मला माहित नाही. परंतु मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आरोप केले आहेत. मी कोणाचीही पाठराखण करणार नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाची आपणास तपासणी करावी लागेल. या घटनेच्या पाठीमागे कोण आहे, हे पहावे लागेल. यात कोण दोषी आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई करावयाची हे पुढील तपासातून स्पष्ट होईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते मुख्यमंत्री असताना त्यांनी सन्माननीय श्री. राज ठाकरे यांना ३३ हजार विहिरींचा, जलयुक्त शिवाराचा पेनड्राईव्ह दिला होता. मागील अधिवेशनामध्येही ६.५ चा एक पेनड्राईव्ह दिला होता. दोन दिवसापूर्वी एक पेनड्राईव्ह दिला होता. आज पुन्हा त्यांनी एक पेनड्राईव्ह दिला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी डिटेक्टीव्ह एजन्सी काढली आहे काय ?

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन यांच्या प्रकरणाबाबत त्यांनी माहिती दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन यांच्या विरोधात हे सरकार खोटे षडयंत्र तयार करीत आहे, पोलिसांचा गैरवापर करीत आहे, असा आरोप करण्यात आला. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ, जळगाव या संस्थेची स्थापना सन १९१७ मध्ये झाली आहे. सन १९१७ ला या संस्थेची स्थापना झाल्यानंतर श्री. भोईटे आणि श्री. पाटील या दोन गटांचा वाद आहे. तो वाद माननीय न्यायालयात गेलेला आहे. त्यावर माननीय न्यायालयात निर्णय होईल. परंतु मला सांगावयाचे आहे की, ही घटना झाली आहे. या घटनेत २९ आरोपींना अटक केली आहे. मी या निमित्ताने विचारु इच्छितो की, या संस्थेला पोलीस बंदोबस्तामध्ये शाळा का चालवावी लागते ? काही लोकांचा ही

श्री. दिलीपराव वळसे-पाटील......

संस्था ड्रॉप करण्याचा प्रयत्न होता. या संस्थेला पोलीस बंदोबस्त दिलेला आहे. दिनांक १७/०२/२०१८ ते दिनांक ३१/१२/२०१८ पर्यंत आणि दिनांक २६/०३/२०१९ पासून ते दिनांक ३०/१२/२०१९ पर्यंत १ अधिकारी, १२ कर्मचारी, ७ अधिकारी आणि काही इतर कर्मचारी..... पुढील वर्षामध्येही हा पोलीस बंदोबस्त दिला आहे. जवळपास ३०० पेक्षा अधिक दिवस या संस्थेला बंदोबस्त दिला गेला.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील.....

मला या निमित्ताने एवढेच सांगायचे आहे की, जळगाव जिल्हयातील ही घटना जुनी असली तरीही याची वस्तुस्थिती समाजासमोर आली पाहिजे. त्या दृष्टीकोनातून आपण कारवाईस सुरुवात केली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, घटना पुण्यामध्ये घडली व गुन्हा निंबोरा येथे दाखल केला व नंतर पुणे येथे वर्ग करण्यात आला. यासंदर्भात मी आपणास हेही सांगू इच्छितो की, सुशांत सिंह राजपूत प्रकरणात मुंबईमध्ये घडलेल्या घटनेचा गुन्हा बिहारमध्ये दाखल करण्यात आला व नंतर सी.बी.आय. कडे ट्रान्सफर करण्यात आला. याचा अर्थ, मी याचे समर्थन करतो असे नाही. या प्रकरणातील मी थोडासा मजकूर वाचून दाखवू इच्छितो. "फिर्यादीनुसार ...यांना जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित, जळगाव या संस्थेची कागदपत्रे देतो असे सांगून २०१८ मध्ये पुणे येथे बोलावून आरोपी निलेश भोईटे व तानाजी भोईटे यांनी त्यांना दमदाटी करुन मारहाण करुन संस्था आमच्या ताब्यात द्या, गिरीषभाऊ तुम्हाला १ कोटी रुपये देणार आहेत, असे सांगितले." या सर्व गोष्टींवर मी या क्षणी विश्वास ठेवायला तयार नाही. परंतु... (अडथळा...) बरोबर आहे. याची सत्यता तपासण्याच्या दृष्टीकोनातून आपण दिलेल्या पेन ड्राईव्हचा तपास केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी एकच सांगू इच्छितो की, या प्रकरणात मी कोणालाही पाठीशी घालणार नाही. या प्रकरणातील वकील श्री.प्रविण चव्हाण यांनी आपल्या वकीलपत्राचा राजीनामा दिला असून सरकारने तो स्विकारला आहे. तसेच यापुढे या प्रकरणाची चौकशी सी.आय.डी. कडे देण्याचा निर्णय मी जाहीर करतो. ही चौकशी सी.आय.डी. कडे दिल्यानंतर वस्तुस्थिती पुढे येईल, अशी मला अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.नवाब मलिक यांच्या संदर्भात देखील बोलले गेले. माननीय मंत्री श्री.नवाब मलिक हे ५ वेळा विधानसभा सदस्य म्हणून निवडून आले आहेत.

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील.....

ते केंद्र सरकारच्या काही धोरणांच्या विरोधात आवाज उठवत असतील तर त्यांचे तोंड बंद करण्यासाठी जुना-पुराना व्यवहार उकरुन काढण्यात आला. त्याची वस्तुस्थिती काय आहे तो तपास संबंधित यंत्रणा करीत आहेत. तपासामध्ये वस्तुस्थिती समोर येईल त्यावेळी पाहू. परंतु मला या निमित्ताने माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांना एक प्रश्न विचारायचा आहे की, आपण ५ वर्षे या राज्याचे मुख्यमंत्री व गृह मंत्री देखील असताना या प्रकरणाचा तपास केला असता तर अधिक बरे झाले असते. परंतु अन्यायाच्या विरोधात भूमिका घेतली म्हणून एखाद्याला गुन्हयामध्ये अडकविण्यासाठी षडयंत्र केले जाते व आपण पुन्हा आमच्यावरच आरोप करता की, "तुम्ही षडयंत्र करता, पोलीस दलाचा वापर करता." पोलीस दलाचा किंवा यंत्रणांचा देशामध्ये कसा वापर सुरु आहे याबद्दल मी सविस्तरपणे सांगण्याची आवश्यकता नाही.

अध्यक्ष महोदय, चर्चेमध्ये न आलेले जळगाव जिल्हयातील असेच आणखी एक प्रकरण आहे. भाईचंद हिराचंद रायसोनी पतसंस्थेतील गैरव्यवहाराच्या चौकशीचे हे प्रकरण आहे. भाईचंद हिराचंद रायसोनी या पतसंस्थेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.राधासिंह यांनी दिनांक १४ जून, २०१८ रोजी आदेश दिले.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. दिलीप वळसे पाटील...

यामध्ये जवळपास एकूण २६ आरोपी आहेत. पोलीस त्याचा तपास करीत आहेत आणि पोलीस त्याचा तपास करीत असताना आज असे वातावरण निर्माण केले जाते की, हे महाविकास आघाडीचे सरकार जाणूनबुजून काही तरी कोणाच्या पाठीमागे लागून कोणाला तरी, काही तरी दोष देण्याचा प्रयत्न करतात आणि कोणाला तरी कटामध्ये फसविण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, या दोन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी तपास करायचा की नाही. पोलिसांनी जर तपास करायचा असेल तर... जसे कालची घटना घडली. मी त्या विषयात पुन्हा जात नाही. परंतु पोलिसांनी तपास करुन त्यामधून सत्य पुढे येत असेल आणि उद्या सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन त्यामधून निर्दोष झाले तर माझ्यासारख्याला सर्वात जास्त आनंद त्यातून होईल. परंतु असे वातावरण निर्माण केले जाते की आपण या संपूर्ण प्रकरणाचा तपास कसा करायचा ? मघाशी मी सभागृहात नव्हतो. परंतु आपण त्यावेळी आणखी एक पेन ड्राईव्ह दिला. डॉक्टर मुदत्शीर लांबे नावाच्या व्यक्तीला वक्फ बोर्डाच्या सदस्यपदी नियुक्ती केल्याचा त्यामध्ये उल्लेख आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, आपल्याला मिळालेली माहिती चुकीची आहे. या व्यक्तीची नेमणूक सरकारने केलेली नाही. याबाबतची निवडणूक दिनांक ३०.८.२०१९ रोजी पार पडली आणि त्यामध्ये ते निवडून आलेले सदस्य आहेत. त्यामुळे विनाकारण दाऊद, दाऊद, दाऊद करुन... कारण एकदा हे झालेले आहे. ते जर संबंधित असतील तर त्यांच्यावर कोणती कारवाई करायची, त्यांना काढून टाकायचे, या संदर्भात आपण निश्चित प्रकारे पुढे कारवाई करु. परंतु मी आपल्याला दुसरे एक विचारु इच्छितो की, जी रश्मी शुल्कांची केस आहे आणि काल ज्याच्या संदर्भात आपण बोललो... मी त्याची वस्तुस्थिती फक्त सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०११ च्या द्वितीय अधिवेशनात झालेल्या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी लोकप्रतिनिधींचे मोबाईल गैर पध्दतीने टॅपिंग केले जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी अन्य काही आमदारांनी या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी

श्री. दिलीप वळसे पाटील...

केली होती. या आरोपाच्या अनुषंगाने त्यावेळी याच सभागृहात या आरोपाची पूर्ण उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, अशा प्रकारचे आश्वासन मी दिले होते. जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असेही त्यावेळी सांगितले होते. सन २०१५ ते २०१९ या कालावधीतील फोन टॅपिंगमध्ये पडताळणी करण्याकरिता शासनाने दिनांक ९.७.२०२१ ला आदेश काढला आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आणि सदर समितीमध्ये आयुक्त, राज्यगुप्त वार्ता, अतिरिक्त आयुक्त, विशेष शाख हे होते. सदर उच्चस्तरीय समितीने सन २०१५ ते २०१९ या कालावधीत फोन टॅपिंग प्रकरणांची पडताळणी करुन उपरोक्त कालावधीमध्ये अनिष्ठ राजकीय हेतूने लोकप्रतिनिधींचे फोन गैर पध्दतीने टॅप केले किंवा कसे, तसा तपास करणे व तसे आढळल्यास जबाबदारी निश्चित करण्याची कार्यकक्षा निश्चित केली होती. त्या समितीने अहवाल दिला आणि तो अहवाल राज्य सरकारने स्वीकारला. तो अहवाल स्वीकारल्यानंतर पुढे असे आले की, सन २०१७ ते २०१८ या काळामध्ये पुणे शहर पोलीस आयुक्त असलेल्या श्रीमती रश्मी शुक्ला यांनी ४ लोकप्रतिनिधींचे ६ भ्रमणध्वनी क्रमांक खालील नमूद कारणास्तव वापर करता म्हणून दर्शविण्यात आलेल्या नावाकरिता अधोरेखित ठेवण्यात आले होते.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांचे नाव अमजद खान असे ठेवले होते आणि यांचे काम असे नमूद केले की, पुणे शहरामध्ये अमली पदार्थांची अवैध विक्री मोठया प्रमाणात चालत असून सदर व्यक्ती कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थ विक्री करतात. माननीय मंत्री श्री. बच्चू कडू यांचे नाव निजामऊद्दीन बाबु शेख, राहणार नागपाडा, मुंबई असे ठेवले. त्यांच्या ही नावापुढे पुणे शहरात अमली पदार्थांची अवैध विक्री मोठया प्रमाणात चालत असून सदर व्यक्ती कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थ विक्री करतात, असे नमूद आहे. श्री. संजय काकडे हे तर आपल्या पक्षाचे खासदार होते. तरी त्यांचे नाव तरबेज सुतार, राहणार कात्रज, पुणे असे ठेवले. पुणे शहरातील कुप्रसिद्ध बाबु नायर या गुन्हेगार टोळीचे ते सदस्य असून ते अनाधिकाराने जमिनी बळकावणे, खंडणी, दरोडा असे गुन्हे करतात, असे त्यांच्या नावापुढे नमूद केले आहे. दुसरा भ्रमणध्वनी क्रमांक पुन्हा श्री. संजय काकडे यांचाच आहे. तसेच श्री. आशिष देशमुख त्यावेळी भारतीय जनता पक्षाचेच आमदार होते. त्यांचे नाव ठेवले रघु चोरगे, राहणार राहटवाडी तालुका हवेली. त्यांच्याही नावापुढे पुन्हा तेच काम अमली पदार्थांची अवैध विक्री करणे असे नमूद केले आहे. तसेच श्री. आशिष देशमुख यांचा दुसरा फोन होता. त्या ठिकाणी त्यांचे नाव हिना महेश साळुंखे असे ठेवले. याचा अर्थ पुरुषाची स्त्री केली. आज मला या निमित्ताने सभागृहाला सांगायचे आहे की, सत्ता आहे किंवा नाही हा भाग वेगळा आहे. परंतु एखादे वरिष्ठ अधिकारी जर असे काम करीत असतील आणि त्यामध्ये निवडून आलेल्या सदस्यांच्या संदर्भात सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांमध्ये.... मला वाटते सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले त्यावेळेला भारतीय जनता पक्षातच होते. मला हे काही कळले नाही. आमच्या पक्षाच्या कोणत्या सन्माननीय सदस्यांवर आपण पाळत ठेवली असती तर कदाचित मी समजू शकलो असतो. परंतु आपल्याच पक्षातील लोकांवर पाळत ठेवून....(अडथळा).. आपण हे केले नाही. परंतु आपल्या काळात झालेले आहे. परंतु आपण ते केले असे मी म्हणत नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, यामध्ये शेवटी एक कनक्ल्युजन काढलेले आहे. त्यात असे नमूद आहे की, श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी त्यांच्या काळात सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले, माननीय मंत्री श्री. बच्चू कडू, श्री. संजय काकडे, श्री. आशिष देशमुख, तत्कालीन लोकप्रतिनिधींचे मोबाईल नंबर अनिष्ट राजकीय हेतूने जाणीवपूर्वक फसवणूक करुन अभिवेक्षणाखाली घेतले व हेतुपुरस्सर अभिवेक्षण केले. कायद्याचे पूर्ण ज्ञान असताना जाणीवपूर्वक, हेतुपुरस्सर शासनाच्या अभिवेक्षण नियमाचे पालन न करता बेकायदेशीर अभिवेक्षण केले. लोकसेवक असून सुद्धा जाणीवपूर्वक कायद्याने दिलेल्या निर्देशाचे पालन केले नाही. लोकप्रतिनिधींना अपाय पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातून या ठिकाणी अवहेलना केली. ही घटना इथे झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई मध्ये दुसरी एक घटना घडली. त्यामध्ये मुंबईचे एसआयडी कमिशनर असताना... ही केस आता न्यायालयामध्ये आहे. त्यामध्ये मी काही खोलात जात नाही. परंतु मुंबईमध्ये असताना सुद्धा अशीच एक घटना घडली आहे. त्यामुळे त्या घटनेचा तपास करण्याच्या दृष्टीकोनातून राज्य सरकारने जे प्रयत्न सुरु केले आहेत त्यामध्ये आम्ही गुन्हा दाखल केला आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

श्री. दिलीप वळसे –पाटील....

गुन्ह्याबाबत सर्व संबंधितांकडून माहिती घेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. तत्कालीन माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्या बाबतीत देखील असेच घडले आहे. तत्कालीन माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्या बाबत काय झाले, हे मला कळत नाही. घटना अशी आहे की, अँटेलियाची केस घडली. कोणीतरी त्या ठिकाणी जिलेटीन ठेवले. (अडथळा ) कृपया मला आपण सहकार्य करावे. मी सर्वांचे शांततेने ऐकतो. या केसमध्ये मनसुख हिरेन यांचा मर्डर झाला. ही केस एनआयए यांच्याकडे गेली. आता अंबानी यांच्या घराच्या खाली जिलेटीनच्या कांड्या ठेवल्या. नक्की त्याचे कारण काय आहे, आजच्या तारखेपर्यंत एनआयएने या बाबत काय तपास केला, हे आम्हाला माहीत नाही. काही तरी घटना घडल्यानंतर त्या संबंधी काही चर्चा झाली. या चर्चेनंतर त्यांनी पत्र लिहले. माझ्याकडे १०० कोटी रुपये मागितले असे त्यांनी या पत्रात नमूद केले. कालच्या बातमीमध्ये २५० कोटी रुपयांपर्यंत हा आकडा गेला होता. पूर्वी हा आकडा १०० कोटी रुपये एवढा होता. श्री.सचिन वाझे यांनी पत्र लिहिले व त्यामध्ये आरोप केले. एखाद्या गुन्ह्यातील आरोपी राज्याच्या माननीय गृह मंत्र्यांवर आरोप करतो. ते आरोप खरे –खोटे आहेत, हा सिध्द होण्याचा भाग आहे. त्यांच्यावर इडी, इन्कम टॅक्सची रेड झाली. एक केस सीबीआयकडे गेली, दुसरी केस एनआयए कडे गेली. तत्कालीन माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्यावर इडीने धाड घातली. मी नम्रतापूर्वक सांगतो की, त्यांच्यावर व त्यांच्या जवळच्या लोकांवर ९० ते ९५ छापे टाकण्यात आले. तपासामध्ये त्यांनी काय करावे, हा भाग वेगळा आहे. एखाद्याला जर संपवायचे असेल, अडचणीत आणायचे असेल तर यंत्रणेचा वापर कशा प्रकारे केला जातो, या बाबत मी अधिक बोलू इच्छित नाही.

अध्यक्ष महोदय, या ठरावामध्ये एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबतही विषय आहे. माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील या संबंधी बोलले. ठरावातही त्यांनी हा विषय नमूद केला आहे. त्यांनी असे सांगितले की, आपल्यामुळे ओबीसी आरक्षण

श्री. दिलीप वळसे –पाटील....

गेले, मराठा आरक्षण गेले. एसटी कर्मचाऱ्यांचा संप आपल्यामुळे झाला. मी आपल्याला विचारु इच्छितो. एसटी कर्मचाऱ्यांचा संप झाला. त्या संपाचा नेता ॲड. सदावर्ते हे होते. मराठा समाजाला आरक्षण दिले व ते सर्वोच्च न्यायालयात चॅलेंज केले गेले. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात पिटीशन दाखल करणाऱ्या महिला होत्या श्रीमती जयश्री पाटील. या जयश्री पाटील ॲड. सदावर्ते यांच्या पत्नी आहेत. श्री.हरिष साळवे यांच्या सारखा वकील जो ५०-६० लाख रुपये प्रति ॲपिअरन्सकरिता घेतो, असे मी ऐकले आहे, खरे खोटे मला माहीत नाही. रेकॉर्डवर चुकीचे जाणार असेल तर ते काढून टाकावे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.दिलीप वळसे-पाटील ...

ज्यांनी आरक्षणाला विरोध केला तोच म्हणत आहे की, "एक मराठा, लाख मराठा". माननीय श्री.शरद पवार यांची बदनामी करायची. मुख्यमंत्री महोदयांची बदनामी करायची. उप मुख्यमंत्री महोदयांची बदनामी करायची. मग आता हे जे चाललेले आहे... योगायोगाने माझ्या समोर आले म्हणून मी मांडले. याच्या पाठीमागे कोणी आहे का, नक्की कोण याच्या पाठीमागे आहे का, असे का घडत आहे, त्याला कोण मदत करत आहे, त्याला पैसे कोण देत आहे?....(अडथळा)... ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात माझे काही म्हणणे नाही. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात जी घटना घडली, आपण सर्वांनी, सभागृहाने मदत केली. एकमताने कायदा मंजूर केला. खात्री आहे की, तो कायदा माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये, सर्व न्यायालयांमध्ये टिकेल.

अध्यक्ष महोदय, धनगर आरक्षणाचा उल्लेख आपल्या या ठरावामध्ये आहे. आपण कोणी एका शब्दानेही त्यावर बोलला नाहीत. माननीय दादा बोलले असे मला वाटते. परंतु, मला आपल्याला आठवण करुन द्यायची आहे की, आपण ज्यावेळेस एखादी भूमिका घेतो, त्यावेळेस त्या भूमिकेमध्ये वेगळेपण असू नये. आपल्याला आठवत असेल. आपण अनेकवेळा बारामतीला गेला. आपण एकदा आरक्षणाच्या संदर्भात आंदोलन करण्यास गेला होता. तेथे आपण घोषणा केली होती की, ‘पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये आम्ही धनगर समाजाला आरक्षण देऊ’. परंतु, ५ वर्षे त्यामध्ये काही घडले नाही. अडचणी काय आहेत ते मला माहिती नाही. परंतु, हे सर्व आपण त्या ठिकाणी समजून घेतले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माझे असे म्हणणे आहे की, सूडबुध्दीने कारवाई कोणीच करु नये. माननीय श्री.अजित पवार यांनी काल असे स्टेटमेंट केले की, कोणी कोणाला नोटिसा काढू नये. कोणीकोणाच्या विरोधी वागू नये. सर्वांनी खेळीमेळीने वागावे, राज्याच्या हिताच्या विरुध्द वागू नये सर्वांनी त्यांचे  कौतुक केले. साहजिक आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील ...

अध्यक्ष महोदय, या महाराष्ट्राची आजपर्यंतची परिस्थिती काय होती, या महाराष्ट्रामध्ये एक सलोख्याचे वातावरण होते. त्या सलोख्याच्या वातावरणामध्ये आज काही तरी गोंधळ झालेला दिसत आहे. मला एक समजत नाही की, आपण केंद्रीय यंत्रणांचा वापर करीत असताना म्हणजे त्यांनी जेन्युईनली वापर केला तर, त्याला कोणाची तक्रार नाही. परंतु, आधी आपला एक प्रवक्ता जाहीर करतो की, आज यावर रेड पडणार आहे. आज त्याला अटक होणार आहे. आज तो जेलमध्ये जाणार आहे. मग लगेच दुसऱ्या दिवशी तशी घटना घडते. मग अशी काही हॉटलाईन बसविलेली आहे का की, जेणेकरुन त्यांचा प्रवक्ता म्हणून तुम्ही प्रथम येथे घोषणा करा व त्यावर मग अशा प्रकारचा ... आता तर आम्हाला भीती वाटू लागली आहे. काल आपण आपल्या भाषणात सांगितले. तुम्ही एक तर सीबीआयकडे द्या, नाही तर आम्ही न्यायालयात जातो. आता तुमचा देखील न्यायालयावरील विश्वास जरा जास्त वाढलेला आहे. आमचा तर आहेच. आपण सर्व मिळून एखादी तरी संस्था सुरक्षित ठेवूया.

अध्यक्ष महोदय, आज सकाळी "द कश्मिर फाईल्स" या सिनेमाच्या संदर्भामध्ये चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा यांनी एक प्रश्न मांडला की, "द कश्मिर फाईल्स" असा एक सिनेमा आलेला आहे. तो टॅक्स फ्री करा. मी तो सिनेमा पाहिलेला नाही. परंतु, ज्यांनी पाहिलेला आहे... स्वातंत्र्याच्या काळात म्हणजे सन १९४७ च्या दरम्यान ज्यावेळेस स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळेस या देशातून त्या देशात, त्या देशातून या देशात इकडून तिकडून जे येणेजाणे झाले. त्यावर त्यामध्ये दाखवलेले आहे. मी पाहिलेले नाही. मी ऐकलेल्या माहितीवर सांगत आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील...

आज मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, चित्रपटगृहात सदरहू चित्रपट संपल्यानंतर लोकांना बाजूच्या सभागृहामध्ये घेऊन जाण्यात येते व हिंदू जनजागृती विशेष संवाद नावाचा एक संवाद केला जातो व त्यांचेशी चर्चा करण्यात येते. काही लोकांनी अशी पद्धत अवलंबिल्याने काही लोकांनी झुंड चित्रपट मोफत दाखविण्यास सुरुवात केली. आपल्या कोणत्याही कृतीतून समाजासमाजात अंतर निर्माण होता कामा नये...(अडथळा)...

अध्यक्ष महोदय, आपणास चार राज्यांतील निवडणुकीत यश मिळाले त्याबाबत सांगू नका. आपण एक बाब लक्षात ठेवावी की, उत्तर प्रदेशामध्ये आपल्या पक्षाच्या ५७ जागा कमी झाल्या आहेत. ...(अडथळा)... आमचे नाही वाचू द्या. परंतु आपणास जग जिंकल्या सारखे वाटते. आपण जल्लोश करावा, काही हरकत नाही. निवडून आल्याबद्दल अभिनंदन करावे लागते, त्याबद्दल पेढा खावा लागतो. कोणत्याही बाजूने वातावरणात सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न होता कामा नये. सत्ता येते व सत्ता जाते. पण सत्ता गेल्यानंतरची अस्वस्थता आहे ती चांगली नाही.

अध्यक्ष महोदय, अनेक आंदोलने झाली, कोर्टकचेऱ्या झाल्या आहेत. आज मिडीया व सोशल मिडीयाची अवस्था कशी झाली आहे ? माननीय विरोधी पक्ष नेता यांनी परवा सभागृहात भाषण केले, ते बाहेर जाण्यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या आयटी सेलच्या प्रमुखाने ते व्हायरल केले. यात काही चुकीचे नाही. आजकाल सगळे राजकीय पक्ष अशा यंत्रणेचा वापर करतात. त्रिपूरा येथे एखादी घटना घडते व त्याप्रकरणी आपल्या राज्यात आंदोलन करण्यात येते. कोविड कालावधीत मंदिर उघडण्यासाठी आंदोलन करण्यात येते. शाळा उघडण्यासाठी आंदोलन करण्यात येते. परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी आंदोलन करण्यात येते. एका बाजूला आपण कायदा व सुव्यवस्थेबाबत बोलत असतो दुसऱ्या बाजूला आपण त्याचे पालन केले पाहिजे. हे राज्य आपले आहे. या राज्याला विकासाच्या दिशेने पुढे घेऊन जावयाचे असेल तर सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील...

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता यांनी "The Whistle Blowers Protection Act" चा उल्लेख केला होता. मी हा कायदा अगोदर वाचला नव्हता, तो मी आता वाचला. आपला उक्त मुद्दा बरोबर आहे, त्यानुसार आपणास अधिकार आहे. त्यामध्ये एक तरतूद आहे की, "Every disclosure shall be made in good faith and the person making disclosure shall make a personal declaration stating that he reasonably believes that the information disclosed by him and allegation contained therein is substantially true.". आपण सांगितले की, केंद्रीय गृह सचिव यांना मी पेन ड्राईव्ह दिला आहे, त्यामध्ये काय आहे मला याची माहिती नाही. त्यासंदर्भात आपणास अधिकार आहे व त्यानुसार आपण आपले म्हणणे मांडत रहावे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील.......

आपण ५ वर्षे मुख्यमंत्री व गृह मंत्री म्हणून काम केलेले आहे. आपण अनुभवी आहात म्हणून आम्हाला मार्गदर्शन करण्याचे काम करावे. काही प्रश्न निर्माण झाल्यानंतर नेहमी जशी मदत करीत होतात, तशीच मदत आता देखील करण्याचा प्रयत्न करावा, प्रश्न निर्माण करु नका, एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. परंतु आता त्यासंदर्भात बोलणार नाही. संबंधित सन्माननीय सदस्यांना बोलावून त्यांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

अध्यक्ष महोदय, अमरावती येथे घडलेल्या घटनेप्रकरणी संबंधित दोन पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे, अशी सन्माननीय सदस्य श्री.रवि राणा यांची मागणी आहे. या निमित्ताने सांगू इच्छितो की, मी सभागृहामध्ये कोणालाही निलंबित करणार नाही. कारण अशा प्रकारच्या निलंबनामुळे पोलिसांचे खच्चीकरण होते. आपले जे प्रश्न आहेत ते आपण मांडावेत. काही अधिकारी चुकीचे असतील तर त्यांच्याबाबत आवश्यक निर्णय घेण्यात येईल. परंतु सभागृहामध्ये एखाद्या अधिकाऱ्याला निलंबित करावे, अशी मागणी केल्यानंतर त्या मागणीनुसार एखाद्या अधिकाऱ्यांला निलंबित केल्यानंतर एका पोलिसांचे नव्हेतर पूर्ण पोलीस दलाचे खच्चीकरण होते. आपण प्रकारे पोलिसांवर कारवाई करीत असू तर पोलिसांनी विश्वासाने कसे काम करायचे, धाडसाने कसे काम करायचे, हा मुख्य प्रश्न आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आम्ही सर्वजण पोलीस दलाच्या भक्कमपणे मागे उभे आहोत. पोलिसांनी या राज्यातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, एवढेच मी सांगतो आणि मी माझी रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

---------

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मागील २२ वर्षापासून मी माननीय श्री.दिलीपराव वळसे-पाटील यांना या सभागृहामध्ये पाहतो आहे. परंतु ते एवढे हतबल झाल्याचे मी प्रथमच पाहिले आहे. तरी देखील मी आपले अभिनंदन करतो. विक विकेटवर असताना देखील आपण नाईट वॉचमन सारखे खेळले आहात.

अध्यक्ष महोदय, एनआयएने बॉम्बस्फोट प्रकरणी एफआयआर दाखल केलेला नाही. राज्यातल्या राज्यात मनी लॉड्रींगचे व्यवहार कसे होतात, यावर व टेरर फंडिंगच्या संदर्भात एनआयएने गुन्हा दाखल केलेला आहे. एनआयएच्या तपासामधून या सर्व बाबी निष्पन्न झालेल्या आहेत. सरदार शाह वली खान, हा बॉम्बस्फोटातील एक आरोपी आहे. सलीम पटेल हा दाऊदचा फ्रंटमॅन आहे. हे सर्व माहिती असताना देखील त्यांच्याकडून बाजार भावापेक्षा कमी दराने जमीन विकत घेतली गेली. या व्यवहारातील मूळ मालकाला एकही रुपया देण्यात आलेला नाही. त्यामुळे हे प्रकरण साधे नाही. कोणालातरी पकडून अचानक कारागृहामध्ये टाकलेले नाही. यामधील सर्व सबस्टॅन्शिअल पुरावे मिळाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. याबाबतचा निर्णय माननीय न्यायालय देणार आहे. ट्रायल कोर्टाने तर हे प्रकरण सकृतदर्शनी असल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. उद्या उक्त प्रकरणी माननीय उच्च न्यायालय निर्णय देणार आहे. उद्या त्यांना जामीन मिळू शकतो की नाही, हे मला माहिती नाही. परंतु ट्रालय कोर्टाच्या रिमांड ऑर्डरमध्ये स्पष्टपणे हे प्रकरण सकृतदर्शनी असल्याचे नमूद केले आहे. आपल्याला त्यांना वाचवावेच लागणार आहे. आमची काही हरकत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अनिल देशमुख यांच्यावर एफआयआर दाखल करण्यास कोणी सांगितले आहे? माननीय उच्च न्यायालयानेच त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले. आम्ही किंवा केंद्रीय तपास यत्रंणेनी तसा आदेश दिलेला नव्हता. माननीय उच्च न्यायालयाने माननीय श्री.अनिल देशमुख यांच्यावर एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मघाशी मंत्री महोदय माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयावर भाष्य करीत होते तेव्हा सर्वजण मोठ्याने टाळ्या वाजवीत होते.

श्री.देवेंद्र फडणवीस........

आपले म्हणणे आपल्या सदस्यांना समजले की नाही, हे मला माहिती नाही. मंत्री महोदयांनी बीएचआरच्या चौकशीसंदर्भात भाष्य केलेले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, बी.एच. रायसोनी प्रकरणात पहिल्यांदा रायसोनी हे मुख्य गुन्हेगार होते. या गुन्हेगाराचे वकील श्री. प्रविण चव्हाण हे होते.

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाची वेळ सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, तेव्हा श्री. प्रविण चव्हाण हे सरकारी वकील नव्हते. त्यावेळेस ते मुख्य आरोपीचे वकील होते. आता बीएचआरच्या प्रकरणातही सरकारच्या वतीने वकील हेच आहेत. मंत्री महोदयांनी सांगितल्यानुसार सन्माननीय सदस्य श्री.गिरीश महाजन यांच्यासारखेच इतर कोणीही असू शकतात. सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन यांना या प्रकरणात अडकविण्याकरिता काय काय करावयाचे याचा व्हिडीओ आहे. चाकू कशा प्रकारे ठेवावयाचा, कागदपत्रे कशा प्रकारे ठेवावयाची, रेड कशा प्रकारे करावयाची, त्यासाठी कशा प्रकारे व्यवस्था करावयाची हे काम सरकारी वकिलाचे आहे काय ? पुरावे तयार करणे, हे सरकारी वकिलाचे काम आहे काय ? यात अनेक षडयंत्र आहे. त्यामुळे माझी अपेक्षा होती की, हा विषय माननीय गृहमंत्री गांभीर्याने घेतील. परंतु तसे होत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय गृह मंत्र्यांनी श्रीमती रश्मी शुल्का प्रकरणाबाबत माहिती दिली आहे. माननीय न्यायालयाने स्थगिती दिली आहे. हे प्रकरण माननीय न्यायालयात आहे. माननीय न्यायालय यात निर्णय घेईल. परंतु मी या अनुषंगाने मंत्री महोदयांना आठवण करुन देऊ इच्छितो की, आवश्यकतेनुसार त्यांच्याही कार्यकाळात असे फोन टॅप झाले आहेत. सन्माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. नार्वेकर यांचाही पुण्यात फोन टॅप झालेला होता. मी त्याचे समर्थन करणार नाही. मी कोणाचेही समर्थन करणार नाही. माननीय न्यायालयात ते प्रकरण सुरु आहे. सरकार षडयंत्र करीत असल्याचा व्हिडीओ आम्ही राज्य सरकारकडे दिला आहे. त्यावर निर्णय मिळविण्यासाठी आम्ही राज्य सरकारकडून अपेक्षा व्यक्त केली होती. गृह विभागांतर्गत असलेले पोलीस दल याची चौकशी करेल काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, मला आजही महाराष्ट्र पोलीस दलाचा अभिमान आहे. परंतु सर्वच पोलीस अधिकारी, कर्मचारी चांगले आहेत, असे नाही. जे पोलीस लाच घेताना सापडतात त्यांचा मला अभिमान नाही. परवा एक पोलीस बलात्कार प्रकरणात सापडले होते. त्यांचा मला अभिमान नाही. राज्य सरकारच्या विरुद्ध आम्ही चौकशी करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्र पोलीस किंवा सीआयडी यंत्रणा ही चौकशी कशा प्रकारे करेल ? मला माहित आहे की, ही चौकशी ते करु शकणार नाहीत.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहारात आता यादी प्रसिद्ध झाली आहे. श्री. संजय पांडे आता आलेले आहेत. आता पहिला नंबर विधान परिषदेचे सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. प्रविण दरेकर यांचा आहे, नंतर दुसरा नंबर कोणाचा, तिसरा नंबर कोणाचा याची यादी प्रसिद्ध केली आहे. याबाबत मला माहिती आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. प्रविण दरेकर हे सत्ताधाऱ्यांवर आरोप करीत असतात. म्हणून हे सरकार दोन ते तीन दिवसांमध्ये पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करणार आहे. मी सांगू इच्छितो की, आम्ही याचाही मुकाबला करण्यास तयार आहोत. आम्ही घाबरणार नाहीत. परंतु मी एवढा मोठा पुरावा दिल्यानंतरही राज्य सरकारच्या विरोधात चौकशी होऊ शकत नाही. ही चौकशी करण्याची आम्ही मागणी केली आहे. तरीही आमची मागणी आहे की, हे प्रकरण सीबीआयकडे सोपविले पाहिजे. ही मागणी राज्य सरकारने मान्य केली नाही तर आम्ही याबाबत माननीय न्यायालयात दाद मागणार आहोत. आमचा माननीय न्यायालयावर विश्वास आहे. माननीय न्यायालयाने सन्माननीय सदस्य श्री. गिरीश महाजन यांना दंड ठोठावला. असे असले तरीही आमचा न्यायालयावर विश्वास आहे. आम्ही पीआयएल दाखल केली होती. आम्ही पीआयएल दाखल करावयास नको होती. ही चूक झाली. आम्ही दुसरीकडे जावयास हवे होते. तरीही आमचा न्याय यंत्रणेवर विश्वास आहे. आम्ही आमच्या बाजुने निकाल लागला तर माननीय न्यायालय चांगले आणि विरोधात निकाल लागला तर माननीय न्यायालय वाईट, अशी आमची भुमिका नाही. त्यामुळे आम्ही मागणी करतो की, हे प्रकरण सीबीआयकडे पाठविले पाहिजे. ते जर पाठविले नाही

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस.....

तर याबाबत आम्ही निश्चितपणे न्यायालयात दाद मागू. परंतु जर राज्य सरकारने हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग केले तर त्याचा आम्हाला आनंद होईल. राज्य सरकार हे प्रकरण सीबीआयकडे पाठवित नसल्यामुळे आम्ही याचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे. आता अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर हे या चर्चेवर बोलत होते. ते ऑनलेग आहेत. मी विनंती करतो की त्यांनी त्यांचे भाषण सुरु करावे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

**विशेषाधिकार भंगाबाबत**

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहातून बहिर्गमन केले असले तरीही आम्हाला प्रश्न विचारण्याची संधी दिली पाहिजे, असे आमचे म्हणणे आहे.

अध्यक्ष महोदय, माझा छोटासा प्रश्न आहे. माननीय गृह मंत्री हे विधानसभेचे माजी अध्यक्ष देखील होते. त्यामुळे माझ्या व सभागृहाच्या माहितीकरिता मी त्यांना प्रश्न विचारु इच्छितो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी परवा एक पेन ड्राईव्ह कस्टोडियन म्हणून माननीय अध्यक्षांकडे सुपूर्त केला. माझ्या माहितीप्रमाणे ज्यावेळी कस्टोडियन म्हणून सदर पेन ड्राईव्ह माननीय अध्यक्षांकडे सुपूर्त केला तेव्हापासून तो अध्यक्षांच्या कस्टडीमध्ये गेला. त्यानंतर माननीय अध्यक्षांनी तो पेन ड्राईव्ह संबंधित खात्याकडे द्यायला हवा होता. संबंधित खात्याने त्याची तपासणी केल्यानंतर तो पब्लिश व्हायला पाहिजे होता. परंतु माननीय अध्यक्षांकडे पेन ड्राईव्ह सुपूर्त केल्यानंतर लगेच त्यातील बातम्या टीव्हीवर यायला सुरुवात झाली. त्यामुळे मला जाणून घ्यायचे आहे की, कस्टोडियनकडे कस्टडीमध्ये ठेवण्यासाठी पेन ड्राईव्ह दिलेला असताना अशा प्रकारे प्रसार माध्यमांमध्ये पब्लिश होणे योग्य होते का ? योग्य नसल्यास हा सभागृहाचा हक्कभंग आहे. त्यामुळे ज्यांनी कोणी, विशेषकरुन माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हा पेन ड्राईव्ह पब्लिश केला त्याबद्दल त्यांच्याविरोधात हक्कभंग आणला जाईल का ?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी अतिशय रास्त, महत्त्वाचा व गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. त्यामुळे आपण त्यावर निर्णय द्यावा.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, आपण जर यासंदर्भात योग्य निर्णय घेतला नाही तर दररोज असे होईल की, अध्यक्षांकडे एखादा ऐवज देऊन त्याच वेळी ताबडतोब तो प्रसारमाध्यमांवर देखील पब्लिश केला जाईल. त्यामुळे आपण यासंदर्भात निर्णय द्यावा. माझे असे म्हणणे आहे की, हा सभागृहाचा हक्कभंग होतो.

श्री.भास्कर जाधव.....

परंतु मला आपल्याकडून ही बाब जाणून घ्यायची आहे. आपण निर्णय दिल्यानंतर मला पुढे जाता येईल.

**तालिका सभाध्यक्ष :** ज्या सन्माननीय सदस्यांना असे वाटत आहे की, आपला विशेषाधिकार भंग झाला आहे. त्यांनी तशी सूचना सभागृहाला दिल्यानंतर त्यावर विचार करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**फोन टॅपिंग व मुंबई बँकेतील भ्रष्टाचाराबाबत**

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, नियम २९३ च्या चर्चेला माननीय गृह मंत्र्यांनी आताच उत्तर दिले आहे. मी देखील या चर्चेमध्ये भाग घेतला होता. त्यावेळी मी सांगितले होते की, माझा फोन टॅप झाला होता. माननीय मंत्र्यांनी देखील त्याचा मघाशी उल्लेख केला. परंतु या प्रकरणात कोण दोषी आहे ? श्रीमती रश्मी शुक्ला या अधिकाऱ्याच्या मागे कोण होते, या सर्व गोष्टींची मला माहिती हवी आहे व तो माझा अधिकार आहे. अमजद खान असे माझे नाव ठेवण्यात आले व अफीम आणि गांजा विकणारा मी व्यक्ती आहे अशी माझ्या नावाची बदनामी करण्यात आली. त्यामुळे याचे जर मला उत्तर मिळत नसेल तर ही बाब गंभीर आहे. माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी मुंबई बँकेच्या संदर्भात देखील एक मुद्दा उपस्थित केला होता. मुंबई बँकेच्या संचालक मंडळाने हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे सर्व ऑडिट रिपोर्टमध्ये उघड झाले आहे. या सर्व बाबी रेकॉर्डवर आहेत. परंतु त्याबद्दल देखील एक शब्दही बोलले गेले नाही. तिकडचा व्यक्ती असेल तर गंगा नहाला आणि इकडचा व्यक्ती असेल तर तो झाला...

अध्यक्ष महोदय, भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याची आमची भूमिका असू शकत नाही. विरोधी पक्षाकडून सत्ताधारी पक्षावर अनेक आरोप लावले जात आहेत. परंतु विरोधी पक्षामध्ये देखील हजारो कोटी रुपयांचे भ्रष्टाचारी बसलेले आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. नाना पटोले...

अध्यक्ष महोदय, मी मुंबई बँकेचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याच्याबद्दल आम्हाला थोडी तरी माहिती मिळाली पाहिजे. तो आमचा अधिकार आहे. मला अपेक्षित आहे की, आपण गृहमंत्र्यांना तशा सूचना द्याल. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला नंतर उत्तर देऊ असे सांगितले आहे. पण माझ्या मुद्याबद्दल आपल्याला जर कागदपत्रे हवी असतील तर ती सर्व कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत मी ती आपल्याला देतो. त्यामुळे मुंबई बँकेच्या भ्रष्टाचाराबद्दल गृहमंत्र्यांनी माहिती दिली पाहिजे.

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या असून त्या संदर्भात चौकशी सुरू आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील) :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची विशेष बैठक, उद्या मंगळवार दिनांक १५ मार्च २०२२ रोजी सकाळी १० ते १०.४५ या कालावधीत घेण्यात येईल. या विशेष बैठकीमध्ये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११ वाजता भरेल. आजचे सभागृहासमोरील कामकाज संपले आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ६.११ मिनिटांनी मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत